IRBK-0100736

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय चरित्र
दा क्र ७३६

IRBK-0100736
IRBK-0100736

ग्रा ७३६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय क्रमांक
पु. क्र. ७३६ नों दि
वि. ...

# “लोकहितवादी”

म्हणजे

## रावबहादुर गोपाळराव हरि देशमुख फर्स्ट क्लास सरदार राहणार पुणें,

# ह्यांचें चरित्र.

कागदपत्र, उपलब्ध माहिती व स्वतःचा अनुभव इत्यादिकांच्या आधारें लिहिलें.

लेखक—
“ महाराष्ट्रभाषा-चित्रमयूर ”
कृष्णाजी नारायण आठल्ये,
एडिटर ‘ केरळकोकिळ ’.

मुद्रक व प्रकाशक—शंकर नरहर जोशी,
‘ चित्रशाळा प्रेस, ’ १०२६ सदाशिव पेठ पुणें सिटी

१९२६ इसवी

IRBK-0100736

किंमत १२ आणे.

श्री ग्रंथ स…
नं.
ना.

कै० रावब० गोपाळराव हरि देशमुख.



म. क्रं. चरित्र १७२
पा. क्र....७३६
वि. ......चरित्र

# प्रस्तावना

**वदनं प्रसादसदनं सदयं हृदयं सुधामुचोवाचः।**
**करणं परोपकरणं येषां केषां न ते वंद्याः ॥१॥**

मुख हें प्रसादाचें मंदिर; अंतःकरण दयेनें भरलेलें; भाषण अमृतासारखें मधुर; परोपकार हेंच ज्यांचें कर्तव्य, असे पुरुष असतील ते कोणास वंदनीय होणार नाहींत? अर्थात् सर्वांसच वंदनीय होतील हें उघड आहे. हेंच लक्षण रावबहादुर गोपाळराव हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी ह्या गृहस्थांस अक्षरशः लागू आहे. पण या विधानांवर कोणी अशीही शंका काढतील कीं 'सुधा मुचोवाचः' हें वाक्य त्यांना मुळींच लागू पडत नाहीं. कारण त्यांनीं 'लोक-हितवादी' या नांवाखालीं जे अनेक लेख प्रसिद्ध केले आहेत, त्यांत अज्ञानी लोकांवर, आळशांवर व धर्माच्या नांवाखालीं वेडेवेडेचार करणारांवर अतिशय कडक टीका केली आहे. इतकेंच नव्हे तर त्यांमध्यें कित्येक वेळां अतिशय कठोर शब्दांचाही भडिमार केला आहे. मग त्यांची वाणी अमृतासारखी मधुर कशी म्हणतां येईल? ही शंका सकृद्दर्शनीं खरीशी वाटते, पण ती भ्रामक आहे. प्रत्येक गोष्टीला दोन दोन अंगें असतात. एक वैयक्तिक व दुसरें सामाजिक किंवा लौकिकी. किंवा पाहिजे तर त्याला 'तात्त्विक' नांव दिलें तर अधिक योग्य. सूर्य दररोज पूर्वेकडून पश्चिमेस जातो, असें म्हणणें हें शास्त्र-दृष्ट्या व्यर्थ होय. कारण सूर्य जाग्यावरून मुळींच हालत नाहीं. आपली पृथ्वीच आपणांस घेऊन दर तासास एक हजार मैल पूर्वेस जात आहे. हा विचार हल्लींचा एखादा शाळेंतील विद्यार्थीही सांगूं शकेल. बरें; आपण दर तासास हजार मैल वेगानें प्रवास करीत असून व्यक्तिमात्राला त्याचें काडीचेंही ज्ञान नसतें, असा हा वैयक्तिक व लौकिक प्रकार किंवा अनुभव आहे. प्रत्येक बाबींची गोष्ट हीच; एखादा मुलगा खोडकर असला, दुर्व्यसनी निघाला, तर आईबाप त्याला 'गाढव' 'मूर्ख' वगैरे हवे तितके अपशब्द बोलतात, किंवा वरती मारतातही. पण त्यांच्या मनांत त्या मुलाबद्दल यत्किंचित् वाईट असत नाहीं.

तर उलट तें सर्व करणें त्यांच्या हिताकरितांच असतें. त्याप्रमाणेंच लोकहितवादींचा वैयक्तिक हितापेक्षां सार्वजनिक हिताकडे फार ओढा होता. सार्वजनिक हिताकरितां त्यांचें अंतःकरण तिळतिळ तुटत असे. आलस्यांत,दुर्व्यसनांत लोक गर्क झालेले पाहून त्यांच्या आंतड्यांस पीळ पडे. त्यामुळें एखादा मुलगा कोणत्याही उपायानें वळतीवर येत नाहीं असें पाहिलें म्हणजे बाप जसा कडीनिकडीला येऊन अगदीं निर्वाणीचे कठोर शब्द बोलतो, त्याप्रमाणेंच लोकहितवादींच्या लेखांतील हे कठोर शब्द लोकांस केवळ सन्मार्गावर आणण्यासाठीं आहेत, ही गोष्ट विसरतां कामा नये. एरवीं त्यांचें अंतःकरण केवळ ' सज्जनस्य हृदयं नवनीतं ' असेंच होतें. आमचा व लोकहितवादींचा फारसा निकटचा सहवास नव्हता; तरी, आमचा बराच काल त्यांच्या प्रत्येक चिरंजीवाच्या निकट सहवासांत गेल्यामुळें मधून मधून त्यांची कारकीर्द १७।१८ वर्षें आम्हांसही पहावयास मिळाली आहे.त्यावरून आमची तर खात्री झालीच आहे. परंतु ज्यांचा ज्यांचा त्यांच्याशीं प्रत्यक्ष परिचय असेल, त्यांचीही पण खात्री झालीच असेल कीं,लेखामध्यें जितका त्यांचा उग्रपणा दिसून येतो तितका प्रत्यक्ष बोलण्यांत कधींच आढळून येत नसे, इतकेंच नव्हें, तर त्यांना राग म्हणजे काय, कठोर शब्द म्हणजे कसले ते त्यांच्या मुखांतून कधीं चुकूनही येत नसत. म्हणजेः—

**फणसा अंगीं करड काटे।**
**आंत साखरेचे गाटे।**

ह्या तुकोबाच्या उक्तीप्रमाणेंच त्यांची वृत्ति होती. त्यांच्या वृत्तींचा नमुनाच पाहणें असेल तर, त्यांचे हल्लीं हयात असलेल्या उभय चिरंजिवांशीं ज्यांचें निकट सान्निध्य असेल, परिचय असेल, किंवा जे कोणी करून घेतील, त्यांस हुबेहुब लोकहितवादींच्या शांत, मृदु भाषणाची आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं. तरी पण एवढी गोष्ट खरी कीं परोपकार हें लोकहितवादींचें अहर्निश व्रत असल्यामुळें त्यांची वृत्ति चिरंजिवांपेक्षांही अत्यंत उदार व गंभीर होती हें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

गोपाळराव हरींच्या अंगचा हा दातृत्वगुण त्यांच्या वंशजामध्येंही उतरलेला आढळतो. लोकहितवादींचे तिसरे चिरंजीव कै. रामचंद्र गोपाळ उर्फ भाऊसाहेब बी. ए. एल् एल्. बी, बडोदें येथील सरसुभे यांच्या वाटणीस त्यांनीं

अमदाबाद येथील वाडा, एक धर्मशाळा व साठ सत्तर एकर जमीन इतकी ठेविली होती. परंतु भाऊसाहेबांच्या पश्चात् त्यांचे चिरंजीव रा. गोविंदराव हे महाराष्ट्रांतच राहूं लागल्यामुळें गुजराथेंतल्या या जमिनींचा नीट व्हावा तसा बंदोबस्त होईना, ह्यास्तव सन १९०३ सालीं त्यांनीं अमदाबादचा वाडा विकून टाकला व धर्मशाळा आणि इतर पिकाऊ जमीन, सुमारें ६०।७० एकर, जिचा वर्षाचा सारा २००रु. येत होता,ती सर्व जमीन '**माहेपतराव रूपराम अनाथाश्रम**' या संस्थेला बक्षीस दिली. आणि त्यांत विशेष गोष्ट ही कीं ती त्यांनीं, स्वतःच्या वाटणीची असून आपल्या किंवा वडिलांच्या नांवें न करतां आपले कीर्तिमान् आजोबा गोपाळराव हरि यांच्याच नांवानें दिली आहे. ही गोष्ट अत्यंत भूषणभूत होय.

लोकहितवादींच्या रावबहादुरीच्या सेवेपेक्षां कलमबहादुरीची सेवा विशेष महत्त्वाची आहे. कारण रावबहादुरी ही इहलोकच्या प्रभूला रुजूं आहे; परंतु कलमबहादुरीची सेवा जगत्प्रभूच्या ठिकाणीं रुजू आहे. कारण ती त्यांनीं केवळ निरपेक्षबुद्धीनें केली आहे: परोपकारबुद्धि व समाजहित जागृत ठेवून केली आहे; आणि तें व्रत त्यांनीं अखंड पतकरलें आहे. ह्यापेक्षां आणखी भूतदया ती कोणती ?

लोकहितवादींनीं आपल्या निबंधसंग्रहांत ब्राह्मण जातीवर कडक वाग्प्रहार केल्याचा निबंधमालाकारांनीं जरी गवगवा केला आहे तरी त्यांच्याकडे कोणीही ब्राह्मण जावो; तो विद्वान् असो कीं अक्षरशत्रु असो; तरी त्यांनीं कधीं कोणाचा उपमर्द केला नाहीं. उलट त्याची रीतीप्रमाणें कांहींना कांहीं संभावना ही होतच असे. त्यांच्यापुढें कोणत्याही जातीचा याचक आला तरी तो कधीं विन्मुख जात नसे. मग ब्राह्मणाला दक्षिणा मिळेल हें काय सांगावयाला पाहिजे ? लोकहितवादींच्या चरित्रांतील जे अनेक गुण आहेत, ते तर असोतच; पण सर्वांत श्रेष्ठ, सर्ववंद्य व ईश्वरी प्रभावाचा गुण म्हटला म्हणजे 'परोपकार' हाच होय; त्यांत हा ब्राह्मण कीं शूद्र कीं कोणी अन्य ? हा प्रश्नच नाहीं. रस्त्यावर कोणीही दीनदुबळा, अनाथ पंगू दृष्टीस पडला कीं, रावबहादुरांची स्वारी घोड्यावर असली तर घोडा थांबवावयाचा, गाडींत असली तर गाडी थांबवावयाची, व पायानें चालत असतील तर स्वतःच तेथें थांबावयाचें. मग त्याची विचारपूस करून कोणास वस्त्रमात्र,

रोगी असल्यास औषधपाणी, पैसा अडका, खाणेपिणें याची कांहींतरी सोय करून मग पुढें जात असत. हा त्यांचा गुण फार अलौकिक होता. त्याचीं उदाहरणें आम्ही शेंकडों पाहिलेलीं आहेत. व तीं मोठीं गमतीचीं आहेत. पण तीं येथें आतां पुनः देत बसून ग्रंथ वाढविण्यांत अर्थ नाहीं.

परंतु यावर आणखी एक प्रश्न असा उद्भवतो कीं, अशा प्रख्यात पुरुषाचें चरित्र कधींच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होतें, तें आजपर्यंत कसें झालें नाहीं? अशा विख्यात पुरुषाचें चरित्र आजपर्यंत मुळींच होणार नाहीं असें कसें घडेल? त्यांचीं लहान लहान त्रोटक चरित्रें, निबंध,ज्ञानचक्षु, ज्ञानप्रकाश, पुष्पगुच्छ, विविधज्ञानविस्तार, निबंधमाला इत्यादि वर्तमानपत्रांतून व मासिक पुस्तकांतून कैक वेळां प्रसिद्ध झालीं आहेत. एक दोन वर्षांपूर्वी दक्षिणा प्राइझ कमेटीनेंही 'लोकहितवादी' वर निबंध लिहिणारास बक्षीस वगैरे देऊन एक लहानसें स्वतंत्र पुस्तकही छापविलें आहे. तथापि त्यांच्या दप्तरांतील कागदपत्र चाळून, इतर माहिती गोळा करून, साधार व साग्र असें चरित्र आजपर्यंत छापून प्रसिद्ध झालें नव्हतें हें खरें; पण प्रयत्न मुळींच चालू नव्हता असें मात्र नव्हतें, तरी कोणतेंही कार्य शेवटास जावयाला योग यावा लागतो, तो योग आज थोडा उशिरानें कां होईना पण आला, हेंही कांहीं कमी नाहीं.

सुमारें २५।३० वर्षांपूर्वी डॉ० नानासाहेब देशमुख ह्यांनीं आम्हांस मुद्दाम पत्र पाठवून लोकहितवादींचें चरित्र लिहिण्याविषयीं सुचविलें होतें, परंतु त्यावेळीं आम्हीही दुसऱ्या अनेक कामांत गुंतलों असल्यामुळें व मलबारसारख्या दूरवरच्या प्रवासांत असल्यामुळें आम्हांसही तें कार्य अंगिकारतां आलें नाहीं. व नानासाहेबांनीं, त्याबद्दल पुन्हां कांहीं लिहिलें नाहीं. अशाखालीं पांचचार वर्षे गेलीं. पुढें सोलापूरचे कोणी पंडीत नांवाचे गृहस्थ लोकहितवादींच्या परिचयाचे होते. त्यांनीं नानासाहेबांस भेटून आपण तें काम मोठ्या हौसेनें करतों असें सांगितलें. म्हणून नानासाहेबांनीं तें काम त्यांजकडे सोंपविलें. त्याप्रमाणें त्यांनीं लहानसें चरित्र लिहूनही तयार केलें. परंतु कागदपत्र पहावेत ते पाहिले नाहींत. त्यांचे ग्रंथ कोणते त्यांचा शोध केला नाहीं. त्यांच्या कारकिर्दी कोठकोठें कसकशा झाल्या व त्यांत महत्त्वाचे फेरफार काय काय झाले ह्याचाही उल्लेख नव्हता. फक्त सांगावांगीच्या किरकोळ गोष्टी भरल्या होत्या व त्याही लोक-

हितवादींच्या इभ्रतीस मुळींच शोभेशा नव्हत्या. इत्यादि कारणांनीं तें चरित्र अगदींच निरुपयोगी झालें.ते लिहिणारेही पण लवकरच निवर्तले. आणि लोकहितवादींचें चरित्र लिहिण्याचा प्रश्न बरींच वर्षे जसाच्या तसाच राहिला. पुढें केसरीचे माजी लेखक कै० लिमये ह्यांनीं तें काम अंगिकारलें व त्याकरतां मुंबईहून कागदपत्रांचीं पोतीं पुण्याचे चित्रशाळेंत येऊन पडलीं. यासही कांहीं काल लोटल्यानंतर लिमयेही प्लेगनें अकस्मात् कैलासवासी झाले.त्यानंतर श्री. आप्पासाहेब देशमुख पेन्शनर कलेक्टर यांचे जामात रा. सा. अभ्यंकर B.A.LL.B. वकील सांगली यांनींही तें काम आपण हौसेनें करण्याचें पत्करलें.तेव्हां तीं कागदपत्रांचीं चित्रशाळेंतील पोतीं सांगलीस जाऊन पडलीं. तेथें तीं तशींच पांचचार वर्षे होतीं.रावसाहेबांना वकीलीचें काम, म्युनिसिपालिटीचें काम इ.अनेक व्यवसायामुळें त्या कामाकडे लक्ष देण्यास वाव मिळाला नाहीं.अखेर आम्ही मुंबईस कीर्तन मासिकाचा संबंध सोडून पुण्यास यावयास निघालों असतांना सहज डॉ०·नानासाहेबांस भेटावयास गेलों असतां त्यांनीं हें काम आमचेवर सोंपविलें. त्याप्रमाणें आम्ही लागलीच सांगलीस जाऊन कागदपत्रांचीं सर्व पोतीं तपासलीं व त्यांचीं निरनिराळीं फेरिस्तें लावून एकतिस दप्तरें तयार केलीं. व त्यांतून चरित्रास अत्यंत आवश्यक तेवढें कागद निवडून काढून आम्हीं हें प्रस्तुतचें चरित्र लिहून तयार केलें.

कागदपत्रांचा संग्रह इतका विपुल पहावयास मिळाला कीं त्यामुळें किती लिहावें आणि काय लिहावें असें आम्हांस होऊन गेलें. बरेच लिहिलेले ग्रंथ छापावयाचे राहिलेले होते ते वेगळे काढले; ह्या शिवाय फुटकळ लेख होते त्यांचीही विषयवारी लावली.अण्णासाहेबांच्या विलायतेहून आलेल्या पत्रांची फाईल, शामजी कृष्णवर्मांची पत्रें, संस्थानिकांची पत्रें, युरोपियन अमलदारांचीं पत्रें, हीं तर महत्त्वाचीं आहेतच, पण त्यांच्या प्रत्येक मुलांचीं पत्रेंही फार वाचण्यासारखीं आहेत. त्या सर्वांचीं ३१ दप्तरें अनुक्रमणिकेसहवर्तमान तयार करून ठेविलीं,

चरित्रांस आवश्यक म्हणून जेवढे कागदपत्र निराळे काढले होते, तेवढ्यावरूनही चरित्र फारच मोठें होईल असें वाटूं लागलें; इतकेंच नव्हे तर झालेंही होतें. परंतु मागाहून त्यांतही बरीच छाटाछाट करून निव्वळ महत्त्वाची माहिती तेवढीच राहील अशा बेताचें हें चरित्र करण्यांत आलें आहे.

ही अस्सल प्रत तयार होऊनही ५।४ वर्षें पुन्हां तशींच पडून राहिलीं होतीं. ह्याचें कारण रावसाहेब अभ्यंकर ह्यांच्या मनांत आणखी तींत कांहीं महत्त्वाची भर घालावयाचें फार होतें. पण तेही ' लॉ क्लासा 'कडे वगैरे गुंतल्यामुळें तेंही काम त्यांच्यानें झालें नाहीं. पण तोंपर्यंत अशी मौज झाली कीं, ही आम्ही लिहिलेली ' लोकहितवादीं ' च्या चरित्राची हस्तलिखित प्रतच ह्या हातांतून त्या हातांत जात जात दुसऱ्याच लेखकांनीं ह्या प्रतींतील बरीचशी माहिती घेऊन नवीं पुस्तकें लिहून दक्षिणा प्राइझ कमिटींतून बक्षिसें-ही मिळविलीं ! नुकत्याच नव्या काळाच्या परवाच्या एका अंकांत ' लोक-हितवादींचें कार्य ' म्हणून बराच लांबलचक लेख आला आहे. त्यांतच शेवटीं 'आठल्ये ह्यांचा हस्तलेख ' म्हणून जो उल्लेख केला आहे तो हाच होय.

ह्या चरित्राला प्रस्तावना लिहावयाची ती तरी रावसाहेब अभ्यंकर ह्यांनीं लिहावी असा आमचा व इतरांचाही फार हेतु होता. म्हणून आम्हीं त्यांस मुद्दाम त्यासाठीं लोणावळ्यास पत्र लिहिलें. पण त्याच दिवशीं पुणें येथील सुप्रसिद्ध ज्ञानप्रकाश छापखाना दुर्दैवानें जळून खाक झाल्यामुळें ज्यांच्या भिस्तीवर अभ्यंकर त्यांत भर घालणार होतें,तीं ज्ञानप्रकाश वर्तमानपत्राची जुना फाईलेंच त्यांत पार नष्ट होऊन गेली ! त्यामुळें त्यांनाही उमेद राहिली नाहीं. अर्थात् त्यांचा प्रस्तावना लिहिण्याचा बेतही तहकूब झाला. अशा रीतीनें आज बरींच वर्षें तयार होऊन छापून प्रसिद्ध न झालेली ही प्रत सर्व जनांस आम्ही आज प्रेमानें सादर करीत आहोंत.

ह्या देशमुखांच्या घराण्याशीं आमचा फार दिवसापासून घरोबा आहे.रावब-हादुर हयात असतांना त्यांचा अनेक वर्षें आम्हांस प्रत्यक्ष सहवास घडलेला आहे. त्यामुळें लोकहितवादीची मूर्ति अद्याप आमच्या डोळ्यासमोर दिसत आहे;त्यांचे शब्द कानांत घुमत आहेत; आणि त्यांच्या कृति वारंवार अंतःकरणांत स्मरत आहेत. शिवाय त्यांच्या प्रत्येक चिरंजिवांशीं आमचा बराच सहवास घडलेला आहे. कोणाजवळ चार सहा महिने, कोणाजवळ वर्ष दोन वर्षें असा आमचा सहवास होताच आणि प्रत्येकाची कृपा मजवर चढत्या प्रमाणानें आहे असें म्हटलें तरी चालेल. तेव्हां अशा पुरुषाचें चरित्र आपल्याच हातून तयार व्हावें अशी आमची दृढतर इच्छा होती. आणि पहिली संधि फुकट गेली म्हणून मनाला अत्यंत वाईट वाटत होतें.परंतु ईश्वर नियमानें तें कार्य आमच्या हस्तेंच पुरें व्हावें असें होतें; म्हणूनच पुन्हां इतक्या उलाढाली होऊनही तें काम

मजकडेच आलें. तरी तें पुरें होऊन आणखी ५।४ वर्षें तसेंच पडलें म्हणून ही मनाला हुरहुर लागली होती. परंतु आज तीही जाऊन हें चरित्राचें काम पुरें झालें.

ह्यास्तव तीच अल्प सेवा मी लोकहितवादींचे उभयतां चिरंजीव डॉ० नानासाहेब देशमुख एम्. डी. व श्रीमंत आप्पासाहेब देशमुख बी. ए. पेन्शनर कलेक्टर, यांच्या चरणीं प्रेमपुरस्सर अर्पण करून कृतार्थ झाल्याचें समाधान मानतों.

मुक्काम पुणें सिटी
शनवार पेठ घ. नं. ३०६
ता. ९।६।२६

सर्वांचा नम्र सेवक,
**कृ० ना० आठल्ये.**

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे.

# अनुक्रमणिका.

विषय. पान.


| विषय | पान |
|---|---|
| १ प्रस्ताव... | १ |
| २ खानदानी घराणें | ७ |
| ३ जन्म व बालपण | १० |
| ४ व्रतबंध | १६ |
| ५ विद्याभ्यासाची सुरवात | १७ |
| ६ विवाह-समारंभ | १८ |
| ७ आजीबाईचा आधार | २२ |
| ८ आपत्ति | २५ |
| ९ पत्र नं. १ | ३३ |
| १० पत्र नं. २ | ३६ |
| ११ पत्र नं. ३ | ३९ |
| १२ पत्र नं ४ | ४१ |
| १३ अपमानाबद्दल रिपोर्ट व ठराव | ५७ |
| १४ दिनचर्या आणि साहाय्यकर्तृत्व | ६५ |
| १५ विलायत-प्रकरण | ८६ |
| १६ महापूर | ९० |
| १७ साहाय्यकर्तृत्व | ९१ |
| १८ नाशिकची कारकीर्द | १०० |
| १९ जाहिरात | १०१ |
| २० पुण्याची कारकीर्द | १०८ |
| २१ कुटुंबसौख्य | ११० |
| २२ मुलें व त्यांचा गृहशिक्षणक्रम | १११ |
| २३ संततिसौख्य | ११५ |
| २४ पुण्यास केलेले ग्रंथ | १३९ |
| २५ विद्याव्यसन | १४१ |

| विषय. | पान. |
|---|---|
| २६ आक्षेप .. .. .. | १४३ |
| २७ शतपत्राचा इत्यर्थ .. .. .. | १५३ |
| २८ इंग्रजी राज्यापासून फळ .. .. .. | १६८ |
| २९ शाक्तमार्ग .. .. .. | १६९ |
| ३० काळेपाणी .. .. .. | १७२ |
| ३१ दवाखान्याची हकीगत .. .. .. | १८० |
| ३२ रतलामची दिवाणगिरी .. .. .. | १८६ |
| ३३ आपत्ति .. .. .. | १९० |

कै. श्री. सौ. गोपिकाबाई देशमुख.
लग्नांत वय ४ वर्षांचें !!



जन्म सन १८२६ मृत्यु सन १८[illegible]

कै. रावब. गोपाळराव हरि देशमुख.
लग्नांत वय ७ वर्षांचें !



जन्म सन १८२३ मृत्यु सन १८९२

# "लोकहितवादी"

उर्फ

## रावबहादुर गोपाळराव हरि देशमुख फर्स्ट क्लास सरदार राहणार पुणें

# ह्यांचें चरित्र.

**प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ज्यानें केला । तो नर भला भला ।**

मनुष्य प्राणी जन्मास आला कीं, त्या जन्माचें यथायोग्य सार्थक करणें हीच त्याची इतिकर्तव्यता असते. आणि प्रपंच करून परमार्थ साधणें—परोपकार करणें—हेंच जन्माचें खरें खरें सार्थक होय. कर्तव्य हें प्रत्येकाचे मागें लागलेंच आहे, पण तें मनोनिग्रहानें यथासांग पार पाडणें ही मोठी कुशलता आहे, एक प्रकारची हातोटी आहे; ती सर्वांसच साधते असें नाहीं. नाहींतर-

"**आला आला प्राणि जन्मासि आला ।**
**गेला गेला बापुडा व्यर्थ गेला ॥ १ ॥**"

अशा नमुन्याचे तांडेच्या तांडे आज अनंत युगें ह्या भवचक्राच्या फेऱ्यांत गिरक्या खात पडलेलेच आहेत. बहुतेकांची दशा हीच, कारण वरील गोष्टी साधण्यास अलोट बुद्धिमत्ता, प्रचंड धैर्य, कट्टा मनोनिग्रह, अखंड उद्योगशीलता, विद्याभिरुचि, दया, क्षमा, लीनता इत्यादि अनेक सद्गुण अंगामध्यें मुरावे लागतात. हे गुण मनुष्यामध्यें एकदां प्रकाशमान झाले कीं मग दैव अनुकूल असो कीं प्रतिकूल असो तो आपलें कार्य साधतोच. परंतु अशा

महात्म्याला दैव प्रतिकूल असणें म्हणजे बहुधा सूर्याला अंधःकारानें झांकण्यासारखें आहे. कारण दैव हें उद्योगाचे नेहमीं दासच बनलेलें असतें. "उद्योगाचे घरीं ऋद्धिसिद्धि पाणी भरी" ही म्हणही प्रसिद्धच आहे; पण तितक्यातूनही जरी तें प्रतिकूल झालें तरी सुद्धां तो त्यांतून उत्तम रीतीनें पार पडतो. आतां असे पुरुष विरळा आढळतात ही गोष्ट खरी आहे. एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे:—

**"शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे**
**साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने ॥ १ ॥"**

प्रत्येक पर्वतावर कांहीं माणकें सांपडत नाहींत; किंवा दरएक हत्तीच्या गंडस्थळांत मोतीं मिळतें असें थोडेंच ! दिसेल त्या रानांत जाऊन चंदनाचे वृक्ष पाहूं लागले तर कोठून मिळतील ? त्या प्रमाणेंच सत्पुरुषही कांहीं वाटेवर पडलेले नसतात. तेही फार क्वचितच जन्मास येतात.

मनुष्याला आपल्या व आपल्या कुटुंबाच्यानिर्वाहा करितां प्रपंच करावा लागतो. त्या प्रपंच्याच्या निर्वाहाचें साधन म्हणजे राजाश्रय किंवा व्यापारधंदा. राजाश्रय मिळाला म्हणजे प्रपंच–निर्वाहाचें साधन होतें हें खरें; पण परमार्थासाठीं परोपकार करणें–जनहित साधणें–हाच मनुष्याचा मुख्य धर्म आहे. आपलें पोट कोण भरीत नाहीं? रानांतले पशुपक्षी सुद्धां भरतात. पण आपल्याबरोबर इतर जनांचेंही जो कल्याण करतो तोच खरा सत्पुरुष होय. तोच इहलोकीं धन्यता पाऊन परलोकींही शांतिसुखाचा उपभोग घेतो. असे जे कोणी सत्पुरुष धन्यवाद घेऊन गेले त्यांतच "लोकहितवादी" किंवा रावबहादूर गोपाळराव हरि देशमुख ह्या थोर पुरुषाची गणना करतात. म्हणून आज आम्ही त्यांचें (शक्य तेवढें) विस्तृत चरित्र प्रसिद्ध करीत आहों.

परंतु येथें सामान्य जनांच्या मनांत अशी एक शंका येण्याचा संभव आहे कीं 'रावबहादुर गोपाळराव हरी देशमुख,' हें नांव ठीक झालें, पण **'लोकहितवादी'** हें काय ? **'जस्टिस ऑफ धि पीस'**, सारखी एखादी पदवी तर सरकारांनीं दिलेली नाहींना ? आणखी त्यांना जाऊन बराच काल लोटल्यामुळें व त्यांचे लेखही आतां फारसे उपलब्ध नसल्यामुळें तर ही शंका येण्याला पुष्कळच जागा आहे. म्हणून त्या संबंधानें येथेंच थोडासा खुलासा करून ठेवतों म्हणजे वाचकांस फार वेळ ह्यासंबंधानें बुचकळ्यांत पडावयास

नको. सदरचे चरित्र-नायक म्हणजे रावबहादुर गोपाळ रावजी देशमुख हे ब्रिटिश सरकारच्या अव्वल अमदानींतील एक मोठे थोर अंमलदार होऊन गेले. त्यांस पगारही तसाच मोठा होता. व त्याप्रमाणेंच त्यांचें औदार्यही, अत्यंत तारीफ करण्यासारखें होतें; ते नेहमीं गोरगरिबांचा परामर्ष घेत असत. पण ह्याशिवाय ते लोकांस सन्मार्गास लावण्यासाठीं जो लेखनद्वारें उपदेश करीत तो केवळ अपूर्व होय. ते घरंदाज होते; त्यांचा पगार त्यास गाद्या-गिरद्या पुरविण्यासारखा होता, तरी ते त्यांवर चैनीनें लोळत न पडतां आपलें काम यथास्थित संभाळून फावल्या वेळांत निरपेक्ष बुद्धीनें लोक-कल्याणासाठीं युक्तिवादाचे शेंकडो लेख लिहीत असत. परंतु असे लेख कडू औषधा-प्रमाणें ते केव्हां केव्हां असमंजस जनास रुचत नाहींत. निदान प्रथम तरी त्यांस थोडेसे झोंबतात. म्हणून वर्तमानपत्रांतील अशा लेखाखालीं आपलें खरें व प्रचारांतलें नांव लिहिण्याची बहुधा वहिवाट नाहीं. त्यासाठीं 'क्ष', 'वाचक', अशीं टोपण नांवें धारण करून तींच त्या लेखाखालीं घालण्याची रीती आहे. त्यास अनुसरून आपल्याही अंगिकारलेल्या लोकसेवेच्या व्रतास साजेसें त्यांनीं "**लोकहितवादी**" हें नांव धारण केलें होतें व ह्याच 'लोकहितवादी'च्या लेखावर 'निबंधमाले'सारख्या मासिक पुस्तकांतून टीका वगैरे झालेल्या आहेत. तेव्हां 'लोकहितवादी' हें त्यांचें स्वीकृत नांव त्याकाळीं सर्वांस माहीत होतें आणि त्यांचे सारे लेख ह्याच नांवानें बहुधा ओळखले जातात, म्हणून त्या लोकप्रसिद्ध नांवाचा आम्ही त्यांचे नांवाबरोबरच उल्लेख केला आहे.

खरें म्हटलें तर अशा थोर व नामांकित पुरुषाचें चरित्र ह्यापूर्वीं कधींच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होतें. परंतु आजपर्यंत तसा योग आला नाहीं ही खरोखरीच दिलगिरीची गोष्ट आहे. कारण त्यांना परलोकवासी होऊन आज तिसावर वर्षें झालीं. आणि जसजसा हा काल अधिक अधिक लोटत जाईल तसतशी त्यांच्या बद्दलची माहितीही नष्टच होत जाणार. तेव्हां आज मितीस उपलब्ध झालेल्या माहितीवरूनच का होईना त्यांचें हें चरित्र लिहून तयार झालें हेंच मोठें सुदैव होय. **'अकरणात्मंदकरणं श्रेयः'** अशी एक म्हण आहे. हें चरित्र आजपर्यंत न घडण्यासही अनेक कारणें झालीं आहेत. तीं येथें देत बसणें उचित नव्हे. तरी पण ह्या महात्म्याचें चरित्र आजपर्यंत

मुळींच कोणीं लिहिलें नाहीं असें नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी '**बालबोध**' मासिक पुस्तक, सुप्रसिद्ध लेखक कै. विनायक कोंडदेव ओक ह्यांच्या नेतृत्वाखालीं 'निर्णयसागर' छापखान्यांत निघत होतें. त्या वेळीं त्यामध्येंही 'लोकहितवादीं'चें सचित्र चरित्र आलेलें आहे. तें बऱ्याच वाचकांना अवगत असेल. तसेंच गुजराथी भाषेमध्येंही एक '**गोपाल चरितम्**' म्हणून गद्यपद्यात्मक पुस्तक असल्याचें ऐकतों. ज्ञानप्रकाश, पुष्पगुच्छ, देशहितैषी, थिआसोफिस्ट, ज्ञानचक्षु इत्यादि ठिकाणींही त्यांची त्रोटक माहिती आहे. पण हीं सर्व चरित्रें अगदींच त्रोटक आहेत. तसेंच सन १८८६ मध्यें **आर्. एच्. जालभाई** ह्या पार्शी गृहस्थांनीं

**"the portrait gallery of western india"**

"थि पोर्ट्रेट ग्यालरी ऑफ वेस्टर्न इंडिया" ह्या नांवाचा एक इंग्रजी व गुजराथी फार मोठा व सर्वोत्कृष्ट ग्रंथ केला आहे. त्यांत दक्षिण हिंदुस्थानांतील नामांकित पुरुषांचीं इंग्रजी व गुजराथी भाषेमध्यें फार परिश्रमानें मिळविलेलीं त्रोटक चरित्रें देऊन विलायतेंतील नामांकित कारागिराकडून तयार केलेलीं चित्रेंही पण त्यांत घातलीं आहेत. ह्यांत दिलेली माहिती जरी अगदीं निवडक व महत्त्वाची आहे, तरी त्यांत कांहीं चुकाही आहेत. उदाहरणार्थ 'लोकहितवादी'चें चरित्रच का घ्याना ? लोकहितवादींना खरोखर ६ पुत्र असून ह्या चरित्रांत ५ म्हणूनच लिहिलें आहे ! आणि रावबहादुर कृष्णराव ऊर्फ अण्णासाहेब जे ब्राह्मण जातींतील पहिलेच ब्राह्मण विलायतेस जाऊन ब्यारिस्टर होऊन आले, त्यांचें नांवही नाहीं, व उल्लेखही नाहीं ! ह्याकरितां आम्ही आज मितीला ह्या थोर पुरुषाच्या संबंधानें जेवढी माहिती उपलब्ध करवेल तेवढी करून त्यावरून तयार केलेलें चरित्र हें वाचकांपुढें ठेवीत आहों. ह्याच्या वाचनानें उद्योगाचें माहात्म्य, धैर्याचें पाठबळ, सदाचाराचें फळ, विद्येची महती, परोपकाराचें सामर्थ्य,व कालाची परिस्थिति इत्यादि अनेक गोष्टी डोळ्यापुढें उभ्या राहून मानवी ज्ञानांत थोड्याबहुत अंशानें तरी भर पडेल अशी आशा आहे.

पण हें चरित्र लिहिण्यास आरंभ करण्यापूर्वीं **तत्कालीन स्थितीचें** थोडेसें तरी दिग्दर्शन करणें अवश्य आहे. कारण कोणत्याही चरित्र नायकाचे आचार, विचार व कृति हीं सारीं त्यावरच अवलंबून असतात. त्यांत जर का राज्यक्रांतीचा संबंध आला, तर मग काय ? बोलणेंच नाहीं. कारण राज्य-

क्रांति झाली कीं, कालमन्वंतराचें सारेंच पारडें फिरुन जातें. आमच्या चरित्रनायकाचे जन्मस्थानीं हाच योग आल्यामुळें त्या वेळच्या उलाढालीचा उल्लेख करणें भाग आहे. ही राज्यक्रांति कोणती ? तर शेवटच्या बाजीरावाचें सुमारें ७०००००० सात कोटींचें राज्य इंग्रज कंपनीनें हरण करुन त्यास ब्रह्मावर्तास नेऊन स्नानसंध्या करीत दसावयास लावलें ही होय. हाय ! हाय ! **भरतखंडावर** केवढा बरें हा दारुण प्रसंग ! दसईच्या तहानंतर थोड्याच वर्षांनीं जिकडे तिकडे टोपीवाले पसरले. ब्राह्मणी बादशाही ठार झाली. स्वराज्य होतें तें पार रसातळास गेलें ! आम्ही सारे हिंदु लोक स्वराज्य गेलें म्हणून हळहळतों. पण आमच्या चरित्रनायकाचें स्वराज्यच नव्हे तर 'स्वज्ञाति–राज्य' नष्ट झालें. तेव्हां त्यास व त्यांच्या वाडवडिलांस किती बरें दुःख व्हावें ? त्यांचे झाडून सारे पूर्वज पेशव्यांचे एकनिष्ठ सेवक,उजव्या हातचे सरदार; तेव्हां ह्या खानदान घराण्याला हा प्रसंग पाहून किती बरें वाईट वाटलें असेल ? ह्याची केवळ कल्पनाच केली पाहिजे. त्याचा थोडासा भाग पुढें येईलच. ब्राह्मणी बादशाही संपून टोपीवाल्यांची बादशाही सुरू होतांच एकदम सारा मनु बदलला. पुणें पहिलेंच असून त्याचें धिग्जिणें असें वाटूं लागलें. ब्राह्मण लोकांचें सारेंच वैभव नष्ट झाल्यानें त्यांना तर दाही दिशा शून्य वाटूं लागल्या. त्यांना यजमानच नाहीं मग मान कुठला ? श्रीमंत देशोधडीला लागले; नाना फडणीसांचें नांवच बुडालें; बापू गोखल्यांनीं स्वर्गाची वाट धरली. साडेतीन शहाण्यांपैकीं अर्धा तर काय पण पावशहाणा सुद्धां कोणी उरला नाहीं. पहावें तों घरोघर शहाणे व घरोघर श्रीमंत !* सारा गांव मामाचा पण एक नाहीं कामाचा अशी अवस्था प्राप्त झाली. जे टोपीवाले पूर्वी बूट काढून हात बांधून नानापुढें चोरुन तोफ × आणल्याबद्दल नाकदुरया काढीत होते-

---

* पेशवाईंत पेशव्यांच्या घराण्याशिवाय कोणच्याही नांवामागें श्रीमंत अथव नांवापुढें साहेब हे लावीत नसत.

× ह्याविषयीं पेशव्याच्या बखरींत असा उल्लेख आहे कीं,नाना फडणीसांनीं इंग्रजांस पुण्यांत मुंबईहून व्यापाराचें जिन्नस व त्यांस खाण्यापिण्यास लागणारें सामान आणण्याची परवानगी दिली होती; त्याप्रमाणें इंग्रजांचें सामान मुंबईहून पुण्यास बिनहरकत येत असे. असें असतां एकदां इंग्रजांचें सामान पुण्यास येत असतां

[ पुढें चालू ]

तेच टोपीवाले—ज्यांना बेटांतून शहरांत परवान्याशिवाय येण्याची मोकळीक नव्हती.—तेच आतां वर नाकानें बूट पाटलोण घालून साऱ्या शहरांतून मिरवूं लागले ! वेदशास्त्राच्या शाळा जाऊन तेथें इंग्रजीचा फलफलाट झाला. लोड तक्के जाऊन खुर्च्या टेबलांचा सुळसुळाट झाला. हातावर शालजोड्या लटकावणारे शास्त्री जाऊन स्टॉकिंग बूटवाले रावबहादुर चमकूं लागले. वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणास ओगराळ्यांतून रुपायांची दक्षिणा मिळत असे ती बंद होऊन तिच्यावर डेक्कन कॉलेज बनलें ! भारत,रामायण, वगैरे ऐतिहासिक बखरी मागें पडून जिकडे तिकडे मारिस वगैरे आंग्ल पंडितांचे इतिहास वावरूं लागले. विटाळ, चांडाळ, जातिभेद संपुष्टांत येऊन 'बाजूला हो ' म्हणण्याची सोय राहिली नाहीं. ज्या भूदेवांस पूर्वी परकीयांचा विटाळ सुद्धा खपत नसे त्यांसच हां हूं न म्हणतां साहेबांच्या हातांत हात घालण्याचा प्रसंग आला ! व सोवळें ओवळें चटसारें गुंडाळून ठेवावें लागलें. तेव्हां अर्थात कालच फिरल्यामुळें प्राचीन वेदविद्यारूप पवित्र भागीरथीचें स्नान बंद करून ह्या नव्या आंग्ल विद्यारूप नवविद्याभांडारांत बुडी मारण्याकरितां सर्वांसच कंबर कसणें भाग पडलें. असो.

तर अशा ह्या अश्रुतपूर्व रूपांतराच्या स्थितींत वेदविद्येला मान नाहीं; नव्या उलाढाली कांहीं समजत नाहींत. राज्यकर्त्यांशीं धड बोलतां सुद्धां येत नाहीं असें झालें. तेव्हां ब्राह्मणांना साहजिकपणें असें वाटूं लागलें कीं,

---

घाटांतील चौकीवरील पहारेकऱ्यांनीं तें अडकविलें व पुण्यास जाऊं देण्याचें नाकारलें. तेव्हां इंग्रजांचे वकीलांनीं नाना फडणीसाकडे इंग्रजांचें सामान घाटांत चौकीदारांनीं अडविल्याबद्दल तक्रार केली. त्यांस नानांनीं उत्तर केलें कीं इंग्रजांचें सामान अडकाविलें तें बरोबर आहे. कारण त्यांत व्यापाराचे अगर खाण्यापिण्याचे जिन्नस नसून तोफ व दारूगोळे वगैरे लढाईचें सामान आहे. हें नानांचे उत्तर ऐकून इंग्रजांचे अगदीं गुप्त कारस्थान नानास कसें कळलें याचें त्या वकिलास अत्यंत आश्चर्य वाटलें व नानांनीं सांगितलेली गोष्ट खरी असल्यामुळें, तो अगदीं लज्जित झाला. त्यानें मुकाट्यानें नानांचा निरोप घेऊन इंग्रजी रेसिडेंटास झालेली हकीकत सांगितली. ती ऐकून रेसिडेंटांनीं मुंबईसरकारास कळविलें कीं पुण्यास नाना फडणीस आहेत तोपर्यंत आपला शिरकाव पेशव्यांचे राज्यांत होणें शक्य नाहीं.

आतां ही आपली भटपणाची विद्या सोडून किंवा गृहस्थांनीं खर्डेघाशीस रजा देऊन इंग्रजी शिकून पोट भरावें हेंच बरें.

## खानदानी घराणें.

अशा ह्या वर सांगितलेल्या देशाच्या व्युत्क्रम स्थितींतच आमच्या चरित्र नायकाचा जन्म झाला. म्हणजे अर्थातच त्यांच्या वडिलांनीं पेशवाईच्या किंवा श्रीमंतीच्या अखेरच्या वैभवांचा उपभोग घेतला. व चिरंजीवांनीं ब्रिटिश रियासतीच्या अव्वलीच्या वैभवाचा उपभोग घेतला. ह्याकरितां प्रथम त्यांच्या वाडवडिलांची इभ्रत, वैभव, राहणी, वगैरे थोडक्यांत सांगून मागाहून चरित्र-नायकाच्या कथानकास सुरवात करूं. ह्या घराण्याचा मूळ पुरुष विश्वनाथ ह्या नावाचा होता. तो गोपाळरावांचा निपणजा. ह्यांचें मूळचें उपनांव 'सिद्धये' असें आहे. हे मूळचे कोंकणचे रहिवाशी. विश्वनाथपंत हे आपल्या प्रांतीं 'देशमुखी' करून सुखवस्तु राहात असत. परंतु 'देशमुखी' म्हणजे काय, हें सुद्धां आज कितीएकांस कळणार नाहीं. म्हणून त्याचाही खुलासा करतों. पूर्वी गांवचा सरकारी वसूल करणें तो कोणीतरी लायक मनुष्य करून देण्याचा मक्ता घेत असे. व त्याजबद्दल त्यांस सरकारांतून १० टक्के कमिशन मिळे. अशा वसूल करणारास 'देशमुख' व त्या वतनास 'देशमुखी' असें म्हणत असत. विश्वनाथपंतांनीं अशा प्रकारचें १२ गांवचें 'देशमुखी' चें वतन खरेदी केलेलें होतें. विश्वनाथपंत हे चित्पावन जातीचे अर्थात पेशव्यांचेच जातीचे ब्राह्मण होत. ह्यांस कोंकणस्थ ब्राह्मण असेंही म्हणण्याचा परिपाठ आहे. पूर्वीचे ब्राह्मण म्हटले कीं ते बहुधा सात्त्विक वृत्तीचे असावयाचे. त्याप्रमाणें हें घराणेंही सात्त्विक वृत्तीचें होतें. आल्या गेल्या अतिथीस भोजन घालणें हें तर त्यांचें कुलव्रत. विश्वनाथपंतास चाळिसाव्या वर्षी एकच पुत्र झाला. त्याचें नांव नारायण. विश्वनाथपंतांचा जन्म सन १६५० मध्यें झाला होता. व नारायणरावाचा जन्म सन १६९० मध्यें झाला. विश्वनाथ पंत हे आपल्या साठाव्या वर्षी म्हणजे सन १७१० मध्यें वारले. त्यावेळीं त्यांचा मुलगा नारायण हा वीस वर्षांचा होता.

नारायणरावास—१ वामनराव, २ गोविंदराव, ३ अंताजीपंत, व ४ लक्ष्मणराव असे चार मुलगे होते. अर्थात विश्वनाथपंतांचें कुटुंब ह्या पिढीपासून वाढत चाललें. तेव्हां सर्वांनीच कोंकणांत राहून येवढ्या कुटुंबाचा निर्वाह व्हावा

कसा, ही चिंता उत्पन्न होऊन बाळाजी विश्वनाथ पेशवे व भानू ज्याप्रमाणें पूर्वी कोंकणांतून निघून घाटमाथ्यावर येऊन सातारच्या महाराजांच्या आश्रयास राहिले, त्याप्रमाणें हे चौघेहि बंधु सन १७५४ मध्यें पुण्यास आले. त्यांत लक्ष्मणराव हे चौघांतही फार हुशार असून नाना फडणीसांची त्याच्यावर फार बहाल मर्जी असे. त्यावेळीं पुण्यास फड म्हणून फडणीसांच्या हाताखालीं पेशवाईच्या सर्व कामाची एक मोठी कचेरी होती. तेथें सर्व राज्यांतून पत्रें येऊन त्यांस उत्तरें जात असत. तेथें त्यावेळेस नवीन मुत्सद्दी तयार होत. कोंकणांतून नवीन आलेली होतकरू व हुशार मुलें तेथेंच ठेवीत. तेथेंच या चारी बंधूंस चाकऱ्या लागल्या. अशा प्रकारें चारी बंधूंची पुण्यास सोय झाल्यानंतर नारायणराव हे सन १७६० त कोंकणांत आपल्या गावीं वारले. लक्ष्मणराव देशमुखांची स्वामिभक्ति किती निस्सीम होती ह्याची साक्ष पुढील गोष्टीवरून चांगली पटते. श्रीमंत नारायणराव पेशवे मारले गेले तेव्हां त्यांची पत्नी गंगाबाई गरोदर होती. तिचें चांगलें संरक्षण व्हावें म्हणून नानांनीं तिला पुरंदरच्या किल्ल्यांत नेऊन ठेवलें व तिच्या तैनातीस आपल्या पूर्ण विश्वासांतील लक्ष्मणराव देशमुख यांची नेमणूक केली होती. पुढें एके दिवशीं कोणी येऊन नानांस अशी बातमी सांगितली कीं, "राघोबादादांनीं गंगाबाईस किल्ल्यांतून पळवून नेलें." तें ऐकून नाना म्हणाले "पण लक्ष्मण नारायण देशमुख मेल्याची बातमी अद्याप आली नाहीं !" अहाहा ! ह्याचें नांव विश्वास व ह्याचें नांव स्वामिभक्ति ! त्यांची खात्री होती कीं लक्ष्मणराव जिवंत आहेत तोंपर्यंत गंगाबाई दुसऱ्याचे हातीं लागणें शक्य नाहीं. पुढें गंगाबाई किल्ल्यावर प्रसूत होऊन त्यांस पुत्ररत्न झालें. तेच सवाई माधवराव होत. लक्ष्मणरावांची एकनिष्ठा व हुशारी पाहून नानांनीं त्यांस बांकेड म्हणून एक गांव जिल्हा रत्नागिरी तर्फ लांजे पैकीं इनाम करून दिला. तें गांव लक्ष्मणराव यांनीं आपल्या एकट्याच्या नांवें इनाम न घेतां आपणासह चारी बंधूंच्या नांवावर घेतलें. तें अद्यापि त्यांच्या वंशजांकडे चालू आहे. ह्या चारही बंधूंचीं जन्मल्याचीं वर्षें मिळालीं नाहींत, परंतु ते अनुक्रमानें सन १७८२, १७९२, १८०२ व १७८७ ह्या सालांत परलोकवासी झाले. ह्या चारही बंधूंस प्रत्येकास पुत्रसंतति होती. हे सारे पेशव्यांचे एकनिष्ठ सेवक असून सर्वजण कमीजास्ती प्रमाणानें चांगल्या अधिकाराला पोंचले होते. चिंतो

वामन देशमुख तर नानाफडणीस वारल्यानंतर पेशव्यांचे फडणीसच होते, हें पेशव्यांच्या बखरींतही नमूद आहे. हरि गोविंद हे पेशव्यांचे शेवटले मुख्य सेनापती वापू गोखले यांचे फडणीस होते. तिसरे कृष्णाजी अनंत हे सरदार विंचूरकर यांचे फडणीस होते. हरिपंताकडे १०००० चा सरंजाम होता, व स्वारी खर्चासाठीं १२००० ची नेमणूक होती. हरिपंत हेच आमच्या चरित्र नायकांचे म्हणजे गोपाळरावजींचे वडील होत. अर्थात:—
१ गोपाळराव हरि—२ हरि गोविंद—३ गोविंद नारायण—४ नारायण विश्वनाथ.

अशी ही चरित्रनायकापासून विश्वनाथपंता पर्यंत वंश परंपरा लागते. गोपाळरावांच्या वडिलांचें नांव हरिपंत हें वर आलेंच आहे. मातोश्रींचें नांव काशिबाई. ह्या वासुदेव अनंत वर्वे कुर्धेकर ह्यांच्या कन्या होत. हरिपंत हे सरदार गोखले—म्हणजे पेशव्यांचे मुख्य सेनापति—ज्यांस वापू गोखले असें म्हणतात, त्यांचे फडणीस. धोंडो वल्लाळ गोखले ह्यांची धोंडी वाघावरोवर लढाई झाली त्यांत धोंडोपंत गोखले पडले. त्या स्वारींत त्यांच्या बरोबर हरिपंत देशमुखही होते. पण ते बचावून आले. पुढें वापु गोखले, चिंतामण पांडुरंग पटवर्धन व वसली साहेब या त्रिवर्गाच्या फौजेनें वाघास मारलें. तेव्हां गोखले, साहेबावरोवर पुण्यास आले. तों पुन्हां त्यांस वसली साहेवांवरोवर दौलतराव शिंद्यावर पाठविलें. त्यांची सरजे अंजनगांवीं अजंठ्याजवळ लढाई होऊन शिंदे पराभव पावले. नंतर परशुराम पंडित प्रतिनिधी यांनीं कऱ्हाडास वंड* केलें होतें त्याजवर गोखले यांची नेमणूक झाली. तेव्हां त्यांच्यावरोवर हरिपंतही गेले होते. त्या स्वारींत प्रतिनिधींचा पराभव होऊन इ० स० १८०७ मध्यें त्यास पुणें येथें कैद करून आणलें तेव्हां त्या स्वारी बरोबर हरिपंत ही पुण्यास आले.

पुढें श्रीमंतांचें व इंग्रजांचें बिघडल्यावर वापू गोखले यांच्या ठिकठिकाणीं लढाया झाल्या. शेवटीं गोपाळपूर अष्टे येथें जनरल स्मिथ साहेबाशीं लढाई होऊन त्यांत बापू साहेब पडले, तेव्हां बापू साहेबांचे शिल्लक राहिलेलें लष्कर श्रीमंत पुणें सोडून उत्तरेकडे जात होते त्यांस जाऊन मिळाले. त्यांत हरिपंत देशमुखही होते. पुढें अशीरगडानजीक श्रीमंत व जनरल मालकम

---

* खरोखर पाहिलें तर प्रतिनिधींनीं कांहीं वंड केलें नव्हतें, तर त्यांच्या मायलेकरांतील तो तंटा होता.

त्यांची गांठ पडली. तेथें श्रीमंतांनीं आपलें सर्व राज्य इंग्रजांस अर्पण करून आठ लाखांची पेन्शन नेमून घेऊन आपण ब्रह्मावर्तास रहावयास गेले. तेव्हां हरिपंत हे श्रीमंतांचे आज्ञेनें पुण्यास आले; ते त्यांचे वकील म्हणून पुण्यास होते. श्रीमंतांनीं पुणें सोडल्यावर इंग्रजांनीं एक जाहीरनामा काढला कीं, "श्रीमंतांचा पक्ष सोडून सर्व लोकांनीं एलफिस्टन साहेबास येऊन भेटावें. ह्यास दोन महिन्यांची मुदत ठेवली आहे. तेवढ्यांत जो कोणी येणार नाहीं, त्याची पुढें कोणत्याही प्रकारची तजवीज होणार नाहीं." ह्या दोन महिन्यांत हरिपंत हे श्रीमंतांच्याच स्वारींत असल्यानें साहेबांस भेटावयास गेले नाहींत. तेव्हां अर्थात हरिपंताकडे ३ गांव जहागीर होते ते जप्त झाले. पण पुढें श्रीमंतांच्या रदबदलीनें त्यांचे ते तीन गांव **सन १८२४** मध्यें म्हणजे **गोपाळराव एक वर्षाचे असतांना** इंग्रज सरकारनें त्यांचे हवाली केले. इतकेंच नव्हे, तर मागची सर्व उत्पन्नाची रक्कम सुद्धां दिली. ह्या गावाचें सालीना उत्पन्न १०,००० दहा हजारांचें होतें. हरिपंत ह्यांस ४ पुत्र होते. पहिले परशुरामपंत हे पहिले कुटुंबापासून झालेले होते. दुसरे, चिंतोपंत हे बार्शीस व इतर ठिकाणीं मुनसिफ होते. तिसरे, गोपाळराव—हेच आजचे आमचे चरित्र नायक असल्यानें ह्यांचें संपूर्ण चरित्र पुढें येणारच आहे, सबब येथें त्यांच्यावद्दल कांहींच सांगणें नको. चवथे, गोविंदराव—हे तळेगांवास व इतर ठिकाणीं मुनसिफ होते.

## जन्म व बाळपण.

येथ पर्यंत चरित्र नायकाच्या वाडवडिलांचा थोडक्यांत इतिहास झाला. आतां खुद्द त्याच्या जन्मापासूनच त्याच्या चरित्रास प्रारंभ करूं. रावबहादुर गोपाळराव हरि देशमुख ज्यांनीं लोकहिताप्रीत्यर्थ लिहिलेल्या लेखाखालीं त्या व्रतास योग्य असें ' लोकहितवादी ' नांव धारण केलें होतें,—त्यांचा जन्म पुणें येथें त्यांचे वाड्यांत ता. १८ फेब्रुवारी सन १८२३ ह्या दिवशीं झाला. ह्यांच्या मातुश्रीचें नांव काशीबाई असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. ह्या बाई महा साध्वी व सुशील होत्या. गोपाळराव हे लहानपणीं अंगानें गुटगुटीत होते. त्यांची शरीरकाठी पहिल्यापासूनच बळकट होती. कपाळ विस्तीर्ण, डोळे पाणीदार, वर्ण गोरा, छाती, गाल, पिंढऱ्या, हनुवटी वगैरे भरदार. ही त्यांची ठेवण अगदीं लहानपणापासून तों बहुतेक शेवट पर्यंत कायमच होती. ह्यामुळें त्यांच्याकडे पाहिलें म्हणजे कोणाचेंही मन सुप्रसन्न होत असे.

पुढें गोपाळरावास पांचवें सहावें वर्ष लागू लागलें तसतसें तें आपल्या समवयस्क खेळगड्यांस जमवून त्यांत नाना प्रकारचे खेळ खेळू लागलें. परंतु साऱ्या मुलांत गोपाळरावांची नेहेमीं वरकडी असे. शरीर निकोप, काठी बळकट, ताकदवान्, आणि मुद्रा पाणीदार, नेत्र तरतरीत, बोलणें ठासून व दिलदार यामुळें साऱ्या मुलांवर त्यांचें सहजीं वजन पडत असे. शिवाय गोपाळराव कधीं कोणाच्या वाटेस जात नसत इतकेंच नव्हे तर उलट प्रत्येकास कांहींनां कांहींतरी मदतच करीत. न्यायीपणानें बोलावयाचें व वागावयाचें, असा त्यांचा नेहेमींचा परिपाठ असे. एक वेळ असें झालें कीं, चेंडू खेळत असतां एका मुलाचा चेंडू उडून तो दुसऱ्याच्या घरांत पडला. तो त्या घरांतल्या मुलास सांपडला. दुसऱ्या दिवशीं पुन्हां मुलें चेंडूनें खेळूं लागलीं असतां तो सांपडलेला चेंडू घेऊन त्या घरचा मुलगाही तो आपला चेंडू घेऊन खेळूं लागला. परंतु आदल्या दिवशीं ज्या मुलाचा चेंडू हरवला होता त्या मुलानें तो आपला चेंडू ओळखला आणि म्हणूं लागला कीं ' हा चेंडू माझा आहे, हा काल तुझ्या घरांत जाऊन पडला होता.' तो दुसरा मुलगा म्हणे 'हा चेंडू माझ्या घरांत सांपडला तेव्हां तो माझा आहे, ' असें म्हणून ते दोघेही भांडूं लागले. अखेर तें भांडण सर्वांनीं गोपाळरावांकडे आणलें. तेव्हां गोपाळरावांची मुंज सुद्धां झाली नव्हती ! तरी तें सर्व ऐकून म्हणाले " अरे समज; एखाद्याची कांहीं वस्तु चुकून आपल्या घरीं पडली, तर आपण ती ज्याची त्याला देऊं नये काय ? तिला आपलीच म्हणावी ? उद्यां एखाद्याची हिऱ्याची आंगठी तुझ्या घरांत पडली, तर तिलाही तूं आपलीच म्हणणार काय ? छे ! हिऱ्याची आंगठी सुद्धां ज्याची त्यालाच दिली पाहिजे. नाहीं तर लोक काय म्हणतील ! हे: ! वेडा आहेस तूं. चेंडु तो काय ? आणि त्याच्यासाठीं खोटें बोलून भांडतोस तें काय ? प्राण गेला तरी आपण खोटें बोलूं नये. टाक देऊन त्याचा चेंडू त्याला. तुला खेळावयास पाहिजे असल्यास हा घे माझा. " असें बोलून त्यांनीं आपला चेंडू त्या मुलास दिला. तेव्हां तो खजील होऊन त्यानें मुकाट्यानें ज्याचा चेंडू त्यास देऊन टाकला.

' मोठेपणाचीं चिन्हें लहानपणींच दिसूं लागतात ' अशी एक आपल्यांत म्हण आहे; आणि तिचें प्रत्यंतर बहुधा अनेक ठिकाणीं आढळून येतें. बडोद्याच्या महाराणी जमनाबाई साहेब ह्या एका पाटलाच्या घरीं जन्मल्या होत्या,

तरी त्या लहानपणीं कसला तरी हत्ती करून त्यावर नेहमीं बसत असत! तेंच भविष्य पुढें खरें झालें. त्याचप्रमाणें गोपाळरावजींची गोष्ट आहे. तेही नेहमीं बरोबरीच्या मुलामध्यें असले म्हणजे आपण मोठ्या उच्चासनावर बसून बाकी-च्यांचा कांहींना कांहीं तरी न्याय तोडीत असत. व ह्यांची हुशारी व तरतरीत-पणा पाहून बाकीचीं मुलेंहीं ह्यांस फार वचकत व मान देत. 'मुलांचीं लक्षणें पाळण्यांत दिसतात' तसेंच झालें. कारण हेच आमचे चरित्र-नायक पुढें मुंबई स्मॉल कॉज कोर्टाचे जज्ज व ठाणें येथें डिस्ट्रिक्ट जज्ज व सेशन जज्ज झाल्याचा वृत्तांत पुढें येईलच. हे कधीं कधीं दुसऱ्या मुलाला घोडा करून आपण त्यावर स्वार होत. पण आपण घोडा होऊन दुसऱ्याला कधीं स्वार होऊं द्यावयाचें नाहीं असा त्यांचा बाणा असे.

त्यांचे वय जसजसें मोठें होत चाललें, तसतसें ते शाळेंत जाऊन मराठीचा अभ्यास करूं लागले. पण शाळा सुटली कीं, फिरावयास जाण्याचा त्यांना मोठा नाद असे. आणि तो अगदीं अखेरपर्यंत होता. आणि तें सुद्धां रोज जावयाचें तें भिन्न भिन्न दिशेला जावयाचें. आज पर्वतीकडे, तर उद्यां चतुःशृंगी-कडे, परवा मुळामुठा, तर तेरवा वानवडी असा त्यांचा नेहमींचा परिपाठ असे. आणि त्यांच्याबरोबर नेहमीं पांच चार मंडळी असावयाचीच असावयाची. एकटें कधींच जात नसत. सरदार घराण्यांतील असल्यामुळें त्यांस बंदुकीनें निशाण मारण्याचाही अभ्यास होता.

एके दिवशीं पहाटेस स्वारी संगमावर येऊन तेथील कौतुक पहात उभी राहिली होती. इतक्यांत पलीकडे एक बंदुकीचा बार झाला! तेव्हां गोपाळ-रावांचें लक्ष तिकडे गेलें, तों तेथें कांहीं सोजीर लोक आणि त्यांचेवरील एक ऑफिसर निशाण मारण्याचा खेळ खेळत असलेले दृष्टीस पडले! ते निशाण मारण्यास शिकत होते. त्यांनीं एक पाण्यानें भरलेली घागर समोर शंभर कदमावर ठेवून तिजवर निशाण धरलें होतें. त्या घागरीस निशाण लागून मधोमध ती दुभंग व्हावी असा त्या लोकांचा हेतु होता. परंतु तो साध्य होईना. त्यांचा ऑफिसर त्यांना वरचेवर शिकवीत होता, परंतु त्यांना बरोबर नेम कांहीं साधेना! प्रत्येकानें बंदूक हातांत घेऊन नेम मारून पाहिला, परंतु घागरीस निशाण लागलें नाहीं. शेवटीं त्यांच्या ऑफिसरनें आपल्या हातीं बंदूक घेऊन निशाण मारून पाहिलें तथापि तेंही चुकलें! तेव्हां ते

सर्व सोजीर लोक मोठे खजील झाले. हा सर्व प्रकार आमच्या गोपाळरावांनीं दुरून पाहिला तेव्हां त्यांच्यानें मग उगीच राहवेना. ते स्वतः या मंडळीजवळ येऊन इंग्रजी भाषेत त्यास म्हणाले कीं, ‘ काय तुम्ही हुशार ! ’ एवढें मोठें घागरीचे निशाण तुम्हाला मारता येईना, मग लहान बारीक असें एखादें निशाण कसें माराल ? आंब्याच्या झाडावर उंच ठिकाणीं एखादा रुपाया अगर पावली बांधून ठेवली तर तें निशाण तुम्ही कसें माराल ?’ असें इंग्रजींत गोपाळराव त्यांस म्हणाले. तेव्हां ते अधिक लाजून गेले. गोपाळराव इंग्रजी बोलण्यांत एव्हांपासूनच मोठे पटाईत झाले होते. त्यांचे भाषण ऐकून त्या ऑफिसरास वाईट वाटून थोडा रागही आला. आणि तो डोळे वटारून गोपाळरावास म्हणाला कीं ‘ तूं ब्राह्मणाचा पोरगा होऊन मोठ्या गोष्टी बोलतोस ? बोलण्याचें काम सोपें आहे, परंतु करण्याचें काम अवघड असतें समजलास ?’ तेव्हां गोपाळराव त्या ऑफिसरास म्हणाले कीं, थोडा वेळ माझ्या हातांत बंदूक देऊन पहा बरें ? ब्राह्मणाचा पोरगा कसा काय आहे तो तुम्हांला दाखवितोंच ! हें भाषण ऐकून त्यांनीं आपली भरलेली बंदूक चटदिशी गोपाळरावांचे हातांत दिली ! गोपाळराव अगदीं डगमगले नाहींत. त्यांनीं आपल्या हातांतील सोटा आपल्या सोबत्याच्या हातांत देऊन आपण ती बंदूक नीट हातांत धरून घागरीचा नेम बरोबर दृष्टींत धरून एकदम चाप दाबून ती उडविली ! त्याबरोबर नेम लागून त्या घागरीचीं दोन मधोमध शकलें झालीं ! तेव्हां ते सर्व लोक अत्यंत आश्चर्यचकित झाले.

असो. घागरीचे मधोमध दोन तुकडे बरोबर झालेले पाहून त्या युरोपिअन हापिसरास गोपाळरावाविषयीं मोठें कौतुक व धन्यता वाटली ! ह्यावरून युरोपिअन लोक मोठे गुणग्राही असतात, ही गोष्ट चांगली व्यक्त होते ! या हापिसरची मर्जी गोपाळरावावर मोठी खूप झाली आणि त्यानें आपली तीच खाजगी बंदूक गोपाळरावास बक्षिस देऊन म्हटलें कीं, ‘तुला मिलटरी खात्यांत नोकरी करण्याची इच्छा आहे काय ? माझे बरोबर चल; मी तुला आमच्या जनरल साहेबास भेटवितो !’ तेव्हां गोपाळराव त्याला ‘होय’ म्हणाले आणि त्याचेबरोबर जनरल साहेबांचे बंगल्यावर गेले.

हा समय अव्वल इंग्रजी अमलाचा होता. बरेंच इंग्रजी लष्कर त्यावेळीं पुण्या-

जवळ गारपिरावर होतें. जनरल साहेबांचा बंगलाही गारपिरावरच होता. लष्करी बडे साहेबांची आणि गोपाळरावांची भेट होऊन बोलणें झालें. गोपाळरावांनीं आपले देशाच्या इतिहासाचें पुराण त्याला बरेंच सांगितलें. त्यावरून गोपाळरावास इंग्रजी चांगलें बोलतां येतें हें साहेबास कळून आलें. आणि निशाण चांगलें मारतां येतें ही हकिकत यांच्या कानावर पूर्वींच गेलेली होती! अर्थात् जनरलसाहेब खूष होऊन, विनोदानें म्हणाले कीं, "ब्राह्मण लोक जर इतके निशाण मारण्यांत हुशार होते तर त्यांनीं आपलें राज्य कसें गमावलें?" या साहेबांच्या प्रश्नावर गोपाळरावांनीं समर्पक उत्तर दिलें कीं, "ब्राह्मणांचें राज्य गेलें तें त्यांच्या बंदुक मारण्याचा कसबाच्या अभावामुळें किंवा तलवार बहादुरीच्या अभावामुळें गेलें, असा मुळींच अर्थ नाहीं. त्यांचें राज्य गेलें तें ऐक्याच्या अभावामुळें गेलें!"

असो. गोपाळरावांचें समयोचित व समर्पक उत्तर ऐकून जनरल साहेबास मोठा संतोष झाला! आणि त्यांनीं गोपाळरावास 'बडा हुशार है' अशी हिंदुस्थानी भाषेंत शाबासकी दिली आणि सांगितलें कीं, "नोकरी पाहिजे म्हणून एक अर्ज लिहून उद्यां तूं मला येऊन भेट! मी तुझ्याविषयीं विचार करून तुला चांगली नोकरी देईन!" असें सांगून गोपाळरावास रजा दिली.

पुढें मिलीटरी खात्यांत नोकरी धरावी अशी सल्ला घरांतील मंडळींपैकीं कोणाचीच पडली नाहीं, व गोपाळरावांच्याही मनांत लष्करी नोकर होण्याची इच्छा नव्हती! अधिक अभ्यास करावा, विद्वान व्हावें, मोठे पंडित व्हावें, ग्रंथकार व्हावें, सरकारचे मंत्री व्हावें अशीच त्यांची मनीषा होती.

त्यांना थंड पाण्यानें स्नान करण्याचा व पोहण्याचा फार नाद. एके दिवशीं गोपाळराव हे आपल्या कांहीं सवंगड्यासह पर्वतीच्या तलावावर गेले, व सर्वांनीं कांठावर कपडे काढून ठेवून पोहण्यासाठीं तलावांत उड्या टाकल्या, आणि मोठ्या आनंदानें पोहूं लागले. परंतु त्यांत एक अतिशय भित्रा मुलगा असून त्याला मुळींच पोहावयास येत नव्हतें. सारीं मुलें कशीं मजेनें तलावांत पोहतात, मजा मारतात, आणि आपल्याला पाण्यांत उतरतां मुद्धां येत नाहीं, म्हणून मनांत खजील होऊन येवढेसें तोंड करून तो कडेला उभा होता. त्याच्याकडे गोपाळरावजींचें लक्ष गेलें, आणि ते त्यास म्हणाले "अरे ये, असा भितोस काय? शीर पाण्यांत; मी शिकवितो तुला पोहावयाला." विचारा

पोहावयास शिकण्यासाठीं उत्सुक झालेला पोर, त्यास वाटलें खरेंच, एकदां पाण्यांत तर जाऊन पहावें. म्हणून तो हळू हळू पाण्यांत तर शिरलाच, पण जरासा खोल पाण्यांत जातांच गटकळ्या खाऊं लागला. तेव्हां सारींच पोरें ओरडलीं. गोपाळराव पोहत पोहत त्याच्याजवळ गेले आणि मोठ्या प्रयत्नानें त्यांनीं त्यास बाहेर काढलें.

पण दुसऱ्या दिवशीं काय विचारतां ? साऱ्या गावांत बातमी पसरली कीं गोपाळराव देशमुख काल एका मुलाला बुडवित होतां ! जो तो ह्याबद्दल गोपाळरावास विचारूं लागला. घरच्या माणसांनींही याबद्दल गोपाळरावजी-पाशीं विचारपूस केली. पण ते मुळींच डगमगले नाहींत किंवा खोटेंही बोलले नाहींत. खरा प्रकार होता तो त्यांनीं बेधडक सांगून टाकला. ते म्हणाले "होय मी पाण्यांत ये म्हटलें खरें, पण त्यांत कांहीं माझा वाईट हेतु नव्हता, तो बुडूं लागला तर त्यास बाहेर काढण्याइतकी माझ्या अंगांत ताकद होती." ते म्हणाले "मी कधीं खोटें बोलणार नाहीं." केवढी बरें सत्यप्रीति ही ! ह्यावरून जॉर्ज वॉशिंग्टनच्या गोष्टीचें कोणास स्मरण होणार नाहीं ?

मोठेपणीं विकसित होणाऱ्या सद्गुणांचा अंकुर बालपणांतही दृग्गोचर होत असतो. ही गोष्ट पुढें दिलेल्या दयाशीलतेच्या गोष्टीवरून चांगली निदर्शनास येते. ती गोष्ट अशी—गोपाळराव लहानपणीं शाळेंत गेले म्हणजे त्यांची पाटी, दप्तर, बुकें वगैरे आणावयास घराकडून एखादा गडी किंवा पोरगा पाठवीत असत. तो शाळा सुटावयाचे वेळीं जाऊन त्यांचीं बुकें वगैरे सामान घेऊन त्यांच्याबरोबरच दररोज घरीं येत असे. एके दिवशीं घरचा गडी गोपाळरावास व त्यांचीं बुकें आणावयास निघाला असतां पाऊस येऊं लागला. मातोश्रींनें गोपाळरावास भिजत यावयास लागूं नये म्हणून त्याच्या-पाशीं एक बनातीची टोपी दिली. ती घेऊन तो पोरगा गोपाळरावाकडे शाळेंत गेला. शाळा सुटल्यावर गोपाळरावांनीं आपली पाटी, पुस्तकें त्या पोऱ्यापाशीं दिली आणि बनातीची टोपी त्यांस पांघरावयास घालून आपण काचा मारून त्याच्यामागें उघडे पावसांतून भिजत चालले. घरीं आल्यावर मातोश्री पाहातात तो गडी आला आहे बनातीची टोपी पांघरून आणि त्याचे धनी म्हणजे आपले चिरंजीव आले आहेत पावसानें भिजून चिंब होऊन ! हा प्रकार पाहून त्यांना फार वाईट वाटलें. व त्या गड्यास रागें भरूं लागल्या.

पण गोपाळराव म्हणाले "आई! जरा थांब. त्याला रागें भरूं नको. मींच ती टोपी त्याला पांघर म्हणून सांगितलें. कारण माझीं चिरगुटें भिजलीं तर तुम्ही मला दुसरीं नेसावयास द्याल, पण त्या गरिबाचीं चिरगुटें भिजलीं तर त्याला दुसरीं कोण बरें देणार? ह्याकरतां आपल्याला जर उद्यांपासून त्याला मजकडे पावसांतून पाठवावयाचें असेल तर त्याला दुसरें घोंगडें वगैरे कांहीं तरी द्या, नाहींतर मी असेंच करीन." दुसऱ्या दिवसापासून त्या बिचाऱ्याला घोंगडें मिळालें हें कांहीं सांगणें नकोच.

## व्रतबंध.

गोपाळरावजींच्या वयाच्या सहाव्या वर्षी म्हणजे इ. स. १८२९ मध्येंच त्यांच्या वडिलांनीं त्यांचा व्रतबंध मोठ्या थाटानें केला. तेव्हां अर्थातच रोज संध्यावंदन करण्याचा प्रसंग आला. उपाध्यायांनीं गायत्री-मंत्राचा जप दिला. संध्या, पूजा, नैवेद्य, वैश्वदेव, रुद्र, सौर व पवमानाच्या संथा देण्यास सुरवात केली. परंतु आजपर्यंत मिळालेले इतर शिष्य वेगळे व हे आतांचे पट्ट छात्र अगदीं वेगळे! हे आधींच तैल बुद्धीचे, दोन चार गुंडिका केल्या कीं झाला अध्याय पाठ! उच्चारांत कीं स्वरांत चूक म्हणून नाहीं! असे थोडे दिवस चालले; परंतु महिना पंधरा दिवस होतांच शिष्यांनीं गुरूचा पराजय करण्याची पाळी आणली. गोपाळराव एके दिवशीं उपाध्येबोवास म्हणाले, "अहो गुरुजी! मला आज संध्येंतील अर्थ तरी सांगा हो! आपण काय म्हणतों तें कांहींच समजत नाहीं तर त्याचा उपयोग काय?" उपाध्येबोवा आश्चर्यचकित होऊन छोट्या यजमानांच्या तोंडाकडे पाहूं लागले. तेव्हां गोपाळराव म्हणाले, "निदान गायत्री-मंत्राचा तरी अर्थ सांगाच; नाहींतर मी साफ सांगतों उद्यांपासून मी कांहीं संध्या करणार नाहीं."

संध्येचा अर्थ आधीं भटजीबोवांना कळेल तर ना पुढें ते शिष्याला सांगणार? आणि त्यांतून गायत्रीमंत्राचा! मग तर काय आटोपलाच बाजार! भटजी अगदीं गोंधळून गेले. त्यास उत्तर काय द्यावें व काय न द्यावें हेंच सुचेना. त्यांनीं "बरें पुढें सांगतां येईल, सध्यां तुम्ही आधीं पाठ तर करा. नीट पाठ झाल्याखेरीज अर्थ काय कामाचा!" अशी कांहीं तरी समजूत करून ती वेळ मारून नेली. परंतु दररोज गोपाळरावजींचा हा कांहींना कांहीं तरी ससेमिरा गुरुजींच्या मागें हा असेच. तो कांहीं सुटेना. 'प्राणायामांत नाक धरल्यानें-

च काय होतें ?' 'अस्तायफट्' म्हणून टाळी कशाकरितां वाजवावयाची ?' अशा मार्मिक प्रश्नांची मालिका रोज त्यांच्यामागें असावयाचीच, आणि उपाध्येबुवा त्यामुळें अगदीं मट्टयाला यावयाचे. असें होतां होतां जेमतेम नित्यकर्मापुरती संध्या, पूजा, नैवेद्य, वैश्वदेव, रुद्र, सौर वगैरे अध्ययन एकदाचें संपलें, व मग उपाध्येबुवा हळू हळू ह्या धाकटे यजमानास समक्षासमक्ष फारसे भेटेनासे झाले !

## विद्याभ्यासाची सुरवात.

गोपाळरावजींचा तरतरितपणा व शोधकपणा इतका तीव्र होता कीं, सामान्य मनुष्याची त्यांच्यापुढें कांहीं लटपट चालत नसे. संध्येच्या कामांत उपाध्येबोवांची तारांबळ उडाली यांत फारसें नवल नाहीं. परंतु शाळेंत शिकल्यासवरलेल्या मास्तरची सुद्धां गोपाळरावजींपुढें हबेलंडी उडत असे. गोपाळरावांची चौकसबुद्धि इतकी विलक्षण होती कीं, तिला दुसरी तोड नाहीं. पुष्कळ मुलें चौकस असतात व त्यांच्या भलभलत्या शंकांचीं उत्तरें देतां देतां कधीं कधीं आईबापांच्या देखील नाकीं नऊ येतात; परंतु गोपाळरावजींच्या शंका तशा प्रकारच्या नव्हत्या; त्या तर पहिल्यापासूनच फार मार्मिक असत.

गोपाळराव मराठी शाळेंत शिकत असतांना त्यांनीं इंग्रजी भाषेचा घरीं खासगी रितीनें अभ्यास केला होता. ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. आधीं इंग्रजी भाषा म्हटली म्हणजे किती कठीण; मराठी भाषेहून तिची रचना अगदीं भिन्न; ती हल्लींच्या काळीं शिकूं म्हटलें तरी सुद्धां किती जड जातें; मग अव्वल इंग्रजींत ती त्यांनीं लहानपणीं कशी साध्य केली असेल ती असो. कारण इंग्रजी शाळेंत जाण्याचे पूर्वींच ती त्यास अवगत असल्याचें त्यांच्या इंग्रजी शाळेच्या मास्तरच्या सर्टिफिकिटांत नमूद आहे. या सर्टिफिकेटावरून असें समजतें कीं, ते १८४१ मध्यें म्हणजे आपल्या वयाच्या अठराव्या वर्षीं सरकारी इंग्रजी शाळेंत गेले व तेथें त्यांनीं तीन वर्षें अभ्यास करून १८४४त म्हणजे आपल्या वयाच्या २१ व्या वर्षीं त्या शाळेंतील अभ्यास संपविला. ह्याशिवाय मोठेपणीं संस्कृत, पराशियन, हिंदुस्थानी, गुजराथी, या भाषाही त्यांना अवगत असल्याचें R. H. golbhoy ह्यांनीं आपल्या 'पोर्ट्रेट ग्यालरी' नांवाच्या पुस्तकांत नमूद केलें आहे. अगदीं लहानपणापासून त्यांचा आवडता विषय म्हटला म्हणजे इतिहास. त्यांतील गोष्टी सारा दिवस त्यांच्या तोंडीं असत. आणि ते मोठ्या भक्तिभावानें आपल्या सर्व सोबत्यांस

व घरांतील वडील माणसांस सुद्धां त्या सांगत असत. त्या ऐकून सारीं मनुष्यें त्यांच्या स्मरणशक्तीचें व वक्तृत्वाचें मोठें कौतुक करीत. तसेंच त्यांना लहानपणापासून व्याख्यान देण्याची हौस असे व ते आपल्या बरोबरीची मंडळी जमवून त्यांस इतिहास व दुसऱ्या निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें देत असत. हेच त्यांच्या मनांत लहानपणापासून घोळत असलेले विचार त्यांनीं निबंधरूपानें 'लोकहितवादी,' नांव धारण करून त्या वेळच्या वर्तमानपत्रांतून सर्वसाधारण लोकांचे उपयोगाकरतां प्रसिद्ध केले आहेत.

## विवाह-समारंभ.

मुलगा चांगला लिहिणारा वाचणारा व शाहाणा निघाला म्हणजे त्याचें लग्न करावयाचें त्याच्या आईबापाच्या मनांत येणें हें साहजिकच आहे. परंतु पूर्वीच्या लोकांचो समजूत कांहीं निराळीच असे. मुलाची मुंज झाली न झाली तोंच त्याच्या दोन हाताचे चार हात कधीं होतील ह्याची त्या वेळच्या आईबापांस चिंता पडत असे. त्यांतून घराणें श्रीमंत असलें तर मग काय पहावयासच नको. आपल्या बाळाचें मंगलकार्य केव्हां उरकेल, सूनबाई घरांत केव्हां पाऊल टाकतील, व्याहीविहिणी होऊन केव्हां एकदां मिरवूं असें त्यांस होऊन जात असे. त्यांत घोडनवरा आणि घोडनवरी झाली कीं, ती डोळ्यासमोर सुद्धां पहावयास नको. नवरानवरी कशी अगदीं गोजिरवाणी असावींत ही इच्छा. गोपाळरावावरही तीच पाळी आली. मुलाला चांगलें लिहितां वाचतां येते; मुलगा हुशार, पाणीदार, देखणा, अंगापिंडानें मजबूत, तेव्हां अशाला स्वस्थ बसूं देणार कोण ? मुंज होऊन पुरतें एक वर्षही लोटलें न लोटलें तोंच मुलीवर मुली सांगून येऊं लागल्या. जाहागिरदारांचा मुलगा हुशार, सद्गुणी, शेकडो नवस करूनही मिळणार नव्हे, मग असें हातचें स्थळ कोण जाऊं देणार ? शनवारांतील इनामदार गोळे यांची मुलगी, म्हणजे चित्रकूटच्या जहागीरदार जोग ह्यांची नात, ही सांगून आली. मुलगी फार सुस्वरूप, सद्गुणी, नीटस, बांधा सुदृढ अशी होती. शिकली सवरली काय ? ह्या प्रश्नाचें त्यावेळीं नांवही नव्हतें. हुंडापांडा सर्व जमलें. मग काय उशीर? गोपाळरावांच्या मातापितरांस असें झालें कीं आपल्या डोळ्यादेखत येवढा लग्नसोहळा एकदां उलगडला कीं, 'कृतकृत्यश्च भारत' झालें. त्यांनीं त्या कार्याला लागलीच रुकार दिला. तो लग्नसोहळा मोठ्या थाटानें पार पडला. हेही पिढीजाद श्रीमंत, व तेही पिढीजाद श्रीमंत, मग न्यून तें पडणार कोठें ?

पण बहुल्यावर नवरानवरी किती वर्षांची ? नवरा सात वर्षांचा आणि नवरी ४ वर्षांची ! उभयतांत अंतर तीन वर्षांचे ! खुद्द गोपाळरावजींच्या लग्नांतील हुंडा पांडा व मानपान जरी आम्हांस कोठें पहावयास मिळालें नाहींत, तरी ह्या देशमुख घराण्यांत जीं दुसरीं लग्नें झालीं होतीं, त्या लग्नांतील खर्चावरून ह्या लग्नांतील खर्चाचेंही अनुमान होण्यासारखें आहे. म्हणून त्यांच्याच घराण्यांतील दुसऱ्या एका लग्नाची उपलब्ध झालेली यादी मुद्दाम देत आहों. तिच्यावरून त्यावेळच्या श्रीमंतांच्या घराण्यांतील लग्नाच्या खर्चाची बरीच कल्पना येते. ती यादी ही:—

श्री

यादी श्रीमद्वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री शंकर अप्पा दीक्षित यांच्या मुलाचें लग्न राजमान्य राजेश्री कृष्णाजीपंत देशमुख यांची कन्या वधू निश्चय करून त्यासंबंधें बोलणें ठरलें. विद्यमान आत्माराम योगीराज निसबत सुभेदार.

८००० सौभाग्यवती विहिणीस वरास व वधूस वस्त्रें अलंकार, वरदक्षणा एकंदर मिळोन ८००० आठ हजार रुपये हल्लीं शिक्का द्यावें. दागिने, वस्त्रा करावयाची याद अलाहिदा ठरली आहे. त्याप्रमाणें लग्नाचे समारंभास दीक्षित बावांनीं घ्यावें.

४००० वाट खर्च; जातां येतां घोडीं, माणसें, डोल्या, भोजन-खर्च विवाहसंबंधें; एकंदर चार हजार रुपये.

१२००० एकूण बारा हजार रुपये हल्लीं शिक्का द्यावयाचे.

तपशील:—

५००० नूर्त पोंचवावयाचें.

३००० वाट खर्चाबद्दल ४००० पैकीं.
२००० दागिने वरदक्षणेबद्दल ८००० पैकीं.

५०००

२००० पुण्याचे मुक्कामीं द्यावयाचे दागिनेवस्त्राबद्दल ८००० पैकीं.

५००० सोमांत पूजनाचे वेळेस द्यावयाचे.

१००० वाटखर्चाबद्दल ४००० पैकीं.
४००० आठ हजार पैकीं.

५०००

येणेंप्रमाणें करारबरहुकूम उभयपक्षीं रहावें. वधूस वस्त्रें, अलंकार दीक्षित बावांनीं घालावीं. सदरहू कराराशिवाय दीक्षित बावास ऐवज पोंचणार नाहीं. सदरहू कराराप्रमाणें देशमुख देतील, न दिल्यास खुद्द आत्माराम योगीराज देऊं. वि॥ आत्माराम माराडकर दस्तुर खुद्द. शके १७४८ व्यय नाम संवत्सरे—कार्तिक वद्य ६ सोमवार.

श्री.

यादी सौ० विहिणीस, वरास व वधूस वस्त्र, अलंकार श्रीशंकर अप्पा दिक्षित याणीं करवून लग्नाचे समारंभास द्यावयाचें ते अजमास किंमत रुपये.

६०० सौ० विहिणीस वस्त्र-अलंकार

५६०० वरास

= ४१०० अलंकार

६०० कर्डा सोन्याची.

३०० तोडे सोन्याचे.

२५०० कंठी मोत्याची.

५००चौकडा.

२०० आंगठ्या.

४१००

५०० ताट, वाट्या, तबक, चौफुला, रुप्याचे दागिने.

१००० पांच पोषाख दागिने

५६००

१८०० वधूस

१२०० अलंकार दागिने.

६०० वस्त्र पितांबरसुद्धां.

१८००

८०००

सदरहू किंमतप्रमाणें दागिनें, व वस्त्र दिक्षीत बावांनां ऐवज घेतल्यास लग्नाचे वेळेस द्याव्या. शिवाय वाटखर्ची जातां येतां लग्नसंबंधें मिळोन चार हजार अलाहिदा द्यावे. हा करार येणेंप्रमाणें ठरला आहे. वि. रा. आत्माराम नाईक माराडकर रुजू.

थोरांचें सारेंच थोर ! एवढ्या खर्चांत गरीबांचीं कितीएक लग्नें उरकलीं असतीं ! गोपाळरावांच्या लग्नांतही असाच अलिजहा खर्च झाला असावा असें अनुमान करण्यास पुष्कळ अंशीं जागा आहे. वधूचें नांव गोपिकाबाई असें ठेविलें. व त्याच पुढें " आईसाहेब " ह्या नांवानें प्रसिद्धीस आल्या. ह्या बाई महान् साध्वी, पतिसेवापरायण, व्यवहारदक्ष, सुशील व संतती संपत्तीनें भाग्यशाली अशा निपजल्या. ह्या उभयतां पतिपत्नी मध्यें अखेरपर्यंत निस्सीम प्रेम होतें. आणि सांगण्याला अभिमानाची गोष्ट ही कीं, गोपाळरावजी येवढ्या हुद्यावर चढले असून व हजारों रुपये तनखा झडत असून ही त्यांनीं आजन्म एकपत्नीं व्रत पाळलें, ही खरोखरच अपूर्व गोष्ट होय. एका संस्कृत कवीनें म्हटलें आहेः—

**विश्वामित्र पराशरः प्रभृतयो वातांबुपर्णाशनाः ।**
**स्तेपि स्त्रीमुखपंकजं सुललितं दृष्ट्वैव मोहंगताः ॥**
**शाल्यन्नं सघृतं पयोदधि युतं भुंजंति ये मानवाः ।**
**स्तेषामिंद्रिय निग्रहो यादिभवेद्विंध्यस्तरे त्सागरे ॥ १ ॥**

" विश्वामित्रपराशरासारखे महान् महान् ऋषी, जे केवळ वायुभक्षण करून, उदक प्राशन करून किंवा पाला खाऊन राहणारे ते सुद्धां तरुणींचें सुंदर मुखकमल पाहतांच लंपट होऊन पडले, असें असतां दररोज यथेच्छ घृतकल्या मधुकल्यावर ताव मारणाऱ्या मनुष्याच्या हातून इंद्रियदमन होईल, तर मग समुद्रामध्यें विंध्याद्रि तर्पतच तरला म्हणून समजलें पाहिजे. "

तेव्हां एवढा मनोनिग्रह ज्यानें वैभवाच्या शिखरावरही आरोहण होऊन केला तो महात्मा केवढा धन्य खरे ! अस्तु. गोपाळरावजी जसे अत्युच्च कुलांतील होते, त्याचप्रमाणें गोपिकाबाईही अत्युच्च कुलांतीलच होत्या.

श्रीमंत दाजीसाहेब कुरुंदवाडकर यांच्या मातोश्री, ह्या गोपिकाबाईच्या चुलत भगिनी, व हल्लींचे सांगली संस्थानचे अधिपति श्रीमंत चिंतामणराव अण्णासाहेब ह्यांच्या सख्ख्या मातोश्री ह्या गोपिकाबाईच्या सावत्र भावाची मुलगी म्हणजे भाची होत. गोपिकाबाईचें लग्नांत वय अवघें चार वर्षांचें ! तेव्हां त्या वयांत लिहिण्या वाचण्याची विद्या ती त्यास काय असणार? आणि शिकविणार तरी कोण? आतां सारखें आहे थोडेंच ! त्या कालीं बायकांनीं विद्या शिकणें म्हणजे महत्पाप आणि गोपाळराव तर प्रथमपासूनच स्त्री-शिक्षणाचे कैवारी. तेव्हां त्यास आपली पत्नी अक्षरशत्रु राहिलेली कशी खपणार ? पण करतात काय ?

जुनी पद्धत ! पुढें प्रौढपणीं गोपाळरावजींनीं लिहिण्यावाचण्याचा त्यास तगादा लावला. परंतु गरोदरपण, बाळंतपण, मुलांची जोपासना, प्रपंच मोठा, घरांत सारा कारभार स्वतः पहावयाचा, यामुळें एवढ्या थोर वयांत त्यांना तरी तें साधावें कसें ? तरी त्यांनीं पतीची आज्ञा शिरसावंद्य करून र ट फ करीत लिहिण्यावाचण्याचें काम चालविलें व बालबोध पत्र लिहिण्यापर्यंत मजल येऊन ठेपली. त्या जेमतेम बालबोध पत्र लिहूं लागल्या. पुढें कांहीं दिवसांनीं मोडी सुद्धां लिहूंवाचूं लागल्या. शिवलीलामृत व रुक्मिणीस्वयंवर हे त्यांच्या नित्यपाठां-तले ग्रंथ असत. शिवाय फावल्या वेळीं त्या तुकारामाचे अभंग व वामनी श्लोक वाचीत. असो. तर याप्रमाणें बाईसाहेबांनीं पतीच्या आज्ञेनुरूप प्रपं-च्याचा सर्व उद्योग संभाळून मुलाबाळांच्या तारांबळींत सुद्धां मोडी बालबोध लिहितांवाचतां येण्याइतकी विद्या संपादन केली हेंही त्यांस भूषण होय. आणि इतक्या लहान वयाच्या दंपत्यास सदृढ व विपुल संतती होऊन त्यांनी दीर्घ कालपर्यंत सुखानें व आनंदानें संसार केला ही ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

## आजीबाईचा आधार.

पुढें कांहीं वर्षांनीं म्हणजे गोपिकाबाई यांचा संसार वाढत चालल्यावर ह्या देशमुखांच्या घरांत एका नव्या कळकळीच्या मनुष्याची भर पडली. हें माणूस कोण ? तर श्रीमंत सौभाग्यवती गोपिकाबाईच्या मातोश्री होत. त्यांचें ह्या मुलीवांचून दुसरें अपत्य जगलें नाहीं. तेव्हां अर्थात त्यांचा सारा जीव, ओढा काय तो ह्या मुलीवर. तिला सोडून राहणें म्हणजे त्यांना अगदीं जिवा-वरची गोष्ट वाटणें साहजीकच होतें. शिवाय मुलीलाही पुढें मुलेंबाळें होऊं लागलीं. तेव्हां त्यांच्या संगोपनासही असें जिव्हाळ्याचें कोणितरी माणूस घरा-मध्यें पाहिजेच होतें. तो योग अनायासें आला, तो असा. इनामदार गोळे यांस प्रथम कुटुंबापासून मुलगा झालेला जगला नाहीं म्हणून त्यांनीं द्वितीय-संबंध केला.* ह्या द्वितीय संबंधानंतर सौ० गोपिकाबाईच्या मातोश्री आपल्या

* पुढें या द्वितीय संबंधापासून इनामदार गोळे यांस मुलगा झाला. त्याचें नांव दामोदर मोरेश्वर ऊर्फ दाजीसाहेब गोळे. हेच गोपिकाबाईचे सावत्रबंधु. यांचीच कन्या श्रीमंत माईसाहेब या हल्लींचे सांगलीचें संस्थानाधिपति यांच्या मातोश्री होत.

एकुलत्या एका मुलीकडे राहूं लागल्या. कितीही श्रीमंती असली आणि चाकर नोकर कितीही ठेवले तरी जिव्हाळ्याच्या माणसाची सर कधींच कोणाला येत नसते. तेव्हां अर्थातच ह्या बाईंना आतां येथेंच तुम्ही वृद्धापकाळीं आपल्या मुलीनातींच सुखानें रहा म्हणून सर्वांनीच गळ घातली. तेव्हां त्यांनींही नाहीं होय म्हणतां अखेर मोठ्या मिनतवारीनें तालमाल पाहून ती गोष्ट मान्य केली व त्या आपल्या अंतकाळपर्यंत देशमुखांच्या घरींच राहिल्या. गोपिकाबाई साहेबांस जीं मुलें झालीं तीं त्यांस "आजी" म्हणूं लागलीं, हें उघडच आहे. त्यावरून त्यांचें नांव 'आजी' पडलें. व तेंच सर्वतो मुखीं झालें. देशमुखांच्या घरांत ह्या आजीबाई म्हणजे कांहीं सामान्य मनुष्य नव्हत्या. तर तो एक मोठा खंदा शिपाईच होता म्हटलें तरी चालेल. आजीबाईचा बाणाच नेहेमीं मर्दानी असे. चित्रकूटचे जहागीरदार जोग याच्या त्या कन्या असल्यामुळें त्यांस उत्तम प्रकारच्या **खंद्या घोड्यावर बसून फेरफटका करतां येत असे. पोहोण्याच्या** कामांत तर त्या इतक्या पटाईत होत्या कीं कांहीं पुसूं नये. पुरुषांचीं कामें कसलीही असोत, त्या ह्या सहज करून टाकावयाच्या. त्या कशालाच भीत म्हणून नसत. चोरा-चिरांची व भुताखेतांची त्यांना कधींच भिती वाटत नव्हती. देशमुखांचें घर श्रीमंतांचें. तेव्हां तेथें रात्रीं बेरात्रीं केव्हां तरी लाग साधल्यास पहावा म्हणून रामोशी वगैरे बदमाष लोक रावसाहेब घरीं नसले म्हणजे कधीं कधीं उगाच-च्या उगाच मध्यरात्रींच्या सुमारास मोठमोठ्या हाका मारून घरांतील माणसांस भेवडावीत. पण आजी त्या हाकांना कधीं एक दिवसही भीक घालीत नसत. अमदाबादेस गोपाळराव हरि जड्जाच्या कामावर असतांना घरांत १०।५ शिपाई नेहमीं असत. पण वेळेस हाक मारली तर बहुधा कोणी असावयाचा नाहीं. आणि असला तर झोंप घेत पडलेला असावयाचा, व आजींनीं जर विचारलें 'कां रे तू कोठें होतास ?' तर प्रत्येकानें जबाब द्यावयाचा कीं, मी रात्रीच्या पहाऱ्यावर असतो, त्यामुळें दिवसां झोंप घेतल्याशिवाय कसें चालेल ? हीच त्याची सबब. हें ऐकून आजींनीं एके दिवशी अशी मौज केली कीं, रात्रीं मध्यरात्रीच्या सुमारास एकट्याच बाहेर आल्या आणि हळूच पहाऱ्यांत जाऊन पाहूं लागल्या. तों काय ? कोणी कुंभकर्णाचें व्रत पतकरलें आहे, कोणी डुलक्या खात आहेत, कोणी कैफांत गुंगले आहेत ! हा प्रकार पाहून त्यांनीं त्या प्रत्येकाचें पागोटें हळूच काढून घेतलें आणि तीं सारीं

पागोटीं घेऊन मुकाट्यानें घरांत आल्या आणि तीं एका बाजूस न दिसेशीं ठेवून दिलीं. हवालदार, जमादार, दफेदार, सकाळीं उठून पाहातात तों आपल्या डोक्याचें पागोटें नाहीं ! "मोऱ्या ! तुझेंरे ?" "माझं बी नाहीं!" अशींच साऱ्यांची दशा झाली. आणि हे स्वतः कोण ? तर पहारेकरी ! आतां आजींना सांगावें तरी काय ? आणि कोणत्या तोंडानें ? घरांतला सारा कारभार पहाणार काय त्या आजीबाई. अखेर हातां पायां पडून त्यांनीं तीं पागोटीं घेतलीं. पण तेव्हांपासून पहाऱ्यावर डुलकी कोण घेईल ! असा बंदोबस्त झाला.

आजींना आपल्या मुलीला मुलगा व्हावा ही आवड फार. कारण त्यांना स्वतःला पुत्रसंतान नव्हतें. त्यामुळें त्यांना मुलग्याची फार हौस वाटे. मुलगा झाला म्हटलें कीं त्या मोठ्या आनंदानें सर्व सोहोळा करीत. आणि मुलगी झाली म्हणून ऐकलें कीं, त्या बाळंतिणीच्या खोलींत पाऊलसुद्धां टाकीत नसत ! मग आनंद कोठचा ! असा त्यांचा स्वभाव ( करारी ) होता. गोपाळरावजींच्या सर्व मुलांस त्या जीव कीं प्राण करीत असत. साऱ्या मुलांस आईचा लळा इतका नसे, पण आजींचा लळा फार. साऱ्या दिवस रात्र सारीं मुलें आजीभोंवतीं बसावयाचीं व त्यांच्या मांडीवर लोळावयाचीं. ह्यामुळें आजीवर सर्वांचेंच प्रेम. सर्वच माणसें त्यांना पूज्य मानीत. आजी देशमुखांचे घरीं सुमारें २५।३० वर्षे होत्या. त्या वृद्ध होऊन देशमुखांचे घरींच पुण्यांत त्यांचा अंत झाला. त्यांस आमरणांत पोलिटिकल पेन्शन मिळत होतें. त्यावेळेस त्यांची आवडती कन्या व जांवई आमदाबादेस होतीं. त्यांस हें वर्तमान कळल्यावर फार वाईट वाटलें व त्यांनीं आपले चवथे चिरंजीव तात्यासाहेब—जे त्यावेळीं पुण्यास होते त्यांस असें पत्र लिहिलें कीं "आजी गेल्या ' असें दोन अक्षरांत तुम्हीं का लिहिलें ? त्या केव्हां गेल्या ? त्यांस काय झालें ! अंतकाळीं काय काय बोलल्या ? इत्यादि माहिती सविस्तर लिहून कळवावी." त्याप्रमाणें तात्यासाहेबांनीं त्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें लिहून कळविलीं. हें पत्र फार वाचण्यासारखें आहे; परंतु विस्तारभयास्तव तें येथें देतां येत नाहीं ! ह्यावरून आजी गेल्यामुळें सौ. बाईसाहेबांस व रावबहादुरांस किती वाईट वाटलें, व त्यांचा केवढा हात मोडल्यासारखा झाला, ह्याची कल्पनाच केली पाहिजे.

खरोखर आजींचा अंतकाल पुढें २५।३० वर्षांनीं झाला आहे. पण ओघानुसार हें एक प्रकरण येथेंच सांगून टाकलें.

## आपत्ति.

संसार हें रहाटगाडगें आहे. त्यांत सुखामागून दुःख व दुःखामागून सुख ही त्याची परंपरा. त्याप्रमाणें ह्या देशमुखांच्या घरांवर तसा प्रसंग गुदरला तर त्यांत फारसें नवल नाहीं. गोपाळरावजींच्या लग्नास कोठें ६।७ वर्षें होत आलीं; ते मराठी शाळेंतच शिकत होते. त्यांचें मराठी अक्षर फार उत्तम-पेशवाई धर्तीचें असून जावसाली कागद एक येर्जी, दुयेर्जी वगैरे यांत ते फार प्रवीण असत. मराठी ग्रंथ वाचण्याचा तर त्यांना मनस्वी नाद असे. दासबोध, एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी हें ग्रंथ त्यांच्या फार आवडीचे असत. असा क्रम चालत असतां त्यांचे सर्वांत वडील असलेले सावत्र बंधू परशु-* रामपंत हे फार कर्ते पुरुष असून अकस्मात् वारले. त्यामुळें त्यांच्या वडिलांस म्हणजे हरिभाऊस फार पुत्रशोक होऊन त्यांची अगदीं कंबर खचली. तीं इतकी कीं, तेव्हांपासून त्यांचें कमरेखालचें सारें अंग लटकें पडलें ! ते हांथरुणास अगदीं खिळून राहिले. आणि अखेर आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी वैशाख शु॥ ११ शके १७५९ ता. १६ माहे मे सन १८३६ ह्या पवित्र दिवशीं कैलासवासी झाले ! त्या दुःखदायक प्रसंगाचें किती म्हणून वर्णन करावें! परंतु चिंतामणराव व गोपाळराव हे दोघेही बंधू मोठे सहनशील व दिलदार. त्यांनीं तें सर्व दुःख गिळून शांतवृत्तीनें उत्तरकार्य वगैरे सर्व पार पाडलें.

हा एक प्रसंग तर झालाच, पण पुढें दुसरेंच संकट दत्त म्हणून उभें राहिलें. तें कोणतें? तर इंग्रज सरकारनीं हरिपंतांकडे चालत असलेला १०,००० हजारांचा सरंजाम होता तो तहाहयात होता, या सबबीवर एकदम जप्त करून टाकला ! पिढीजाद श्रीमंत घराणें ! त्याजवर हा अकल्पित केवढा दरे प्रसंग !

*त्यास एक पुत्र व एक कन्या होती. पुत्राचें नाव पांडोबा. हे खानदेशांत एरंडोल येथें मुन्सफ झाले होते. त्यांचे चिरंजीव हरी पांडुरंग देशमुख बी. ए. हे मामलेदार होते.त्यांनीं हल्लीं पेन्शन घेतलें असून ते पुण्यास आपले घरीं असतात.

एकदम आकाशाची कुऱ्हाडच कोसळली म्हणावयाची. हें ऐकून सर्वांच्याच तोंडचें पाणी पळालें, त्या वेळेस वडील काय ते चिंतामणराव. त्यांनीं काय काय म्हणून करावें ? खरोखर श्रीमंत पेशव्यांचा व इंग्रजांचा जो तह झाला होता, त्यांत पूर्वींच्या जहागिरदारांच्या जहागीरी कायम ठेवूं असें आश्वासन दिलेलें होतें, पण तें सर्व बाजूस ठेवून देशमुखांची जहागीर तहह्यात होती असें ठरविलें ! सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं म्हणतात, तेंच प्रत्ययास आलें. हें वर्तमान चिंतामणराव यांनीं ब्रम्हावर्तास श्री. बाजीरावसाहेब होते त्यांस कळविलें. त्यावेळीं ब्रम्हावर्तास श्रीमंतांजवळ देशमुखांचीं कोणीना कोणीतरी माणसें असतच; व त्यांचा नेहमीं पत्रव्यवहार होत असे. चिंतो वामन देशमुख यांचीं मुलें कधीं कधीं ब्रम्हावर्तास जाऊन राहत असत. ब्रम्हावर्तास ह्या देशमुखांचा स्वतंत्र वाडाच होता. दामोदर चिंतामण देशमुख हे ह्या सुमारास ब्रम्हावर्तास होते, व त्यांचे एक पत्र खुद्द हरिभाऊसच आलेलें मिळालें आहे. तें असें:—

श्री.

**तो. राजश्री हरिपंत भाऊ देशमुख**

**वडिलांचे सेवेसी,**

अपत्य दामोदर चिंतामण देशमुख दोन्ही कर जोडून चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना ऐशीजे. सुभेदार यांचा ऐवज आपणाकडे घ्यावयाचा त्याजकैर्कीं हल्लीं हुंडी करण्याविषयीं आपलें पत्र लिहून आलें. त्याचप्रमाणें अजम अरदिन साहेब बहादुर याजपासून येथील चलनी कलदार रुपये १२०० अक्षरीं बाराशें घेतलें हे त्यांनीं पुण्यांतील कलेक्टर साहेबास देवविले आहेत, तरी चिठी पावल्यावर मुदत रोज ३०॥, ३०॥ एकूण एकसष्ट दिवसांनीं सदरहूं बाराशें रुपये पुण्यांतील हल्लींचे कलेक्टर साहेब यांजकडे पावते करून चिठ्ठीवर भरपाई करून घेऊन लिहून पाठविणें. पौष शुद्ध ७ भृगुवार सु॥ सलासोनमयातैनवअल्लफ शके १७५१ विरोधीनाम संवत्सरे. मु० श्री ब्रह्मावर्त. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. सदरहु हुंडीचे रुपये १२०० शिक्का हुजुर पुणें मुक्कामीं खजिन्यास भरणा झाला. ता० २४।२।३०

श्री.

* यादी हरिपंत भाऊ देशमुख यांणीं पुण्याहून जिन्नस ब्रम्हावर्तास पाठविणें ते सुमारीतसलासोनमैयातैनवअल्लफ शके १७५८ दुर्मुखनाम सवन्सरे.

ब्रम्हावर्त मक्कामीं वाड्यांत विहीर पक्की चांगली बांधली आहे त्यांत पाणी विपुल सर्वकाल असते. त्यांजवर बैल रहाट नेहेमीं चालूं आहे त्याजकरितां माळा नारळाचे काथ्याच्या ऐंशी ऐंशी लोटे रहावया जोग्या लांब साठ हात प्रमाणें तयार करून अगत्य पाठवाव्यात.

२ कागद गड्या.
१ दौलतावादी,
१ कीर्दीची पातळ सफेत मोहरेदार.

---

२

४०० बोरूचीं पेरें कवडी अगर निगडी वगैरे येथील बारीक लांब पाणीदार निंवळीं अशीं आपण समक्ष परिक्षा करून पाठवावीं.

१० रातंब्याच्या तेलाचे गोळे.
८।- चिंच कर्नाटकी वजन पक्कें.
८८५ गूळ व गुळपापडी कोंकणची.
८८३ काजूच्या पिया.
८८५ गोडंब्या.
८८५ कडवे कोंकणचे.
८८५ पावटे.
८।- आंबसोल कोंकणीं रातंब्याचें.
८८२ खजूर चांगला.
८८३ लाकीर **वर्तकी** चांगली.
१ या खेरीज आणखी कांहीं चमत्कारिक.

---

* ह्या ब्रम्हावर्तास राहणाऱ्या कुटुंबास लागणारा दक्षिणेंतील कांहीं जिन्नस पाऊस हरिभाऊस पाठवावें लागत. अशा प्रकारची एक यादी उपलब्ध झालेली दिली आहे,:—

येणंप्रमाणें जिन्नस चिरंजीव सौ० गंगाबाई दीक्षित यांस वडलीस पोंचवून उंट, तट्टे, स्वार, व पायदळ वगैरे माघारें पुण्यास येतील त्यांजबरोबर तेथील साहेब एजंट बहादुर यांची रहदारी घेऊन देऊन पाठवयाचें करावें. छ. १५ मोहरम वैशाख शु० १ इंदुवार.

ब्रम्हावर्तास खुद्द त्यांचाच वाडा असल्यामुळें व तेथें त्यांचींच मनुष्येंही असल्यामुळें त्यांनीं हा वृत्तांत श्रीमंत बाजीरावांच्या कानावर घालून आपलें जहागिरीचें जप्त झालेलें गांव सोडवून देण्याबद्दल विनंती केली. तेव्हां श्रीमंतांनींएजंटास एक पत्र लिहून दिलें तें तेथील मनुष्यांनीं चिंतामण रावजीकडे पाठविलें. त्यांत " हरिपंत देशमुखांचे जहागिरीचे गांव तहाहयात नसून वंशपरंपरेचे आहेत. त्याकरितां तें त्यांचे त्यांच्या हवाली करावेत. "हें श्रीमंतांचें पत्र चिंतामणरावांनीं एजंटास दिलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण त्याकाळीं श्रीमंत बाजीराव साहेब यांस शेवटपर्यंत जे सरदार चिकटून राहिलें त्यांच्या जहागिरी कांहींतरी निमित्तानें जप्त करण्याकडे इंग्रज सरकारचा कल होता. त्यामुळें ती सर्व जहागीर तहाहयात आहे या सबबीवर जप्त केली हेंच बरोबर आहे असें उत्तर आलें.

चिंतामणरावांनीं ह्या कामीं फार खटपट केली. एकदां एक अर्ज घेऊन मुंबईस जावें पुन्हां महाबळेश्वरास जावें, या प्रमाणें " गडातच सासवडं चैव सासवडातच गडं पुनः " अशी त्यांची सारखी पायपिटी सुरू होती. अशा सारख्या वाऱ्या केल्या तरी त्यावेळच्या अधिकाऱ्यांच्या हृदयाला कांडीइतकासुद्धां घाम फुटला नाहीं. ते स्पष्ट सांगत कीं कांहींएक व्हावयाचें नाहीं. प्रपंचाचा खर्च मोठा. लग्नें कार्यें होऊन कुटुंब वाढलेलें. आणि अशा स्थितींत हा दुर्धर प्रसंग ! तेव्हां सर्वांच्याच तोंडचें पाणी पळालें. परंतु बिटुराहून श्रीमंतांच्या शिफारसीनें कमिशनरामार्फत परभारें विलायतेस लिहून गेलें. तेव्हां त्यांचा विचार होऊन तिकडून लिहून आलें कीं, हे गांव तहाहयात चालतील. हा ठराव हरिपंतास कळविलेला नव्हता. यास्तव त्यांचें कुटुंब गफलतींत राहिलें असेल, म्हणून त्यास गुजाऱ्यापुरतें पेन्शन द्यावें. त्याप्रमाणें काशीबाईस सन १८४३ पासून ६०० रुपये वर्षास पेन्शन मिळूं लागलें, परंतु मुलांस कांहींच नाहीं; म्हणून चिंतामणरावादि त्रिवर्ग बंधूंनीं दुसरी एक यादी लिहून, त्यांत आपला खर्च आज कसा आहे, तो दाखल करून, आपणास पेन्शन मागितलें. त्या यादींत त्रिवर्ग बंधूंपैकीं प्रत्येकाचा

सालीना खर्च ९०० रुपये, म्हणजे सर्वांचा मिळून सालीना २००० रुपये खर्च कसा अवश्य आहे, हें दाखवून कळविलें कीं " आमचा दावा पेन्शनीचा आहे, व आमची खानदानी व आम्हांस पूर्वी उत्पन्न होतें तें हल्लीं जप्त झालें आहे. व आमच्या मोकदम्यासारखे दुसरे जाहागिरदारास पेन्शनें झालीं आहेत. हा मजकूर आपण मनांत आणला म्हणजे ६०० रुपये आमचे मातोश्रीस पृथक् तहाहयात झाले, हें आमचें हल्लीं कमी खर्च झाला आहे, तरी आहे यास पुरत नाहींत, असें नजरेस येईल. याकरितां यादीचें मनन होऊन सरकारास लिहून जाऊन आमचा सत्वर बंदोबस्त होण्यांत येईल असें झालें पाहिजे. " कांहीं दिवसांनीं म्हणजे १६ जानेवारी सन १८४४ रोजीं त्या यादीस कांहींसें अनुकूल उत्तर आलें. ह्या अर्जावर प्रत्येक देशमुख बंधूस २०० रुपये पेन्शन देण्याचा ठराव होऊन आला. व मागील बाकीबद्दल सरकारांतून ७०० रुपयेही पण त्यास मिळालें. मात्र हें पेन्शन त्यांस सरकारी नोकरी लागल्यावर ती असेपर्यंत मिळणार नाहीं, पुढें तहाहयात मिळेल अशी शर्त होती. त्याप्रमाणें गोपाळरावजींसही २०० रुपये वर्षासन सुरू झालें. पडत्या काळांत चढता काळ आला तर मनुष्यास सुख होतें; परंतु चढत्या काळांत पडता काळ आला म्हणजे फार कठीण दशा येते. तीच अवस्था ह्या वेळीं देशमुख घराण्याची झाली होती. तेव्हां या पेन्शनच्या ठरावानें त्यांस बराच धीर आला हें उघड आहे. तें त्यांस नोकरी लागेपर्यंत मिळालें व नोकरी लागतांच तें बंद होऊन पुढें नोकरींतून मुक्त होऊन पेन्शन मिळाल्यानंतर पुन्हां हें वर्षासन सुरू झालें होतें. हरिपंतांची जहागीर त्याचे मृत्युनंतर जप्त झालीं. त्यावेळीं गोपाळरावजींचें वय अवघें १३ वर्षांचें होतें. तेव्हां त्यांनीं वर लिहिलेल्या पेन्शनीचे खटपटींत विशेष मन न घालतां आपला शिकण्याचा क्रम पुढें चालविला होता. ते विष्णुपंत पाटणकर यांचे कोर्टांत व अमृतराव अप्पाजी रानडे, हवेली तालुक्याचे मामलेदार, यांचे कचेरींत लिहिणें शिकावयास जात असत. तेथील शिकणें संपल्यावर गोपाळरावजींचें मनांत आलें कीं, आतां ह्या मराठी विद्येत अर्थ उरला नाहीं. शिवाय वेळोवेळीं इंग्रजी लिहिण्याचें कामही पडतें आणि तें करावयास कोणी मिळत नाहीं; याकरितां आपणच आतां इंग्रजी शाळेंत जाऊन आपला इंग्रजी अभ्यास वाढवावा. म्हणून सन १८४१ पासून ते पुणें येथील गव्हर्नमेंट इंग्लिश स्कूल मध्यें जाऊं लागले. ते त्या शाळेंत अवघे ३ वर्षें होते. तरी तेवढ्यांत त्यांनीं सर्वांकडून

इंग्रजी भाषेच्या प्राविण्याबद्दल वाहवा मिळविली. तीन वर्षांत एवढा अभ्यास केला ह्यावरून त्यांच्या तैल्बुद्धीची साक्ष पटते.

गोपाळरावांस इंग्रजी शाळेंत जाऊन तीन वर्षे झाल्यावर एज्युकेशन बोर्डानें त्यांच्या हुषारीबद्दल अभिप्राय नमूद केला; तो असाः—

Extract para 29 from the report of the
Board of Education
for 1844 No. IV

" One pupil, Gopall Haree Deshmook, has distinguished him-self and deserves to have his name handed up to the Board as a good English scholar, and worthy of its patronage."

गोपाळरावजींच्या यशाचा हा ' श्रीगणेशा ' किंवा त्यांच्या सत्कीर्तीचा हा उगम होय. ह्यापुढें गंगोत्रीपासून ज्याप्रमाणें गंगेचा प्रवाह वाढत्या प्रमाणानें तुफान होऊन शेवटीं सुंदरवनापाशीं सहस्र मुखानें पसरला आहे, त्याप्रमाणेंच त्यांची किर्ति व यशही यापुढें उत्तरोत्तर पसरत चाललें. तेंच सांगण्याचा ह्यापुढें मुख्य भाग आहे.

ही बोर्डानें त्यांची शिफारस केल्याबरोबर गोपाळरावजींनी ती शाळा सोडण्याचा निश्चय केला. आणि मास्तरापाशीं निरोप मागितला. त्या वेळीं त्या शाळेच्या युरोपियन मास्तरानें मोठ्या आनंदानें त्यास सर्टिफिकेट दिलें. इतकेंच नव्हे तर असला बुद्धिमान् विद्यार्थी आपल्या शाळेंतून जातो म्हणून त्यांस वाईटही वाटलें. त्यानें दिलेलें सर्टीफकीट हें:—

Gopall Raw Deshmook entered the Poona Government English school in February 1841. He had previously acquired a considerable knowledge of English, and he has distingwished him-self by the progress he has made since he commenced attending the school. He has a very good knowlage of General History, translatse remarkably well from English into Marathi, and compose in English in a style superior to what is commonly to be met with among natives who profess to write that language. He knows Arithmetic and a little Mathematics and writes good hand.

I entertain a very favourable opinion of his abilities and genaral charactor, and consider him well qualified to fill a situation of respectability.

( signed ) E. A. Eisdale, Head-master
Poona G. E. School.

Poona 9th may
1844

वर दिल्ली बोर्डानें केलेली शिफारस तेथील जज्ज John Wardaw साहेब यांनीं वांचून आपण होऊन सरकारांत लिहिलें, आणि त्यास दक्षिणेंतील सरदारांच्या एजंटच्या ऑफिसामध्यें ७७ रुपये दरमहाची ट्रान्सलेटरची जागा देवविली.त्याप्रमाणें ते त्या कामावर रुजू झाले.तेथें त्यांचा इंग्रजी अभ्यास पुष्कळ वाढला. पूर्वीपासूनच घरांत असलेलीं जुनीं वडील माणसें इंग्रजी लिहिण्यावाचण्याचा मोठा तिरस्कार करीत. म्हणून गोपाळरावजींनीं आपल्या लहान विद्यार्थीदशेपासुनच इंग्रजी अभ्यासाला एक निराळीच स्वतंत्र जागा शोधून काढली होती. ती कोठें ? तर त्यांच्या घरांत विहीर असून तिच्यांत एक भला मोठा दगडी कोनाडा बांधलेला होता, त्यांत ते जाऊन बसत आणि इंग्रजीचा अभ्यास करीत. त्या वेळच्या इंग्रजी अभ्यासाच्या आवडीबद्दल लोकांची मनःस्थिति कशी होती हें दाखविणारा एके ठिकाणीं एक इंग्रजी उतारा मिळाला आहे तो असाः—

" In those days there existed great objection to learning English in Poona. The pupils of an English school were obliged to bathe on their return home and there were not more than 50 boys attending the only English school taught by Mr. Eisdale. There were similar objection also to being employed in the service of a new Government, Gopalrao Haree was the first of the Deshmook family, who entered the service. "

बुद्धिमान् आणि मेहनती मनुष्य म्हटलें कीं त्याची केव्हांही भरभराटच होत असते. हा जगाचा नियम आहे. तो गोपाळराव हरींच्या ठिकाणीं ही अनुभवास आला. तेही एजंटच्या ऑफिसामध्यें आपलें काम फार झटून

व इमानेंइतबारें करीत असल्यामुळें त्याच ऑफिसमध्यें ते १३७ रुपये पगारावर हेड क्लार्क झाले. व तेथपासून त्यांची एकसारखी उत्तरोत्तर बढतीच होत चालली.

आपलें काम कोणतेंही असो, तें लक्ष लावून करावयाचें, हा गुण गोपाळरावांचे अंगीं अगदीं लहानपणापासून होता. त्यांनीं इंग्रजी शाळेंत कीर्ति मिळविली त्या अर्थी ते आपला अभ्यास झटून करीत असत, हें उघड आहे. आणि सरकारी नोकरी लागतांच तेथील आपलें काम चोख व उत्तम करून वर्षा दोन वर्षांत एवढी बढती मिळविली ह्यावरून ते आपलें काम फार दक्षतेनें करीत होते हेंही उघडच आहे. ह्याशिवाय ते सार्वजनीक व लोकहितार्चीं जीं कामें करीत तीं फारच आश्चर्य करण्यासारखीं असत. कोठेंही कथाकीर्तन असो; त्यांत गोपाळरावजी हे अगदीं नेहमीं पुढें असावयाचे. व्याख्यान म्हटलें कीं गोपाळरावजी तेथें हजर. व्याख्यान द्यावयाचें असलें तरी तयारी. पुढें पुढें तर कोणतीही व कोठेंही सभा होऊं द्या कीं तेथें गोपाळरावजी देशमुख अध्यक्ष ही गोष्ट तर अगदीं ठरल्यासारखीच झाली होती. लहानापासून तों थोरापर्यंत कोणीही आपल्या सभेमध्यें अध्यक्ष होतां का म्हणून विनंती करण्यास येवो, रावबहादुराकडून त्यांना कधीं नकार द्यावयाचा नाहींच. असा त्यांचा नेहमींचा धारा असे. पण त्यांनीं ह्याहूनही एक मोठा उद्योग ह्या वर्षापासून अंगिकारिला आणि तो बहुतेक आमरणांत चालविला. तो कोणता? तर लोकहितार्थ वर्तमानपत्रांतून लेख लिहिणें हा होय. ह्या वर्षापासून म्हणजे सन १८४८ पासून ते राजहितासाठीं व लोकहितासाठीं लेख लिहूं लागले. ते प्रत्येक आठवड्याला बहुतकरून एखादा तरी लेख वर्तमानपत्राकडे पाठवीत असत. त्यांत सरकारकडे कांहीं दोष असल्यास तो दाखवीत किंवा लोकाकडे कांहीं दोष असल्यास तो ही दाखवीत असत. त्यावेळीं ब्राह्मण लोकांत पसरलेलें अज्ञान पाहून त्यांचा जीव तिळतिळ तुटत असे. त्याकरितां त्यांची ते स्पष्ट शब्दांनीं निर्भर्त्सना करीत. ह्याशिवाय त्यांच्या लेखांत अवांतर माहितीही इतकी विपुल असे कीं, तितकी माहिती एखाद्या मोठ्या पंडिताला सुद्धां मिळणें कठीण. त्यांच्या ह्या नुसत्या वर्तमानपत्रांतील पत्रव्यवहाराचाच 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रह' ह्या नांवाचा एक १०४९ पृष्ठांचा भाग झालेला प्रसिद्ध आहे! हा सर्व लेखसंग्रह शिळाछापावरचाच आहे. ह्याशिवाय त्यांचें ग्रंथही अनेक आहेत.

व त्यांत ही अत्यंत दुर्मिळ अशी विपुल माहिती भरलेली आहे. ह्याच लेखसंग्रहावर "निबंधमालाकारां" नीं सुमारें एक वर्षभर टीकात्मक लेख लिहिले आहेत. ह्यास्तव ह्या सर्वांचा विचार पुढें एका निराळ्याच स्वतंत्र आरंभ करण्याचें ठरविलें आहे. तथापि ह्याच वर्षापासून म्हणजे इ. स. १८४८ पासून त्यांच्या लेखांची ज्या अर्थी सुरवात झाली आहे, त्या अर्थी त्यांचे त्या वेळचे थोडेसे तरी विचार येथेंच नमूद करणें इष्ट दिसतें. म्हणून आम्ही त्यांच्या वर्तमानपत्रांतलि लेखसंग्रहांतून कांहीं पहिल्याच वर्षांतील अस्सल बरहुकूम पत्रें दाखल करतों.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें गोपाळराव एजंटच्या आफिसांत हेड क्लार्कचें काम करीत असतां पुण्यास कोतवालीच्या जाग्यावर एक ब्राह्मण होता. त्यानें फार अन्याय केले. लोकांवर जुलूम केला; व तो लोकांपासून लांचही घेत असे. इत्यादि गुन्हे त्यांजवर शाबीत झाल्यामुळें इंग्रज सरकारनें त्यास कामावरून बडतर्फ केलें, व अतःपर कोतवालीसारख्या जबाबदारीच्या कामावर ब्राह्मण म्हणून नेमावयाचा नाहीं, कारण ब्राह्मण लोक फार लबाड असतात; ह्याकरितां ही जागा ह्यापुढें खिश्चनला द्यावयाची असा निश्चय केला. हें ऐकून गोपाळरावजीस फार वाईट वाटलें. व त्यासाठीं त्यांनीं सरकारासही थोडासा हितबोध करण्याकरितां 'प्रभाकर,' या नांवाच्या वर्तमानपत्रांत नंबर १ चें पत्र प्रसिद्ध केलें. तें असें:—

प्रभाकर ता. १९ मार्च १८४८.

### पत्र नंबर १

## इंग्रज लोकांच्या व्यक्तिमात्राच्या गैरसमजुतीविषयीं.

विनंती विशेषः—हल्लीं अशी बातमी कळली आहे कीं, पुणें येथें राज्य बुडाल्यापासून फौजदार कोतवालीचे कामावर ठेवीत होते. त्यापैकीं जे ब्राह्मण फौजदार झाले त्या सर्वांची बहुतकरून वहिवाट दुरुस्त नाहीं, असें अनुभवावरून कळलें, व माजी फौजदार बळवंतराव गोविंद याजवर तर दरवडयाचे वगैरे अपराध स्पष्टपणें शाबीद होऊन त्यास मोठी शिक्षा मिळाली. तेव्हां ब्राह्मण लोक अविश्वासू आहेत; याजकरितां येथील अधिकाऱ्यांनीं असें मनांत आणलें आहे कीं या कामावर पुनरपि ब्राह्मण न नेमितां खिस्तियन धर्मातील मनुष्य नेमावा, त्यास याविषयीं मी थोडासा मजकूर आपल्यास लिहून

पाठवितों. जर कृपाकरून आपलें पत्रद्वारें प्रसिद्ध होईल तर ब्राह्मणांवरील दोष निवारण होईल, असें वाटतें.

ब्राह्मण लोकांनीं वाईट वर्तणूक केली असें अनुभवावरून जें दिसलें तें खरें आहे. परंतु त्याचा दोष ब्राह्मणाकडे नाहीं. कारण चांगले वाईट लोक सर्व जातींत असतातच, परंतु त्यांपैकीं पक्का शोध करून चांगले कुलीन, संभावित, नीतिमान असे असतील त्यांस अधिकारावर नेमावें. धर्मशास्त्रीं व्यवहार मयुखांत प्रथमतः श्लोक आहे; तो असा कीं:—

**व्यवहारान्नृपः पश्येद्विद्वद्भिर्ब्राह्मणैः सह ।**
**धर्मशास्त्रानुसारेण क्रोधलोभविवर्जितः ॥ १ ॥**
**श्रुताध्ययनसंपन्ना धर्मज्ञाः सत्यवादिनः ।**
**राजा सभासदः कार्यारिपौमित्रेच ये समाः ॥ २ ॥**

याप्रमाणें बहुत अध्ययन केलेले, बहुत ऐकलेले, धर्म जाणणारे, सत्य बोलणारे, निष्पक्षपाती सभासद राजानें अधिकारी नेमावे म्हणून आहे. त्याप्रमाणें जर ब्राम्हण लोक नेमले असते तर असें कां होतें ? इंग्रजी राज्यांत हें रयतेचें फार नुकसानास कारण व दुर्दैव आहे कीं, ज्या साहेब लोकांचे हातीं मोठ्या नेमणुका द्यावयाच्या असतात ते त्या देते वेळीं कांहीं-एक विचार करीत नाहींत. मनास येईल त्यास देतात. त्यांची विद्या, गुण, अब्रु, यांचा शोध घेण्याचे श्रम करीत नाहींत. म्हणून अयोग्य लोक मोठ मोठ्या कामावर मुकरर होऊन लांचेचे वगैरे बोभाटे उठले आहेत. साहेब लोकांचे हातीं राज्य गेलें परंतु ते इकडील लोकांप्रमाणें काम करण्यांत माहितगार आहेत असें नाहीं. ते विद्वान, शहाणे, निष्पक्षपाती आहेत हें खरें; पण देशाची व भाषेची माहिती नेटीव लोकांप्रमाणें त्यांस नाहीं. यामुळें नेटीव लोक जे त्यांचे हाताखालीं आहेत त्यांचे हातीं रयतेचे वाईटबरें करणें पुष्कळ असतें. गरीब लोकांस साहेबांची भेट किंवा त्यांशीं स्वस्थपणाचें भाषण होत नाहीं. तेव्हां त्यांस कामगार हेच साहेब असतात आणि हे कामगार लोक वाईट चालीचे, आशाबद्ध व द्रव्यलोभी असतात. म्हणून लोकांस फार छळितात. त्यांतून एखाद्याचे अपराध बाहेर दृष्टोत्पत्तीस येऊन त्यांस शासन मिळतें. परंतु तसें सर्वांस होत नाहीं. नेटीव लोक महान धूर्त आहेत, म्हणून त्यांचे अपराध सांपडणेंही फार कठीण आहे. साहेब लोक मोठें काम ज्यास देतात त्याची हुशारी मात्र पाहतात. परंतु कामगाराचे

फक्त हुशारीचा उपयोग काय ? तिच्याशिवाय दुसरे बहुत गुण त्यास पाहिजेत. मनुष्य कृत्रिम अंतःकरणी व तोंडा पुढें बोलणारा व इकडे तिकडे धावून आर्जवासाठीं काम करणारा तो समक्ष मेहेनत घेतो, त्यामुळें इंग्रज लोकांस असें वाटतें की, हा फार चांगला हुषार आहे. परंतु ज्याचें अतंकरण मलीन व ज्यास धर्मशास्त्र कळत नाहीं त्याचा दुष्टपणा हृदयांत असतो. तो साहेबानें तोंड मागें फिरविलें पुरें, कीं लागलाच प्रगट होतो. तेव्हां अशा प्रकारचे लोक अधिकारावर नेमल्यावर मग त्यांचे सद्गुण ऐकावयाची अशा कोठून ? परंतु येणेंकरून सर्व जातीस बट्टा लागला असें नव्हे. ती नेमणाऱ्याचें अलक्ष यामुळें अशा गोष्टी घडतात. पुण्यांत बहुत संभावीत,कुलीन, सरंजामदार व पेनशनवाले गृहस्थ आहेत, परंतु त्यांतील चांगला आणि विद्वान् मनुष्य आजपर्यंत कामावर कोठें ठेवला आहे असें झालें नाहीं. शाळेंतून शिकलेलें कुलीन व विद्वान् यांचेंविषयीं तर सरकारानें बहुत वेळ हुकूम पाठविले आहेत. परंतु जिल्ह्यांतील साहेब लोक त्या सर्वांस एकीकडे ठेवितात. आणि आपले कृपेंतील एखादा मनुष्य त्याचें कुलशील चांगलें नसलें आणि अगदीं कवडीचा मोल असला तरी त्यास ठेवून ‘ रजाचा गज ’ करतात. या प्रमाण कुलहीन लोक इंग्रजांचे दरबारांत फार जमले आहेत, त्यामुळें ब्राह्मण लोकांची अब्रु कमतर दिसते, हें त्यांचें दुर्दैव म्हणावें. याची तजवीज कोणी मनांत आणीत नाहींत. साहेब लोक मनास येईल तसा दोष ठेवितात हें ठीक नाहीं. राजांनीं खराब लोक सन्निध केले तर कारभार चांगला कसा होईल ? मागें कारभार अशा रीतीनें चालत नव्हता. व माधवराव पेशव्यांच्या वेळच्या किती एक गोष्टी ऐकण्यांत आहेत. त्याजवरून दिसतें कीं, ब्राह्मण लोक सगळे वाईट आहेत असें नाहीं. बाजीरावाचे कारकिर्दींत बहुतेक ब्राह्मणास नीचत्व येऊन ते दुर्गुणी झाले हें खरें आहे. तत्रापि अद्याप न्यायनिष्ठुर व योग्य असेही पुष्कळ आहेत. परंतु त्यांस परीक्षक मिळून जसें कवि म्हणतो “ **काकः काकः पिकः पिकः** ” असें करणारे भेटतील तेव्हां व्यवस्था नीट होईल. साहेब लोक भाषा वगैरे शिकण्याचा प्रयत्न करतात, तशी जर मनुष्य निवडून काढण्याची मेहेनत घेतील तर लोकांचा फार फायदा होईल. बहुतेक ठिकाणीं असें आहे कीं, एकादी जागा खाली झाली म्हणजे वेळेस जो उभा असेल त्यास ती देऊन आपली मेहेनत चुकवितात. कारण जर बातमी फुटली तर कोणी शिफारसी आणतात

व कितीएक अर्ज्या पडतात. तेव्हां त्या वाचावयाच्या एवढी मेहनत कोण करतो ? म्हणून तात्काल भलत्या एखाद्या शुंभास ती जागा देतात. तेव्हां चांगले लोक कोठून मिळणार ? कांहीं दिवस जागा खाली राहून किंवा परीक्षा घेऊन जितके उमेदवार जमतात तितके जमूं देऊन त्यांची नीट चौकशी करून जागा द्यावी, तसें करीत नाहींत. आणि जाग्याची सोडत काढतात. येणेंकरून लोकांची अब्रू जाते आणि ठेवणाऱ्याचे बुद्धीची प्रशंसा-ही होत नाहीं. याचा बंदोबस्त लौकर होईल आणि उगीच कारणाशिवाय ब्राह्मणाचे अब्रूस दूषण लावणार नाहींत अशी आशा आहे. इंग्रज लोक फार शोधक आहेत. म्हणून त्यांस हें अवघड नाहीं. कदाचित् याविषयीं सरकार लक्ष देईल तर बरें होईल. याजबाबद आणखी कांहीं सूचना पुढें लिहून पाठविण्यांत येतील हे विनंती.

"लो. हि."

## पत्र नं. २

## लहानपणच्या लग्नापासून अडचणी.

विनंती विशेषः—तारिख ५ वी माहे मार्च सन मजकूरचे पत्रांत आप-ल्यास 'प्रवासी' याणें पत्र लिहिलें तें आपण कृपा करून लोकांत प्रसिद्ध केलें, त्यांतील मजकूर पहातां फार समर्पक आहे. यास्तव त्याचे अनुमोदनार्थ हें पत्रही प्रसिद्ध कराल असा हेतु आहे.

सांप्रत काळांतील लोक अल्पायुषी व रोगिष्ट असतात, असें महाराष्ट्रां-तील लोक म्हणतात. व त्याचे प्रतिपादनार्थ वृद्ध पुरुष अंगापिंडानें सदृढ असतात,त्यांचें उदाहरण दाखवितात.असें होण्याचें कारण 'प्रवासी'ह्यांनीं लिहिलें आहे. त्याजवरून साफ दिसत आहे कीं, लोकांच्या चाली आणि नीति भ्रष्ट झाल्यामुळें हा परिणाम निदर्शनास आला आहे.केवळ काळाच्या सत्तेनें अशी गोष्ट घडते असें नाहीं. हा तर निश्चय दिसतो.परंतु अविचारी लोक मनास येईल तसें बोलतात. आणि कारण लक्षांत आणीत नाहींत. याजमुळें त्यांस आपली नीतिही सुधारतां येत नाहीं. जर लोक थोडासा विचार करतील व शास्त्राज्ञा कशी आहे ती पहातील तर हल्लींचे उत्पत्तींतील लोकही पूर्वींचे लोकांप्रमाणें सदृढ आणि दीर्घायुषी होतील; व असें झालें म्हणजे पूर्वींच्या लोकांप्रमाणें पराक्रमही करतील. परंतु असें न करितां बहुत लोक व त्यांत ब्राह्मण फार

वाकडे आणि अशास्त्र चालतात. हल्लीं लग्नाचे दिवस आहेत याजमुळें किती एक ठिकाणीं वारंवार असें पाहण्यांत येतें कीं, मोठेमोठे संभावीत गृहस्थांचा मुलगा पांच वर्षांचा झाला म्हणजे ते काळजींत पडतात. ती त्यांची काळजी दोन प्रकारची असते, एक मुलाचें लग्न लौकर कसें होईल आणि त्यास हुंडा पुष्कळ कसा मिळेल ? यास्तव मोठा प्रयत्न करून हीं दोन्हीं कार्यें साधतात. आणि सांत आठ वर्षांच्या मुलास बरोबरीची मुलगी मिळाली किंवा ती विद्रूप, हीनकुलोत्पन्न असली तरी द्रव्याचे आशेनें ती करतात व मग लग्न उभें राहिलें म्हणजे आपल्यास धन्य मानून कर्ज करून पुष्कळ खर्च करितात. याप्रकारें करून कर्जबाजारी होऊन तें लग्न कोणीकडून तरी दगडावर दगड घालून सिद्धीस नेतात. पुढें लवकरच 'प्रवासी' यानें जे परिणाम लिहिले आहेत ते निदर्शनास येतात. आणि बहुधा बापाचे, आईचे डोळ्यादेखत पुत्राचें व सुनेचें वांकडें पडतें. व पहिल्यानें जी जोडी गोजिरवाणी दिसते ती मग शत्रूप्रमाणें दिसूं लागते. जो विद्या करण्याचा काळ व जेव्हां शरीर बळकट व्हावयाचें त्यासमयीं पुत्र संसारी व मुलाबाळांचा धनी होतो. मग त्याची विद्या तरी संपूर्ण कशी होईल ? आणि शरीरांत जोम कसा येईल ? घोडा किंवा बैल मेहनतीसाठीं तयार करावयाचा असेल तर त्यास घोडीचें किंवा गायीचें दर्शन होऊं देत नाहींत. याचें कारण हेंच कीं, मग तो दळू होईल व मेहनतीचीं कामें करावयास अयोग्य होईल. तसेंच मनुष्याविषयीं आहे: कारण मनुष्य तरी एक जनावरच आहे. व या जनावरास ईश्वरानें बुद्धि-कौशल्य इतरांपेक्षां अधिक दिलें आहे. असें असतां रानचे जनवरांपेक्षां मूर्ख-पणानें वागतात, तेव्हां त्यांस ईश्वरानें बुद्धिविशेष व विचार दिल्याचा उप-योग काय ? आणि अल्प वयांत मुलास यौवन प्राप्त आहे किंवा नाहीं याचा संशय आहे तों इतक्यांत स्त्रीविषयीं लुब्ध झाल्यानें त्यास दुर्गुण आणि अपौ-रुष प्राप्त होतें व त्याचें जन्माचें सार्थक होत नाहीं. फजीती मात्र होते. आणि त्याचा बदलौकिक झाला म्हणजे सर्व कुळाचाही होतो. मग त्याचे बापानें लवकर लग्न करून शिफारस मिळविल्याचें त्यास बक्षीस काय मिळालें बरें ? व्यभिचार मात्र अशानें बहुधा वाढला आहे. आणि विप्रस्त्रियांनीं इतर जातीपेक्षां ताळ टाकला आहे. हें बहुधा लोक समजतात. व पूर्वीपासून बाजीराव पेशवे यांचे अमलांत लोकांत भ्रष्टाकार होऊन ही अधर्मप्रवृत्ति उत्पन्न झाली, तीस लोकांचे अज्ञानानें उत्तेजन आलें आहे. आणि यानें

ब्राह्मणधर्मास फार लज्जा आली आहे. ही दूर करण्याकरितां आपले सारख्यांनीं भगिरथ प्रयत्न केला पाहिजे. वारंवार लोकहितसंबंधीं मजकूर आपण प्रगट केल्यास काळेंकरून तरी या गोष्टी हृदयांत ठसून नीति आणि धर्म यांचें स्थापन होईल. यास्तव माझी ही विनंति सर्व लोकांस कळवावी कीं, ज्या चाली एक वेळ पडतात त्या जरी वाईट असल्या तरी त्या लोकांस फार लाडक्या वाटतात. यामुळें त्यांचा त्याग करण्यास अनमान होतो. व जे लहान किंवा गरीब आहेत ते तर अगदींच धजत नाहींत तें मोठे लोकांकडे पाहून दबतात; यास्तव कोणी संभावीत लोकांनीं आरंभ केल्याशिवाय हें होणार नाहीं. महाराष्ट्र देशांत जे मोठाले गृहस्थ आहेत त्या सर्वांस बहुत करून मुलेंबाळें आहेत; त्यांनीं ही गोष्ट मनांत वागवून केली तर इतर लोक त्यांचे पाठीमागें चालूं लागतील. जसें बाजीराव यांचें राज्य बुडालें तेव्हां शूरांचा फार तोटा पडला, तसें आतां इतकें मूर्खपण पसरलें आहे कीं, लोकांस मार्ग दाखविण्याजोगे शहाणे देशांत नाहींत. असें अवर्षण कां पडलें ? लहानपणीं बापांनीं आपलीं मुलें शहाणीं केलीं तर किती एक चांगलीं निघतील आणि लग्न हें केव्हां तरी त्यांचें स्वसामर्थ्यानें घडेल. परंतु मुलास रोजगार धंदा नाहीं, शहाणपण नाहीं, व पुढें कसा काय निघतो, त्याचा अंकूर दिसत नाहीं तो त्याचे गळयांत मुलगी बांधून जोखिमांत घालावा व त्याची विद्या, आयुष्य सर्व बुडवावें यांत काय लाभ होतो ? लग्न बापानें केलें म्हणजे त्यांत काय मोक्षसाधन आहे ? ज्याचा तो आपलें पराक्रमानें करील तर फार चांगलें. आणि मोठेपणीं लग्न झालें म्हणजे लग्नसंबंधीं शपथा वगैरे मनांत सार्थ वागतील. आणि त्याप्रमाणें तो वर्तेल. परंतु लहानपणीं हें सिद्धीस जात नाहीं. व खाण्यापिण्याची सोय झाल्यापूर्वीं स्त्री व मुलें गळयांत पडतात. मग त्यानें पोटास मिळवावें, किंवा स्त्रीचे बरोबर रहावें ? थोडके दिवसांत पुण्यांत असा पर्याय झाला कीं, एक संभावित गृहस्थाचे मुलानें एक गरीब व्यापाऱ्याची मुलगी फसविली म्हणून तो हता उत्पन्न झाला होता. कोणी लबाड मनुष्य होते त्यांस सरकारांतून शासन होऊन निवारण झालें; परंतु कारण पाहिलें असतां त्या स्त्रीचें लग्न झाल्यापासून नवरा बाहेर गांवीं पोट भरावयास गेला होता व त्याचे पश्चात् ती कन्या यौवन दशेस आली तेव्हां तिनें एक द्रव्यवान शेजारीं गृहस्थ होता त्याचे संबंधानें बहुत कुकर्में केलीं याजमुळें तो नवरा पुनः पुण्यांत आला तेव्हां तें वर्तमान

ऐकून त्यानें स्त्रीचा त्याग केला. असें ऐकण्यांत आलें आहे. तेव्हां अपराध कोणाचा हें वांचणारांचे सदरांत येईलच. माझें म्हणणें इतकेंच कीं, असे दुराचार घडतात व फार ठिकाणीं घडले आहेत, त्यांचा विचार करून जे चांगले गृहस्थ आहेत त्यांनीं कांहीं तजवीज काढावी म्हणजे बरें होईल. नाहींतर पापवृद्धि फार होत आहे. तीस कोण आवरील तो आवरूं.

" लो. हि. "

प्रभाकर ता० २६ मार्च १८४८

## पुण्यांत लायब्ररीची स्थापना.

### नंबर ३

पुणें येथील पुस्तकगृहाविषयीं वर्तमान आपणांस लिहितों. पुण्यासारखे शहरांत विद्याशाळा वगैरे बऱ्याच आहेत; परंतु ग्रंथ वाचण्याची जागा लोकांस अद्याप माहीत नव्हती. व तिचा उपयोग कोणा नेटिव्ह लोकांस माहीत नव्हता, परंतु सांप्रतचे गव्हर्नर साहेब हेन्री ब्रौन यांस सुचविलें कीं, पुण्यास लायब्ररी स्थापण्याचा बेत करावा. त्याजवरून त्यांनीं ता० २८ जानेवारी सालमजकुरीं सर्व लोकांची सभा जमवून त्यांस हा मजकूर निवेदन केला. तेव्हां बुधवारचे वाड्यांतील इंग्रजी शाळेंतील अभ्यासी लोकही पुष्कळ हजीर होते, त्या सर्वांनीं अनुमोदन दिलें, व अदालतीकडील चाकर मंडळी व सरदार लोक यांणींही बरें आहे असें म्हटलें. पुण्यांतील कितीएक आळशी लोकांस लायब्ररी काय हें माहीत नाहीं. याचमुळें सरदार लोकांनीं व कामगार लोकांनीं उदारपणानें पैसा दिला नाहीं. तथापि अजमासें दीड हजार रुपये जमले. सभेपैकीं दहा असामी कमेटींत नेमून लायब्ररीचे कायदे ठरविल्यानंतर पुनरपि ४ थ्या फेब्रुवारीस दुसरी सभा भरली, त्यावेळेस कमेटीपैकीं एका गृहस्थानें विद्येच्या उपयोगाविषयीं महाराष्ट्र भाषेंत एक निबंध केला होता तो वाचून दाखविला. पुण्यांतील बहुत गृहस्थांस सांप्रतकाळीं विद्या आणि ज्ञान काय आहे याविषयीं समजूत नाहीं व ते आज बहुत वर्षें स्वस्थ घरीं बसून इंग्रज सरकारची देणगी खात आहेत. याजमुळें अशा कामांत ते झटून पडत नाहींत. व त्यांस कितीही समजून सांगितलें तरी त्यांच्या ज्या जुन्या व पोकळ समजुती आहेत त्याच ते खऱ्या धरतात. व त्या बदलण्यास बहुत दिवस पाहिजेत. याच कारणानें दुसरे सभेंत आणखी जास्त पैसा जमला नाहीं. परंतु

असें ठरविलें कीं, लायब्ररीचें काम पाहण्यास एक धाकटी कमेटी असावी. व तिचीं नांवें त्याच वेळेस लिहिलीं आणि लायब्ररीयन एक असामी नेमून बुधवारचे वाड्यांत कलेक्टर साहेब यांणीं कृपा करून जागा दिली आहे. त्या ठिकाणीं तारीख ७ फेब्रुवारीपासून लायब्ररी सुरू झाली. अद्याप गृहस्थांपैकीं कोणी ग्रंथ वाचावयास व ज्ञान संपादन करवयास येत नाहींत. शाळेंतील विद्वान मंडळी, ज्ञानेच्छु व विद्याभ्यासी मात्र येतात. सरदार लोक येत नाहींत. त्याविषयीं मला असें वाटतें कीं, आम्ही थोर, चार शिपाई, घोडा, व अबदागीर बरोबर घेतल्याशिवाय बाहेर कधीं पडत नाहीं तेव्हां या लायब्ररींत मुलासारखें शिकण्यास जावयास त्यांस लाज वाटत असेल, परंतु अज्ञानामुळें आणि अनश्रुतपणामुळें त्यांची अशी अवस्था झाली. तथापि तिचा परिहारोपाय ते ग्रहण करीत नाहींत हें आश्चर्य आहे. ज्यास अन्नवस्त्र मिळतें ते म्हणतात कीं, आम्हांस विद्येची काय गरज ? व ज्यांस मिळत नाहीं ते पोटापाठी मागें लागतात. तात्पर्य, अक्कल वाढविण्याचें काम कोणाच्यानें होत नाहीं. असो. ह्या अडचणी कांहीं दिवसांनीं दूर होतील व ज्ञानाचें संपादन नेटीव लोकांत चालू होईल. सांप्रतकाळीं तर आपले शास्त्रांत व देशांत काय आहे व इंग्रज लोक हे कोठून येऊन राज्य करतात, व त्यांचीं व्यवस्था काय आहे, हें कोणास माहीत आहे कां ? म्हणून विचारलें तर नाहीं म्हणून बहुतेक शपथ करतील, तेव्हां कोणाचे अमलांत आहों हें ज्यांस कळत नाहीं त्यांचें अज्ञान काय वर्णन करावें ! परंतु हें दूर होण्याचें साधन गव्हरनर साहेबांनीं लायब्ररी चालू केली याबद्दल त्यांची कीर्ति बहुत काळपर्यंत राहील आणि नेटिव लोक तिचा लाभ समजत नाहींत तरी पुढें कधीं काळीं समजून स्तुति करतील. आणि पुणें येथें मेहेरबान ब्रौन साहेब जज्ज होते त्यांनीं या कामास फार आश्रय दिला. त्यांचे योगानें हें काम सिद्धीस गेलें. असे असें लोक आठवतील अशी आशा आहे. गव्हरनर साहेब यांनीं हिंदू लोकांचे अज्ञान दूर होण्याचा उपाय पुण्यांतच केला आहे असें नाहीं परंतु नगरास केला आहे, व इतर ठिकाणीं जागोजागचे रेसिडेंट वगैरे अधिकारी यांस तसेंच करण्याविषयीं हुकुम पाठविले आहेत. गव्हरनर साहेबांचे प्रायव्हेट सेक्रेटरी कपतान फ्रेंच यांनीं तसेंच करण्याची प्रवृत्ति चालू करविली, त्याबद्दल त्यांचे ही मोठे उपकार समजले पाहिजेत. परंतु मला फार दुःख वाटतें कीं आपले लोक ज्ञान संपादन करणें हें लहान मुलांचें काम असें समजतात, आणि

शिकत नाहींत. आतां जे असें म्हणणारे आहेत ते कांहीं जाणतात असें असतें तर मी क्षमा केली असती. परंतु ते केवळ अडाणीवरचे किंवा सांबापुढचे असून विद्येस असें तुच्छ मानतात. व थोडें खावयास मिळूं लागलें म्हणजे आपली अप्रतिष्ठा होईल असें समजून वाचणें व अभ्यास करणें सोडून देतात. याबद्दल वाईट वाटून त्यांचा राग येतो. दुसरें ज्याजवळ द्रव्य आहे ते मदांध त्यांस असें वाटतें कीं, आम्हांसारखे कोणी नाहींत. विद्या काय आहे ? विद्येचें सार जें द्रव्य तें आम्हांजवळ आहे असें त्यांस वाटतें. व ते आपल्यास सूर्यचंद्राइतकें उंच समजतात. ही खोडी नेटीव लोक लवकर टाकतील तर बरें आहे. पूर्वीं यांची हीच खोडी होती,परंतु ती बाहेर व्यंगोक्ती सारखी दिसत नव्हती. कारण पुण्यांत पेशव्यांचें राज्य होतें म्हणून त्यांचें ज्ञान व अज्ञान आजपर्यंत दिसलें नाहीं. परंतु आतां तो समय नाहीं. आतां बाहेर काय आहे हें समजून आपली नीट व्यवस्था कशानें होईल हें पाहण्याची वेळ आहे. म्हणून आतां नेटीव लोक आळस व गर्व न करतील तर फार चांगले होईल. अस्तु. हल्लीं लायब्ररींत ३०० बुकें आहेत व आखबारा चार आहेत. बरेंच चाललें आहे. व पुढें सुधारेल अशी आशा आहे.

" लो. हि. "

अशा प्रकारें त्यांनीं अनेक विषयांवर अनेक लेख लिहून आपल्या मता—प्रमाणें आपल्या समाजसुधारणेविषयीं भगीरथ प्रयत्न केले आहेत. व त्यांत नाना प्रकारचे विषय आल्यामुळें ते सर्व लेख लिहून विपुल माहितीनें भरले आहेत. त्याचा विचार येथें आम्ही मुळींच करीत नाहीं. तर फक्त ज्यांच्या योगानें गोपाळरावजींचीं त्या वेळचीं समाजसुधारणेच्या संबंधानें काय मतें होतीं तीं ज्यांत बहुतेक एकत्र रितीनें कळतील असें एकत्र पत्र देऊन हा विषय इत—काच ठेवून देतों. सदरहू पत्र असें आहे :—

ता० ७ माहे मे.सन १८६३.

### नंबर ८

## जुन्या समजुती.

आमचे लोकांच्या पुष्कळ मूर्खपणाच्या समजुती आहेत. आणि इतकी ज्ञानाची प्रसूती झाली आहे तरी लोकांचा वेडेपणा अद्याप दूर झाला नाहीं. माझे आढळण्यांत ज्या समजुती आल्या आहेत त्यांची पत्रद्वारें एक यादी

प्रसिद्ध करून असें इच्छितों कीं कोणी समजदार मनुष्य असेल त्यानें त्या-विषयीं प्रतिपादन किंवा निषेध करावा. मला वाटतें कीं, या समजुती मूर्ख-पणाच्या आहेत, किंवा शहाणपणाच्या आहेत याचा निश्चय झाला म्हणजे संशय जाईल.

१ ब्राह्मणाशिवाय अन्य वर्णानें विद्या करूं नये. संस्कृत विद्या एकीकडेच आहे. परंतु एकादा मराठा किंवा इतर जातीचा कारकून ब्राह्मणांनीं पाहिला म्हणजे त्यांचे अंगाचे तिळपापड होतात हें काय ?

२ ज्ञानविद्या वाढवूं नये. कारण शहाणे व वेडे एका दरानें विकतील, असें भय बाळगतात.

३ जरी कोणी अपराध करूनही ब्राह्मणांचीं घरें भरलीं तरी त्यास पुण्य-वान् असें जाणतात. याचें उदाहरण बाजीराव पेशवे यांचे अपराध कोणी मनांत आणीत नाहींत व ब्राह्मण प्रजा त्यास योग्य मानितात.

४ देव-ब्राह्मणाकरितां कशीही कर्में केलीं तरी चिंता नाहीं. यांस उदा-हरणें, कबिरानें साधूस जेवण देण्याकरितां चोरी केली.

५ ज्या यंत्रानें बहुत लोकांचें काम थोडे माणसांचे हातून करतात तें चालू करूं नये. म्हणजे डाक, छापखाना टांकसाळ हे कारखाने लोकांचे पोटास बुडविणारे म्हणून त्यांचा द्वेष करितात.

६ सरकार करील तें करील, सत्तेपुढें शहाणपण नाहीं.

७ सर्व गोष्टी नशिबानें घडतात. शहाणपण व उद्योग यांचा उप-योग नाहीं.

८ सर्व सुख द्रव्यापासून आहे, त्यापलीकडे सुख नाहीं व सर्व गुणांचें अधिष्ठानही तेंच आहे.

९ विद्या पोट भरावयाकरितां शिकावी व ती श्रीमंतांनीं शिकणें जरूर नाहीं.

१० देशाचार, वृद्धाचार, शिष्टाचार, इत्यादिक जुन्याचालींविरुद्ध आचरण करूं नये. मागील चाल चालत आली ती चालवावी. याविषयीं आग्रह धरतात.

११ वाईट गोष्ट असेल आणि ती चार लोकांचें पोट भरण्याचें साधन असेल तर मोडूं नये.

१२ घर सोडून बाहेर जात नाहींत व मूलांस घरीं बाळगण्याविषयीं आग्रह धरितात.

१३ मुलें नातवंडें झालीं म्हणजे जन्माचें सार्थक झालें असें वडिलांस वाटतें. यास्तव मुलांचीं लवकर लग्नें करतात.

१४ इंग्रजांचे राज्यांत पैशास बरकत नाहीं. पाऊस कमी व जरी-मरी फार म्हणतात, व याचें कारण देवताक्षोभ झालेला आहे व इंग्रजांचें कायदे व रीती वाईट आहेत म्हणून समजतात.

१५ ब्राह्मणानें अपराध केला तरी त्यास शासन करूं नये व त्याचें सर्वस्वीं चालविण्यांत महापुण्य आहे, असें मानतात.

१६ धष्टपुष्ट ब्राह्मणास केला तो धर्म, परंतु आंधळ्या कुळंब्यास किंवा लंगड्या महारास दिलें तर तो धर्म नव्हे.

१७ पहिल्या लढाया व दंगे वगैरे होते, तेव्हां शिपायांचें पोट भरत होतें. आतां जिकडे पाहावें तिकडे सामसूम झालें आहे. हें वाईट असें कित्येकांस वाटतें. कुळंबी माजले व ब्राह्मण त्यांचे बरोबर झालें हें वाईट वाटतें.

१८ उद्योग न करावा हें थोरपणाचें चिन्ह व व थोरांनीं वेडे, भोळसर असावें व द्रव्याचा उपयोग इतकाच कीं, चार लोकांचें चालावें स्वस्थ खावें व निजण्यांत, स्नानसंध्येंत आयुष्य घालवावें हाच थोरपणा असें समजतात.

१९ संस्कृतविद्येखेरीज बाकीच्या विद्या व भाषा नरकाचें साधन आहेत.

२० स्नानसंध्येचा डामडौल करील तो धर्मशील आणि पुण्यवान्; मग त्याची वर्तणूक कशीही असो.

२१ स्त्रियांना विद्या शिकवूं नये व्यभिचार अधिक वाढेल.

२२ थोडा पराक्रम व थोडीशी ब्राह्मणावर भक्ति केली म्हणजे ईश्वराचा अवतार म्हणून त्याची लोकांत प्रसिद्धि होते. जसें शिवाजी भवानीचा अवतार, माधवराव पेशवे विष्णूचा अवतार.

२३ मुलगा झाला तर संतोष. मुलीचा संतोष नाहीं, अशी रूढी आहे.

२४ स्त्रियांचा पुनर्विवाह करूं नये कारण कीं जिच्या प्रारब्धीं सुख असेल तिचा नवरा मरणार नाहीं, जी अभागी तिचा मरतो.

२५ नवसानें देव पावतो. व मनुष्याचे सुखदुःखावर नवग्रहांचा अंमल चालतो म्हणून त्यांचे नांवानें ब्राह्मणांस दानें वगैरे केलीं म्हणजे पीडा दूर होते. तसेंच दुःशकुन मानणें इत्यादि.

२६ स्वार्थ पहावा; लोकांची काळजी करूं नये; या अर्थाची म्हण आहे कीं, लष्करच्या भाकऱ्या कोण भाजतो? राजाचीं लेंकरें काय खातात, त्याची चौकशी कशास. या समजुतींत हिंदु लोक सांप्रत परदेशांतील व स्वदेशांतील वर्तमानास गैर माहित. पलीकडचें घरीं काय होतें, याची काळजी शेजारी करीत नाहींत.

२७ आपल्या पाठीमागें कसें होईल याची काळजी करूं नये. 'आपण मेला जग बुडाला,' इत्यादि म्हणी.

२८ पुष्कळ पैसा उधळला म्हणजे लोकांत कीर्ति होते, मग तो पैसा कोठूनही येवो.

२९ यत्किंचित् कारणाकरितां खळवाद करितात; आणि भिकारी होतात; पण त्यास सोडीत नाहींत.

३० परक्याजवळ हात जोडून राहतात. पण आपले स्वकीयांशीं लढाई करितात; अशी चाल आपले लोकांची आहे. आपसांत प्राण देऊन भांडतात, पण परक्याच्या लाथा सोसून नम्र होतात.

एकूण तीस प्रश्न मीं घातले आहेत, हे ज्यास अमान्य असतील त्यानें लिहून कळविल्यास मला फार संतोष होईल. परंतु यासमयीं मूर्खपणाच्या समजुती इतक्या दृढ आहेत कीं, त्यांस असें वाटेल कीं, काय हे प्रश्न? याचीं उत्तरें काय द्यावयाचीं आहेत? पण तसें नव्हे. या गोष्टी मोठ्या आहेत व लोकांच्या गैरसमजुती जाव्या व त्यांनीं सुज्ञ व्हावें अशी इच्छा ज्यास असेल त्यास हें पत्र आहे. इतर जे लक्ष्मीचे बंधू आहेत त्यांचा हिशेब व गणना आमचे मनांत मुळींच नाहीं. ते बोलले सारखे न बोलले सारखे. ही विनंति.

'लोकहित वादी.'

अशा प्रकारें १८४८ पासून लोकहिताच्या गोष्टी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्याचा त्यांचा अव्याहत क्रम चालू होता हें मागें सांगितलेंच आहे. असो.

शिरस्तेदारीचें काम संभाळून व लोकहितासंबंधीं लेखनाचें काम चालू ठेवून ते पुढचा आपला अभ्यासही करीत असत. त्यांनीं कामावर लागल्यापासून दोन वर्षांत म्हणजे इ. स. १८४६ मध्यें मुनासिफीचीही परीक्षा दिली. त्याबद्दल त्यांचें सरटिफिकीट असे आहे:—

No. VIII

Seal of the
Sudder Adawluat

Bombay Sudder Dewance Adawluat
27 March 1846.

It is hereby certified that Gopall Raw Haree Deshmook has been examined by the committee which assembled in the Sudder Adawluat on the 18th march 1846, and has been declared qulified for the situation of Moonsiff in the Conkan and Deccan.

By order the Sudder Dewanee Adawluat
( signed ) W. H. Harrison, Register.

हें मुनसफीचें सर्टिफिकेट जरी सन १८४६ मध्यें मिळालें होतें तरी ५।६ वर्षे त्यास कांहीं मुनसफीची जागा मिळाली नाहीं. परंतु इ. स. १८५२ मध्यें सातारा जिल्ह्यांतील श्रीक्षेत्र वाई येथील जागा फर्स्टक्लास मुनसफीची केली, त्यावेळीं सरकारनें स्मरणपूर्वक गोपाळरावजींचीच नेमणूक केली. त्यावेळीं हुकूम पाठविला तो:—

Sattara 31st August 1852

To

AZum Gopal Raw Hurry Deshmook
Poona.

Sir,

The Commissioner at sattara is pleased to offer you 1st class Moonsiff-ship on his estabishment on a salary of 200 Rupees a month.

Should you desire to accept this appointment, you should present your-self at my office in Sattara with the least practical delay.

I remain, Sir,
yours obedienly,
( Signed ) M. A. Caxon J. A. C.

P. S. your station will be the town of Waee.

ही सरकारची २०० रुपये दरमहाची जागा गोपाळराव ह्यांनीं पत-करली. व त्याप्रमाणें ते वाईच्या मुनसिफीच्या कामावर जाऊन रुजूं झाले. व येथपासूनच त्यांच्या भाग्योदयाचा अंकुर चांगला जोमांत आला असें म्हटलें पाहिजे.

श्रीक्षेत्र वाई येथें ते मुनसिफीच्या कामावर रुजू झाले. तेव्हां त्यांच्या कामाची तरतरी, त्यांचा पाणीदारपणा, त्यांची तैल बुद्धि, अविश्रांत श्रम करण्याची हौस, येणेंकरून ते वरिष्ठ अंमलदारास प्रिय वाटत व त्यांजबद्दल त्यांनीं काढलेले उद्गार असेः—

I have a very high opinion; his abilities are of a high order; his character above suspicion and he appears to combine with them are earnest desire to discharge his duties conscientiously.

Azum Gopal Raw Hurry Deshmook 1st class Munsiff 1854 } H. Newton J. A. Commissioner.

त्याचप्रमाणें इतरासही ते प्रिय असत. साधारण लोकांतही त्यांचें वजन फार असे. त्यांच्या शरिराची ठेवण, मुद्रा व लोकोपयोगी स्वभाव ह्यांचा जंग-जोड असल्याच्या योगानें लोक त्यांना अतिशय पूज्य मानीत. ते सहज रस्त्यानें जाऊं लागले तर त्यांना नेहमीं नमस्कार व रामराम ह्यांची इतकी गर्दी उडे कीं, त्याला खंड म्हणून नाहीं. आणि रावबहादुर हे प्रत्येक सार्व-जनिक कामांत, सभेंत, नेहेमीं पुढारी असल्यानें त्यांना आबालवृद्ध ओळ-खीत असत. हें तर असो. पण शाळेंतील लहान लहान मुलींस सुद्धां हे गृहस्थ कोण हें सांगण्याची कधीं गरज लागत नसे.

कोणताही अंमलदार आपल्या वरिष्ठ अंमलदाराशीं सौजन्यानें वागतोच, पण तो आपल्या हाताखालच्या अंमलदाराशीं कसा काय वागतो यावरून त्याच्या अंतःकरणाची खरी परिक्षा होते. गोपाळरावजींचें अंतःकरण किती दयाळु होतें व ते आपल्या हाताखालच्या लोकांना किती ममतेनें वागवीत हें पुढील गोष्टीवरून चांगलें सिद्ध होईल. ती पुढील गोष्ट अशीः—

गोपाळरावजी वाई येथें सबॉर्डिनेट जजाच्या कामावर असतांना दोन तीन दिवसांत वरिष्ठ साहेब कोर्टाच्या तपासणीकरितां येणार आहेत म्हणून

समजलें, त्या दिवशीं शनिवार होता.ह्यास्तव त्यांनीं कोर्टांतील शिरस्तेदार,कारकून वगैरे सर्वांस बोलावून विचारलें कीं, सोमवारीं साहेब तपासणीस येणार आहेत. तेव्हां तुमचें काम सर्व तयार आहेना ? कां कांहीं शिल्लक आहे ? ह्यावर कित्येक म्हणाले " आमचीं कामें तयार आहेत, कांहींएक शिल्लक नाहीं. " कित्येक म्हणाले " आमचें थोडेंसें शिल्लक आहे, तें उद्यां रविवारीं तयार करून परवाला सर्व खलास करतों." पण त्यांत एक "बारनिशी कारकून" होता, तो म्हणाला "माझें काम फार शिल्लक आहे. तें कांहीं एक दोन दिवसांत होण्यासारखें नाहीं. " " कां? तुमचें काम इतकें शिल्लक कां पडलें ? " म्हणून विचारतां 'मी आजारी होतों,' वगैरे त्यानें सबब सांगितली. तेव्हां 'बरें, होईल तेवढें आटपा,' असें सांगून कोर्टाचें काम संपविलें. आणि स्वारी घरीं आली. पण दुसऱ्या दिवशीं, रविवारीं सकाळींच सात वाजले नाहींत तोंच गोपाळरावजी कोर्टांत गेले. त्या कारकूनाचा बारनिशीचा रुमाल काढला व काय काय काम शिल्लक होतें तें पाहून भराभर लिहिण्याचा सपाटा चालविला. तें तब्बल ११ वाजेपर्यंत ! विचारा बारनिशी–कारकून जेवण वगैरे आटोपून आतां आपलें काम होईल तितकें करून टाकावें म्हणून कोर्टांत आला व पाहातों तों मुनसफसाहेब स्वतःच आपलें बारनिशीचें काम करित आहेत ! हें पाहून तो फार खजील झाला. आणि भयानें त्याची गाळण उडाली. त्याकडे पाहून गोपाळरावजी प्रसन्न मुद्रेनें म्हणाले " पहा ! तुमचें बहुतेक काम मी आज आटोपून ठेवलें आहे. बाकी आतां थोडें राहिलें आहे. तेवढें तुम्ही संध्याकाळपर्यंत पार करा म्हणजे झालें. " कारकून नम्रपणानें हात जोडून म्हणाला, " साहेबांनीं दयाळू होऊन मजवर अनंत उपकार केले हें खरें आहे. पण आपण माझें काम केलें हें इतरांस समजलें तर लोक माझ्या तोंडांत शेण घालतील ? त्याची वाट काय ? " त्यास गोपाळराव म्हणाले " त्याला थोडी युक्ति आहे. मी कांहीं हें कोणापाशीं सांगत नाहीं, आणि तुम्हीही याबद्दल कोठें बोलूं नका म्हणजे झालें ! " असें सांगून स्वारी स्नानास घराकडे गेली. व तो कारकूनही वरिष्ठाचे शब्दांतून मुक्त झाला. केवढा हा दयाळूपणा आणि साधेपणा ! ह्यापैकी कोणच्या गुणाची अधिक तारीफ करावी हेंच समजत नाहीं.

गोपाळरावजीस वाईस जाऊन पुरतें वर्षही लोटलें नाहीं तोंच त्यावर्षी कृष्णाबाईस भयंकर पूर आला. हा शके १७७५ सालचा कृष्णेचा महापूर

म्हणून प्रसिद्ध आहे. हा पूर इतका भयंकर होता कीं, त्याचें वर्णन ऐकून अद्यापही अंगावर रोमांच उभे राहतात. ह्यावर्षी सात दिवस एक सारखा मुसळधार पाऊस लागला होता असें म्हणतात. ह्या पुराचें वर्णन पोवाडे करून शाहिरांनीं गाइलें आहे.

## पोवाडा.

**शक सतरासं पंचात्रामधिं महापूर आला ॥**
**कराडाचं वराड निघालं पाणि लागलं मनुष्याला ॥ १ ॥**

ह्या जलप्रलयांत किती गांव वाहून गेले, किती जनावरें व मनुष्यें प्राणास मुकलीं व किती तान्हीं मुलें व लेंकरें पाळण्यांतून वहावत आलेलीं धाडसी व दयाळू लोकांनीं बाहेर काढलीं याचा पत्ता नाहीं. कित्येकांनीं लाह्याचें पीठ कमरेस बांधून कित्येक दिवस देवळाच्या शिखरावर बसून काढले. ही सर्व महाराष्ट्रांत प्रसिद्धच आहे. ह्या महापुरानें वाई येथील सबंध दोन आळ्याच्या आळ्या वाहून गेल्या व जिकडे तिकडे एकच हाहाःकार उडाला. गोपाळरावजींचा स्वभाव अत्यंत दयाशील व उदार असल्यानें [ त्याचें एक उदाहरण बाल्यदशेंत दिलें आहे व बाकीचीं पुढें येणारच आहेत. ] ह्यांनीं ही ह्या कामीं होईल तेवढें सहाय व प्रयत्न केलें हें सांगणें नकोच.

गोपाळराव हरि हे वाईस मुनसिफच्या कामावर असतां त्यावेळस साताऱ्यास एक गृहस्थ प्रिन्सिपाल सदर अमीन असतांना ते सस्पेंड झाले. त्यांच्या जाग्यावर गोपाळराव हरि ह्यांस तीन महिने आक्टिंग नेमले होते. पुढें प्रिन्सपाल सदर अमीन यांची चौकशी सुरू झाली. तेव्हां तुम्हाला असेसर कोण कोण पाहिजेत ? असें सरकारनें त्यांस विचारलें. तेव्हां त्यांनीं सरकारांत जी नांवनिशी दिली त्यांत गोपाळराव हरि यांचेंही एक नांव होतें. त्यावरून गोपाळरावजींना ही त्याच्या खटल्यांत असेसर नेमलें होतें. यावरून त्यांची निस्पृहता व निःपक्षपातीपणा याविषयीं लोकांचा ग्रह कसा होता हें स्पष्ट होतें. गोपाळरावजी हे एजंटच्या हापिसांत असतांना कप्तान कूपर साहेब हे एजंट हापिसांत दप्तरतपासणीला वारंवार येत असत. त्यामुळें त्यांचा व गोपाळरावजींचा चांगला परिचय होता. कूपर साहेब गोपाळरावजीस नेहमीं आग्रह करीत कीं, तुम्ही आमच्या खात्यांत या. परंतु त्यांचें खातें इंगामी असल्यानें गोपाळरावजी ती गोष्ट मान्य करीनात. पुढें कूपर साहेबांस मुख्य

कमिशनरचा अधिकार मिळाला. तेव्हां त्यांनीं ३०० रुपये पगारावर गोपाळरावजीस आपले सब असिस्टंट इनाम कमिशनर नेमून घेऊन त्यांस सरकारकडून हुकूम पाठविला तो असाः—

No 606 of 1855

Territorial Department, Revenue

To

Gopall Raw Hurry Deshmook Esq.

Sir,

Government are pleased to appoint you a sub Assistant Inam Commissioner on a salary of rupees 250. two hundred and fifty, per mensum, and permanent travelling allowance of Ruppes 50, fifty.

I have the honour to be.

Sir,

Your most obedient servant.

( signed ) H. Young.

Officiating chief Secretary

to Government.

Bombay castle.
10th February
1856.

ह्या नव्या कामावर ते रुजू झाल्यानंतर नाशिक, खानदेश, नगर हिकडे फिरून तेंही काम त्यांनीं नेहमींप्रमाणें फार चोख रीतीनें बजावलें व त्याबद्दल त्यांची सरकारांतही वाहवा झाली ती अशीः—

Extract Paras 1 and 3 of the Government resolution No-4955 dated 1st November 1855.

" His Lord-ship in council has received a very favourable impression of the intelligence and zeal of Gopall Raw Hurry Deshmook, sub Assistant Inam Commisioner N. D. from the report now submitted.

If possible the investigation should be completed, by Go-

pall Raw Hurry, who has evinced in his proceedings and report a thorough knoweldge of the subject, which peculiarly qualify him for the task.

ह्याप्रमाणें सरकारी काम उत्तम बजाविलं. त्यामुळें सरकारांतून सन १८५७ चे सुमारास त्यास असिस्टंट इनाम कमिशनरचा बढतीचा हुद्दा देऊन त्यांचें हेड ऑफिस साताऱ्यासच ठेवलं. या जागीं त्यांचा पगार दरमहा ६०० रुपये होता. ह्या इनाम कमिशनरच्या कामांत गोपाळरावजींची नेहमीं प्रमाणें सरकारांत वाहवा झाली. कारण ते त्यांचें नेहेमींचेंच व्रत होतें. या संबंधानें एक सरकारी पत्राचा उतारा आम्हांस सांपडला आहे; तो येणें प्रमाणें:—

Extract from letter No. 1297 dated the 29th April 1857 from the Revenue Commissioner for Alienations to Government.

The Senior Native Sub-Assistants—Mr. Gopall Row Hurry Deshmook has been lately appointed an Assistant. I have every confidence that his future career will justify my recommendation. He commenced his service, and for 10 years was employed, in the Poona Agency. He is almost the only one of the subordinates of that office upon whose character and conduct the recent enquiries have cast no suspicion. It is no slight thing to have done this, surrounded by temptation and corruption.

पण त्यांचें याबेळचें या खात्यांतील काम लोकापवादास मात्र कारण झालें. त्या वेळची गोष्ट तर असोच, पण आजमितीला जरी त्यांच्या संबंधानें कोठें गोष्टी निघाल्या व त्यांच्या थोरवीचें व सद्गुणांचे कोणी वर्णन करूं लागलें तर मध्येंच कोणी तरी म्हणतो "ठाऊक आहेत ! सरकारची तुंबडी भरून आपलें व आपल्या मुलाबाळांचें कल्याण करून घेतलें !" पण ह्यावर त्यांना जर कोणीं उलट प्रश्न केला कीं "असें त्यानीं काय केलें ? कोणाचें कसें नुकसान झालें ? त्याचें एखादें उदाहरण आहे का ?" तर ते म्हणतात "छे छे बुवा ! तें नाहीं आपल्याला माहित, लोक म्हणतात म्हणून आम्ही

म्हणतो." तेव्हां खरें पाहतां ह्या आरोपाला वास्तविक पुरावा असा कोठून मिळत नाहीं. तरी पण हा बोभाटा बऱ्याच लोकांच्या तोंडून ऐकूं येतो यांत शंका नाहीं. फार तर काय, पण सुप्रसिद्ध टीकाकार कै० विष्णु शास्त्री चिपळूणकर ह्यांच्या कानापर्यंत सुद्धां हा बोभाटा गेलेला होता. पण त्यांना सुद्धां त्या गोष्टीबद्दल लोकवार्तेशिवाय दुसरें कांहींच प्रमाण सांपडलें नाहीं असें स्पष्ट दिसतें. कारण ते आपल्या ' निबंधमाला ' नामक मासिक पुस्तकाच्या ६४ व्या अंकांत ' लोकहितवादी ' च्या लेखावर टीका करतांना म्हणतात. " याशिवाय इतर अपयशाहून लांछनप्रद व लोकहितवादी या नांवाला न साजणारें असें आचरण त्यांच्या हातून अनेक प्रसंगीं घडलें आहे. हेंही सर्वप्रसिद्धच आहे. या आचरणाची वाच्यता येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. कां कीं, लोकहितवादीच्या लौकिक वर्तनावर आम्हांस चर्चा करण्याचें कारण नाहीं. ग्रंथकर्तृत्वाच्या नात्यानें आम्हीं त्याजविषयीं मुख्यतः लिहिणार आहों."

ह्यावर असा प्रश्न उद्भवतो कीं, शास्त्रीबोवांना जर ' लोकहितवादीच्या ' लौकिक वर्तनावर ग्रंथकर्तृत्वाच्या नात्यानेंच टीका करावयाची होती व लौकिक वर्तनासंबंधानें वाच्यता करावयाचें प्रयोजन नव्हतें, तर मग नसता अगांतुक विषय मध्यंतरीं कां काढला ? बरें काढला तर काढला, पण त्याचा स्पष्ट खुलासा करून व त्यास प्रमाणें वगैरे देऊन पुरती शहानिशा तरी करावयाची होती ? तीही नाहीं. एका मोघम वाक्यानें त्या थोर पुरुषाच्या कीर्तीवर विनाकारण शिंतोडा टाकून अपरिपक्व जनांचीं मनें कलुषित तरी कां करावींत? हें कांहीं ठीक झालें नाहीं. आधीं ज्याची वाच्यता करूं नये असें स्वतःच सांगतात तो ऐकीव आरोप तर सांगितलाच आणि तोही काय हें स्पष्ट नाहीं. सारेंच गुळमुळीत. केवळ अनुमानधबक्याचा बाजार. ' हें तर सर्वप्रसिद्धच आहे,' ह्यांत समजावें काय ? अशा मुग्धपणानें नामांकित पुरुषास दूषण लावणें हें कांहीं मोठेपणास शोभत नाहीं. असो.

निबंधमालेंत जरी ' लोकहितवादी ' या नांवाला न साजणारें व लांछनप्रद आचरण कोणतें घडलें हें स्पष्ट सांगितलें नाहीं, तरी प्रस्तुत प्रसंगीं त्याचा थोडा तरी विचार करणें आम्हांस भाग आहे. शास्त्रीबोवांच्या लिहिण्याचा रोख ' लोकहितवादीच्या ' इनामकमीशनच्या कामावर आहे हें तर सांगणें नकोच. गोपाळरावांच्या इनाम कमिशनच्या कामाबद्दल आम्हीं वर जो

लोकापवाद सांगितला तोच या वेळेस शास्त्रीबोवांचे मनापुढे असेल असे वाटतें. तो असा कीं:—

त्यांनीं इनाम कमिशनच्या कामामध्यें लोकांचीं वंशपरंपरेचीं इनामें होतीं तीं सरकारच्या घशांत घालून सरकारची तुंबडी भरली, आणि आपले व आपल्या मुलाबाळांचें कल्याण करून घेतलें व लोकांस तळतळत ठेवलें.

हा आक्षेप केवळ लोकवार्तेमध्येंच घुमत असल्यामुळें त्यास लेखी पुरावा असा तर कोठें आढळत नाहींच. तेव्हां त्याच्या संबंधानें विचार करावयाचा तर हा कीं ती गोष्ट कितपतशी शक्य आहे ? आधीं आपल्याच देशबांधवांचीं इनामें खलास करून सरकारची धन करण्यांत ' लोकहितवादी ' चा फायदा काय ? हा पहिला प्रश्न आहे. याचें उत्तर हें दिलें जातें कीं तेणेंकरून त्यांनीं आपलें व आपल्या मुलाबाळांचें कोटकल्याण करून घेतलें ! पण हें म्हणणें अगदीं वेडगळपणाचें आहे. कारण ' लोकहितवादी ' ला आपलें हित करून घ्यावयाला येवढ्या आड व नीच मार्गांत शिरण्याचें प्रयोजन काय ? ते तर लहानपणापासून सरकारची वाहवा मिळवीत होते. ७७ रुपयांपासून तों ३०० रुपयांपर्यंत ते स्वपराक्रमानेंच चढले, व पुढेंही जें जें सरकारी काम पडलें तें तें चोख करून त्यांस सहजीं बढती मिळण्यासारखी होती. मग लोकांचीं इनामें अन्यायानें व जुलमानें खालसा कशाला करावयास पाहिजेत ? दुसरें, मुलाबाळांचे कल्याणासाठीं किंवा त्यांना मोठमोठ्या चाकऱ्यानोकऱ्या मिळाव्यात ह्या इराद्यानें त्यांनीं हें ' लांछनप्रद ' काम पतकरलें म्हणावें तर तीही गोष्ट संभवनीय नाहीं. कारण गोपाळराव हरींचीं मुलें म्हणजे कांहीं शुंभनिशुंभ नव्हते कीं त्यांना कसें तरी दगडावर दगड घांसून अन्नास लावलें पाहिजे. त्यांच्यांत कोणी बी. ए., कोणी एल्. एल्. बी, कोणी एम्. डी. तर कोणी 'ब्यारिस्टर ॲट लॉ.' कोणी जज्ज तर कोणी कलेक्टर, कोणी इंग्रजी भाषेचा कोशाचा कोश पाठ करणारा, तर कोणी परीक्षेंत सुवर्णपदक मिळविणारा; अशीं ज्यांचीं मुलें बुद्धिमान्, त्याला असें लोकांचे गळे कापून इनामें खालसा करून सरकारची अन्यायानें भर करून वशीला तो कशास लावावयास पाहिजे ? नुसत्या एम्. डी.ला किंवा ब्यारिष्टरालाही त्याकाळीं कोठें थारा मिळण्यासारखा नव्हता काय ? एवंच आपल्या किंवा आपल्या मुलाबाळांच्या कल्याणासाठीं त्यांनीं स्वदेशबांधवांचीं इनामें कांहींतरी कुरापतीनें खालसा करून सरकारची धन केली

असें म्हणणें केवळ वृथारोप होय. ती गोष्ट मुळींच संभवनीय नाहीं. तर मग लोकांची जी एवढी हाकाटी ऐकूं येते ती कशाची ? असा प्रश्न सहजीं उद्भवतो. त्याचें उत्तर आमचे मतें असें आहे:—

पेशव्यांच्या अमदानींत शेवटीं शेवटीं इनामदारांना सनदा देत त्या चौकस बुद्धीनें बहुधा देतच नसत. यःकश्चित कारणावरून जरी श्रीमंतांची मर्जी खूष झाली, तरी 'द्या त्याला एक गांव इनाम!' असे हुकूम सुटत व ते तोंडचेच हुकूम कधीं कधीं अमलांत येत. व लेखी सनदा व्हावयाच्या तशाच राहूनही जात. इनाम चालू लागलें कीं, इनामदारासही सनदेची कधीं अवश्यकता वाटत नसे. अशी पूर्वीं पासूनच अंदाधुंदी चालत आल्यामुळें इनामदारांना आपल्यापाशीं सनदा आहेत किंवा नाहींत त्याची दादही नसे. इतकेंच नव्हे तर कित्येक धूर्त लोकांनीं ह्या अंदाधुंदीचा फायदा घेऊन खरो-खर लाटे गंगाजीपणा करून कित्येक कालपर्यंत कितीएक इनामे फुकट-फाकट खाल्लेलींही होतीं. अशी बाजीरावी इंग्रज सरकारचे राज्यांत कशी चालणार? त्यांनीं पूर्वीं दिलेलीं इनामें कायम राखण्याबद्दल श्रीमंतांच्या तहामध्यें कलम घातलें होतें खरें, पण त्याची ते यथोचित तपासणी केल्यावांचून थोडेच राहणार ? इंग्लिश अंमलदारांनीं लगेच खरीं इनामें कोणकोणाचीं आहेत, कोणीं दिली, कशाबद्दल दिलीं, त्याच्या सनदा आहेत किंवा नाहींत, नसतील तर इनाम दिल्याबद्दल त्याला पुरावा काय, ह्याबद्दल चौकशी सुरूं करणें स्वाभाविकच होतें. हीच कामगिरी इनाम कमिशनकडे सोंपविलेली होती. "पूर्वींपासून ज्यांच्याकडे इनामें चालत असत, त्यांच्या सनदा पहाव्यात, त्यांच्या खऱ्याखोट्याचा निवाडा करावा, सनदा नसतील तर प्रत्यंतरीं पुरावा पाहवा, आणि कांहींच पुरावा न मिळेल तर तीं इनामें खालसा करावीत." असे इनाम कमिशनरचे मालकास सरकारचे हुकूम सुटलेले होते. आणि ते हुकूम सरकारी अधिकाऱ्यांना अंमलांत आणणें भागच होते. मग गोपाळरावजीकडे अन्याय तो कोणता? पण बऱ्याच लोकांच्या सनदा त्यावेळीं सांपडल्या नसाव्यात. कारण पूर्वीं सनदा इतक्या जपून ठेवी तरी कोण? बरें अरसल सनद सांपडली नाहीं तर पेशव्यांच्या दप्तरीं दाखला मिळावा; तेंही नाहीं! असें झाल्यावर गोपाळराव तरी काय करतील ? किंवा गोपाळरावजींचे ठिकाणीं दुसरा कोणी गोमाजी असता, तर तो तरी काय करता ? हेंच 'इनाम खालसा' होण्याचें कारण. मग त्याचा दोष गोपाळरावांच्याच माथीं कसा काय येतो ? सरकारी नोकरी

पतकरल्यानंतर ती हुकुमाप्रमाणें बजावणें हेंच त्यांचें योग्य कर्तव्य होय. तसाच प्रकार ह्या इनाम कमिशनसंबंधानें झाला आहे. सनदेशिवाय, आधाराशिवाय जे जे इनाम खात होते ते ते निराधार झाले; त्यांचीं इनामें गेलीं. म्हणून ते तळतळूं लागले. ते गोपाळरावजींचे नावानें बोटें मोडूं लागणें हें साहजिकच आहे.पण खरोखर गोपाळरावजींकडे कांहीं त्याचा वांक नव्हता. शिवाय गोपाळरावजींनीं जीं जीं इनामें जप्त केलीं तीं जरी अन्यायानें केलेलीं असतीं, तरी त्यावर अपील करण्याला मार्ग हा होताच. व अशा प्रसंगीं गोपाळराव स्वतः इनामदारांस अपील करण्याचा सल्ला देत, व त्यांच्याकडून अपीलेंही करवीत व अपिलाचा मसुदा ते स्वतः करून देत. तीं इनामें परत मिळण्याविषयीं आपणांकडून करवेल तेवढा प्रयत्न करीत असत. इतकेंच नव्हे, तर भोळेभाबडे, ज्यांस कायद्यांची मुळींच माहिती नाहीं, अशा इनामदारांस आपल्या इनामाविषयीं असलेला खरा पुरावा प्रथम चौकशीच्या वेळींच सरकारांत कसा मांडावा, याविषयीं खाजगी सल्ला देऊन, त्यांचीं इनामें कायम केलीं, व जे आज तीं इनामें वंशपरंपरा अव्याहत भोगीत आहेत, ते लोक गोपाळराव हरि यांचें नांव आठवून त्यांच्या दयाळुपणाविषयीं आनंदानें वर्णन करीत असल्याचीं अनेक उदाहरणें आमच्या कानीं आलेलीं आहेत. यावरून ज्यांचीं इनामें कांहींच पुरावा नसल्यानें बुडालीं ते त्यांच्या नावानें बोटें मोडीत असतील असें जरी खरें, तरी पुष्कळ लोक आपलीं इनामें तारल्याबद्दल गोपाळरावांचे गुण गाणारे सांपडतात, हेंही येथें नमूद करून ठेवणें जरूर आहे.शिवाय गोपाळरावजींचें मन धर्मपरायण,औदार्यशील व दयाळू किती होतें, हें त्यांच्या पुढील वर्णन करण्यांत येणाऱ्या गुणावरून स्पष्ट दिसून येईल. म्हणून कांहीं लोकांच्या कल्पनेप्रमाणें असिस्टंट इनाम कमिशनर असतांना त्यांच्या हातून स्वार्थाकरितां निर्दयपणाचें वर्तन झालें असेल हें मुळींच संभवत नाहीं. ह्यावरून इनाम कमिशनामध्यें लोकांचीं इनामें जप्त झाल्याचें किंवा केल्याचें अपेश जे कित्येक लोक गोपाळरावजींच्या माथीं मारतात, त्यांत तिळमात्रही तथ्यांश दिसत नाहीं. इंग्रज लोकांचे निष्ठुरपणाचें कायदे, पेशव्यांचे दप्तराचा सावळागोंधळ, इनामदारांचा भोळवटपणा, हींच इनामदारांस भिकेस लावणारीं कारणें होत. गोपाळराव हे जप्तीचा हुकूम देण्याला निमित्त मात्र झालेले असावे. ज्याप्रमाणें खून करणाराचा राग, द्वेष, खून झालेल्याचा अपराध, सरकारचा कायदा व भोंवतालचा मिळालेला पुरावा हाच खरोखर

खुनी मनुष्याच्या फांशीच्या शिक्षेला कारणीभूत होतो. देहांताची शिक्षा देणारा न्यायाधीश निमित्ताचा मात्र धनी. त्याप्रमाणेंच हा गोपाळरावजी वरचा जनापवादही केवळ निमित्तमात्र आहे. ह्यापेक्षां त्यांत विशेष तथ्यांश म्हणून कांहीं दिसत नाहीं.व तसें मुद्दाम करण्यापासून 'लोकहितवादीस' प्रत्यक्ष किंवा परंपरायाही कांहीं फायदा होता असें मानण्याला कांहीं कारण नाहीं.

ह्याप्रमाणें असिस्टंट इनाम कमिशनर असतांना त्यांनीं आपलें काम फार दक्षतेनें बजावलें म्हणून त्यांची सरकारांत ही वाहवा झाली. पण तारीख ४ मार्च सन १८६१ रोजीं सरकारानें इनाम कमिशनचें खातें कमी केल्यामुळें गोपाळरावजींचीही नोकरी गेली. नंतर कांहीं दिवस ते रिकामेच होते. पण सरकारानें मुंबईचें हायकोर्टांत हिंदू व मुसलमानांचें धर्मशास्त्राच्या व्यवहारभागाचा गोषवारा [ Digest ] काढण्याकरितां एक नवीन जागा मंजूर केली व त्या जागेवर गोपाळरावजींची नेमणूक तारीख १ मे सन १८६१ रोजीं केली, त्या जागेवर त्यांनीं कांहीं महिने काम केल्यावर.व तें काम संपत आल्यावर सनदी नोकरा [ Covenantal Civil servants ] करतां राखून ठेवलेल्या जागेपैकीं एका जागेवर त्यांची नेमणूक करण्याचें मुंबई सरकारानें ठरवून त्यांस अमदाबादेस असिस्टंट जज्जाचे जागेवर तारीख ६ सेप्टेंबर सन १८६२ रोजीं पाठविलें. तेथें त्यांचा पगार ८०० रुपये होता.पुढें त्यांची त्याच कामावर तारीख ९ जुलै १८६३ रोजीं अहमदनगरास बदली झाली. तेथें तारीख १४ आक्टोबर सन १८६३ रोजीं सनदी नोकरांना अवश्य लागणाऱ्या डिपार्टमेंटल परीक्षे मध्यें पास झाले. तेथें त्यांनीं आपलें काम उत्तम रीतीनें केल्याबद्दल त्यांचे तेथील वरिष्ठ अधिकारी अहमदनगरचे डिस्ट्रिक्ट सेशन जज्ज यांनीं आपलें वार्षिक रिपोर्टांत उल्लेख केला आहे. त्याचा उतारा आम्हांस सांपडला आहे, तो येथें देतों. त्यावरून कळेल:—

Extract from Government Gazette
on the 9th November 1863
Page 1295.

Civil appointments Etc.Revenue Department.

Bombay castle 17th November 1863.

Mr. Gopalrow Hurry passed the Departmental Examina-

tion according to the second standared on the 14th October 1863.

By order
( Signed ) A. D. Robertson,
officiating Chief secretary to Government.

---

Extract from a letter No. 552 dated 30th May 1864 from Mr: Richardson judge of Ahamadnuggar.

The past year has been marked by the application of native Agency to the Appellate and session Courts by the appointment of Rao Bahadoor Gopalrao Hurry Deshmook to whose industry and ability I feel much indebted by the aid he has afforded for the satisfactory disposal of much civil and criminal business.

---

Extract from a letter No 1148 dated 21st November 1864 from a Richardson Esquire, Judge of Ahamadnuggar.

I beg to Express my entire satisfaction with the efficient manner in which you have disposed .of all work both civil and criminal entrusted to you.

ह्याच हुद्यावर अमदाबादेस असतांना वरिष्ठ अधिकारी त्यांचा मान कसा राखीत असत व कांहीं युरोपियन अधिकारी कसे उद्दाम वर्तन करीत हें दाखविणारा आम्हांस एक पत्रव्यवहार सांपडला आहे तो मनोरंजक असल्यामुळें आम्ही येथें देतों, तो असाः—

बडोद्याचे त्या वेळचे महाराज श्रीमंत खंडेराव गायकवाड यांची स्वारी फिरतीवर निघाली होती. व ती अमदाबादेस येण्याचें ठरलें होतें. त्याप्रमाणें ते आले. परंतु त्यांच्या बरोबर जे असिस्टंट रेसिडेंट होते, त्यांनीं तेथील जज्जाचा व असिस्टंट जज्जाचा अर्थात गोपाळराव हरि यांचा बराच अपमान केला. त्याबद्दल सरकारांत लिहून जाऊन त्या असिस्टंट रेसि-

डेंट यांस सरकारनें कामावरून एकदम कमी केलें. तें प्रकरण बरेंच मनोरंजक असल्यावरून तें अस्सल बरहुकूमच येथें देतों:—

## अपमानाबद्दल रिपोर्ट व ठराव.

अमदाबादचे जज्ज साहेब यांजकडून चीफ सेक्रेटरी हेनरी अंडरसन साहेब बहादुर यांजकडे, ता० २ फेब्रुवारी सन १८६३.

१ खंडेराव महाराज अमदाबादेस आले, त्याजबरोबर लेफ्टेनेंट फिनिक साहेब असिस्टंट रेसिडेंट होते. त्यांनीं आमचा अपमान केला. तो मजकूर सरकार गव्हरनर साहेब यांस कौन्सिलांत जाहीर करण्याची जरूर आहे. त्याची हकीकत येणेंप्रमाणें:—

२ प्रथम रेसिडेंट साहेब ह्यांनीं आम्हांस पत्र लिहिलें, त्याची नक्कल शिरस्त्याप्रमाणें कलेक्टर सो॥ कडे पाठविली होती.

३ सदरहू पत्रांत असें होतें कीं, महाराज यांची स्वारी बाहेर निघाली आहे; अमदाबादेस येतील; ती तारीख मागाहून असिस्टंट रेसिडेंट स्वारी बरोबर आहेत त्यांजकडून कळविण्यांत येईल.

४ तारीख २९ जानेवारी सन १८६३ इसवी रोजीं महाराज याजकडील अमदाबादेंतील वकील यांनीं संध्याकाळीं आम्हांस येऊन कळविलें कीं उद्यां सकाळीं महाराज शहरांत येणार आहेत. तेव्हां आम्ही त्यांस उत्तर दिलें कीं, हा निरोप असिस्टंट रेसिडेंट स्वारीबरोबर आहेत त्यांजकडून आला तर आम्ही मानूं. तुमचे बोलण्याचा उपयोग नाहीं.

५ त्यानंतर वकील परत गेले. आणि नऊ वाजतां रात्रीं एक शिपाई चिठ्ठी घेऊन आला. ती चिठ्ठी आम्हांस दिली.

६ असिस्टंट फिनिक यांचा आमचा स्नेह नाहीं. परंतु सरकारी कामाचे प्रसंगीं खाजगी प्रकरण बाहेर काढण्याचें कारण नाहीं. असें माझें मनांत होतें. परंतु तसें फिनिक साहेब यांनीं केलें नाहीं.

७ महाराज शहरांत येणार, त्याजबद्दल तयारी काय काय करावयाची वगैरे आम्हांस कोणीं विचारलें नाहीं. येथें आम्हीं मुख्य असतां आम्हांस कोणीही विचारलें नाहीं. व नऊ वाजतां रात्रीं चिठ्ठी पोंहचवावी हें फार अश्लाघ्य आहे. आमच्यानें गायकवाड सरकारास सामोरे जावयाची तयारी इतक्या उशिरानें व्हावयाची नाहीं. त्यांत आमची प्रकृति बरी नव्हती.

च खबर कळविण्यास इतका उशीर लावला हें आम्ही येऊं नये या धोरणानें केलें असें साफ दिसतें.

८ वकील आम्हांपासून गेल्यावर असिस्टंट रेसिडेंट यांजकडे सहा वाजतां हजर झाले. आणि पत्र मागितलें. त्यांनीं उत्तर दिलें नाहीं आणि असें बोललें कीं, जें लिहिणें तें आम्ही फर्स्ट असिस्टंट कलेक्टर नार्मन साहेब यांजकडे लिहिलें आहे. नंतर वकिलानें आग्रह करून सांगितल्यावरून आमचे नांवची चिठ्ठी लिहिली. ही खबर आम्हांस गोपाळराव हरि यांनीं सांगितली. फिनिक साहेब व नार्मन साहेब फर्स्ट असिस्टंट कलेक्टर यांनीं सर्व तयारी करून ते सामोरे गेले. परंतु या कामांत आम्ही जिल्ह्यांतील मोठे हुद्देदार असतां आम्हांस मुळींच घेतलें नाहीं.

९ ता. ३० जानेवारी सन १८६३ रोजीं आम्ही आपले चोपदार व नजरेचीं ताटें याप्रमाणें महाराजाकडे पाठविलीं. आणि निरोप पाठविला कीं, भेटीस यावयाचें आहे. त्याचा जाब महाराजाकडून आला कीं, तीन वाजतां यावें.

१० सरकारचा हुकूम आहे कीं, गोपाळराव हरि देशमुख यांचा मानपान चांगला ठेवावा. त्यांजवरून मी त्यांस आपले गाडींत घेऊन उभयतां महाराजांचे भेटीस गेलों. त्या समयीं आमचा सत्कार महाराजांनीं चांगला ठेविला. व परत भेटीस येतों म्हणून बोलले.

११ इतक्यांत गोविंदराव रोडे दिवाण व फिनिक साहेब महाराजाजवळ आले. त्यावेळेस फिनिक साहेबांनीं आम्हांकडे न पाहतां सलामही केला नाहीं. याप्रमाणें आमचा अपमान महाराजांचे देखत केला. नंतर ते बसल्यावर त्यांस महाराजांनीं आम्ही आपले बंगल्यांत मेजवानीकरितां बोलावीत आहों, असें कळविलें. दिवाण यांनींही चार वेळ सुचविलें. परंतु फिनिक साहेब यांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. शेवटीं महाराजांनीं वाट पाहून 'येतों' असें आम्हांस सांगून वाटेस लावलें. नंतर आम्ही उठलों.

१२ आमचेबरोबर आमचे असिस्टंट जज्ज गोपाळराव हरि होते. त्यांचे दर्जाप्रमाणें त्यांचा मानपान राहिला नाहीं. दिवाण येईपर्यंत त्यांस कोणी खुर्ची दिली नाहीं. पानसुपारीही कारकुनाकडून दिली. कोणी सरदार यांजकडून दिली नाहीं.

१३ नार्मन साहेब यांनीं आपले घरीं महाराज येणार म्हणोन त्यांजबद्दल

तयारी केली होती. व त्यांजबद्दल सर्व साहेब लोकांस चिठ्याही पाठविल्या होत्या. त्यावर आम्हांस आमंत्रण केलें नव्हतें.

१४ आम्ही परत घरीं येतों तों महाराजांनीं निरोप पाठविला कीं, आज येण्यास फुरसद सांपडणार नाहीं. आम्ही मेजवानीची सर्व तयारी केली होती. इतक्यांत महाराज, कलेक्टर साहेब यांचे कचेरींत येऊन दाखल झाले. तेथेंही आम्ही सूचनेस मनुष्य पाठविला. तों दिवाण यांनीं उत्तर दिलें कीं, टपाल आलें आहे. आतां फुरसद नाहीं. परंतु ही गोष्ट लबाडीची होती. कारण टपाल मुळीं रात्रीचे आठ वाजल्यावर येतें. त्यावरून आमचे मनांत आलें कीं, न येण्याविषयीं महाराजांस फिनिक साहेब यांनीं शिकविलें असावें.

१५ ता. ३१ रोजीं महाराज आमचे बंगल्यावरून तोफखान्याची कवाईत पहाण्यास गेले. त्यांजबरोबर कलेक्टर साहेब होते.

१६ सदरहू तारखेस संध्याकाळीं साहेब लोकांस मेजवानी होती. त्यांत आम्हास चिठ्ठी आली नव्हती. महाराज आमचें घरीं परत भेटीस आले नाहींत, अगर त्यांनीं बोलावलें असतें तरी आम्ही गेलों नसतों, परंतु त्यांनीं आमंत्रण करणें योग्य होतें.

१७ दिवाण यांनीं आपले डेऱ्यांत नेटिव लोकांस मेजवानीस बोलावलें होतें, त्यांत गोपाळराव हरि याजकडे कारकून पाठविला होता. परंतु ते गेले नाहींत. कोणी सरदार मानकरी पाठवून बोलावणें केलें नाहीं. व दिवाणांनीं चिठ्ठी वगैरे पाठविली नाहीं. किरकोळ लोकांप्रमाणें सूचनेस कारकून पाठविला. हें व आमचा मुळापासून अपमान झाला हें पाहून गोपाळराव हरि गेले नाहींत. हें त्यांनीं यथायोग्य केलें.

१८ महाराजांचे मनांत आमचे इकडे येण्याचें होतें. परंतु असिस्टंट फिनिक साहेब ह्यांनीं त्यांस सल्ला दिला नाहीं. त्यांजमुळें हा सर्व दोष फिनिक साहेब यांचेच शिरावर येतो. महाराजांनीं येतों म्हटलें असतां त्याप्रमाणें त्यांजकडून घडलें नाहीं. याजमुळें महाराजांचा व असिस्टंट रेसिडेंट या उभयतांचा हलकेपणा झाला. आणि त्यानंतर महाराज गांवांत शेट सावकार यांचे येथें देखील गेले होते. फक्त आमचे घरीं मात्र आले नाहींत.

१९ आमचे चोपदार व हवालदार आज सकाळीं परत आले. त्यांस

महाराजांनीं येतेसमयीं सांगितलें कीं. जजसाहेब यांस आमचे फार फार सलाम सांगावे, त्या वेळेस असिस्टंट साहेब वगैरे मंडळी समक्ष होती.

२० फिनिक साहेब यांचें व आमचें पूर्वीचें वांकडें. सबब बुद्ध्या आमचा अपमान केला. त्याजबद्दल सरकारानें त्यांस एखादी शिक्षा केली पाहिजे. याशिवाय आणखी आम्हांस लिहिणें जरूर आहे कीं, गोपाळराव हरि देशमुख यांजबद्दलही तजवीज झाली पाहिजे. कारण ते थोर मनुष्य असून त्यांनीं आपल्या बुद्धिपराक्रमानें सरकारची कृपा संपादन केली. व सरकारनें त्यांस मोठ्या पदवीवर चढविलें. असें असून त्यांचा अपमान झाला ही गोष्ट अयोग्य झाली आहे.

( सही ) सांडविच साहेब. ( जज )

चीफ सेक्रेटरी अंडरसन साहेब बहादुर यांजकडून
जज साहेब–जिल्हा–अमदाबाद–यांस—

१ कप्तान फिनिक साहेब यांनीं अमर्यादेची वर्तणूक केली. त्यांजबद्दल सरकारास लिहून आलें त्याजवरून सरकारनें ठराव केला. त्याची नक्कल गोपाळराव हरि देशमुख यांस इतल्याकरितां पाठविली आहे. तरी त्यांस प्रविष्ट करावी.

( सही ) अंडरसन साहेब चीफ सेक्रेटरी निसबत
सरकार मुंबई.

" सरकारचा ठराव हुकूम तारीख १८ एप्रील सन १८६३. "

१ कर्नल फिनिकसाहेब याचा अव्वल म्हणून जो कागद कर्नल वॉलिस रेसिडेंट यांनीं सरकारास पाठविला तो अगदीं गैरसाल आहे. तो पाठवावयाचा नव्हता.

२ अमदाबादच्या जजाचें पत्र शिरस्त्याप्रमाणें आहे. फिनिकसाहेब यांचें लिहिणें उद्धटपणाचें व दांडगाईचें आहे.

३ जजांनीं महाराज यांस सामोरे जावयाचें होतें परंतु त्यांची प्रकृति बरी नव्हती; दुसरें, भेटीस गेले तें रेसिडेंटास कळवून जावयाचें होतें हें खरें. परंतु फिनिकसाहेबांनीं त्यांस पत्र लिहिलें नाहीं, व वकील पाठविला. व पुढें चिठ्ठी पाठविली ती रात्रीं उशिरानें पाठविली, हें बरोबर नाहीं. आतां ही चूक जज यांजकडून घडली ही साधारण आहे. परंतु फिनिकसाहेबांनीं आपला दोष कबूल न करतां उलटे ते जजाचा

अधिक अपमान करण्यास प्रवृत्त झाले. जज्जांचा अपमान सर्व लोकादेखत फार झाला. त्याजबद्दल महाराज याजपासून चांगला जाब घ्यावा हें खरें; परंतु महाराज असिस्टंट साहेबाचे बुद्धीप्रमाणें चालले. करितां घेतां येत नाहीं. आतां असिस्टंट रेसिडेंट यांच्या वर्तणुकीचा विचार करतां त्यांस पोलिटिकल खात्याचें अगदीं ज्ञान नाहीं असें दिसतें. त्यांनीं महाराजांस सांगून जज्जांचे भेटीस घेऊन जावयाचें होतें.

४ रेसिडेंट कर्नल वॉलिस लिहितों कीं, फिनिकसाहेब हे फार उपयोगी आहेत. परंतु इंग्रजसरकारच्या मोठ्या अधिकाऱ्याचा त्यानें अपमान केला, हा अपराध माफ करूं शकत नाहीं. त्यांस त्यांनीं जाब लिहिला आहे. त्यांत त्यांनीं मनांतील वैर सर्व दाखविलें आहे. यास्तव फिनिकसाहेब यांस असिस्टंटचे कामावरून काढून त्यांनीं आपले फलटणांत जाण्याचा हुकूम केला आहे.

या ठरावाची नक्कल गोपाळराव हरि यांस एक, कलेक्टर यांस एक, रेसिडेंट यांस एक पोंचत्या कराव्या.

( सही ) **अंडरसनसाहेब चीफ सेक्रेटरी नि० सरकार.**

पूर्वीं दिलेल्या 'लोकहितवादींच्या' नं. १ च्या पत्रांत त्यांनीं म्हटलें आहे कीं, प्रत्येक जातींत चांगले व वाईट हे दोन्ही प्रकारचे लोक असतात, तें अक्षरशः खरें आहे. कारण साहेब लोकांचे अंगीं पुष्कळ गुण चांगले असल्याविषयीं त्यांनीं अनेक ठिकाणीं उल्लेख केला आहे. परंतु तसाच साहेब लोकांचा उमेटपणाही झालेला दाखवून दिला आहे. फिनिकसाहेबांचा फाजिलपणा हा त्यांपैकींच होय.

पण अशा रीतीनें युरोपिअन सनदी नोकराकरितां राखून ठेवलेल्या जागेपैकीं एका जागेवर त्यांची नेमणूक झाल्यापासून त्या वेळचे सर्व युरोपिअन सनदी ( Covenantal ) सिव्हिल सर्व्हंट होते त्यांनीं सरकारापाशीं अशी तक्रार केली कीं, असें जर सरकार आपखुषीनें येथल्या येथें सिव्हिल सर्व्हंट नेमील, तर त्यांत आमचें फार नुकसान आहे. कारण, असें झालें तर आम्ही विलायतेस मोठ्या कष्टानें परीक्षा दिली त्याचा उपयोग काय ? आमचे सारे श्रम फुकट जातात. आमचें फार नुकसान होतें. आमच्या बढतीची वेळ आली असतां आम्हास बढती मिळत नाहीं. या युरोपिअन सिव्हिल सर्व्हंटांच्या स्टेट सेक्रेटरीकडे केलेल्या तक्रारीवरून, गोपाळराव आपलें काम उत्तम करीत

असतांना सुद्धां, व मुंबईसरकार हे, योग्य हिंदी लोकांस योग्य वेळीं सनदी नोकरांमध्यें नेमण्याचा आम्हाला अधिकार आहे, असें आग्रहानें प्रतिपादन करीत असतांना, मुंबईसरकारास स्टेट सेक्रेटरीच्या सांगण्यावरून, गोपाळरावजींची सनदी नोकरांत केलेली नेमणूक कायम करणें अशक्य झालें. व त्यांनीं त्यांस बिनसनदी नोकरांत जास्त पगारावर तारीख २१ आगस्ट सन १८६५ रोजीं ॲक्टिंग जज्ज नेमलें. नंतर त्याच वर्षीं ता० १३ आक्टोबर रोजीं त्यांस मुंबईचे स्मॉलकॉज कोर्टांत तिसऱ्या जज्जाचे जागेवर ॲक्टिंग जज्ज नेमलें. नंतर पुढील वर्षीं म्हणजे तारीख १७ मार्च सन १८६६ रोजीं त्यास अमदाबादेस ॲक्टिंग स्मॉलकॉज जज्ज नेमलें, व त्याच जागेवर त्यांस तारीख ६ मार्च सन १८६७ रोजीं कायम केलें. या जागेवर त्यांचा पगार १००० रुपये होता. येथें ते १८७६ अखेरपर्यंत सतत होते. अमदाबादेंतील त्यांची दहा वर्षांची कारकीर्द हीच गोपाळराव हरींची भरभराटीची कारकीर्द होय. तेव्हां त्यांनीं तेथें जे सरकारी नोकरीशिवाय सार्वजनिक हिताचे अनेक उद्योग केले त्यांचें येथें थोडक्यांत वर्णन करतों म्हणजे त्यांची प्रचंड उद्योगशिलता व सार्वजनिक हिताची कळकळ सहज दिसून येईल.

१ अमदाबादेस 'प्रेमाभाई इन्स्टिटयूट' म्हणून एक सार्वजनिक लायब्ररी व व्याख्यानमंदिर आहे. त्यांत दरवर्षी ते लोकशिक्षणाकरितां व्याख्यानमाला करवीत. व त्यांत त्यांचीं स्वतःचीं अनेक विषयावर जाहीर व्याख्यानें होत. तेथील अनेक विद्वानांकडून अनेक विषयांवर ते व्याख्यानें [illegible]. अशा रीतीनें ती व्याख्यानमाला हें एक मोठें वार्षिक ज्ञानसत्रच होतें. [illegible] काळांत दयानंद सरस्वती–आर्यसमाजाचे उत्पादक–हे अमदाबादेस आले होते. [illegible] अमदाबादेस स्वागत करून तेथें त्यांनीं व्याख्यानें करविलीं. ते जरी प्रार्थनासमाजांत [illegible] असत, तरी त्यांस स्वामींचीं मतें जास्ती पसंत पडलीं म्हणूनच ते पुढें मुंबईस असतांना मुंबईच्या आर्यसमाजाचे अध्यक्ष झाले. त्यांचा स्वामींशीं पुष्कळ पत्रव्यवहार होता. पुढें अमेरिकेहून कर्नल अलकाट व मॅडम ब्लॅव्हट्स्की हे हिंदुस्थानांत थिऑसफिकल सोसायटी स्थापन करण्याकरितां आले त्या वेळेस त्यास आर्यसमाजाचीं मतें पसंत पडलीं व त्यांनीं 'थिऑसफिकल सोसायटी ऑफ दी आर्यसमाज ऑफ इंडिया' स्थापन केली. त्या वेळेस त्या शाखेचे गोपाळराव हे अध्यक्ष होते. पुढें

स्वामी समाधिस्थ झाल्यावर त्यांनीं आपल्या सर्व संस्थेचें ट्रस्टडीड केलें होतें. त्यांत एक ट्रस्टी म्हणून यांचें नांव होतें.

अमदावाद येथें असतांना विलायतेहून मिस् मेरी कार्पेंटर म्हणून एक प्रसिद्ध विदुषी हिंदुस्थानांत स्त्रीशिक्षणास उत्तेजन देण्याकरितां व ठिकठिकाणीं मुलींच्या शाळा काढविण्याकरितां आली होती. तिला तिच्या कामांत गोपाळ-रावांनीं बरेंच साहाय्य केलें व ती परत गेल्यावर तिच्याशीं यांचा पुष्कळ पत्रव्यवहार होता.

२ त्यांनीं तेथें एक गुजराथी प्रार्थनासमाज स्थापन करविला होता. त्यांत रा. व. भोलानाथ साराभाई म्हणून एक प्रसिद्ध नागरिक प्रेमळभक्त हे प्रमुखत्वानें होते. या समाजांत स्वतः गोपाळरावजींची गुजराथींत धर्मोप-देशपर व्याख्यानें होत.

३ गुजराथी पुनर्विवाह मंडळही त्यांनीं तेथें स्थापन करविलें होतें. रा. रा. लालशंकर उमियाशंकर त्रिवेदी, गोपाळरावजींचे त्या वेळचे शिरस्तेदार, जे पुढें पंढरपूर वगैरे ठिकाणीं प्रसिद्ध मुसनफ होते ते या मंड-ळाचे प्रमुख होते. त्या मंडळाकडून त्यांनीं बऱ्याच गुजराथी-ब्राह्मण-वाणी ज्ञातींतील बालविधवांचे योग्य वर पाहून पुनर्विवाह करविले होते, व त्या संबंधानें अनेक तंटे बखेडे व फिर्यादी होत, त्या, ते सामोपचारानें मिटवीत.

४ तेथें त्यांनीं गुजराथी व इंग्रजी भाषेंत एक "हितेच्छु" नांवाचें साप्ताहिक पत्र सुरू केलें होतें. त्यावर एक गुजराथी ब्राह्मण एडिटर नेमिला होता. त्या साप्ताहिक पत्रांत ते अनेक इंग्रजी लेख लिहीत. शेजारीं बडोदें संस्थानांत मल्हारराव महाराजांचे कारकीर्दींत पुण्यांतील शेवटल्या बाजीरावाचे कारकीर्दीप्रमाणें, जीं अनन्वित कृत्यें होत, त्यांचा ऊहापोह फार मार्मिक रीतीनें ते या पत्रांत करीत असत. त्या पत्राचे त्या वेळचे अंक मिळ-विण्याकरितां पुष्कळ खटपट केली, पण ते हातीं आले नाहींत. याची फार दिलगिरी वाटते. नाहीं तर त्यांतील उतारे देण्यास बरें पडलें असतें.

५ अमदाबादेस 'गुजराथ व्हर्नाक्युलर सोसायटी' म्हणून एक गुजराथी भाषेंत अनेक ग्रंथ करवून ते छापणारी संस्था होती. त्यामध्यें हे प्रमुखपणानें काम करीत. त्या संस्थेस उर्जित दशेस आणण्याचें बरेंच श्रेय गोपाळरावजींकडे आहे. तेथील आधुनिक प्रसिद्ध कवि दलपतराय डायाभाई यांस प्रोत्साहन देऊन त्यांजकडून त्यांनीं बरींच काव्यें करविलीं.

६ त्यांनीं स्वतः अनेक संस्कृत धर्मशास्त्राच्या ग्रंथांतून माहिती मिळवून व वेंचें काढवून आगमप्रकाश व निगमप्रकाश नांवाचे दोन ग्रंथ लिहिले. त्यांत सनातन हिंदुधर्मापैकीं तांत्रिक अथवा वाममार्ग आणि वैदिक अथवा दक्षिण मार्ग यांची विस्तृत व मार्मिक माहिती दिली आहे. याचीच पुढें मराठींत त्यांनीं स्वतः भाषांतरें केल्याचें ऐकतों; पण त्याच्या प्रति आम्हांस कोठें सांपडल्या नाहींत.

७ तेथें 'गुजराथी वक्तृत्व—सभा' स्थापन करून तरुण विद्वानांकडून गुजराथींत भाषणें करवून बक्षिसें देण्याचा त्यांनीं प्रघात पाडला. अमदाबाद शहराचे आसपासचा बहुतेक सर्व प्रदेश घोड्यावर बसून फिरून पाहून व गरीब श्रीमंतांशीं समतेनें बोलून ऐतिहासिक, धार्मिक व सामाजिक माहिती मिळविण्याचा व त्याचीं टिपणें करून ठेवण्याचा त्यांचा उद्योग नेहमीं चालू असे. दर वर्षाच्या मे महिन्याचे सुट्टींत कुटुंबांतील लहानमोठीं माणसें बरोबर घेऊन गुजराथेंतील प्रसिद्ध स्थानें यात्रेच्या निमित्तानें ते पहात व तेथील सर्व माहितीचीं टिपणें करीत. अशा रीतीनें पावागड, अबू, अंबाजी, गिरनार, सोरटी सोमनाथ, द्वारका, सुदामपुरी, डाकोर, शितपूर, वगैरे बहुतेक प्रसिद्ध स्थळें त्यांनीं पाहिलीं होतीं. त्यामुळें गुजराथ व काठेवाडांतील अनेक जाती, पंथ व जुनीं ऐतिहासिक घराणीं त्यांच्या पूर्ण परिचयाचीं झालीं होतीं. असे अनेक प्रकारचे सार्वजनिक उद्योग व विद्यावृद्धीचीं कामें सतत करीत असल्यामुळें अमदाबादच्या किंबहुना सर्व गुजराथच्या लोकांना ते फार प्रिय झाले होते.

अमदाबाद येथील त्यांची अतिशय स्नेहांतील व त्यांच्या बरोबर सार्वजनिक कामें करणारी मंडळी आम्हांस माहीत आहेत; तीं देतों.

१ रा. ब. भोलानाथ साराभाई प्रिन्सिपाल सदर अमीन.

२ रा. सा. महिपतराम् रूपराम गुजराथी ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपाल.

३ रा. सा. वासुदेव जगन्नाथ कीर्तिकर हायकोर्ट वकील व लॉ प्रोफेसर.

४ अंबालाल साकरलाल एम्. ए. एल्. एल्. बी. हायस्कूलचे हेडमास्तर, हे पुढें बडोद्यास वरिष्ठ कोर्टाचे जज्ज व दिवाणबहादुर झाले होते.

५ रणछोडलाल छोटालाल सी. आय्. ई. अमदाबाद येथील पहिली कापडाची गिरणी काढणारे, यांचे नातू सर चिनुभाई माधवलाल हे हिंदुलोकांत पहिले बारोनेट झाले.

६ बेचरदास अंबैदास सी. आय. ई. अमदाबादची दुसरी कापडाची गिरणी काढणारे.

७ शेट दलपतभाई भगुभाई हे पुढें नगरशेट होते.

८ शेट प्रेमाभाई, हेमाभाई हे त्या वेळीं नगरशेट होते.

## दिनचर्या आणि साहाय्य कर्तृत्व.

गोपाळरावजींची दिनचर्या हल्लींच्या ब्राह्मण अंमलदारांनीं जर ऐकली किंवा ती सुधारक म्हणविणारांच्या आज कानावर गेली तर तें आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन जातील, इतकी ती स्वधर्मपर होती. ह्याकरितां तिचें येथें थोडक्यांत वर्णन करितों.

त्यांच्या एका जुन्या मित्रानें ( त्या वेळचे एक प्रसिद्ध ग्रंथकर्ते रा० रा० बळवंत मनोहर पंडित ) यांच्या येथें स्वतः राहून त्यांची दिनचर्या सविस्तर लिहून ठेवलेली आम्हांला सांपडली आहे. ती मनोरंजक व बोधप्रद असल्यानें त्यांतील कांहीं उतारे घेऊन ती दिनचर्या आम्ही देतों. पंडितांचे लेखांतील घेतलेले उतारे अवतरण चिन्हांत दिले आहेत.

“ मला अमदाबाद येथें असतांना जो त्यांचा सहवास घडला, त्या वरून माझ्या मताची अशी खातरी झाली कीं गोपाळराव हे माणिक प्रभूसारखे सकलमतस्थापक होते. कारण ते वैष्णवाबरोबर वैष्णव होते, शैवाबरोबर शैव होते ! त्यांची वास्तविक उपासना कोणती होती हें कोणासच सांगतां येणें शक्य नाहीं ! उपनिषदें व वेदांतांत ते प्रवीण होते. तथापि ते वेदांती नव्हते ! ते केवळ प्रेमळ भक्त व परमेश्वराचे सगुण उपासक होते ! ते ऐकेश्वरी मताचेही होते ! ते ब्रह्मोपासकही असून शिवाय प्रार्थना-समाजांत जाऊन ते प्रार्थनाही करीत असत ! त्यांच्या मुखांतून तुकारामाचा खालील अभंग फार ऐकण्यांत येत असेः—

**‘ तुका म्हणे जें ज बोला—तें तें साजे या विठ्ठला ! ’**

शिवाय पूजेसंबंधानें ते असें म्हणत असत कींः—

**‘कोणाही भूताचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वर-पूजनाचें !’**

अहाहा ! किती उदात्त हे त्यांचे विचार ! याला म्हणतात थोर ! सारांश, त्यांची वृत्ति पूर्णत्वास पोहचली होती. ते सर्वांत असून सर्वांवेगळे होते. प्रपंचांत सक्त नव्हते—अलिप्त होते—प्रत्येक मतवादांधवास असें वाटावें कीं.

गोपाळराव आपल्या मताचे आहेत. परंतु गोपाळराव सर्व मतांहून वेगळे होते. त्यांचें खरें मत काय होतें, त्यांना कोणत्या देवाची उपासना होती, कोणत्या मंत्राचा ते जप करीत होते, या गोष्टीचा अंत कधीं कोणास लागला नाहीं. रात्रीं बिछान्यावर गेल्यावर एकांतीं माळ घेऊन निदान एक तास तरी ते जप करीत असत. त्यावेळीं कोणीं जवळ नसावयाचें ! नंतर निद्रा करीत. पाहाटे पंच पंच उषःकालीं उठून ते नामस्मरण करीत ! या सर्व गोष्टी मी अमदाबादेस असतां प्रत्यक्ष पाहिल्या आहेत. कारण हापीसाच्यावर लायब्ररीजवळ त्यांचें निद्रास्थान असे. आणि जवळच लायब्ररीचे दिवाणखान्यांत मला एक पलंगडी टाकून दिली होती, तेथें मी निजत होतों !"

ते रोज प्रातःकाळीं उठल्यावर प्रातर्विधी वगैरे उरकून शुचिर्भूत झाल्यावर प्रातःस्मरणाचे श्लोक म्हणत. नंतर मुंज झालेल्या मुलांकडून रुद्र, सौर, पवमान. पूजा, संध्या, नैवेद्य, वैश्वदेव वगैरे ब्राम्हणांचें नित्यकर्म करावयास लावीत. नंतर ते बाहेर फिरावयास निघत. त्यावेळीं पांच चार बाहेरची मंडळी ही असावयाचीच. त्यांच्याबरोबर बहुधा सामाजिक संबंधानें चर्चा चालत असे. पायांनीं चालावयाची त्यांना फार हौस असे. फक्त कोर्टांत जावयास उशीर होऊं नये म्हणून कचेरींत जातांना मात्र बहुधा घरनी गाडींतून जात. सकाळीं आठ वाजावयाचे सुमारास फिरून येत. तों घराकडे कोणी कामाकाजासंबंधानें, कोणी याचक वृत्तीनें, कोणी औषधपाण्यासाठीं येऊन बसलेलेच असत. कित्येक लोक आपलीं गाऱ्हाणीं इतकीं काल्हाव्यानें सांगत बसत कीं, जवळच्या दुसऱ्या ऐकणारांस सुद्धां त्याचा कंटाळा येत असे. पण गोपाळरावजी त्याचा कधीं कंटाळा मानीत नसत. गोरगरिबांचीं गाऱ्हाणीं ते फार लक्षपूर्वक ऐकून घेत. व त्याला काय सहाय्य होण्यासारखें असेल तें करीत. हीं गाऱ्हाणीं ऐकतांना त्यांच्या स्नानाला व जेवणाला कधीं कधीं पुष्कळ उशीर होत असे. तरी पण 'तुझी कटकट आतां पुरे जा, नाहींतर कोर्टांत येऊन काय तें सांग,' असें तें कधीं म्हणत नसत. प्रत्येकाला प्रत्युत्तर देणें तें नीट त्यांच्या समजुतीप्रमाणें देत. खाजगी पत्रव्यवहार, वर्तमानपत्राचे लेख, किंवा ग्रंथलेखनाचें काम त्यांतल्या त्यांतच चालत असे. नंतर दहा वाजावयाचे सुमारास स्वारी स्नानास निघे.*

---

* भोजनोत्तर थोडसें लेखन वगैरे करून दोन वाजण्य चे सुमारास गाडींत बसून कोर्टांत जात. कोर्टाचें काम संपल्यानंतर पुन्हां मंडळीबरोबर फिरावयास जाणें,

गोपाळरावजी घरीं ऊन पाण्यानें कधींच स्नान करीत नसत. ते नेहमीं नदीवर स्नानास जात, आणि तेही एकटे नव्हेत तर आपलीं सारीं मुलेंबाळें घेऊन. ह्यांपैकीं जेवढीं मोठीं मुलें परगांवीं शिकावयास वगैरे गेलेलीं असत, तेवढीं मात्र नसावयाचीं. बाकी सारीं स्नानास बरोबर घेऊन जात. स्नानास निघालें म्हणजे गोरगरिबासाठीं पैशांची पिशवी व रोगग्रस्तांकरितां मलमपट्ट्या वगैरे साहित्य हे खुद्द यजमानाजवळ असे. येवढेंच नव्हे, तर ज्या सर्वांत लहान मुली होत्या त्यांच्या कमरेला एक पिशवी असून त्यांत धान्य भरलेलें असे. तें त्या मुली गुजराथी रिवाजाप्रमाणें किडा मुंगीला किंवा गोरगरिबाला

---

किंवा कोठें व्याख्यान, सभा, कथाकीर्तन असल्यास तिकडे जाऊन नंतर रात्रौ घरीं येत. आलेल्या मडळीस भेटून कोणास काय उत्तर द्यावयाचें ते देऊन नंतर रात्रीं जेवण होत असे. नंतर 'रामरक्षा' वगैरे स्तोत्रें मुलांकडून पाठ करवून मग झोंपेचा विचार. असा त्यांचा साधारणपणें दिनक्रम असे. विद्याहीन, अक्षरशत्रु, गलिच्छ, दुर्व्यसनी अशा ब्राह्मणांची ते आपल्या वर्तमानपत्रांतील पत्रांतून हवी तशी निर्भर्त्सना करीत. पण घरांत आलेल्या विद्वान किंवा अविद्वान ब्राह्मणाचा यथायोग्य सत्कार झाला नाहीं असें कधींच होत नसे. त्यांचे विचार सुधारक पक्षासारखे होते, तरी घरांतील जुनी पद्धति व धर्मकर्मपद्धति कधींच सुटली नाहीं. ही गोष्ट फार ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. श्राद्धपक्ष, हव्यकव्य, व्रतेंवायनें, लग्न, मुंजी अगदीं पूर्वापार पद्धतीप्रमाणें होत. आणि गोपाळरावजी स्वतः इंग्रजी भाषेतील वाकबगार, मोठमोठ्या साहेब लोकांच्या बरोबरीचे अंमलदार असें असूनही त्यांचा पोषाख अगदीं साधा, केवळ पेशवाईथाटाचा होता असें म्हटलें तरी चालेल. गोपाळराव हरींच्या अंगीं जे जे सद्‌गुण वास करीत होते, त्यांत साधेपणा हा एक विशेष गुण होता. येवढ्या मोठ्या अंमलदाराचे अंगीं तो फारच क्वचित् दृष्टीस पडतो. ह्यांना भेटावयाला कोणास केव्हांही मज्जाव नसे. हवें तेव्हां हवें त्यानें आंत जाऊन भेटावें. पण त्यांच्या देवडीवर नेहेमीं चौकी पहारा असल्यामुळें परके लोक आंत जाण्यास दबकत ती गोष्ट निराळी. ते घरांत असले तरी गादीवर तक्क्याशीं टेकून बसलेले, किंवा खुर्चीवर बसलेले क्वचित् आढळत. ते कोठें तरी मध्येंच बैठकीवर किंवा फळीवर बसलेले व पुस्तक किंवा कागद वाचीत बसलेले असावयाचे. पण दुसरे कोणीही भट, भिक्षुक, शास्त्री भेटावयास आले तर

मार्गामध्यें वाटीत असत. स्नान झालें म्हणजे सर्व मुंज झालेल्या मुलांसह वर्तमान मोठ्यानें म्हणून संध्या करावयाची. नंतर ब्रह्मयज्ञ व तर्पण आपण स्वतः उरकावयाचें. इतकें झाल्यावर देवदर्शन. अमदाबादेंत देवांचीही कांहीं वाण नाहीं. नदीच्या कांठाला पुष्कळ देवालयें आहेत. अर्थात इतकीं देवालयें असून त्यांत कांहीं मूर्ति व कांहीं शिवलिंगें आहेत. या प्रत्येक देवाचें गोपाळरावजी दर्शन घेत. त्यांच्याबरोबर तांब्याची एक मोठी झारी असे. तींत ते नदीचें पाणी भरून घेत. देवापाशीं गेलें कीं, पहिल्यानें स्वतः त्यांनीं देवास झारीनें पाणी घालावयाचें व नंतर एका मुलानें उगाळून आणलेलें गंध

---

त्यांना मात्र ते गादीवर लोडाशीं टेकून बसवीत. त्यांचे तिसरे चिरंजीव रामभाऊ जरा मानी स्वभावाचे असत. त्यांस हे खपत नसे. ते मात्र कधीं कधीं हळूहळू पुटपुटत कीं ' बाबा बसतात खालीं, आणि हे लोक बसतात लोडाला टेकून ! ' पण गोपाळरावजींच्या स्वतःच्या मनांत ती गोष्ट कधींच येत नसे. गोपाळरावजी निखालस निर्व्यसनी पुरुष होते. नाहीं म्हणावयाला ते केव्हां केव्हां तंबाखू खात असत. ते चहा, कॉफी इत्यादि पेयें कधींच पीत नसत. परंतु सकाळीं अच्छेर व संध्याकाळीं अच्छेर दूध ते नियमानें घेत असत. हाच त्यांचा मुख्य आहार होता. त्यांचें भोजन अगदीं मित असे. ते मध्यंतरीं फराळही कधीं करीत नसत. फक्त दोन वेळ जेवण. दिवाळींत फराळाचें वगैरे पुढें आलें तर तें म्हणत " सोन्यासारखें जेवण सोडून हे तेलकट तुपकट पदार्थ कशाला ? " त्यांची रहाणी नेहेमीं साधी असे.

शिवाय स्नानसंध्यादि नित्यकर्म तर केवळ कर्मठ ब्राह्मणाचें ! हें पाहून पुष्कळांस त्यांचें कौतुक वाटे. पुण्यास तुळशीबागेमध्यें वे. शा. सं. कृष्णंभट पुराणीक ह्या नांवाचे मोठे नामांकित वैदिक ब्राह्मण होते. ते गोपाळरावजींस अगदीं लहानपणापासून ओळखीत व त्यांस मुलाप्रमाणें ' अरे जारे 'च म्हणत. ते पुण्यास घरीं येऊन जेव्हां जेव्हां त्यांची स्नानसंध्या, देवपूजा, घरांतील वैदिक सांप्रदाय पाहत तेव्हां म्हणत:— "कायरे गोपाळराव ! तुला कोणरे सुधारक म्हणतात ? येऊन देत बरं असे त्यांना माझ्यापुढें ! बेटे शतमूर्ख आहेत तुला असे म्हणणारे. त्यांनीं येऊन आधीं तुझे पाय धरावेत अशीच तुझी योग्यता आहे !" गोपाळरावजींचें नांव कृष्णंभटजी पुढें निघालें कीं त्यांचे उद्गार शेवटपर्यंत हेच होते.

देवास लावावयाचें, दुसऱ्यानें फुलें वाहावयाचीं व त्यांनीं नमस्कार करावयाचा. ह्याप्रमाणें सर्व देवांचीं दर्शनें घेऊन स्वारी सर्व मुलाबाळांसह बारा वाजण्याचे सुमारास घरीं यावयाची. नंतर मृत्तिकेचें लिंग करून पार्थिवपूजा ते स्वतः करीत व घरच्या देवाची पूजा, नैवेद्य, वैश्वदेव वगैरे उपाध्याय करीत असे. नंतर अतिथी, पांथस्थ, पाहुणे वगैरे असतील ते पंक्तीस घेऊन भोजन करावयाचें.

जेवण अगदीं साधें ! अमुकच पदार्थ जेवणांत पाहिजे, असा आग्रह नाहीं. चव घेत जेवावयाचें नाहीं. खारट किंवा आळणी म्हणावयाचें नाहीं. आणि जेवतांना देखील साऱ्या जेवणांत त्यांचें ऐतिहासिक पुराण कधीं संपावयाचें नाहीं ! आरंभापासून मागचा भात संपेपर्यंत देखील तें चालूच असावयाचें ! 'पेशव्यांची पंगत अशा प्रकारची होती; सव्वा हात लांब केळीचें पान असावयाचें ! साठ भाज्या असावयाच्या ! खाईल तेवढेंच अन्न पानांत राहिलें पाहिजे. मीठ घेणें झाल्यास पानावर आडवें टाकून तें घेतलें पाहिजे.' इत्यादि भोजनसंबंधीं ऐतिहासिक कथा, किंवा अन्य विषयावरती, परंतु ऐतिहासिक कथा भोजनाचे वेळीं चालावयाच्या हा त्यांचा बहुधा नियम असे. त्यांच्या भाषणांत हास्यरस फार असे म्हणून आम्ही जेवीत असतां पोट धरधरून हसावें !

जेवणाचे वेळीं कोणी साधुसंत अगर बैरागी अथवा प्रवासी उपाशी आहे असें समजल्यास त्याला अन्न पोचवावयाचे असा त्यांचा नेम असे. कोणी अजारी आहे, असें कळून आल्यास त्याच्या समाचारास जाऊन औषधपाणी द्यावयाचें ! *

---

* येथें पंडितांच्या लेखांतील रा. ब. गोपाळराव हरि यांच्या पत्नी सौ. गोपिकाबाई ऊर्फ बाईसाहेब यांची दिनचर्या देणे योग्य वाटल्यावरून तीही देतों:—

सौ. गोपिकाबाई फार साध्वी, हुशार, स्वधर्मनिष्ठ, मायाळू औदार्यशील आणि इतकें असून मोठ्या प्रपंचदक्ष व भाग्यवान् होत्या. गोपिकाबाई अशा योग्य अधिकारी असल्यामुळें गोपाळरावास घरची फिकीर संसारासंबंधानें मुळींच नव्हती. आणि म्हणूनच त्यास बाहेरचे सार्वजनिक कामास वेळ मिळत होता. त्या बाईचें सर्व आचरण कित्ता घेण्यासारखें होतें. संतति आणि संपत्ति, दोनही गोष्टींची

## ' पुनर्विवाह प्रकरण. '

रावबहादुर गोपाळराव हरि यांच्या या अमदाबादेच्या कारकीर्दीत सार्वजनिक ह्या नात्यानें ह्या वेळीं एक मोठीच चळवळ उडाली होती. ती कोणती? तर दक्षिणी ब्राह्मणज्ञातींतील विधवांच्या पुनर्विवाहासंबंधानें. ही गोष्ट फार महत्त्वाची असल्यावरून त्याबद्दल येथें उल्लेख करणें अवश्य आहे.

दक्षिणी ब्राह्मण जातींतील विधवांची स्थिति केव्हांही पाहिली तरी फारच शोचनीय आहे. म्हणूनच ' लोकहितवादींनीं ' आपल्या नंबर २ च्या पत्रांत म्हटलें आहे कीं, " व्यभिचार मात्र अशानें वाढला आहे. आणि विप्र-

---

गोपिकाबाईस पूर्ण अनुकूलता होती. त्यांचा चेहेरा कधींही उदास म्हणून नसावयाचा ! जेव्हां पहावें तेव्हां त्यांचा चेहेरा हास्यमुख असावयाचा. दिसण्यांत भव्य आणि तेजःपुंज केवळ साक्षात् लक्ष्मीच होत्या, असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं ! प्रातःकाळीं सडासंमार्जन आपण स्वतः किंवा गुजरणीकडून करवून घेऊन देवापुढें आणि घरापुढें रंगवल्लिका आपण स्वतः काढावयाच्या, किंवा मुलीकडून अथवा सुनांकडून काढवावयाच्या ! नंतर वेणीफणी; त्यानंतर स्नानादि आटोपून स्वयंपाकाची सिद्धता करून द्यावयाची; आणि मग आपण पूजेस बसावयाचें. मोठ्या देवाची पूजा बहुधा ब्राह्मणाकडून होत असे. परंतु गोपिकाबाईंचा लहानसा देव्हारा निराळा होता. ही पूजा आटोपल्यावर मग तुळसीवृंदावनावर जाऊन तुळसीपूजन होत असे. हातांत एक पोवळ्याची माळ घेऊन प्रदक्षिणा घालावयाच्या ! प्रदक्षिणा झाल्यावर मग घरांत मोठ्या देवघराजवळ जप व्हावयाचा. त्यानंतर दानधर्म नित्य कांहींना कांहीं तरी व्हावयाचा. आज काय आहे ! एकादशी, पौर्णिमा, अमावास्या, व्यतिपात, सोमवती द्वादशी, अशा नित्य नैमित्तिक गोष्टी दानधर्मसंबंधांत रोज रोज कांहीं तरी असावयाच्या आणि त्या सर्व यथाशास्त्र नित्य व्हावयाच्या.

गोपाळराव स्नान करून पाटावर येऊन बसले कीं मग गोपिकाबाईंची स्वारी ( यांस बहुधा सर्व बाईसाहेब म्हणत ) संनिध येऊन जवळच कोठें तरी मर्यादेनें उभ्या रहावयाच्या. मग मुलीकडून व सुनांकडून चटण्या कोशिंबिरी वाढावयाच्या, आणि अन्नशुद्धी ( तूप ) शेवटीं आपण स्वतः वाढावयाची. मग गोपिकाबाईंची स्वारी मुली व सुनांबरोबर घेऊन जेवावयास बसावयाची ! याप्रमाणें बाईंची दिनचर्या होती !

स्त्रियांनीं इतर जातींपेक्षां ताळ टाकला आहे. " तेव्हां अशा गुप्त कृत्यांचें परिमार्जन जीं गर्भपातादि नीच कृत्यें पंढरपुरासारख्या, नाशकासारख्या क्षेत्रीं धडधडीत चालत असलेलीं डोळ्यापुढें यावींत ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. हा चाललेला अनर्थ कित्येक दयाशील पुरुषांस पहावेना. इंग्रजी पद्धतीनें शिकून जे विद्वान्, बहुश्रुत व सारासार विचार करणारे झाले होते, त्यांस विधवांच्या अनाचाराबद्दल अत्यंत हळहळ वाटत असे. व ते लोक ह्या अनीतीच्या प्रकाराला कांहींतरी आळा बसेल तर पहावा अशा प्रयत्नांत असत. त्यांत विधवा स्त्रियांची पुनर्विवाह करण्याची पद्धति जर ब्राह्मण लोकांत चालू होईल तर हा अनर्थ पुष्कळ अंशीं टळेल असें बहुतेक लोकांच्या मनानें त्यावेळीं घेतलें होतें. गोपाळराव हरि यांच्या मनांतही हेच विचार घोळत असत. ही गोष्ट त्यांच्या नंबर ८ च्या पत्रांतील २४ व्या कलमावरूनही ध्यानांत येण्यासारखी आहे. आणि त्यांचे पुनर्विवाहाच्या संबंधानें स्पष्ट विचार 'लोकहितवादी'कृत निबंध-संग्रह पत्र ९।१० व १६ यामध्यें विस्तृतपणानें दिली आहे. रावबहादुर महादेव गोविंद रानडे वगैरे इतर विद्वानांचीही त्यावेळीं तींच मतें होतीं. बालविधवांचे पुनर्विवाह करण्याची रूढी पडेल तर पुष्कळ हितावह होईल असें त्यांचें दृढतर मत होत चाललें होतें. पण " मांजराच्या गळ्यांत घाट बांधावी कोणी ? " हा जसा उंदरांस प्रश्न पडला, तसाच ह्यामध्यें पुढाकार घ्यावा कोणीं ? ह्याचें-ही मोठें कोडेंच होतें. कारण, ह्याकालीं अशा गोष्टीचें नांव काढणें म्हणजे महत्पातक असें समजत व त्याकरितां शास्त्री पंडित व जुन्या चालीचे गृहस्थ फार गवगवा करून मोठें ग्रामण्य माजवीत. म्हणून बरेच दिवस स्त्री-पुनर्विवाहाची चाल प्रचारांत यावी असें नवीन विद्वानांस वाटत होतें तरी त्यांचें भाषण व विचार आडून आडून चालत. प्रत्यक्ष पुढाकार असा घेण्यास कोणी धजत नसत.कारण त्यामुळें कुटुंब–वत्सलावर बहिष्काराची वगैरे अनेक संकटें येण्याचा धाक वाटे. पण अखेर त्यांपैकीं सात विद्वान व सभ्य गृहस्थांनीं एका पुनर्विवाहाची सिद्धता केली. वधुवरें निश्चित करून हा पुनर्विवाह प्रसिद्धपणें करण्याचें ठरविलें. व त्याचा परिणाम काय होतो, किती लोकांची सहानुभूति त्यास मिळते, हें पाहण्यासाठीं त्यांनीं ठिकठिकाणच्या लोकांस छापील पत्रें लिहिलीं. व ह्या गोष्टीचा अधिक बभ्रा होऊं नये आणि बोलून

दाखविण्यापूर्वी करून दाखवावें अशा हेतूनें या पत्राच्या माथ्यावर ' गुप्त ' अशीं अक्षरें घातलेलीं होतीं. ह्या पत्राचा नमुना खालीं देतोंः—

श्री

( गुप्त )

**विधवोद्धाहार्थ तुम्ही, साह्य खरें, जरि कराल करवाल ॥**
**धैर्यें व्हालाचि बुध हो तद्दुःखाद्रिस कराल करवाल ॥ १ ॥**

रा. रा. ————————————

————————————यांस

विज्ञापना विशेष, आज कित्येक वर्षें विधवाविवाहाविषयींची वाटाघाट होऊन त्याच्या सशास्त्रतेविषयीं वगैरे ग्रंथही प्रसिद्ध झाले; परंतु त्याचा अजून प्रचार पडला नाहीं, तो पडण्याचीं हल्लीं चिन्हें दिसत आहेत. हल्लीं एका विधवा कन्येचा विवाह होण्याची सिद्धता झाली आहे, आणि तो निर्विघ्नपणें सिद्धीस जाईल असें दिसतें. वधूवर चित्पावन जातीचे असून वधूचें पालन करणारा या कामास पुढारी आहे. वधूचें वय १६ वर्षांचें असून तिच्या९व्या वर्षी प्रथम वर गत झाला. अद्यापि केशादि अलंकार जसेच्या तसेच आहेत. तिचें पालन करणारे तिचे बंधू असून वडील बंधूस १०० रुपये दरमहाचा व कनिष्ठ बंधूस ६० रुपये दरमहाचा रोजगार आहे. वराचें वय तेवीस वर्षांचें असून विद्याखात्यांत त्यास नोकरी आहे. वर व वधू यांचें गोत्रादि सर्व घटित मिळतें व दोन्ही पक्षांकडून पूर्ण तयारी आहे. तेव्हां अशा प्रसंगीं विधवाविवाहपक्षाच्या लोकांनीं सर्वांशीं मदत करून यशाचा विडा उचलावा एतदर्थ ही आपणास प्रार्थना आहे. आपणा सर्वांच्या साहाय्यानें व परमेश्वराच्या दयेनें लग्नसमारंभ येत्या जेष्ठ शुद्ध ६ षष्ठीस मंगळवारीं म्हणजे ता० १५ जून १८६९ रोजीं मुंबईत घडून येईल. तो कोणते ठिकाणीं होईल त्याची खबर मागाहून लिहूं. या प्रसंगीं आपणांकडून खालीं लिहिलेल्या प्रकारांपैकीं कोणत्या प्रकारची मदत या कामास होईल हें मेहेरबानीनें खुलासेवार कळविण्यांत यावें.

१ लग्नसमारंभास आपण मुंबईत येऊन वधूवरांबरोबर अन्नव्यवहार करूं

शकाल किंवा नाहीं ? आपणांस रजा मिळण्याची जरूरी असल्यास ती घेऊन आलें पाहिजे; तसें न घडेल तर आपण आपले कुटुंबापैकीं कोणी पाठवाल कीं नाहीं ?

२ लग्नसमारंभास पुरुषाप्रमाणें स्त्रियांचीही आवश्यकता असते, तेव्हां आपली सहकुटुंब येण्याची सोय आहे अगर नाहीं ?

३ मुंबईस लग्नसमारंभास नच येण्याचें जमलें तर लग्नसमारंभांत ज्या गृहस्थांचा व वधुवरांचा अन्नव्यवहार झाला असेल, त्यापैकीं कोणा एकाबरोबर आपण अन्नव्यवहार कराल कीं नाहीं ?

सदरीं लिहिलेल्या मजकुराचें नीट मनन होऊन सत्वर उत्तर यावें कोणत्याही प्रकारें आपणास असह्य संकटांत घालावें असा आमचा हेतु नाहीं. परंतु विधवादुःखाश्रुमार्जनाच्या कामांत आपणांकडून मदत होईल तितकी आपण सद्गदित अंतःकरणानें कराल असें समजून आपणांस हें विनंतीपत्र पाठविलें आहे. आतां आपणांस मागणें इतकेंच आहे कीं, आपलें जसें मानस असेल तसें उत्तर फार फार सत्वर यावें व पाठविण्याची कृपा व्हावी. आपली जशी सोय व इच्छा असेल तसें करण्याचें आपणांकडे आहे. परंतु या विनंतीपत्राचें अति सत्वर उत्तर मात्र पाठविण्याची पुनः पुनः प्रार्थना आहे, व ती आपण पूर्ण कराल असें जाणून उत्तराची मार्गप्रतीक्षा करीत आहों, तर मर्जीप्रमाणें उत्तर आल्यावर कुंकुमपत्रिका रवाना करूं.

आपणांशिवाय आपल्या माहितीचे कोणी सद्गृहस्थ या कामास मदत करणारे असल्यास त्यांचींही नांवें आपण मेहेरबानीनें लिहून पाठवावीं, व लग्नसमारंभास येऊन अन्नव्यवहार करण्यास कित्येक सद्गृहस्थ तयार असून केवळ पैशाच्याच अडचणीमुळें त्यांचें येणें होणार नाहीं असें आपणांस वाटत असल्यास त्यांची संख्या इकडे लिहून कळवावी, म्हणजे त्यांचा जाण्यायेण्याचा खर्च देण्याबद्दल विचार होईल.

उत्तर पाठविणें तें रा० विष्णु परशरामशास्त्री पंडित यांचे नांवें इंदुप्रकाश छापखान्यांत पाठवावें.

खालीं सही करणाराशिवाय दुसरेही बहुत संभावित गृहस्थ या कामांत पुढारी आहेत. कळावें बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

१ विष्णु परशुरामशास्त्री. १ गोपाळ हरी देशमुख.
१ श्री. कृष्णशास्त्री तळेकर. १ महादेव गोविंद रानडे.

१ विष्णु मोरेश्वर भिडे. १ जनार्दन सखाराम गाडगीळ.

१ विष्णु परशराम रानडे.

ह्या संमतिपत्रावर ह्याच सात गृहस्थांच्या प्रथम सह्या केलेल्या प्रसिद्ध झाल्या. व ह्याच सात असामींना पुढें 'विविधज्ञान-विस्तारांतील' लेखकानें 'सप्तर्षी' असें व्याजोक्तीनें नांव देऊन त्यांच्यांतील दोन असामींवर बरीच टीका केली आहे. त्याचा उल्लेख पुढें येईलच. असो.

हीं संमतिपत्रें रवाना झाल्यानंतर लौकरच ठरल्याप्रमाणें सदरहू पुनर्विवाहाच्या कुंकुमपत्रिकाही रवाना झाल्या. त्या अशाः—

## पुनर्विवाहोत्तेजक मंडळीकडून.

रा. रा. ————————————————————

———————————————————— यांस

वि० वि० रा० वामन प्रभाकर परांजपे यांची भगिनी चिरंजीव वेणूबाई हिचा द्वितीय संबंध जेष्ठ शुद्ध ६ मंगळवारीं ता० १५ जून १८६९ रोजीं विनायकपंत करमरकर यांचे चिरंजीव रा० पांडुरंगपंत यांशीं गोरज मुहुर्तावर योजिला आहे. तरी आपण कृपा करून सहकुटुंब सहपरिवार येऊन कार्यासिद्धि करावी.

लग्नसमारंभ गिरगांवांत गोवाळी तळ्याजवळ रा० ब० मोरोबा कानोबा यांच्या बंगल्यांत होईल. मुंबई ता० १२ जून सन १८६९.

वरील कुंकुमपत्रिके प्रमाणें ठरलेल्या जागीं व वेळीं हा पुनर्विवाह झाला.

ह्या नव्याच प्रघाताचा पाया घातला त्या वेळीं जुन्या लोकांत व धर्माभिमानी शास्त्री पंडितांत केवढी चळवळ उडाली असल, ह्याची केवळ आज कल्पनाच केली पाहिजे. इतका वेळपर्यंत शास्त्री पंडित व जुन्या मतांस चिकटून राहणारी मंडळी फक्त सोवळेंओवळें, व आचारविचार येवढ्या बद्दलच सुधारकांच्या नांवानें खडे फोडीत होती. पण आतां तर त्यांनीं धडधडीत हजारों वर्षांपासून चालत आलेला प्रघात मोडून एकदम प्रसिद्धपणें स्त्रियांचा पुनर्विवाह सुरू केला ! मग काय विचारावें ? सनातन धर्माचा झेंडा घेऊन नाचणारांची काय तारंबळ उडाली, तिला पारावारच नाहीं. मुंबापुरच्या शास्त्री पंडित मंडळींनीं संतप्त होऊन एक मोठी जंगी सभा

[library stamp]

भरविली. व तिच्या मध्यें या नवीन पुनर्विवाहाच्या दंपत्यावर, त्यांच्या सत्कर्त्यांवर प्रमुख असलेल्या ' सतर्षी'वर व त्यांच्या सांसर्गायावर एकदम बहिष्कार घातल्याबद्दल ठराव करून तो प्रसिद्ध केला. त्याची एक प्रत शृंगेरीच्या मठाधिपतीकडे, दुसरी संकेश्वराच्या मठाधिपतीकडे, पाठविली. व इतरही मोठ्या मोठ्या गावीं त्यांच्या नकला पाठवून त्या त्या लोकांशीं अन्नव्यवहार वगैरे न करण्याविषयीं सुचविलें. शंकराचार्यांच्या उभय मठांकडूनही ह्या सभेस आज्ञापत्रें येऊन दाखल झालीं कीं, आपण केलें ह्याला श्रीची पूर्ण संमत्ति आहे. तसाच क्रम ठेवावा. नंतर स्त्री–विधवा-विवाह सशास्त्र आहे किंवा अशास्त्र आहे, ह्याबद्दल उभय पक्षांतही पुण्यामध्यें प्रसिद्धपणें वाद होऊन निर्णय ठरविण्याची वाटाघाट सुरू झाली. व त्याही खटपटीस कांहीं लोक लागले.

ह्यापुढें स्त्रीपुनर्विवाह सशास्त्र आहे किंवा अशास्त्र आहे हें ठरविण्याकरितां मोठमोठ्याल्या विद्वान् व पंडितांसह श्रीशंकराचार्य मठ संकेश्वर यांची स्वारी आपल्या लव्याजम्यानिशीं पुण्यास येऊन तेथें उभय पक्षांमध्यें जंगी वादविवाद झाला. उभय पक्षांचे अभिमानी, शास्त्री, पंडित व विद्वान् गृहस्थ जमले. वाद लेखी होण्याचा ठरलें. दोन्ही बाजूंनीं आपआपल्या तर्फेच पांच पांच पंच नेमले व एक सरपंच नेमला. पंचांचीं मतें समसमान पडलीं तर सर पंचाचे मतानें निकाल व्हावा असें ठरलें. पुनर्विवाह-पक्षाचे तर्फेनें विष्णु शास्त्री पंडित व जुन्या पक्षाचे तर्फे नारायण शास्त्री गजेंद्रगडकर वाद करणारे नेमले. नंतर पाराशर स्मृतींतीलः—

**नष्टे मृते प्रव्राजिते क्लीबेच पतिते पतौ ।**
**पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥ १ ॥**

ह्या व दुसऱ्या अनेक पुनर्विवाह पक्षाच्या आधारावर वाद व शब्दाच्या अर्थाची बरीच ओढाताण झाली. नंतर पंचांचीं मतें घेतांना पुनर्विवाह पक्षाचीं चार व जुन्या पक्षाचीं सहा मतें पडलीं व सर पंचाचें मत जुन्यापक्षाकडेच पडलें. त्यावरून श्रीशंकराचार्यांनीं पुनर्विवाह पक्ष अशास्त्र आहे असा निकाल दिला. व त्याप्रमाणें पुनर्विवाह पक्षावर घातलेला बहिष्कार शंकराचार्यांनीं कायम केला. पुनर्विवाह पक्षाचे खरे अभिमानी होते त्यास हा निकाल पसंत पडला नाहीं व ते बहिष्कृतच राहिले. असे मुख्य सात गृहस्थ होते.

त्यांचीं नांवें पुनर्विवाह पत्राच्या खालीं दिलेलीं आहेत. त्यासच पुढें थट्टेनें 'सप्तर्षी' म्हणत. बाकीचे बहुतकरून सर्व प्रायश्चित्त घेऊन मोकळे झाले. या प्रमाणें जुन्या पक्षाला जोर आला व बहिष्काराची तीव्रता वाढली. सात बहिष्कृतांत गोपाळराव हरि होतेच, त्यांच्यावर विरुद्ध पक्षाच्या लोकांनीं मोठें काहूर माजविलें. त्यामुळें ह्यांतील पुढाऱ्यास कांहीं काल तरी बऱ्याच अडचणी सोसाव्या लागल्या. आधीं खटपटी, किंवा उपद्व्यापी लोकांना कां म्हणाना, अशी कांहींतरी उलाढाल पाहिजेच असते. आणि त्यांत ग्रामण्याचें प्रकरण उपस्थित झालें तर मग कांहीं बोलणेंच नाहीं. ज्याला धर्मशास्त्र कशावरोबर खातात हें सुद्धां माहीत नसतें, ते अरण्य पंडित सुद्धां हवे तसे बहकूं लागतात. व अशा लोकांस मोठा चेव येतो. तशीच यावेळीं स्थिति झाली. प्रत्येक गांवोगांवी सभा भरून कोणाकोणावर बहिष्कार टाकवयाचे याबद्दल चर्चा होऊन मुंबईच्या सभेला मान्यतेचीं पत्रें जाऊं लागलीं. गोपाळराव हरींची द्वारकाबाई ह्या नांवाची एक कन्या होती. ती बडोदे येथील जहागिरदार श्रीमंत भाऊसाहेब मुजुमदार ह्यांस दिलेली होती. विधवा विवाहाच्या सभेचीं पत्रें जशीं गांवगन्ना रवाना झालीं, त्याप्रमाणें बडोद्यास ग्रामस्थांसही पत्र येऊन पोंचलें. तेव्हां अर्थात बडोद्याच्या ब्राम्हणांचीही सभा भरून मुंबापुरस्थ ब्राह्मणांनीं केलेला ठराव वाचून दाखविला. त्यांत ह्या विवाहांतील पुढारी जे 'सप्तर्षी' त्यांचीं नांवें प्रथमच होतीं. अर्थात त्यांच्यावर बहिष्कार असल्याचें सर्वांस जाहीर झालें. त्यांत गोपाळराव हरि देशमुख ह्यांच्यावर बहिष्कार असल्याचें समजलें व त्यांच्याशींही कोणी ब्राम्हणांनीं अन्नव्यवहार करूं नये असें झालें.

पुढें गोपाळरावजीकडून नेहेमींच्या रीतीप्रमाणें मुलीस पाठवून देण्याविषयीं श्रीमंत मुजुमदार ह्यांस पत्र गेलें. पण येवढा बहिष्काराचा गवगवा झाल्यानंतर मुलगी माहेरीं कशी येणार ? त्यांतून मुजुमदारांचें घराणें म्हणजे जुन्या पद्धतीचं. म्हणून श्रीमंत मुजुमदारांचे कारभारी ह्यांनीं एक मोठ्या लीनतेनं त्या पत्राचें उत्तर लिहिलें, तें असः—

श्री.

"राजमान्य राजेश्री रावसाहेब देशमुख स्वामींचे सेवेसी—

पोष्य सदाशिव धोंडदेव घारपुरे कृतानेक सां॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत आषाढ व॥ ५ पावेतों बडोदें येथें सुखरूप असो. विशेष—

आपले कडून कालरोजीं शिपायाबरोबर पत्र आलें तें पावलें. इकडील मजकूर कीं पुनर्विवाह-प्रकरणीं काल रोजीं सरकारांत सभा झाली. त्यासमयीं मुंबईहून जें संमतीविषयीं पत्र आलें त्यांत विवाह करणार व त्याजला संमत्ति अस-त्यांचीं नांवें लिहिलेली आहेत. त्यांत आपलें नांव असल्यावरून सभेंतील मंड-ळींनीं आपलेविषयीं विचारल्यावरून आपलें पत्र आलें, त्याअन्वयें सभेचे अनुयायी व अधिकारी शास्त्री वगैरे मंडळीस कळविलें कीं, देशमुख मशार-निल्हे यांस मुळींच जाणत नाहींत, व अनुमोदनांत नसतां पत्र लिहिणारांनीं कशावरून लिहिलें ? त्याविशीं आम्हीं सरकारमार्फत विचार केला असता. परंतु जातिद्वेष करणें उचित नसोन अपवाद ठेवीत असल्यास अपवाद प्राय-श्चित्त करण्यास सिद्ध आहेत, म्हणोन आपला आशय कळविला. परंतु मुंबई-हून आलेलें पत्र त्यांत असून आपलें नांव सत असामींत आहे आणि तिकडेही असामीस असक्त करण्याचें ठरून त्या संमतावर सर्वांच्या सह्या घेतल्या त्यांत आमचे यजमान साहेबांची सही घेतली आहे. याजमुळें चिरंजीव सौभाग्यवती बयाबाईसाहेब यांची रवानगी करण्यास अडचण. वास्तव रवानगी केली नाहीं. त्याविशीं रोष येऊं नये. कारण हें कृत्य समुच्चयाचें आहे. याजकरितां तूर्त मुलीस आपले तिकडे नेण्याच्या आग्रहाचा विचार व्हावा. आणि या कामाविशीं जिकडून दिलसफाई होईल तें केलें असतां उत्तम आहे. कळावें बहुत काय लिहिणें लोभाची वृद्धी असावी हे विनंती.

**सदाशिव धोंडदेव घारपुरे.**

मजला ज्वर येत आहे."

ह्यावरून त्या वेळीं ह्या बहिष्काराच्या बंडानें मुलीस नेआण करण्याची किती अडचण होत होती, ही गोष्ट ध्यानांत येण्यासारखी आहे. तरी बरें, मुंब-ईच्या सभेच्या ठरावांत एक सवड दिलेली होती, ती ही कीं ह्या बहिष्कार-पत्राखालीं एक स्फुट नोट होती, ती लोकांच्या बरीच उपयोगीं पडली. ही नोट येणेंप्रमाणें:—

" सदरहु मंडळीनें इंदुप्रकाश पत्रद्वारें आपण या विवाहांत नसल्याविषयीं कळविल्यास त्याविषयीं विचार करण्यांत यावा."

ह्या झालेल्या विवाहाला गोपाळरावजींची संमति होती, तरी त्या समारंभास त्यास कांहीं प्रत्यक्ष जातां आलें नव्हतें; आणखी अमदावादच्या दक्षिणी ब्राह्मणांची त्यांच्यावर अत्यंत पूज्यबुद्धि होती. यामुळें तेथील ब्राह्मणांनीं

गोपाळरावजींचें नांव बहिष्कारांत दाखल झालेलें पहातांच दक्षिणी ब्रह्मवृंदांनी लागलीच मोठ्या ईर्ष्येनें सभा भरवून गोपाळरावजी हे पुनर्विवाह झाल्याचे दिवशीं अमदावादेसच होते त्यांजकडे कोणताही दोष येऊं शकत नाहीं असा सर्वानुमतें ठराव करून तो बडोद्याच्या सभेकडे पाठविला. व तो पाहून बडोद्याच्या सभेनें रावबहादुर गोपाळराव हरि यांजकडे कोणताही दोष येत नाहीं असा ठराव केला. हे दोनीही ठराव खालीं दिले आहेत.

श्री.

यादी अमदावादकर मंडळी समस्त यांजकडून लिहिण्यांत येतें की, राजेश्री गोपाळराव हरि देशमुख हे जेष्ठ शुद्ध ६ च्या पूर्वीपासून तों जेष्ठ शुद्ध १२ पर्यंत अमदावादेस होते, हें आम्हांस माहीत आहे. म्हणून आम्ही ह्या यादीच्या खालीं सह्या करित आहोंत. आषाढ व॥३० संवत १९२५ भद्रवर.

सह्या—रामभट अग्निहोत्री इ० १० ब्राम्हणांच्या.

यानंतर दुसरी सभा भरून निर्दोषतेबद्दल ठराव केला तोः—

श्री.

यादी अमदावाद येथें दक्षिणी ब्राह्मणामध्यें मुंबईस पुनर्विवाह झाल्यावरून ग्रामण्य उत्पन्न होऊन रा० गोपाळराव हरि देशमुख यांजवर ग्रामस्थांनीं संशय घेऊन सभापत्र केलें आहे. त्याचें कारण काय येविशीं आम्ही येथें आल्यावर वे० राजश्री रामभटजी अग्निहोत्री हे येथें प्रमुख शिष्ट ब्राह्मण आहेत त्यांस जाऊन विचारतां त्यानीं कागदपत्र दाखविले. व मजकूर सांगितला. तो सर्व ऐकून घेतां आम्हांस असें दिसलें कीं, देशमुख यांजवर कोणताही संशय लागूं पडत नाहीं व विनाकारण दुराग्रहानें हें ग्रामण्य उपस्थित केलें. त्याचीं कारणें अशीं आहेत कीं:—

१. पांडुरंग शिवराम भावे यांचे सहीचें छापलेलें पत्र कीं, जेष्ठ शुद्ध ११ चे दिवशीं ठाकुरद्वारीं सभा होऊन नवरानवरी व नवरीचे २ भाऊ व दुसरे प्रमुख असामी सात एकूण ११ वाळींत घालण्याचा ठराव केला आहे. तो तुम्ही आपले गांवीं प्रसिद्ध करावा म्हणून.

२. रामभटजी यांनीं शिवराम पांडुरंग यांचें पत्र खरें किंवा खोटें व तें कोणीं लिहिलें याचा संशय आहे तो निवारण झाला पाहिजे, म्हणोन पांडुरंग

शिवराम यांस पत्र लिहिलें त्याची नक्कल दाखविली. परंतु त्याचें उत्तर आलें नाहीं म्हणतात.

३. रामभटजोस वगैरे ग्रामस्थ मंडळीनें दुसरें उलट पत्र लिहिलें आहे कीं, देशमुख हे विवाहास गेले नव्हते. द्वादशीपर्यंत अमदावादेस होते.

४ पुण्याचें पत्र दाखविलें परंतु त्याजवर दोनच सह्या आहेत.

५ वडोद्याचे पत्रांत जे लग्नास गेले असतील त्यांचा विचार करावा असें आहे.

६ कांहीं मंडळींचा बहिष्कृताशीं अन्नव्यवहार झाला म्हणून तोंडानें म्हणतात परंतु पत्रांत नाहीं.

७ भास्करशास्त्री ताम्हनकर, सखारामशास्त्री काळे, महादेव चिमणाजी आपटे, नारायण मोरेश्वर कुंटे, या चार असामींचें पत्र जेष्ठ व॥ ६ चें आलें कीं, ठाकुरद्वारांतील सभेचें म्हणून पत्र आलें ते खोटें आहे. सभाच झालेली नाहीं, व कांहीं निर्णय ठरला नाहीं. गणेश बापूजी मालवणकरानें हो तपास केला म्हणून.

८ हें पत्र खरें ठरल्या शिवाय संमतीपत्र करणें वाफ्कळ दिसतें. खात्रीलायक पुरावा घ्यावयाचा होता. कारण एक जणाचें पत्राविरुद्ध चौघांचें पत्र आहे.

९ शिव पांडुरंग यांचे पत्रांत असा मजकूर आहे कीं, जे विवाहास गेले नसतील त्यांचा विचार व्हावा. परंतु त्यांचा विचार मुळींच न करतां व उलट पत्रावर सही केली असतां दोष ठेवितात. त्यांचें विरुद्ध १९२ असामी सभ्यांच्या सह्यांचें पत्र हें खोटें आहे. त्याचा विचार झाला नाहीं.

१० रामभटजी कबूल करतात कीं, देशमुख लग्नास गेले नव्हते. तथापि आपणच दोष ठेवतात हें आश्चर्य आहे.

११ बहिष्काराचें पत्र प्रसिद्ध झाल्यावर अन्नव्यवहार झाल्याचा पुरावा नाहीं.

निर्णयसिंधु परिच्छेद ३ प्रथम भागांत कलिवर्ज-प्रकरणांत '**कलौ कर्तैव लिप्यते इति व्यासोक्तेः**' असें वचन आहे. यावरून पुनर्विवाहाबद्दल ज्यास अशास्त्र वाटेल त्यांनीं फक्त नवरानवरीस दोष ठेवावा. परंतु इतरांचीं नांवें घेण्याचें मुळींच कारण नाहीं. असें, सर्व कागदपत्र आम्हीं पाहिलें त्याजवरून आमचे ध्यानास आलें. त्याजवरून सभा भरवून आम्हीं

बोलावणें केलें. हा सारांश आम्हीं लिहिला. तो मान्य असेल त्यांनीं सही करावी ता. १० नोव्हेंबर सन १८६९ इसवी.

[ सह्या ] प्रभाकर हर जोशी राहाणार श्रीक्षेत्र वाई
हल्लीं मुक्काम अमदाबाद.

१ नारो बापूजी साठे.
२ वासुदेव हरी वैद्य.
३ गोविंद पांडुरंग नातु. इ. इ. ३१ सह्या.

वे. प्रभाकर हर जोशी हे वाईचे राहणारे असून ते साहजिक अमदाबादेस गेले होते. त्यांनीं या प्रकरणाची चौकशी करून सभा भरवून हा ठराव पास केला. व त्याची प्रत बडोद्याचे ब्राह्मणांकडे रवाना केली. त्यावर बडोद्याच्या ब्राह्मण सभेचेंही त्यास अनुकूल उत्तर आलें तें असें:—

श्री

वेदमूर्ति रा. रा. रामभटजी अग्निहोत्री व समस्त ब्राह्मण ग्रामस्थ
शहर अमदाबाद यांसी.

शहर वडोदें येथील समस्त ब्राह्मण मंडळी यांजकडून कळविण्यांत येतें कीं रा. रा. गणेश विनायक वेहेरे यांच्या मार्फत रा. रा. गोपाळराव हरि देशमुख हे मुंबईस पुनर्विवाहास गेले नाहींत, ह्याबद्दल तुम्ही समस्तांच्या सहीचा दाखला पाठविला तो पावला. त्याप्रमाणें मशार निल्हे देशमुख लग्नास गेले नाहींत. सबब त्याजकडे दोष नाहीं, हें समस्तांस कळावें.

ह्या पुनर्विवाहाच्या संबंधांत 'लोकहितवादीं'नीं त्यांच्या नेहेमींच्या स्वभावाप्रमाणें मनस्वी माहिती गोळा करून ठेवून, अनेक प्रकारचे ग्रंथ चाळून, नाना प्रकारचे शास्त्रार्थ व ऐतिहासिक माहिती **मिळवून ठेविली आहे.** ती सारी देण्यास येथें सवड नाहीं. तथापि त्यांनीं पुनर्विवाहाच्या प्रतिपक्षीयांस कांहीं प्रश्न घातलेली एक याद त्यांच्या दप्तरांत मिळाली, तेवढी येथे सादर करतों.

श्री

यादी—शास्त्री मंडळी यांस प्रश्न—वितपशील.

१ श्रुति स्मृति व पुराणें हीं एका खालीं एक धर्मास प्रमाण मानतां कीं नाहीं ?

२ विशेष वाक्यानें सामान्य वाक्याचा बोध होतो कीं नाहीं ?

३ दोन वाक्यें समान असल्यास विकल्प होतो कीं नाहीं ?

४ रूढी बळवान कीं शास्त्र बळवान आहे ?

५ कलियुगांत कांहीं कर्मे वर्ज केलीं आहेत. त्यांपैकीं कितीएक चालतात व कितीएक चालत नाहींत. उदाहरण—मातुल कन्या—दीर्घयात्रा—दीर्घकाल ब्रम्हचर्य—समुद्रयान—इत्यादि. यांस कोणी प्रायश्चित्त योजित नाहीं, याचें कारण काय ?

६ कलियुगापूर्वी पुनर्विवाहधर्म होता किंवा नाहीं ?

७ पराशरस्मृति कलियुगाविषयीं आहे कीं नाहीं ?

८ पराशरानें पुनर्विवाह विधान केलें आहे कीं नाहीं ?

९ अग्निहोत्र, संन्यास, हीं कलींत वर्ज्य आहेत कीं नाहींत ?

१० निर्णयसिंधुकारानेंच पुनर्विवाहाचा विचार केला आहे. त्यांत पराशराची स्मृती मुळींच सोडून दिली, याचें कांहीं कारण आहे कीं काय ?

११ पुराणोक्त आणि सामान्य पुनर्विवाह न करण्याविषयीं वचन असल्यास त्याचा पराशरस्मृतीनें बोध होण्यास काय हरकत आहे ?

१२ कलिवर्ज्यकर्में लिहिलीं तीं कांहीं चालतात व कांहीं चालत नाहींत, तेव्हां कलिवर्ज्यकर्में हिकडे असतां कमी श्रेयस्कर समजावीं किंवा पाप समजावें ? पाप असल्यास त्याचें प्रायश्चित्त कोठें लिहिलें आहे ?

१३ दीर्घकाल ब्रम्हचर्य कलींत वर्ज्य आहे, तर विधवांस जन्मपर्यंत ब्रम्हचर्य करण्यास कां लावावें ?

१४ पुनर्विवाहाचा निषेध चारी वर्णांस किंवा ब्राह्मणांस मात्र लागतो ?

१५ ब्रह्महत्येपेक्षां गर्भघात अधिक पाप आहे कीं नाहीं ?

१६ वैधव्यपीडा ज्यांस सहन होत नाहीं त्यांस सहगमन म्हणून निर्णयसिंधूनें लिहिलें आहे. त्यास सहगमन हल्लीं बंद झालें. तेव्हां वैधव्यपीडित विधवस गति कोणती ?

१७ पुनर्विवाहापेक्षां वैधव्य श्रेयस्कर असेल; परंतु पुनर्विवाहांत पाप आहे काय ? व त्यास वचन कोणतें ?

१८ ज्या आचारापासून गर्भपातादिक पापें उत्पन्न होतात आणि त्या आचारांस शास्त्रांत बाधक वचनें मिळाल्यास शिष्टांनीं टाकावा किंवा अधिक पापें उत्पन्न होतील असाच आग्रह धरावा ?

१९ शूद्रांतील पुनर्विवाह हें जर पाप आहे, तर आजपर्यंत शंकर मध्वादिक उपदेशक ह्यांनीं अनेक पापें सोडविण्याविषयीं जो उपदेश केला, त्यांत त्यांचा निषेध कां केला नाहीं ?

२० वेदांत पुनर्विवाहाचें विधान आहे कीं नाहीं ? आणि त्या मंत्राचा उपदेश अग्निहोत्री यांचे स्त्रियांस व सतीस मरतेसमयीं करण्याचा विधि आश्वलायन, बोधायन, नारायणभट, कमलाकर, धर्मसिंधु या सर्व ग्रंथांत लिहिला आहे कीं नाहीं ?

२१ पुराणांत दमयंती–उलूपी–दिव्यादेवी–यांचे पुनर्विवाह लिहिले आहेत कीं नाहीं ?

२२ पराशरांनीं पुनर्विवाह लिहून औरस व दत्तक असे दोन पुत्र लिहिले, तेव्हां पुनर्विवाहाचे स्त्रीचा पुत्र औरसांत किंवा दत्तकांत धरावा ?

२३ मधुपर्कांत आलंभन पक्ष व उत्सर्जन पक्ष असे दोन सूत्रीं लिहिलें, त्यापैकीं आलंभनपक्ष कलि-वर्ज्यांत गेला, तेव्हां त्या कर्माचे मंत्र कोणी उच्चारीतही नाहींत. तसे पुनर्विवाह-कर्मोत्पादक मंत्र उच्चारूं नये. ह्या आचाराबद्दल कलियुगांत कोठें निषेध लिहिला आहे कीं काय ?

२४ एक समयीं दोन नवरे करूं नये. परंतु समयभेदानें केल्यास चिंता नाहीं असें वेदांत व वेदांतभाष्यांत आहे कीं नाहीं ?

२५ पराशराचें वचन हा अपूर्व विधि आहे. आणखी पंचापत्तींमुळें त्यास अपूर्वत्व आहे. अन्य विपत्तीचे ठायीं निषेधवाक्यास चरितार्थ आहेच.

२६ प्राचीन युगांत नियोग चालू होता तो कलियुगांत बंद झाला. व दत्तककन्या परकीयास लग्नापूर्वीं देत हाही कलींत निषेध केला आहे. तेव्हां या दोन विषयांचीं वाक्यें पुनर्विवाहास लावणें योग्य आहे कीं नाहीं ?

२७ अर्कविवाह पुरुषांस तिसरा गणतात. स्त्रीस कुंभविवाह करतात. तो प्रथम वराशीं दुसरा विवाह असें म्हणण्यास कांहीं चिंता आहे काय ?

२८ पुनर्विवाहविधायक नारद इत्यादिक दुसऱ्या स्मृति आहेत. त्यास चरितार्थ कसा द्यावयाचा ?

२९ अशीं अनेक कर्में, श्राद्ध, अग्निहोत्र, मुंज इत्यादि पुनरपि करते वेळेस विधि पहिल्याप्रमाणेंच तसें पुनर्विवाहाचा विधि एक सारखाच असें कां म्हणूं नये ?

३० बापाच्या गोत्रांतून कन्या लग्नसंस्कारानें नवऱ्याचें गोत्र घेतें, तसें पुनर्विवाहसंस्कारानें दुसऱ्या नवऱ्याचें गोत्र तिला मिळण्यास हरकत काय ?

३१ अभिमानानें मुख्य × × × दिकांनीं पुनर्विवाह टाकून अलीकडे कन्या विधवा ठेवण्याचा प्रचार घातला तसा शास्त्र व वेदाज्ञा बुडवून ब्राह्मणांनीं घातला नसेल असें होण्यास अशक्य काय ?

३२ पुरुषांनीं सवती करून आपली अपत्यदुर्दशा व कलह माजवावे आणि स्त्रियांनीं पतिमरणानंतरही पुनर्विवाह--कुमारिका असतांही--करूं नये यांत कांहीं न्याय किंवा नक्की आहे काय ? यापासून दिवसेंदिवस अनेकविध पापें होतात. आणि बालहत्या केलेल्या विधवा पुनरपि ज्ञातींत वागतात हें आपल्यास ठाऊक असतां डोळेझांक करावी यांत पुण्य आहे काय ?

या सर्व प्रश्नांचीं उत्तरें × × ४२ स्मरोन धर्मपरायण बुद्धीनें लिहून द्यावीं. जाणून अधर्म सांगाल तर सर्व जगांतील पातक लागेल. असें समजून स्वधर्म जाणून नंतर आम्हांशीं बोला.

---

या पुनर्विवाहाच्या प्रकरणांत बहिष्कार घालण्याचा इतका सुळसुळाट झाला होता कीं, त्याला ताळ ना तंत्र ! ज्यानें उठावें त्यानें अमुक अमुक गृहस्थांवर बहिष्कार ठेविला आहे म्हणून प्रसिद्ध करावें. त्यांत खुनशी स्वभावाचे मनुष्यावें तर फारच पिकलें. आपला ज्यांच्याशीं द्वेषभाव असेल, तो द्वेष उगवून घेण्याला उपद्यापी मंडळींना तर ही संधि उत्तमच सांपडली. केवळ द्वेषबुद्धीनेंही कित्येक लोक सभ्य लोकांवर बहिष्कार घातल्याचें प्रसिद्ध करूं लागले. कांहीं लोकांनीं बहिष्कार घालावा व दुसऱ्या शेंकडों लोकांनीं तो अमान्य करावा असा सारखा धुमाकूळ चालला होता. खालचा सभेचा एक ठराव पहा:—

इंदुप्रकाशची पुरवणी सोमवार ता. ४ आक्टोबर सन १८६९.

वे. शा. सं. रा. रा. सर्वब्रह्मवृंद यांस—

"साष्टांग नमस्कार विनंती विशेष. खालीं सह्या करणार ब्राह्मणसमुदाय यांजकडून नम्रतेनें कळविण्यांत येतें कीं, आषाढ शुद्ध १० रविवार शके १७९१ रोजीं मुंबई येथें हिंदुधर्मव्यवस्थापक सभेंत रा. रा. गणेश बापूजी मालवणकर या नांवाच्या गृहस्थानें ( वे. शा. सं रा. रा. भास्कर अनंत

शास्त्री, सखाराम शास्त्री काळे, आणि महादेव चिमणाजी आपटे, आण्णा मोरेश्वर कुंटे ) या चार असामीस बहिष्कार आहे असें सर्व सभासदांस सांगितलें व याचें कारण त्यांनीं असें सांगितलें कीं, ज्येष्ठ शु० ११ रविवार शके १७९१ रोजीं ठाकुरद्वारांत, भरलेल्या सभेंत जी हकीकत झाली तिजविषयीं खोटी हकीकत सदरहू चार ब्राह्मणांनीं छापून प्रसिद्ध केली. परंतु ह्या चौघांच्या पत्रांतील हकीकत बिलकुल खोटी नाहीं असें आमचें पूर्ण मत आहे. सदरील हकिकतीचा खरेपणा मशारनिल्हे मालवणकर याच्या पदरांत घालण्याकरितां कांहीं गृहस्थ अनेक वेळां सभेस गेले असून त्यांस बोलूं दिलें नाहीं, व या प्रकरणीं तुमची कांहीं एक तक्रार आम्हीं ऐकत नाहीं असें साफ सांगितलें. या सर्व कारणांवरून हा बहिष्कार रास्त नाहीं, सबब आम्हांस मान्य नाहीं.”

ह्याच्या खालीं ‘ विष्णु दाजी गद्रे ’ इत्यादि सह्या आहेत.

हें तर काय, पण खुद्द श्रीशंकराचार्यांनीं पाठविलेल्या धर्माधिकाऱ्यावरच कसा बहिष्कार घातला आहे हें खालच्या ठरावावरून दृष्टीस पडेल. हा ठराव असा आहे:—

॥ श्री सद्गुरु-प्रसन्न ॥

वे. शा. सं. रा. रा. समस्तशास्त्री, भिक्षुक व शिष्ट गृहस्थ मुक्काम अमदाबाद यांस:—

साष्टांग नमस्कार वि. वि. मिति पौष वद्य ६ रोज शनिवार शके १७९१ रोजीं मुंबई येथील ग्रामस्थ ब्रह्मवृंदांची सभा श्रीमुलेश्वरीं काशीविश्वेश्वराच्या सभामंडपांत भरली होती, त्यासमयीं सुमारें १०००० वर ब्राह्मण मंडळींचा समुदाय जमला होता, त्यांत हरि गणेशशास्त्री बरवे नि. श्री शंकराचार्य व गणेश बापूजी मालवणकर हिंदुधर्मव्यवस्थापक सभेचे चिटणीस यांजवर खालीं लिहिल्याप्रमाणें दोष स्थापित होऊन त्यांना ज्ञातिबहिष्कृत केलें. तो मजकूर आपणांस कळविण्याकरितां ग्रामस्थांच्या आज्ञेवरून लिहित आहे.

गणेश बापूजी मालवणकर याजवरील दोष:—या गृहस्थावर मागें येथें ग्रामस्थांनीं त्याच्या धर्मविरुद्ध आचरणाबद्दल बहिष्कार घातला होता. त्या दोषापासून शास्त्ररीत्या त्यानें आपली सुटका करून न घेतां चोहींकडे ब्राह्मण लोकांत भ्रष्टता केली, व पुनर्विवाहाच्या निमित्तानें, आपला दोष छपविण्या-

करितां कित्येक दुराग्रही लोकांच्या बुद्धीस भ्रंश करून शेंकडों ब्राह्मणांवर निराधार व विचारपूस केल्याशिवाय बहिष्कार घातला. ते लोक आमच्यावरील दोषारोप सिद्ध करून द्या म्हणून म्हणत असतां तिकडे दुर्लक्ष केलें. कित्येक सज्जनांनीं तुम्ही असा निष्कारण ब्रह्मछल करूं नका म्हणून त्यांस अनेक वेळां सांगितलें असून त्यांचें त्यांनीं ऐकिलें नाहीं. याप्रमाणें अनेक पातकें करून त्यानें ब्रह्मद्रोह संपादिला.

हरि गणेश बर्वेः—याजवर दोष असा आहे कीं, त्यांना गणेशशास्त्री यांच्या वर्तणुकीचा सर्व प्रकार कळून आला असतां तिकडे दुर्लक्ष करून त्यास ब्रह्मछलाचे कामांत समजून उमजून मदत केली व तेणेंकरून श्रीमत् शंकराचार्य जगद्गुरु यांनीं विश्वासानें व सात्विकबुद्धीनें धर्मव्यवस्थापनेचें काम यांच्यावर सोंपविलें असून त्या अधिकाराचा त्यांनीं उपमर्द करून गुर्वाज्ञा अमान्य केली.

वरील कारणाकरितां सदरहू दोन गृहस्थ खालीं लिहिलेल्या शास्त्रवचनाच्या आधारें बहिष्कृत होण्यास पात्र झाले आहेत; सबब त्यांना आजपासून बहिष्कृत केलें आहे. याजकरितां त्यांच्याशीं अन्नोदकादि व्यवहार कोणीं करूं नये, केल्यास तेही त्यांच्याच दोषाचे अधिकारी होतील. कळावें हे विनंति.

गौतम.

**अनृताभिशंसनंगुरोरनृताभिशंसनमिति महा पातक समानि ।**

याज्ञवल्क्य.

**मिथ्याभिशंसिनो दोषोद्विः समोभूतवादिनः ।**
**मिथ्याभिशास दोषंच समादत्ते मृषावदन् ॥ १ ॥**

मुंबईग्रामस्थांचे आज्ञेवरून वामनभट विष्णुभट अभ्यंकर द० खु०
मि० पौष वद्य ७ रविवार शके १७९१.

**ताजाकलम**—सदरहू बहिष्कृत केलेल्या दोन इसमांस सभेंत येऊन आपल्यावरील दोषांचा जबाब देण्याकरितां लेखी तोंडीं निमंत्रणें केलीं असून ते सभेस आले नाहींत. व ब्रह्मवृंदाचा उपमर्द करून गैरशिरस्त जबाब दिला, हेंही आपणांस कळावें.

वे. रा. रामभटजी अग्निहोत्रि यांस नमस्कार. आपण सदरहू ग्रामांत व आसपास सभा भरवून कळवावें. न कळविल्यास महापातकाचा दोष आप-

णांस लागेल. सबब श्री अग्निनारायण व श्री वेदोनारायण यांची शपथ समजून अलक्ष न करावें ही विनंति. संमति-पत्र करून उत्तर पाठवावें.

असो. त्या वेळी अशी बेबंदशाही चालली होती हें समजण्याकरितां वरील पत्रें दिलीं आहेत. परंतु गोपाळरावजींना ते लग्नसमारंभास हजर नव्हते या मुद्यावर अमदावाद व बडोदें येथील ब्रह्मवृंदांनीं त्यांस शुद्धिपत्र देऊन दोषमुक्त केलें. इतकेंच नव्हे तर श्री द्वारकामठाचे स्वामी श्री शंकराचार्य ह्यांनीं त्यांस अपवाद प्रायश्चित्त देऊन पंक्तिपावन असल्याचें आज्ञापत्रही दिलें.

ह्या पुनर्विवाहाच्या प्रकरणांतून 'लोकहितवादी' पार पडले न पडले तोंच कांहीं दिवसांनीं दुसरें एक बहिष्कार-प्रकरण गोपाळरांवावर उपस्थित झालें. त्याची हकीकत अशीः—

## विलायत-प्रकरण.

गोपाळराव हरि यांच्या संततीसंबंधानें येवढा वेळपर्यंत आम्ही उल्लेख केला नाहीं. परंतु कळविण्यास मोठा आनंद वाटतो कीं त्यांना परमेश्वरानें जशी संपत्ति तशीच संततीही दिली होती. त्यांना सहा पुत्र असून दोन कन्या होत्या. हे त्यांचे सारे मुलगे इतके बुद्धिवान्, विद्वान्, पदवीधर, एकापेक्षां एक उच्च दर्जाचे निपजले कीं त्या प्रत्येकाचे थोडें थोडें तरी इतिवृत्त दिल्यावांचून गोपाळराव हरींचें चरित्र पुरेंच करतां येणार नाहीं. ह्याकरितां त्याचें एक प्रकरण स्वतंत्रच पुढें देण्याचें योजिलें आहे. पण विषयानुरोधानें त्यांच्यापैकीं जे एक चिरंजीव विलायतेस जाऊन ब्यारिस्टर ॲट लॉ होऊन आले होते, त्यांच्याच संबंधानें येथें थोडासा उल्लेख करितों. हे चिरंजीव त्यांच्या मुलांतील दुसरे होत. त्यांचें नांव कृष्णराव गोपाळ ऊर्फ अण्णासाहेब. हे ब्राह्मण जातींतिल पहिले बॅरिस्टर. हे लहानपणापासूनच फार बुद्धिमान् व तरतरीत असत. ते मुंबई युनिव्हर्सिटींत बी. ए. ची परीक्षा फर्स्ट क्लासांत पास झाल्यावर, सरकारांतून खानदानीच्या तरुणांना विलायतेस धाडून विशेष प्रकारचें विद्यार्जन करवावें म्हणून ज्या कांहीं शिष्यवृत्त्या ( Scholarships ) देण्याचें ठरलें होतें, त्यांतील एक शिष्यवृत्ती अण्णासाहेब यांस मिळाली. म्हणून त्यांस गोपाळरावजींनीं विलायतेस बॅरिस्टर होण्याकरितां पाठविलें. त्याप्रमाणें ते १८६९ मध्यें विलायतेस गेले व बॅरिस्टरची परीक्षा पास होऊन १८७३चे

आरंभीं मुंबईस परत आले. तेव्हां पुन्हा हें बहिष्कार-प्रकरण घुमूं लागलें. तें जागून गोपाळराव हरींनीं अण्णासाहेब अमदाबादेस आले असतां त्यांस घरीं उतरण्यास न आणतां निराळ्या बंगल्यांत राहण्याची त्यांची सोय केली होती. तरीसुद्धां हा बहिष्काराचा व प्रायश्चित्ताचा ससेमिरा त्यांच्या मागचा कांहीं चुकला नाहीं. ह्या प्रायश्चित्ताला इतकें महत्त्व आलें होतें कीं त्याची किंमत ५००० रुपयापर्यंत चढली! ही गोष्ट गोपाळरावजींचे जामात श्री. चिंतामणराव नारायण ऊर्फ भाऊसाहेब मुजुमदार ह्यांच्या खालीं दिलेल्या पत्रावरून कळून येईल. त्यांचें पत्र असें:—

श्री

ती. रा. रा. रावसाहेब वडिलांचे सेवेसी.

बालके चिंतामण मुजुमदार यांचा शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत आश्विन वद्य ५ गुरुवार पावेतों वडिलांचे आशीर्वादें करून सर्वत्र सुखरूप असो विशेष. वे. रा. रघुपती बुवा यांच्या हातून निकाल होईल असें दिसत नाहीं. त्यानें आपलेप्रमाणें यत्न केला. परंतु व्यर्थ. कोणी गृहस्थ आम्हास असें सुचवितो कीं,५००० रुपये खर्च केल्यास काशींतील ब्राह्मणांकडून रा. रा. कृष्णरावासुद्धां प्रायश्चित्त देववीन. मर्जी असल्यास नक्की करून आपणांस कळवितों. रुकार असल्यास होण्यासारखें आहे. आम्हांस वारंवार अडचण पडत आहे. हें आपणास लिहावें असें नाहीं. मी या कामीं पुष्कळ यत्न करीत आहे. कोणतेही प्रकारें लवकर मोकळीक व्हावी. दक्षचुडेमंडित सौ. येसुबाईस सरकारी बारशाचा समारंभ पाहण्यासाठीं ठेवून घेतलें आहे. करितां विलंब लागला. कळावें बहुत काय लिहिणें कृपा लोभाची वृद्धि निरंतर पूर्ण चंद्रवत् असावी हे विज्ञापना.

अण्णासाहेब देशमुख अमदाबादेस गेले ते श्रीमत् शंकराचार्यांचें शुद्धिपत्र घेऊन गेले होते. तरी सुद्धां बहिष्काराचा बंडावा हा होताच. अखेर त्यांनीं काशीहून शुद्धिपत्र आणविलें, तेव्हां हें सर्व प्रकरण मिटलें. काशी येथील शुद्धिपत्र खालीं दिलें आहे.

श्री

गोपाळराव हरी देशमुख यांजकडून वे. शा. रा. बाळकृष्ण भट पराडकर येथें आले, त्याजबरोबर पत्र आलें त्यांतील सारांश:—

वे. रा. दामोदर भट राहूरकर याचेबद्दल वे. रा. हरभटजी गरुड अमदाबादेस जाऊन रा. राघोबा रामचंद्र यांचे घरीं ता. १६ आगस्ट रोजीं शनिवारीं सभा केली. त्यांत देशमुख यांस आमंत्रण केलें नाहीं. याजकरितां सभेंत बाळकृष्ण भट पराडकर ह्यांनीं विचारलें कीं, या सभेंत देशमुख यांस आमंत्रण कां केलें नाहीं ? देशमुख यांजवर कोणी अनुवादक आहे कीं नाहीं ? तेव्हां नारायणराव वकील, बापू काकाजी, व भास्कर शास्त्री आदिकरून सर्व बोलले कीं, आमची कांहीं तक्रार नाहीं. त्याजवर गरुड यास विचारतां ते बोलले कीं दानाध्यक्ष यांनीं सांगितलें तसें आम्ही केलें. त्याचें कारण त्यास पुसावें. त्यास गरुड यांस कोणते कारणानें अशी ताकीद झाली होती म्हणून विचारतात.

ते म्हणतात कीं, देशमुख यांचे चिरंजीव कृष्णराव गोपाळ हे विलायतेहून परत आल्यावर अमदाबादेस आले होते. त्यांचा संसर्ग झाल्याबद्दल कोणी संशय घेतात. म्हणोन आमंत्रण केलें नाहीं.

ह्या प्रकरणांत मुद्दे दोन आहेत ते असे कीं,

१ विलायतेहून परत आलेले ब्राह्मणांचा संसर्ग झाला आहे कीं काय ?

२ कृष्णराव यांचा संसर्ग दोषावह आहे कीं काय ?

पहिले मुद्याविषयीं विचार करतां बाळकृष्णभट पराडकर हे देशमुखांचे घरीं असतात. त्यांचे सांगण्यांत कृष्णराव हे वैशाखमासीं आले होते. ते वेगळे घरीं राहिले होते. त्यांचा कांहीं संसर्ग घडला नाहीं. सभेंत यांजविषयीं दुसरे कोणी साक्ष दिली नाहीं. तेव्हां फक्त गरुड यांचे बोलण्यावर मात्र ही गोष्ट राहिली. दानाध्यक्ष यांजकडून गरुड यांस कांहीं सांगणें नव्हतें. त्यांनीं ऐकिवावरून हा उपक्रम केला. त्यांत कांहीं हांशील नाहीं. खपुष्पन्यायवत् हा संसर्गाचा दोष मिथ्या आहे.

दुसरे मुद्याचा निर्णय असा दिसतो कीं, कृष्णराव देशमुख यांनीं प्रायश्चित्त घेऊन शंकराचार्यांस ब्रह्मदंड देऊन त्यांजकडील पत्र आपलें नांवचें एक व त्याजबरोबर नारायणभट बिन बापूभट काळे होते त्यास पावन केल्याचें दुसरें अशीं दोन पत्रें चैत्र व॥ ११ ची घेतली तीं बाळकृष्णभट यांनीं दाखविलीं:-

सांप्रत काळीं राज्यकारणप्रयुक्त व विद्या शिकण्याकरितां व परीक्षा देण्याकरितां विलायतेस जाण्याचे अनेक प्रसंग प्राप्त होत आहेत. हल्लीं साक्षी

देण्याकरितां सरकारांतून यहूतांस हुकूम झाले आहेत. हीं सर्व कामें अवश्य दिसतात.

वे. मू. रा. यज्ञेश्वरशास्त्री सुरतकर यांनी प्रस्थानचंद्रिका म्हणून एक ग्रंथ शके १७९१ मध्यें छापून प्रसिद्ध केला. त्यांत देशांतराचा दोष नाहीं असें शास्त्ररीत्या सिद्ध केलें आहे.

त्या आलीकडे रा. गणेश सीताराम गोळवलकर सरसुभे निसबत होळकर सरकार हे कितीएक ब्राह्मणांसहित विलायतेस गेले. त्याजबद्दल श्री स्वामी शंकराचार्य यांनीं शुद्धिपत्र करून दिलें त्या वेळेस स्वामींनीं शास्त्रार्थाचा एकंदर विचार करून निर्णय केला. त्याजबद्दल क्षेत्रोंक्षेत्रीं अनुमोदन घेण्याकरितां लिहिलें होतें. त्या क्षेत्रांचीं नांवें:—

१ श्री क्षेत्र काशी येथील सहा पंडितांनी प्रायश्चित्तानें ब्राह्मण शुद्ध होतो असें लिहिलें आहे.

२ राजधानी इंदूर येथील १६ पंडितांनीं सदरहूप्रमाणें अभिप्राय दिला.

३ पुण्याचे २५ पंडितांनीं सदरहूप्रमाणें अभिप्राय दिला.

४ वाई, सातारा, कऱ्हाड, सांगली, श्री वाडी नरसिंह, या पांच क्षेत्रस्थांनीं याचप्रमाणें ठरविलें आहे.

श्री तारानाथ तर्कवाचस्पति यांणीं शास्त्रार्थ प्रसिद्ध केला आहे त्यांतीलही आशय असाच आहे. याचा इत्यर्थ असा आहे कीं, देशांतरीं नौकायानांत बसून जाण्याचा आचार बहुतकाळापासून शिष्टपरिगृहित आहे. कोंकणांतून ब्राह्मण मुंबईस आले तरी आठदहा दिवसपर्यंत नौकेंत राहतात; तसेंच हजारों ब्राह्मण सिंधु मुलखांत जाऊन राहिले आहेत. ते आगबोटीनें जातात येतात. कराची, हैद्राबाद, मुलतान, एदन, बंदरबुशर वगैरे परदेशांतील व या देशांतील बंदरें आहेत तेथें नौकायानांतून जाण्याचा सांप्रदाय मुळापासून चालत आहे, व हल्लीं वृद्धिंगत आहे.

याप्रमाणें असतां नौकायनाचें प्रायश्चित्त मानल्यास अर्ध्या देशास प्रायश्चित्त प्राप्त होईल. यास्तव प्रायश्चित्तोत्तर स्वामींनीं पत्रें देऊन कृष्णराव यांस पावन केलें. त्यापेक्षां त्यांचा संसर्ग मुळींच दोषावह नाहीं.

सदरहूप्रमाणें असतां देशमुख यांनीं आपले चिरंजीवास घरीं न ठेविलें याचें कारण काय, म्हणून बाळकृष्णभटजी यांस विचारतां त्याचा खुलासा ते असा करतात कीं जरी चिरंजीवाची प्रायश्चित्तपूर्वक शुद्धि झाली तरी सर्व

जातीस कळवून त्यांचे आज्ञेनें संसर्ग करावा या धोरणानें देशमुख यांनीं घाई केली नाहीं. असा बेत करावयाचा होता तो प्रसंग हल्लीं सहजच प्राप्त झाला. हा खुलासा योग्य आहे असें आम्हांस वाटतें.

या सर्व कारणांवरून सर्वानुमतें ठराव करण्यांत येतो कीं, देशमुख यांजकडे पूर्ववत् अन्नोदक-व्यवहार सर्व जातीचे व्हावे. याजबद्दल पत्र नारायणराव वकील यांस अमदाबादेस लिहून जाईल त्यांजकडून सर्व हरकत दूर झाल्याचें लिहून यावें. असा ठराव करून याची नक्कल देशमुख यांस पाठविली आहे. मिति भाद्रपद शु॥४ शके १७९५.

ही निरवानिरव होत आहे तोंच विलायतेंत पार्लमेंटरी फायनान्स कमिटी स्थापन होऊन तींत साक्ष देण्यासाठीं आपण विलायतेस जातां कां ? असें सरकारनें गोपाळराव हरीस विचारलें. परंतु पुनर्विवाह प्रकरणांत व आपल्या चिरंजीवाच्या प्रकरणांत मनस्वी त्रास पडल्यामुळें 'धर्माच्या अडचणीमुळें मला विलायतेस जातां येणें शक्य नाहीं' असें त्यांनीं सरकारास उत्तर दिलें.

## महापूर.

ह्या ठिकाणीं म्हणजे गुजराथेंत असतांना गोपाळराव ह्यांचा नांवलौकिक फारच वाढला होता. फार काय सांगावें ? परंतु लोकांनीं 'गोपालस्तोत्रम्' म्हणून गुजराथी भाषेंत एक स्तोत्र सुद्धां रचलें होतें ! बाईस जसा कृष्णानदीला महापूर आला होता, तसा गोपाळराव हरि अमदाबादेस असतांना साबरमती नदीस महापूर आला होता आणि त्यामुळें पैक लोकांचें नुकसान होऊन मोठा अनर्थ गुदरला. त्यावेळीं श्रीमंत पंत प्रतिनिधी ह्यांनीं रावबहादुर गोपाळराव हरि यांजकडे गोरगरिबांच्या मदती करतां १०० रुपये पाठविले होते. ते पत्र असें आहेः—

श्री.

राजेश्रीया विराजित राजमान्य राजश्री रावबहादुर
गोपाळ रावजी रावसाहेब स्माल कॉज कोर्टाचे
जज्ज मु० अमदाबाद स्वामीचे सेवेसी-

पोष्य बाबाजी हरि कारभारी नि० श्री० राजश्री पंत प्रतिनिधी संस्थान औंध-कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती, येथील क्षेम ता० २५ आक्टोबर सन १८७५ पावेतों आहे विशेष.

साबरमती नदीस महापूर येऊन अमदाबाद शहराचें अतिनुकसान झालें. कित्येक कुटुंबांस राहण्यास घर जागा नसून अन्नवस्त्रास मोताद अशी त्यांची स्थिति झाल्याचें वर्तमान पत्रद्वारें आमचें सरकारांत समजण्यांत आलेवरून सरकारास बहुत दिलगरी वाटली. अशा महत्संकटांचे समयीं होईल तितका उद्योग करणें सर्वांचें कर्तव्यकर्म आहे. व त्याप्रमाणें पुणें, ठाणें, मुंबई इत्यादि ठिकाणीं फंड जमविण्यासाठीं मंडळ्या स्थापन होऊन बरीच वर्गणी जमा झाली असें प्रसिद्ध झालें. त्यायोगें सरकारांनीं संतोष प्रदर्शित केला. आणि निराश्रित दीन झालेल्या कुटुंबांचा अंशतः तरी उपयोग व्हावा म्हणूनच संस्थानांतून १०० रुपये आपल्याकडे पाठविण्याविषयीं हुकूम झाल्यावरून सदर रुपयांची हुंडी पाठविली आहे. प्रविष्ट झाल्याचें कृपा करून उत्तरीं कळविण्याचें व्हावें. बहुत काय लिहिणें कृपा असावी ही विनंती.

**बाबाजी हरि कारभारी.**

असो. याप्रमाणें गोपाळराव हरींनींही अशा संकटसमयीं त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें पुष्कळ मेहनत घेतली. व दीन अनाथास परोपरीनें सहाय्य केलें.

## साहाय्य-कर्तृत्व.

गोपाळरावजींच्या अंगच्या सांच्या सद्गुणांत 'साहाय-कर्तृत्व' हा केवळ ईश्वर-दत्त गुण होता असें म्हटलें तरी चालेल. रावापासून तो रंकापर्यंत ते सर्वांस सारखें होईल तेवढें सहाय्य करीत. बडोद्याचे श्रीमंत खंडेराव महाराज ह्यांची स्वारी अमदाबादेस गेली असतां व गोपाळरावजी तेथे असिस्टंट जज्ज असतां त्यांच्या संबंधानें अपमानास्पद प्रकार कसा घडला व बडोद्याच्या असिस्टंट रेसिडेंटास सरकारनें त्याबद्दल कसें दूर केलें, त्याचा सरकारी ठराव आम्ही पूर्वीं दिलाच आहे. त्यामध्यें 'ह्या कामीं महाराजांचाही जाब विचारणें अवश्य होता,' असेंही सरकारानें स्पष्ट उद्गार काढले होते. ती गोष्ट खंडेरावांचे मनासही लागून राहिली. ह्यामुळें गोपाळरावजी पुन्हां अमदाबादेस स्मॉल कॉज कोर्टाचे जज्ज झाल्यावर त्यांनीं गोपाळरावजींस मुद्दाम आदरपूर्वक बोलावून आणून त्यांचा मोठा सत्कार केला व तेव्हांपासून ते त्यांस बंधुस्थानीं व श्री० जन्माबाई राणीसाहेब त्यांस पितृस्थानीं मानूं लागल्या. गोपाळरावजींची केव्हांही गांठ पडली तरी खंडेराव महाराज त्यांस आपल्या खाजगी खोलींत अगदीं

आपल्या शेजारीं बसवून घेत व तेथें खुषमस्कऱ्यांनीं येऊं नये अशी ताकीद देत. ह्याप्रमाणें घरोबा चालत असतांच पुढें खंडेराव महाराज वारले, त्या वेळीं जम्नाबाईसाहेब गरोदर होत्या. तेव्हां त्यांचे कडून सरकारास अर्ज करून बडोदें क्यांपांत प्रसूत होईपर्यंत त्यांच्या दर्जाप्रमाणें राहण्याची सर्व व्यवस्था गोपाळरावजींनीं लावून दिली. परंतु दुर्दैवानें त्यांस पुत्र न होता कन्या झाली. बडोद्याचें राज्य मल्हारराव महाराजाकडे गेल्यामुळें जम्नाबाई साहेब दुःखी कष्टी होऊन आपले आलेले दिवस पुण्यास राहून कसे तरी कंटूं लागल्या. त्या गोपाळरावजींस 'बाबा' व त्यांचें कुटुंब सौ० गोपिकाबाई ह्यांस 'आई' म्हणत. त्या उभयतांनींही त्यांस कन्येप्रमाणें मानलें होतें. त्यांची पुणें येथें सरकारांत दाद लावून त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्याच्या खर्चाच्या नेमणुकीची व्यवस्था गोपाळरावजींनींच करवून दिली होती.

पुढें मल्हारराव महाराजांची कारकीर्द बडोद्यास चालू झाली असतां प्रजेवर अनेक प्रकारें जुलूम होऊं लागला, व पुष्कळ अनन्वित कृत्यें घडूं लागलीं. म्हणून सरकारानें कमिशन बसवून मल्हाररावांस बडोद्याचे गादीवरून पदच्युत केलें. तेव्हां राणी जम्नाबाईसाहेब यांनीं आपल्या मांडीवर दत्तक घेऊन त्याच्या नांवानें बडोद्याचें राज्य चालवें, अशा अर्थाचा जो अर्ज केला होता तो गोपाळरावजी यांचेच सल्यानें केला. त्यांतील मुद्दे गोपाळरावांनीं काढले, व तो अर्ज इंग्रजीमध्यें गोपाळरावजींचे द्वितीय चिरंजीव कृष्णराव उर्फ अण्णासाहेब बॅरिस्टर अॅट लॉ ह्यांनींच सरकारांत लिहून पाठविला. व तोच यशस्वी होऊन जम्नाबाईसाहेबांस दत्तक घेण्याची इंग्रज सरकारानें परवानगी दिली, व त्याप्रमाणें हल्लींचे श्रीमंत सयाजीराव गायकवाड गादीवर बसले.आणि मातोश्री जम्नाबाईसाहेब बडोद्याच्या राज्यावर स्थानापन्न झाल्या. हे गोपाळरावजींचे व अण्णासाहेबांचे परिश्रम हल्लीं सयाजी महाराजांना माहित असोत वा नसोत पण मातोश्री जम्नाबाईराणीसाहेब ह्या शेवटपर्यंत त्यांचे उपकार स्मरत होत्या.

दुसरें उदाहरण वांईच्या शेखमिऱ्यांचें आहे. हे शेखमिरे गोपाळरावजींचे फार स्नेही होते. ह्यांची जहागीर इनामकमिशनकडे औरसपणाचे वादांत चौकशीसाठीं होती, ती गोपाळरावजींनीं व मे. स्यांडफर्ड साहेबांनीं केलेल्या जांइट रिपोर्टावरून सुटली. ते शेखमिरे वारल्यानंतर मुसलमानी शास्त्राप्रमाणें एकंदर जहागीर मुलीकडे चालली. पुष्कळ दिवसानंतर याच प्रकरणाचा मे. कँडीसाहेब एजंट व जज्ज पुणें याजसमोर वाद चालला. त्यांनीं इनामकमि-

शनचा निकाल फिरविला; परंतु मुंबई सरकारानें पहिलाच निकाल कायम केला. त्याप्रमाणें हजरत् शेखमिरे याचे नातवाकडे अद्यापि सर्व उत्पन्न चालत आहे.

कोणाचा विलायतेस इंग्रजी अर्ज तयार करून देणें, कोणा जहागीरदारांच्या भाऊबंदकीची वाटणी करून देणें इत्यादि मध्यस्थीही करण्यास गोपाळराव कधीं कंटाळत नसत. श्री. विंचूरकर, तुकोजीराजे भोसले, अक्कलकोटकर इत्यादिकांचीं बहुत कामें करीत असल्याचे व त्यांचा दृढतर स्नेह असल्याचें त्यांच्या पत्रव्यवहारावरून व्यक्त होतें.

हें श्रीमंत लोकांविषयीं व राजेरजवाड्याविषयीं झालें; पण गोरगरिबांविषयीं तर त्यांचें अंतःकरण ह्याहूनही दयार्द्र होतें. ह्याचीं उदाहरणें सांगावीत तितकीं थोडींच होणार. पण त्यांतील मासल्याकरितां एक दोन देतों.

गोपाळरावजी प्रत्यहीं मुलांसहवर्तमान स्नानास जाऊन नदीकांठच्या प्रत्येक देवालयांतील देवाला गंधफूल वहात, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यांत नदीच्या पलीकडे जीं देवालयें आहेत त्यांत जाऊन त्यांची नित्य पूजा करावयास मात्र त्यांस वेळ मिळत नसे.कारण तसें केलें तर उशीर होऊन कोर्टांत जाण्याची वेळ टळावयाची. म्हणून रविवारची सुट्टी वगैरे असली म्हणजे ते नदी पलीकडे तिकडील सर्व देवांची पूजा करून दर्शनें घेत. त्याप्रमाणें एके दिवशीं ते नदी पलीकडच्या एका देवालयांत जाऊन त्यांनीं देवाची पूजा करून दर्शन वगैरे घेतलें. तेथें एक वृद्ध गरीबशी गुजराथी बाई आलेली होती. गोपाळरावजींचें सर्व कृत्य पाहून तिला वाटलें कीं, हा कोणी मोठा धर्मशील वैदिक ब्राह्मण असावा. म्हणून तिची त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. आणि ती त्यांच्या पुढें येऊन हात जोडून म्हणाली " महाराज ! तमने शिधुं आपवानो मारो इरादो छे तमे लेशो ?" "तुम्हाला शिधा द्यावा अशी माझी इच्छा आहे, आपण घ्याल कां ?." असा तिनें गुजराथी भाषेत त्यांस प्रश्न केला. गोपाळराव थोडेसें थांबून म्हणाले " हो, आम्ही ब्राह्मणच आहों, शिधा घेऊं." त्यावर तिनें विचारलें कीं, "मी तो उद्यां येथें आणूं कीं मी आपल्या घरीं घेऊन येऊं ? " गोपाळरावजी म्हणाले " तूं आमच्या घरींच आण; म्हणजे आमचें घरही तुला पहावयास मिळेल. " तेव्हां तिनें घराचा पत्ता विचारला व त्यांनीं तो तिला सांगितला. नंतर " मी दुपारीं शिधा घेऊन येतें"

असें सांगून पायावर डोकें ठेवून ती निघून गेली. व 'लोकहितवादी'ही आपल्या मुलांसह्वर्तमान घराकडे आले.

बिचारी साधी भोळी म्हातारी ! तिला वाटलें कीं, आपल्याला आज मोठा विद्वान ब्राह्मण भेटला व शिधा घेतो म्हणाला. म्हणून मोठ्या आनंदानें दुपारीं तीन चार वाजतां सर्व शिधा एका धोतरांत बांधून ती गोपाळरावजींचें घर शोधीत निघाली, व लौकरच तेथें जाऊन पोहोंचली. पाहते तों देवडीवर हत्यारबंद शिपाई ! आतां येथें त्या भटजींची दाद कसची लागते असें तिला वाटलें. अखेर पहाऱ्यावरच्या शिपायास तिनें विचारलें कीं, 'येथें कोण रहातात ?' तो म्हणाला ' जज साहेब. ' नंतर त्या म्हातारीनें त्या शिपायास सर्व कची हकीकत सांगितली. तेव्हां त्यानें तीस थांबविलें व आंत जाऊन गोपाळरावजींस वर्दी दिली. तेव्हां तिला ते आंत घेऊन ये म्हणाले. ती आंत जातांच जजसाहेब ते स्वतः हेंच,असें तिला समजलें.तेव्हां ती सद्गदित अंतःकरणानें पायावर डोकें ठेवून म्हणाली " मला आपण येवढे सरकारी अंमलदार आहां हें माहीत नव्हतें म्हणून मी शिधा घेतां कां म्हणून विचारलें,ह्याबद्दल मला क्षमा करा. " तेव्हां गोपाळरावजी तिचें समाधान करून म्हणालें " त्यांत काय आहे ? ब्राह्मणांनीं शिधा घेण्यास हरकत कोणती ? ठेव तो येथें. " असें म्हणून तो तिनें आणलेला शिधा त्यांनीं प्रेमानें ठेवून घेतला, व तूं कोण ? काय करतेस ? वगैरे विचारपूस करूं लागले. तेव्हां ती म्हणाली, ' माझें नांव जम्ना; मी पिराणें गांवांत राहतें, म्हणून मला ' जम्ना पिराणी ' असेंच म्हणतात, नंतर तिच्या घरच्या उत्पन्नाची वगैरे चौकशी करतां ती रडून म्हणाली ' माझें उत्पन्न व शेतभाती मोठी आहे, परंतु ती भाऊबंदांनीं व सावकारांनीं बळकावली आहे.मी बायको माणूस; माझें त्यांच्याशीं भांडणार कोण ? इत्यादि करुणास्पद मजकूर ऐकून त्यांस तिचें बोलणें खरें वाटलें, आणि त्यांनीं तिला एका वकिलाकडे चिठ्ठी देऊन पाठविलें व हिचें सर्व ऐकून घेऊन व कागदपत्र पाहून तिचें म्हणणें खरें दिसत असल्यास काम चालवावें अशी शिफारस केली. ज्या गोरगरिबांचा खटला खरा असून त्यांस कोर्टांत काम चालविण्याची ऐपत नसे, त्यांस गोपाळरावजी आपल्या खर्चानें वकील करून देत असत. असो. त्याप्रमाणें जम्ना पिराणीच्या फिर्यादी घेऊन कोर्टांत दाखल झाल्या व तिचें म्हणणें खरेंच असल्यामुळें सर्व फैसले तिच्याच तर्फेनें झाले व तिची वतनवाडी सुटली. त्यामुळें ज्या जम्ना पिराणीला

खाण्याला पुरतें अन्नही मिळण्याची पंचाईत पडे, तीच पुढें चांगली खातीपिती, नव्हे श्रीमंतीण बनली. तेव्हां आपली कृतज्ञता व्यक्त करण्याकरितां तिनें गोपाळ-रावजींनीं मुलांबाळांसहवर्तमान चार दिवस आपल्या घरीं येऊन राहावें म्हणून फार फार विनंति केली. अखेर नाहीं होय म्हणतां, शेवटीं ऐके दिवशीं बायकामुलांसह गोपाळरावजी तिच्या घरीं गेले होते. व तिनेंही मोठ्या प्रेमा-दरानें त्यांचा मोठा सत्कार केला. तिनें त्यांच्या सर्व कुटुंबास मोठी मेजवानी दिली. त्यांत गुजराथी चालीचीं पक्वानें, अनेक चटण्याकोशिंबिरी, फार भक्ति-भावानें केल्या होत्या. गोपाळरावजींचीं माणसें परत निघालीं तेव्हां तिच्या डोळ्यांतून टिपें आलीं. तिची गोपाळरावजींच्या ठिकाणीं इतकी श्रद्धा होती कीं ती नेहमीं म्हणत असे " ए तो गोपाळराव नही, पण पंडे रणछोडरायजी छे. " हे गोपाळराव नव्हेत तर प्रत्यक्ष गोपालकृष्णच आहेत. हें तिच्या संबं-धानें किती बरें खरें आहे !

गोपाळरावजीपाशीं कोणीही मनुष्य जावो, त्यास त्यांनीं कांहीं मदत दिली नाहीं, असें कधींच घडलेलें नाहीं. त्यांत मनुष्य गुणी असला म्हणजे मग तर काय, बोलणेंच नाहीं. त्यास हवें तसें साहाय्य मिळत असे. नारायण मार्तंड ऊर्फ नाना सुखात्मे हे सुप्रसिद्ध शतावधानी बहुतेक सर्वविश्रुतच आहेत. हे पहिल्या प्रथम गोपाळरावजींचे कचेरींत लहानसे कारकून होते. परंतु त्यांची बुद्धि व स्मरणशक्ति लोकोत्तर असल्यामुळें ते अनेक अवधानें चालवीत. हा त्यांचा गुण पुढें पुढें अगदीं गव्हर्नरपर्यंत माहीत झाला. त्यांस उत्तेजन देण्यास प्रथमपासून कारण गोपाळरावजी. ते राजेरज-वाड्याकडे व श्रीमान गृहस्थाकडे त्यास शिफारसपत्रें देऊन पाठवीत. व तेथें त्यांच्या गुणाचें उत्कृष्ट चीज होऊन त्यांना देणग्याही मोठमोठ्या मिळत असत. एकदां बडोद्याचे सुप्रसिद्ध श्रीमान व उदार गृहस्थ गोपाळराव मैराळ यांजकडे त्यांनीं सुखात्मे यांस पत्र देऊन पाठविलें. त्याप्रमाणें सुखात्मे यांचा सत्कार करून व त्यांच्या बुद्धीचा चमत्कार पाहून त्यांनीं गोपाळरावजींस त्यांच्या पत्राचें उत्तर पाठविलें आहे. तें असें:—

श्री

" राजमान्य राजश्री रावसाहेब देशमुख मु. अमदाबाद स्वामीचे सेवेसीं:—

पोष्य गोपाळराव मैराळ कृतानेक सां० नमस्कार विनंति. येथील कुशल

तागायत जेष्ठ शु॥ ७ पावेतों मुक्काम बडोदें येथें यथास्थित असो. विशेष. आपणांकडून माहे मजकूर शुद्ध ५ चें पत्र रा. नारो मार्तंड यांजबरोबर आलें तें पाहून भेटीचा लाभ झाला. असेंच निरंतर पत्रद्वारें संतोषवीत असलें पाहिजे. नारो मार्तंड यांची गणिताची व स्मरणाची विलक्षण शक्ति असल्याचें दर्शविलें. त्यावरून विद्वान् मंडळी बोलावून प्रश्न केले, त्यांचीं उत्तरें तत्काळ देत गेले. व गणिताचीही चापल्यता अतिशय पाहिली. यावरून असे बुद्धिमान् थोडेच असतील असें वाटतें. मशारनिल्हेचा सत्कार करून खानगी केली आहे; आपल्यास कळावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभाची वृद्धी असावी हीं विनंति."

अशा प्रकारें शेंकडों लोकांस होईल तेवढें साहाय्य करून निरपेक्ष रीतीनें व निर्भीडपणानें जनांस हितोपदेश करून त्यांनीं अखेरपर्यंत भलेपणा मिळविला.

त्याच मासल्याचें दुसरें उदाहरण भूधर ह्या नांवाच्या मनुष्याचें आहे. हाही असाच एक मोठा सालस मनुष्य असून त्याचीही वतनवाडी मोठी असून ती सावकारांनीं बळकावलेली होती. त्या मनुष्याची व गोपाळरावजींची एके दिवशीं गांठ पडली. व त्यानेंही आपल्या कर्मकथेचा पाढा त्यांच्यापुढें वाचला. तेव्हां त्यांचीही त्यांस दया आली. त्यांनीं त्यांस सर्वतोपरी साहाय्य केलें. त्याचे ५६ मोकद्दमे त्यांणीं त्याच्यासारखे करून दिले, व बाकी दहा राहिले होते, तों त्यांची तेथून बदली झाली. तेव्हां त्यांनी आपल्या खेड्यांतील एका सरकारी अंमलदाराची व त्याची ओळख करून दिली. तेव्हां त्यांच्या साहाय्यानें तेही मुकदमे त्याचे खरे असल्यामुळें त्याच्यासारखे झाले. ह्याप्रमाणें त्या भूधरास गोपाळरावजींनीं रंकाचा केवळ राव करून सोडलें. इतकें गरिबांविषयीं त्यांचें अंतःकरण कळकळत असे.

रावापासून रंकापर्यंत गोपाळरावजींचें अंतःकरण करुणेनें द्रवत असे हें तर असोच, पण एखादा दुर्गुणी मनुष्य जरी त्यांच्याकडे येऊन त्यांची करुणा भाकूं लागला तरी त्यालाही ते आपल्याकडून देण्यासारखा असेल तेवढा आश्रय देत. व एकदां एखाद्याला आपला म्हटलें म्हणजे त्याचे दुर्गुणही त्यांना दिसत नसत; किंवा त्याच्याकडे ते कानाडोळा करीत. असें म्हटलें तरी चालेल. ह्यावरून—

" गुणा न म्हणतां उणा अधिक आदरें सेवेती "

असें जें संतानीं परमेश्वराविषयीं म्हटलें आहे, त्याची आठवण होते. ह्या कवितेंत म्हटल्याप्रमाणेंच गोपाळरावजींची स्थिति होती. त्यांना शरण आलेला मनुष्य कसलाही असो, त्याच्या अंगीं कांहीं गुण असो वा नसो; त्याला साहाय्य करण्याला ते कधींही मागेंपुढें पहात नसत. तेव्हां त्यांच्या भूतदयेची थोरवी किती म्हणून वर्णावी ? गोपाळराव निवर्तल्यानंतर जी दुखवट्याची सभा पुण्यांत भरली होती, तींत रावबहादुर महादेव गोविंद रानडे ह्यांनीं—

**जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥ १ ॥**
**तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥**
**मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचें चित्त ॥ ३ ॥**
**ज्यासि अपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥**
**दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥**
**तुका म्हणे सांगूं किती । तोचि भगवंताची मूर्ति ॥ ६ ॥**

हा अभंग म्हणून डोळ्यांतून खळखळ अश्रुधारा काढल्या: तो अभंग गोपाळरावांच्या संबंधानें किती खरें यथार्थ आहे !

गोपाळरावांनीं केलेला रोजचा व किरकोळ धर्मादाय वाजूस ठेवून त्यांनीं ज्या प्रसिद्धपणें रकमा दिलेल्या आम्हांस माहीत आहेत तेवढ्यांचीच यादी येथें देतों:—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अनाथफंडाला | ५००० | रुपये. |
| २ | गुजराथ प्रॉव्हिन्शिअल कॉलेजसाठीं शाळाकरितां | ६५०० | ,, |
| ३ | प्रार्थनासमाज व इतर मंडळांस | १२०० | ,, |
| ४ | सार्वजनिक लायब्ऱ्यांस | १००० | ,, |
| ५ | सार्वजनिक विहिरी धर्मशाळा वगैरे | २००० | ,, |
| | एकूण रुपये | १५७०० | |

गोपाळराव हे पूर्वींपासून नेहमीं देशी कापड वापरीत व तो त्यांचा नियम

त्यांनीं अखेरपर्यंत चालू ठेविला. या संबंधाचें अमदाबाद येथील प्रसिद्ध गिरणीवाले रणछोडलाल छोटालाल यांचें एक पत्र सांपडलें आहे तें येथें देतों:—

23rd May 1873

My Dear Row Sahib,

Here is a piece of cloth manufactured by a hand-loom weaver and bleached by a Dhobee of Ahmedabad. The price asked is 3 Guz per Rupee. Do you think it will be of any use to those, who have pledged to use only the native manufactured cloth.

I think this cloth will be more durable than the English cloth.

Yours truly,
Runchodlal Chotalal.

अशा रीतीनें ही लोकप्रिय व उज्ज्वलित कारकीर्द सन १८७३ अखेर चालू राहिली. सन १८७७ च्या सुरवातीला त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड लिटन् यांनीं दिल्ली येथें एक मोठा दरबार भरवून व्हिक्टोरिया राणी सरकारास एंप्रेस ऑफ इंडिया. कैसर-इ-हिंद ही पदवी देण्याचें योजिलें होतें. या दरबाराकरितां हिंदुस्थानांतील सर्व प्रांताचे गव्हर्नर व लेफ्टनंट गव्हर्नर व एतद्देशीय महाराजे, राजे, संस्थानिक बोलाविले होते. तसेंच सामान्य लोकांतील प्रसिद्ध व सरकारी मानास चढलेले सद्गृहस्थही बोलाविले होते. त्या दरबारास मुंबईचे गव्हर्नरांबरोबर सन्माननीय पाहुणे म्हणून येण्याचें आमंत्रण गोपाळरावजींस केलें होतें. त्याप्रमाणें ते त्या दरबारास गेले होते. त्या वेळीं त्यांनीं २ महिन्याची रजा घेऊन उत्तर हिंदुस्थानांतील बहुतेक यात्रा केल्या. या दरबारचे वेळीं त्यांस एक रौप्य-पदक व रावबहादुर हा किताब मिळाला. त्या वेळीं गोपाळरावजींस 'रा. ब.' या किताबाची सनद गव्हर्नर जनरल यांनीं आपल्या हातानें दिली. ती येणेंप्रमाणें:—

To

Gopal Rao Hari
Judge of Small Cause Court
Ahmedabad.

In Recognition of your loyal conduct and faithful services, I hereby confer upon you the title of "Rao Bahadur" as a personal distinction.

( Signed ) Lytton
Viceroy and Governor general
of India.

Delhi.
1st January,
1877.

दिल्लीचा दरबार आटपून व आपली रजा उत्तर हिंदुस्थानांतील प्रवासांत संपवून अमदाबादेस ते परत येतात तोंच, हिंदी गृहस्थांस सनदी सिव्हिल सर्विसच्या जागा देण्याचें सरकारानें पुन्हा ठरविलें. हिंदुस्थानांतच विलायतेंतील सिव्हिल सर्विसची परीक्षा दिल्याशिवायच लोक नेमण्याचें ठरलें. त्यामुळें नाशीक येथें तुम्हांस जाईंट सेशन्स जज्ज नेमलें आहे असें सरकाराचें त्यांस पत्र आलें. त्यावरून अमदाबाद येथील आपली चिरपरिचित मित्रमंडळी व जनसमूह यांची रजा घेऊन ते आपल्या नवीन जागेचा चार्ज घेण्यास नाशकास गेले. लोकांचें मनांत त्यांच्याविषयीं किती आदर होता व ते तेथून जरी बढतीच्या जागेवर जात होते तरी लोकांस किती वाईट वाटलें हें आम्हांस त्या वेळच्या सांपडलेल्या एका पत्रावरून व्यक्त होईल. म्हणून तें पत्र येथें देतो:—

Bombay, 23rd February
1877.

My dear Raosahib

I was very glad to learn that you were appointed Joint Judge of Nasik. You fully deserve the post. Please accept my warm congratulations for it. We have lost in you a most philanthropic useful and worthy gentleman at Ahamadabad. I wish to see you before you go to your new appo-

intment and shall feel much obliged if you will let me know the probable date of your arrival at Bombay on your way to Nasik.

Letter addressed to the care of Sheth Morarjee Gokuldas Girgum, Chinnabag will always meet me.

Hoping you are quite well,

Yours Sincerely,

Bholanath Sarabhai.

गोकुळ वृंदावन सोडून श्रीकृष्ण भगवान् बालपणीं मथुरेस गेले, त्या वेळेस तेथें जो देखावा झाला, त्यासारखाच यावेळीं येथें देखावा झाला असें म्हटलें तरी चालेल.

## नाशिकची कारकीर्द.

ते आपल्या नव्या हुद्यावर गेल्यावर नाशिक येथें मुख्यत्वेंकरून त्यांस काम करावें लागे व तेथून वर्षांतून कांहीं दिवस ठाण्याच्या डिस्ट्रिक्ट जज्जाच्या मदतीस जावें लागे व कधीं कधीं अलिबागेसही कोर्ट भरवावें लागे. अशा रीतीनें त्यांनीं ह्या हुद्यावर दोन वर्षें काम केलें. या जागेचा पगार १८०० रुपये होता. परंतु सनदी सिव्हिल सर्विसमध्यें हिंदुस्थानांत नेमणूक केलेल्या गृहस्थास तीन चतुर्थांश पगार मिळावा असा सरकारचा ठराव असल्यामुळें त्यांस १३५० रुपये पगार मिळत होता. यावेळेस युरोपिअन सनदी सिव्हिल सर्व्हंटांनीं मागल्यासारखा पुन्हा गवगवा सुरू केला. पण गोपाळरावजींची पेन्शन घेण्याचीं वर्षें भरत आलीं होतीं, म्हणून सरकारांनीं त्या गवगव्याच्या परिणाम त्यांच्यावर होऊं दिला नाहीं. आणि गोपाळरावजींनीं ह्याच जाग्यावर सन १८७९ सप्टेंबरमध्यें पेन्शन घेतलें. त्यांस सालाचे ५००० रुपये पेन्शन झालें व चाकरीवर असतां बंद झालेले पोलिटिकल पेन्शन सालीना २०० रुपये चालू झालें.

नाशिक व ठाणें येथें जाइंट डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्जाचें काम करीत असतांना त्यांचे सार्वजनिक हिताचे व विद्यावृद्धीचे उद्योग अधिक जोरानें चालू झाले. तेथें असतांना त्यांनीं सनातनवैदिक धर्माच्या विस्तृत व मार्मिक माहितीनें भरलेला ' स्वाध्याय ' नामक ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. तसेंच आश्वलायन गृह्यसूत्राची शुद्ध प्रत मराठी अर्थासह छापून प्रसिद्ध केली. ऐति-

७३६ [१०२]

हासिक गोष्टींचे तीन भाग येथेंच लिहून छापून प्रसिद्ध झाले. शिवाय पानपतची लढाई, गीतातत्त्व, सुभाषित बोधवचनें, हे ग्रंथ व कलियुग, भिक्षुक व जातिभेद हे व्याख्यानरूपानें दिलेले निबंध छापून प्रसिद्ध केले. यांची ग्रंथ लिहिण्याची नेहमींची रीत म्हणजे मनांत विचार आले कीं ते भरभर मोडी लिपींत टांचून ठेवणें. या टाचणांची बालबोध प्रत करून नीटनेटकेपणानें छापण्याकरितां व प्रुफें तपासण्याकरितां त्यांनीं एक गृहस्थास सन १८७७ पासून अखेर पर्यंत ठेवलें होतें. त्यांचें नांव वामन बाळकृष्ण रानडे. हे गृहस्थ पाणीदार, इमानी व दीर्घोद्योगी असत. ह्यांचा स्वभाव विनोदी असे. वामनराव नेहमीं देशमुखांच्या घरांत असल्यामुळें त्यांच्या मुलांपैकींच एक असें वागत. ठाणें येथील "हिंदुपंच" हें पत्र हेच गृहस्थ चालवीत. पुढें ते 'ज्ञानचक्षु' वर्तमानपत्राचे एडिटर होते. 'लोकहितवादी'नीं चालविलेल्या 'लोकहितवादी' नामक मासिकाची व्यवस्थाही हेच पहात असत.

नाशिक येथें असतांना अमदाबादप्रमाणें सामाजिक सुधारणेचीं त्यांचीं कामें नेहमींप्रमाणें चालू होतीं. दक्षिणी ब्राम्हणविधवांच्या पुनर्विवाहाची चाल ब्राम्हण ज्ञातींत शिष्ट संमत न झाल्यामुळें गर्भपातादि अनेक अनर्थ होणें संभवत असे, याचा दुःखद अनुभव नाशिकक्षेत्रीं विशेष आल्यामुळें, गोपाळरावजींनीं कांहीं क्षेत्रस्थ सद्गृहस्थांस हातीं धरून नाशिक येथें 'सूतिकागृह' स्थापण्याचा उद्योग केला, असें त्या संबंधाचें एक छापील जाहीरपत्रक त्यांचे दप्तरांत सांपडलें त्यावरून दिसतें. ते पत्र येथें देतोः--

## जाहिरात.

"सर्व देशहितेच्छु लोकांस विनयपूर्वक जाहीर करण्यांत येतें कीं, उच्च जातींतील स्त्रिया प्रसंगवशात् गरोदर झाल्या असतां त्यांना अब्रू संरक्षण करण्याकरितां व ज्ञातिभ्रष्ट होणें चुकविण्याकरितां गुप्त रीतीनें गर्भपात करणें प्राप्त होतें. त्यामुळें व्याभिचाराच्या दोषाशिवाय भ्रूणहत्या यांसारखीं व कधीं कधीं आत्महत्येसारखीं घोर पातकें घडतात. तेव्हां असे प्रसंग त्यांस न यावे अशा हेतूनें नाशिक वगैरे ठिकाणचे परोपकारी गृहस्थांनीं विचार करून नाशिक येथें एक 'बालरक्षकगृह' स्थापन करण्याचा ठराव केला आहे व त्याकरितां एक गृह नियमित करून ठेविलें आहे. या गृहांत मूल आलें असतां

त्याचे संगोपनाचा व प्रसूत होण्यास कोणी बाई आली असतां तिच्या प्रसूतीचा व खाण्यापिण्याचा वगैरे बंदोबस्त उत्तम प्रकारें ठेविला जाईल. शिवाय या गृहांत कोणाचें मूल आलें, कोण बाई प्रसूत होण्यास आली, ही गोष्ट कोणत्याही प्रकारें बिलकूल प्रसिद्धीस यावयाची नाहीं.

हें गृह कोणतें वगैरे गोष्टींची माहिती ज्या गरजू मनुष्यास पाहिजे असेल, त्यांनीं, नाशिक येथील, खालीं लिहिलेल्या गृहस्थांकडे तपास केला असतां सर्व समजेल.

१. पुरुषोत्तम सदाशिव मटंगे, वकील.

२. नारायण परशराम टिळ्ळु, वकील.

३. गणेश शास्त्री लटें.

४. गंगाधर नरसिंह केतकर, वकील.

ह्या गृहस्थांपाशीं कोणताही गुप्त मजकूर सांगितला असतां, तो गुप्त ठेवण्याविषयीं त्यांनीं निग्रह केला आहे व शपथही घेतली आहे.

गर्भपात करण्याचीं औषधें वगैरे देणाऱ्या बाया वगैरे लोकांसही सुचवितों कीं, त्यांनीं गर्भपाताचीं औषधें देण्याचें बंद करून गर्भपाताचा प्रसंग येणार नाहीं अशी तजवीज ठेवावी. शिवाय विधवेचें मूल कोणी या गृहांत दाखल करील अगर गरोदर विधवेस गर्भपाताचें औषध न देतां तिला येथें दाखल करील, त्यास प्रत्येक प्रसंगीं १० रुपये बक्षीस दिले जातील.

या सत्कृत्यांत मोठे मोठे सभ्य लोक असल्यामुळें सदरीं लिहिल्याप्रमाणें व्यवस्था राहण्यास कोणत्याही प्रकारची हरकत होणार नाहीं असें सांगणें आहे.

सभेच्या आज्ञेवरून

नाशिक. गंगाधर नरसिंह केतकर, वकील

ता. १४ जुलै सन १८७७. 'बालरक्षक गृहाचे' चिटणीस.

त्याचप्रमाणें अमदाबाद येथील त्यांचे कचेरींतील शिरस्तेदार रा० रा० लालशंकर उमियाशंकर त्रिवेदी जे अमदाबाद शहरीं पुनर्विवाह मंडळी स्थापण्याचे कामीं प्रामुख्यानें खटपट करीत असें सांगितलेंच आहे. ते या वेळीं पंढरपुर येथें मुन्सफ होते; त्यांस प्रोत्साहन देऊन त्यांचेकडून पंढरपुरासही एक "अनाथ बालकाश्रम व सूतिकागृह" काढविलें. ते रा० लालशंकर उमियाशंकर यांच्या खटपटीनें चांगल्या उर्जित दशेस येऊन चिरस्थायी झालें आहे.

गोपाळरावजींनीं या ठिकाणीं वक्तृत्वसभा 'स्थापन केली.' या सभेंत गोपाळरावजींची व इतर प्रसिद्ध वक्त्यांचीं भाषणें वारंवार होत असत.

त्याचप्रमाणें त्यांनीं अमदावादेच्या धर्तीवर येथेंही एक प्रार्थना-समाज स्थापन केला. या समाजांतही त्यांचीं व्याख्यानें व प्रार्थना होत असत.

त्यांनीं नाशिक येथें व्याख्यानमालाही सुरू केली होती. तेथें दरवर्षी गोपाळरावजींचीं व इतर प्रसिद्ध विद्वानांचीं व्याख्यानें होत.

अशा रीतीनें त्यांचें सार्वजनिक हिताचे अनेक उद्योग चालू होते.

नाशिक येथील गोपाळरावांची अतिपरिचियांतील कांहीं मंडळी आम्हांस माहीत आहेत, तीही येथें देतोः—

१. रा० ब० विष्णु मोरेश्वर भिडे.
२. रा० ब० महादेव गोविंद रानडे.
३. सुप्रसिद्ध वैद्य गणेश शास्त्री तटे.
४. वे० रा० रा० गणेश शास्त्री लेले.(रघुवंशादि मराठी काव्यांचे कर्ते )
५. रा० ब० गणेश व्यंकटेश जोशी.
६. रा० रा० द्वारकानाथ राघोबा तर्खडकर वगैरे.

याच संधीस देवमामलेदार यांची कीर्ति सर्व मुंबई इलाख्यांत फार पसरली होती. या सुमारास ते बागलाण तालुक्यांत सटाणें येथें मामलेदार होते. हजारों लोक त्यांच्या दर्शनास येत जात होते आणि नित्य नव्या नव्या आख्यायिका त्यांच्या संबंधांत जगांत पसरून लोक आश्चर्यचकित होत होते.

पुण्यास मदन श्रीकृष्ण नामें प्रभु जातीचे गृहस्थ पुण्याचे स्मॉल कॉज कोर्टाचे जज्ज होते. ते यशवंतराव मामलेदारांचे शिष्य झाले. आणि त्यांची श्रद्धा त्यांच्यावर पराकाष्ठेची बसली होती.

एकदां उन्हाळ्याचे सुट्टींत मदन श्रीकृष्ण, महादेव गोविंद रानडे, विष्णु मोरेश्वर भिडे वगैरे पांच सात मंडळी पुण्याहून निघून नाशकास आली आणि तेथून त्यांचा बेत पुढें सटाण्यास जाण्याचा ठरला ! तेव्हां त्यांनीं रावसाहेबांस-ही आग्रह करून बरोबर घेतलें. ही सर्व मंडळी घोड्याचे टांगे करून पहि-ल्यानें मालेगांवास गेली आणि तेथून पुढें बारा कोस टांग्यातूनच चार घंट्यांत सटाण्यास गेली. मालेगांव येथें रा. रा. प्रल्हाद कृष्ण शहाणे मामलेदार होते. त्यांनीं या मंडळींची व्यवस्था फार उत्तम ठेविली. सर्वांचे भोजन रात्रौ माले-गांवास झालें. आणि रात्रभर तेथें विश्रांति घेऊन सकाळीं चहाकॉफी होऊन

मंडळी पुढें सटाण्यास जाण्यास निघाली, ती अकराचे सुमारास सटाण्यास पोहोंचली. बरोबर रा. रा. प्रल्हाद कृष्ण हेही होते. हे मामलेदारांचे सच्छिष्य होते. एक वेळ विस्तवास हातीं धरवेल परंतु प्रल्हाद कृष्ण यांस हातीं धरवणार नाहीं, अशी त्या प्रांतीं लोकांत म्हण पडली होती. कारण त्यांची मिजास मनस्वी तापट असे. परंतु अलीकडे देव मामलेदारांचा सहवास झाल्यापासून ते अतिशय शांत झाले होते.

असो. इकडे सटाण्यास देवमामलेदार यांची स्नानसंध्या आटोपल्यावर जवळच्या मंडळीस ते म्हणाले कीं, "आज मोठा पुण्यदिवस आहे. आज आम्हांस महापुरुषांचीं दर्शनें होणार आहेत. पलीकडच्या मोठ्या वाड्यांत बिछायत घालून लोडतक्के ठेवा. लौकर तयारी करा. मागील चौकांत पंचवीस पानांचा खासा स्वयंपाक करा. दूध आणवा. खीर आणि पोळ्यांचा बेत ठेवा. आम्ही त्या मंडळीस सामोरे जाऊन घेऊन येतों. असें म्हणून पानसुपारीचीं तबकें, अत्तरदाणी, गुलाबदाणी, आणि फुलांचे हार बरोबर घेऊन सटाण्यापासून पुढें वाटेवर दीड कोसावर एक खेडेगांव होतें, तेथें जाऊन तेथील चावडींत बिछायत करून, रावसाहेब मंडळींची मार्गप्रतिक्षा करीत बसले. दूध, पेढेबर्फी, आणि केळीं, जांब, साखरलिंबें वगैरे फराळाच्या सामानाचीही तयारी ठेविली होती.

मंडळी येणार म्हणून रावसाहेबांस पूर्वी कोणीं सूचना पाठविली नव्हती. असें असून त्यांना कसें कळलें, कोण जाणें ! अथवा अंतर्ज्ञान-तारायंत्रावरून त्यांना कळलें नसेल कशावरून ? असो. रावसाहेब आले आहेत असें कळतांच आसपासचे दहापांच गांवांतील चटसारे लहानमोठे लोक दर्शनास लोटले. यात्रा जमा झाली ! नारळाचे ढीग पडले व दर्शनाविषयीं तोबा उडाला. इतकें होत आहे तोंच चार पांच घोड्याचे टांगे तेथें येऊन पोहोंचले. मग शिपायानें टांग्यास तेथेंच उभे राहाण्याची इशारत दिली. इतक्यांत देवमामलेदारही चावडींतून बाहेर आले. तेव्हां मंडळींनीं टांग्याखालीं उड्या मारून ते सर्व रावसाहेबांचे पायांवर डोकीं ठेवण्यास गेले असतां त्यांनीं त्यांस वरचेवर उचलून धरून हृदयाशीं धरून आलिंगन दिलें आणि डोळ्यांत आसवें आणून म्हणाले कीं, आज मला दर्शन देऊन कृतार्थ केलें.

यानंतर सर्वांचे हात धरून चावडींतील बिछायतीवर आणून सर्वांचा परामर्श घेतला. थंडपाणी, दूध, फळफळावळ आणि पेढे बर्फी इत्यादि उपा-

हार सर्वांस दिला. हार गजरे गळ्यांत घातले ! या उपचारानें मंडळी अगदीं गारीगार होऊन गेली आणि रावसाहेबांचें आदरातिथ्य, नम्रता, गोडभाषण, वगैरे पाहून महादेव गोविंद रानडेसुद्धां सर्वांचे डोळे प्रेमाश्रूंनीं भरुन आले? अहाहा ! या भेटीपासून मंडळीस जो आनंद झाला तो किती वर्णन करावा ? ही मंडळी आठ दिवसपर्यंत तेथें होती. तितक्या अवधींत कथा-कीर्तनें, भागवत-पुराण, भजन, नामस्मरण, पूजन, ब्रम्हचर्चा आणि संत-साधूंचीं दर्शनें सर्वांस झालीं आणि आठ दिवस मोठ्या आनंदांत गेले.

आठ दिवस गेल्यावर मंडळींनीं मोठ्या मिनतवारीनें देव मामलेदारांचा निरोप घेतला. सर्वांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. रावसाहेब यांनीं शेला-पागोटें वगैरे पोशाख आणवून सर्वांस हा प्रसाद घेण्याविषयीं त्यांनीं आग्रह केला. तेव्हां सर्वांच्या वतीनें गोपाळराव पुढें होऊन रावसाहेबांस अदबीनें म्हणाले, "आम्ही कोणीही हा आहेर मिळण्याचें आशेनें आलों नाहीं. तुमचा आहेर व प्रसाद असा कृपाळूपणें द्या कीं, ज्यापासून मायाभ्रांति दूर होऊन भवाब्धि गोष्पद होईल !"

तेव्हां देवमामलेदार म्हणाले कीं आजपर्यंत,

**' महाथोर ते मृत्युपंथेंचि गेले । असंख्यात ते जन्मले आणि मेले '**

दुसरी गोष्ट अशी आहे कीं:—

**' महाजनो येन गतस्सपंथः '**

तिसरी गोष्ट अशी आहे कीं:—

**' सदा बोलण्यासारिखें चालताहे । अनेकीं सदा एक देवासी पाहे**
**सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा'**

चवथी गोष्ट अशी आहे कीं:—

**' यावत् स्वस्थामिदं देहं यावत् मृत्युश्च दूरतः।**
**तावत् आत्महितं कुर्यात् प्राणांते किं करिष्यासे। '**

याप्रमाणें चार गोष्टी सांगितल्या आहेत. यांतील जी गोष्ट ज्याला रुचेल ती त्यानें घेऊन त्याप्रमाणें अंतःकरणावर अंमल करावा. हा अंमल होईल तितका लवकर करावा. कारण **काळचोर घिरट्या बहु घाली-पामरा तुज कशी निज आली ।** असें वामन म्हणतात.

मीं तुम्हांस सांगावें असा माझा अधिकार नाहीं. तुम्ही मोठे अधिकारी आहां. पण हा अधिकार काय उपयोग ! अधिकार काळावर चालला पाहिजे: तर तो अधिकार !..

हें भाषण चाललें असतां मंडळींचें चित्त एकाग्र होऊन सर्वांस सुख वाटलें. मग सावध होऊन रावसाहेबांचा निरोप घेऊन सर्व तांग्यांत बसले आणि तांगे चालूं झाले.

ही मंडळी परत घरोघर गेल्यावर देवमामलेदारांच्या सांगण्याप्रमाणें बहुतेक पारमार्थिक उद्योगास लागले ! आमचे चरित्र-नायक हे पूर्वींपासूनच संसारासंबंधीं व्यवहारांत विरक्त व अलिप्त असे सावधपणानें राहिलेलेच होते. तथापि सटाण्यास देवमामलेदारांची वृत्ति पाहून त्यांचा उपदेश ' महाथोर ते मृत्यु पंथेंचि गेले !' हा ऐकल्यापासून तर त्यांची वृत्ति फारच उदास झाली. मदन श्रीकृष्ण-पुण्यांतील स्मॉल कॉज कोर्टाचे जज-हे तर पायांत चाळ बांधून देवघरांत देवापुढें नित्य नाचूं लागले, आणि भजन करूं लागले ! इतकेंच नव्हे तर आपले कोर्टांतील कारकुनास सवडीप्रमाणें भजनास कृपा करून येत जा, असें म्हणून आमंत्रण देऊं लागले ! अहाहा ! साधु-संगतीचा महिमा अगाध आहे. ' आपणासारिखे करिती तात्काळ. '

महादेव गोविंद रानडे आणि विष्णुपंत भिडे यांच्या अंतःकरणावरही देव-मामलेदारांच्या भेटीचा परिणाम झाला. परंतु रानडे मुत्सदी असल्यामुळें व भिडे बाह्यदृष्टि ( लौकिकी विचाराचे ) असल्यामुळें, उभयतांच्या वृत्तींत काय फरक झाला, तो दिसून आला नाहीं. प्रल्हाद कृष्ण पुढें नाशकास बदलून आले. त्यांच्या वृत्तींत मात्र फार फरक पडला. सारांश, ह्या कालांतसुद्धां मोठमोठ्या गृहस्थामध्यें व अधिकाऱ्यांमध्यें कांहीं लोक साधूंच्या वर्गांत गणण्यासारखे होते, ह्यांत संशय नाहीं. शिवाय अलीकडील दोन हजार वर्षांचा आपल्या देशाचा इतिहास पाहिला तर असें दिसून येतें कीं, आजपर्यंत जेवढे म्हणून संत झाले, तेवढे पूर्वी पंत होते! म्हणजे गृहस्थ व कामगार होते! भिक्षुक वर्गांत फारसे साधु झाले नाहींत ! असो. आमचे चरित्रनायक गोपाळराव हरि हे गृहस्थ व मोठे कामगार असून मोठे महात्मे, साधु, संत, अवलीये आणि खरोखर गरीब लोकांचे वाली, देशाचे पुरस्कर्ते, समाजाचे हितकर्ते, आणि स्वदेश सुधारणेचे कैवारी होते. आणि त्यांनीं पत्करलेली कामगिरी आपल्या आयुष्यांत चांगली बजावली यांत तिळमात्र संशय नाहीं.

येथेंच त्यांस १८७७ सालांत Justice of the peace हा किताब मिळाला. त्याबद्दल सरकारी ठराव झाला तो पुढीलप्रमाणें:—

Bombay Government Gazette 16th August 1877
Page 738.
11th August 1877

Under the provisions of section 4 Act 11 of 1869 His Excellency the Governor in Council is pleased to Reappoint Rao Bahadur Gopalrao Hari Deshmook to act as Justice of the Peace within the limits of the town and island of Bombay.

आणि १८७८ सालांत त्यांस Fellow of Bombay University. नेमलें त्याबद्दल सरकारी ठराव झाला तो असा:—

No 131 of 1878
Educational Department

From

John gardine Esquire
Acting secretary to Government of Bombay.

To

Rao Bahadur Gopalrao Hari Deshmook.

Sir

I have the honour to inform you that His Excellency the Governor in Council has been pleased to nominate you to be a fellow of the University of Bombay.

I have the honour to be
sir.

Bombay Castle
29th January
1874

your most obedient servant,
( signed ) John Jardine
Ag. secretary to Government.

अशा रीतीनें नाशिकची दोन वर्षांची कारकीर्द संपवून सप्टेंबर १८७९ मध्यें पेन्शन् घेऊन ते मुंबईस आले व तेथें सुमारें एक वर्षभर राहून नंतर ते पुण्यास आपल्या सदाशिव पेठेंतील घरांत राहण्यास आले. तेव्हां त्यांस मागील २०० रुपये पोलिटिकल पेन्शन सुरूं झालें.

पेन्शन घेऊन मुंबई येथें आल्यावर ते आर्यसमाजाचे अध्यक्ष, थिऑस-

ॅफिकल सोसायटीचे अध्यक्ष, व गुजराथी बुद्धिवर्धक सभेचे अध्यक्ष होते. त्यांची तेथें निरनिराळ्या विषयावर मराठींत, गुजराथींत व इंग्रजींत व्याख्यानें होत.

गोपाळरावजींचा पोषाख नेहमीं अगदीं साधा असे; ते कोठेंही बाहेर पडोत, कोर्टांत जावोत, कीं साहेब लोकांच्या भेटीस जावोत, कां लग्नकार्यास जावोत, त्यांचा पोषाख नेहमीं साधा असे. तरुणपणांत ते तेव्हांच्या रिवाजाप्रमाणें,कृष्णशास्त्री चिपळूणकर,बापूसाहेब कुरुंदवाडकर, अण्णासाहेब विंचूरकर वगैरे मंडळी जशी मोठमोठी घेरदार पागोटीं घालीत त्याप्रमाणें त्यांचें पागोटें मोठें घेरदार असे. पण पुढें पुढें त्याचा घेर लहान होत जाऊन वृद्धापकाळीं तर तो पुष्कळच लहान झाला होता. त्यांच्या पागोट्याचा रंग बहुधा तांबडा असे. पण पुढें त्यांच्या पत्नीच्या निधनानंतर म्हणजे सन १८८५ पासून ते पांढरें पागोटेंच शेवटपर्यंत घालीत. त्यांच्या अंगांत बैलूदार अंगरखा असे. कोट वगैरे त्यांनीं कधींही घातला नाहीं. चाकरीवर असतांना कचेरीचे वेळीं कोट,बूट व स्टॉकिंग कोर्टांतच ठेवलेले असत.ते घालून कामावर बसत व कामें संपल्यावर तो पोषाख तेथेंच काढून ठेवीत.नेसावयाचीं धोतरें साधीं, उपरण्यास मात्र थोडेसें रेशीम किंवा कधीं कधीं जरीचेही कांठ असत. पायांत जोडा; बूट कधीं घालावयाचा नाहीं. हाच त्यांचा पोषाख. त्यांत बदल म्हणून नाहीं. बूटपाटलोण घातल्याशिवाय मोठमोठ्या सरकारदरबारांत जाऊन केवळ आपल्या वजनदारीवरच मानमरातब मिळविणारे महाराष्ट्र देशांत राजा सर. टी. माधवराव व गोपाळराव हरि हे दोनच गृहस्थ दिसतात ! गोपाळरावजी एके दिवशीं नित्याप्रमाणें पोषाख करून बाहेर जावयास निघाले असतां एका सलगींतल्या गृहस्थानें त्यांस विचारलें कीं " काय रावसाहेब ! आपण लॉर्ड लिटनच्या दिल्ली दरबारास गेला होता,तेव्हां कोणता पोषाख केला होता ? " गोपाळरावजींनीं लगेच जवळच्या खुंटीवरचें लहानश्या कांठाचें जरीचें उपरणें होतें तें ओढून अंगावर घेतलें आणि म्हणाले " हा पहा असा ! "

## पुण्याची कारकीर्द.

गोपाळराव हरींनीं पेन्शन घेतल्यानंतर कांहीं दिवसांनीं म्हणजे सुमारें एक वर्षांनीं त्यांस मुंबई सरकारनें आपल्या कायदे कौन्सिलचे मेंबर नेमलें. त्याबद्दलचा सरकारी ठराव झाला तो असाः—

No. 190 of 1880
Legislative Department
Poona, 23rd August 1880.

To

Rao Bahadoor
Gopalrow Harry Deshmook.

Sir,

I am directed to inform you that His Excellency the Right Hon'ble the Governor has been pleased to nominate you to be an additional member of his Council for making Laws and Regulations only from the 30th instant.

I have the honour to be
sir,

your most obedient servant
(signed) C. G. W. Macpherson.
Acting Under Secretary to Govt.

यानंतर कांहीं दिवसांनीं म्हणजे २८ सप्टेंबर १८८० मध्यें पेन्शन आणण्यास स्वतः जावयास नको असा सरकारी ठराव झाला. तो असाः—

Extract from the Government Resolution
No. 3464 Financial Department.
Dated Bombay Carstle 28th sept.
1880

Resolution—The Honorable Mr. Gopal Rao Harry Deshmook is exempted from personal attendence at the Accountant General's office to receive his pension.

यानंतर कांहीं दिवसांनीं गोपाळरावांस 'फर्स्ट क्लास सरदार' सरकारनें नेमलें, त्यावद्दल ठराव झाला तो असाः—

No. 1157

Political Department.

Bombay Castle 11 March 1881

Resolution—The name of the Honorable Rao Bahadoor Gopal Rao Harry Deshmook should be entered in the list

of Sardars of the First class for rank of precedence only. (Redink)

( signed ) C. Gonne.
Chief secretary to Government.

## कुटुंबसौख्य.

संतति, संपत्ति व विद्वत्ता सर्व कांहीं उत्तम आहे, आणि मनुष्याला कुटुंब-सौख्य मुळीं मनासारखें नसेल तर तें सर्व व्यर्थ होय ! परंतु गोपाळराव हरींची पुण्याईच अशी जबरदस्त होती कीं परमेश्वरानें त्यांना एक अणुमात्र सुद्धां न्यून म्हणून कांहीं ठेवलेंच नाहीं. एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे:——

**यदि रामा यदि च रमा यदि तनयो विनयधी गुणोपेतः ।**
**तनये तनयोत्पत्तिः सुरवरनगरे किमाधिक्यम् ॥ १ ॥**

सुशील पत्नी व संपत्ति, पुत्र विद्वान् गुणवान् असून विनयसंपन्न, मुलांस मुलें झालेलीं; इतकें असल्यावर स्वर्गलोकांत अधिक तें काय ? ही उक्ति गोपाळरावजींना शब्दशः लागू पडते. कारण ह्यापैकीं एकही गोष्ट त्यांना कमी नव्हती. ह्यास्तव त्यांच्या कुटुंबांतील मनुष्यें कशीं होतीं, व मागें राहिलेलीं कशीं आहेत हेंही सांगणें उक्त आहे.

कुटुंब सौख्यामध्यें अगदीं पहिलें सौख्य म्हणजे पत्नीसौख्य होय. हें जर चांगलें नसेल तर मग संसार तो कसचा ? परंतु गोपाळरावजींना पत्नी मिळाल्या होत्या त्या केवळ गृहलक्ष्मीच मिळाल्या होत्या. ह्यांचें नांव सौ. गोपिकाबाई. ह्या आधींच थोर कुलांतल्या होत्या. ह्यांचें माहेर म्हणजे गोळ्यांचें घर. गोळे हे इनामदार होते. व त्यांचें आजोळ चित्रकूटचे जाहागिरदार जोग यांच्याकडे होतें, हें मागें सांगितलेंच आहे. गोपिकाबाईस सर्व लोक 'आईसाहेब किंवा बाईसाहेब' असें म्हणत असत. ह्यांना लहानपणीं जरी शिक्षण मिळालें नाहीं तरी त्यांनीं मोडीबालबोध लेखन-वाचन चांगलें केलें होतें. परंतु ह्याशिवाय संसारांत लागणारे गुण त्यांच्या अंगीं फार उत्कृष्ट होते. त्या संसारांत फार दक्ष असत. घरांत काय हवें, काय नको, वगैरे सर्व त्याच पहात. खर्च वेच सर्व दक्षतेनें करीत. यामुळें गोपाळरावजींस प्रपंचसंबंधीं विचार फारसा करावाच लागत नसे. गोपाळ-रावजींच्या स्वभावास त्यांचा स्वभाव अगदीं अनुरूप होता. गोपाळरावजी

लेखामध्यें व भाषणामध्यें धर्मासंबंधानें व ब्राह्मणासंबंधानें वरीच टीका करीत. परंतु घरांतील वर्तनांत मात्र सुधारकी थाट मुळींच नसे. घरामध्यें देवपूजा, व्रतें, श्राद्धपक्ष वगैरे नित्यनैमित्तिक पूर्वाचार चालीप्रमाणें होत असे. त्याही नेमधर्म, व्रतें, उपोषणें सर्व कांहीं करीत. त्यांचा स्वभाव इतका उदार होता कीं, त्यांनीं एक वेळ पुण्यास १०८ ब्राह्मणांस पीतांबर व शालजोड्याही दिल्या! ह्यापेक्षां औदार्य तें काय राहिलें? परंतु गोपाळरावजींचे सारासार विचारानें मनांत नवीन उद्भवलेले अंकुर त्यांचे मनांत कसे बिंबणार? म्हणून पुनर्विवाहाच्या पक्षांत धडधडीत जरी गोपाळरावजी होते, तरी त्या म्हणत, "आपण पुनर्विवाहांत जेवावयास वगैरे जाऊं नये. त्यामुळें मुलीबाळींना नेआण करण्याची सुद्धां पंचाईत पडते." हें त्यांचें म्हणणें व्यवहारदृष्ट्या खरेंच होतें. परंतु गोपाळरावजी 'होहो' म्हणून युक्तीनेंच दोन्ही पक्ष संभाळीत. आणखी गोपाळरावजींच्या वडिलांची तैनात बंद झाली तरी पुढें स्वपराक्रमानेंच गोपाळरावजी उदयास आले, भाग्यास चढले, संपत्तिमान झाले, हा सर्व गोपिकाबाईंचा पायगुण असे सर्व लोक म्हणत असत. म्हणजे आईसाहेब खऱ्या देवतेप्रमाणें शोभत. यात्रेला जाण्याची व दानधर्म करण्याची त्यांना मनस्वी हौस असे. त्यांनीं काशीयात्रा केली होती, येवढेंच नाहीं. तर द्वारका, पंढरपूर, नरसोबाची वाडी, वगैरे क्षेत्रें सुद्धां त्यांनीं पाहिलीं होतीं. आणि तेथें त्यांनीं आपल्या नांवलौकिकप्रमाणें दानधर्महीपण केला होता. मुलांचें संगोपन, लग्नकार्यें, मुलींची नेआण, मानपान सर्व कांहीं त्या पहात. त्या महान् साध्वी असून त्यांची पतीवर अत्यंत निष्ठा होती, ह्यांत कांहीं नवल नाहीं. परंतु गोपाळरावजींचेंही पत्नीच्या ठिकाणीं तसेंच एकनिष्ठ प्रेम असून तेही एकपत्नीव्रती होते, ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. अशा प्रेमळ दंपत्यापासून तेजस्वी संतति निर्माण व्हावी ह्यांत आश्चर्य तें काय? त्यांचे मुलगे एकापेक्षां एक बुद्धिमान्, विद्वान् निपजले, व मोठ्या नांवलौकिकास चढले, यास्तव त्यांचीही थोडथोडी माहिती देतों.

## मुलें व त्यांचा गृहशिक्षणक्रम.

गोपाळरावजींस एकंदर मुलें आठ, त्यांत पुत्र सहा व कन्या दोन, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. सर्व मुलें व मुली सुशील असून एकाहून एक गुणवान् होतीं. मुलगे तर काय 'बाप से बेटा सवाई' असेच निपजले. ह्या मुलांस

गृहशिक्षण गोपाळरावजी स्वतःच देत असत. त्यांच्या घरगुती शिक्षणाचीही पद्धति कळावी म्हणून सांगतों. सकाळीं उठलें कीं आधीं मुलांकडून प्रातः-स्मरण म्हणून घ्यावयाचें व नंतर दुसरा अभ्यास; त्यांत मोडी लेखनवाचना-वर विशेष भर. त्यांचे सारे चिरंजीव इंग्रजी अभ्यासांत निष्णात होते; बी. ए., एल्. एल्. बी., एम्. डी., ब्यॅरिस्टर ॲट लॉ अशी झालेली वडी वडी मंडळी होती व आहेत. परंतु सर्वांचें मोडी अक्षर इतकें उत्तम आहे कीं, जणों काय पेशवाई थाट! ह्याचें कारण गोपाळरावजींस पहिल्यापासून मोडीची फार आवड असे. त्यांचें स्वतःचें मोडी अक्षर अत्यंत नमुनेदार होतें. यामुळें मुलांच्या मोडी लिहिण्यावद्दल ते अतिशय काळजी घेत. कोण-ताही मुलगा मोडीकडे दुर्लक्ष करून आधीं इंग्रजी अभ्यास करूं लागल्यास त्यांस तें खपत नसे.

हल्लीं इंग्रजी शिकलेल्या विद्वानांस म्हणा कीं, शिकत असलेल्या विद्या-र्थ्यांस म्हणा, मोडी लिपींत आलेलें पत्र वाचतां सुद्धां येत नाहीं! मग स्वतः लिहिण्याची गोष्ट तर लांबच.त्यांनीं आपल्या मुलांस एक उपदेशपर लांबलचक १६ कलमांचें; मोडींत फारच उत्कृष्ट पत्र लिहिलेलें होतें. त्याचे मागील बंद गहाळ झाले आहेत. ते कोठें मिळाले नाहींत, ही मोठी दिलगिरीची गोष्ट होय. फक्त तेराव्या कलमापासून शेवटचा बंद मिळाला आहे तेवढाच येथें देतों. कारण त्यांतील उपदेश थोरामोठ्यांच्या मुखांतून निघालेला अस-ल्यामुळें इतर विद्यार्थ्यांस तो मूल्यवान् वाटेल व त्यांस सन्मार्गास लावण्यास कारणीभूत होईल. त्या बंदाचा प्रारंभ असा आहे.

'मनुष्याची वेळ हाच पैसा आहे. त्याचें जितकें व्याज काढावें तसें निघतें. आणि फुकट टाकला तर फुकट जातो. याकरितां वेळ विनाकारण गोष्टींत व निरर्थक कामांत घालवूं नये, हें मुख्य कलम आहे.'

१४ तोंडानें शिवी काढूं नये. खाण्यापिण्यास मिळालें तरी उन्मत्तपणानें निंदा करूं नये. शहाणपणाच्या गोष्टी, हिशेब, जमाखर्च लिहिणें वगैरे लक्षांत ठेवावें. शिकलेलें विसरूं नये, व विसरावें लागेल असें निरुपयोगी शिकूं नये. याजकरितां जे शिकलेले आहेत त्यांचें अनुमत घेऊन शिकणें तें शिकावें, म्हणजे तें चांगलें आहे तेंच दाखवितील.

१५ अंगानें काम करण्याची संवय ठेवावी, म्हणजे स्नान करतांना आपलें धोतर आपण पिळावें. निजून उठल्यावरोवर बिछाना नीटपणें गोळा करून

करून ठेवावा. बसावें तेथें स्वच्छता ठेवावी. केर करून त्यांत बसूं नये. ऊनावर टाकूं नये व फार वेऊं नये. दिवस आल्यावर निजूं नये. रात्रीं उशीर करूं नये. उघड्या हवाशीर जागेंत बसावें व निजावें. कोंडलेले जागेंत बसूं नये. अंगीं जलदी ठेवावी, आळशिपण असो नये. खरें बोलावें. स्वहिताकरितां किंवा थट्टेकरितां लबाडी करूं नये. हलक्या मनुष्याबरोबर संगत करूं नये. परंतु जे चांगले विद्वान्, त्यांच्याशीं स्नेह करावा.

१६ अंगावर दागिने घालण्याची द्वाड खोड असो नये. तसेंच वस्त्र स्वच्छ असावें. परंतु मूल्यवान् नसलें तरी इच्छूं नये. लाज वाटेल असें काम करूं नये. दोन घासांनीं कमी जेवावें. फार डौल करणें हें नीचकाम आहे. व डौलदार माणसास शहाणे मूर्ख समजतात. याजकरितां ढोंगडौल करूं नये. कोणी गृहस्थ येईल तर त्याची योग्यता पाहून त्यांस नमस्कार करून, उठून उभें राहण्यासारख्या योग्यतेचा असेल तर उठून, त्यांस बसावयास विनंती करावी. सुज्ञपणाची गोष्ट बोलावी. म्हणजे तो मनुष्य विनय पाहून चांगलें म्हणतो; नाहीं तर उद्धटपणा केला तर बेवकूब म्हणतो. याजकरितां दुसऱ्याचा आदरसत्कार ठेवावा. स्तुति करूं नये. व जो आपली स्तुति करील त्यास आर्जवी म्हणजे फसविणारा म्हणावें, आणि स्तुति ऐकूं नये. त्यांस सांगावें कीं, स्तुति आम्हांस आवडत नाहीं. बहुधा थोर व शहाणे स्तुति करीत नाहींत. हें मूर्खाचें काम आहे. सबब त्यास असें म्हटलें तरी चिंता नाहीं. हरएक बाबतींत दुसऱ्याचा उपकार घेऊं नये. परंतु करीत जावा. गरिबाची ममता, बरोबरीच्यांचा आदर, वरिष्ठाची आज्ञा पाळण करावी हें मुख्य आहे. एकूण सदरी कलमबंदी लिहिली आहे. याप्रमाणें वागलें असतां तुम्ही थोडे दिवसांत शहाणे व्हाल असें आम्हांस वाटतें.

ता० ९ माहे मार्च सन १८५७ इसवी. हे आशीर्वाद.

मुक्काम मुंबई. **गोपाळराव.**

ह्या पत्रांतील उपदेश जसा ध्यानांत ठेवण्यासारखा आहे, त्याप्रमाणेंच त्या पत्राच्या अक्षराचा मोडी नमुनाही ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

प्रसिद्ध ' निबंधमाला ' कार धाकटे चिपळुणकरशास्त्री यांनीं ' लोकहितवादी ' च्या लेखावर ( व वर्तनावरही ! ) मनसोक्त टीका करतांना नव्या आंग्लविद्याविभूषित पंडितावर मोडी लिपीच्या अज्ञानाबद्दलही जातां जातां फटकारा मारला आहे. ते म्हणतातः—" लोकहितवादी " नीं आमच्या

जुन्या पंडितांस केवळ व्यवहारशून्य ठरवितांना थोडा तरी विचार करावयाचा होता कीं, इंग्रजी विद्येत निपुण झाल्यानें तरी कितीसें व्यवहारचातुर्य येत असतें? मोडी लिहिण्यासंबंधानें तर बहुधा येथें लिहावयासच नको. कां कीं विद्यालयीन शस्त्रास्त्रांनीं मंडित होऊन तीन तीन चार चार लढाया मारून आलेल्या महावीरांची मामलेदारकचेरींत काय फजीति उडते, हें आज कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. जन्मभर गदायुद्धाचा अभ्यास केलेल्या भीमाच्या हातीं विराटाच्या घरीं जसा पळा व झारा आला, किंवा 'किरातरूपी' प्रभूशीं झगडलेल्या महारथ्याच्या हातांत शंख व वलयें येऊन पडलीं, त्याप्रमाणेंच मिल्ल, बेकन, ग्रांट एके खिशांत व विद्यारण्य, कालिदास, मम्मट दुसऱ्यामध्यें घालून अर्वाचीन पंडित जेव्हां आपल्या नवीन अधिकारावर रुजू होतात, व त्रिशीवंचविशीच्या अमलांत पुन्हा पुस्तीवर बसून श्री-श्री-श्री, व ग-ग-ग, करण्याचा त्यांस प्रसंग येतो तेव्हां श्री तर सरस्वतीच्या मत्सरानें गेलीच, पण 'ग' चाही तिजबरोबर परिहार झाला आहे, हें मनांत येऊन आमच्या ग्वाशा मंडळींना किती संतोष होत असेल बरें! ही एक मोडी लिहिण्याची गोष्ट झाली."

हें निबंधमालाकारांचें म्हणणें सामान्यत्वें करून असेल तर आजामितीला तरी तें अक्षरशः खरें आहे. परंतु निबंधमाला मासिक पुस्तक सन १८७४ सालीं सुरू झालें. हा लेख ७१ व्या अंकांतील म्हणजे अर्थात् सन १८८० तील आहे. ह्याच सुमारास गोपाळरावजींचे धाकटे चिरंजीव लक्ष्मणराव ऊर्फ आप्पासाहेब, जे पूर्वीं कलेक्टरच्या कामावर असून हल्लीं पेन्शनर आहेत, त्यांची नेमणूक प्रथम मामलेदारकचेरींतील माहिती घेण्यासाठीं मामलेदारकचेरींत फडणिशीच्या कामावर झालेली होती. त्यांना अनुलक्षून हा लेख असावा अशी आमची मनोदेवता धांवते. आणि शास्त्रीबुवांच्या नेहमींच्या स्वभावावरून तें खरेंही वाटतें. पण तसें असेल तर मात्र या बाबतींत शास्त्रीबुवा सपशेल घसरले असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. कारण सदर आप्पासाहेब देशमुख यांचें मोडी अक्षर आजमित्तीला सुद्धां इतकें उत्तम आहे कीं, मुलांनीं त्यांच्या हातचे कित्ते वळवावेत. ते मामलेदारकचेरींत असतांना त्यांच्या मोडी अक्षराची तारीफ मामलेदारच काय, पण सारे कारकून सुद्धां करीत असत. ही गोष्ट आम्ही त्या वेळीं त्यांच्या सान्निध्याला असल्यामुळें आम्हांस पूर्णपणें माहीत आहे. तेव्हां निबंधमालाकारांनीं हें जें विधान केलें आहे तें केवळ

इतरांच्या परिस्थितीवरून अमनधवक्यानेंच केलें आहे, हें उघड आहे. असला उपरोधिक लेख निदान ह्या लोकहितवादींच्या टीकेंत तरी येणें योग्य नव्हतें. म्हणूनच मोडीच्या संबंधानें आम्ही इतकी मुद्देसूद माहिती दिली आहे.

गोपाळरावजींच्या मुलांच्या गृहशिक्षणांतील आणखी एक भाग सांगावयाचा राहिला. तो भाग म्हणजे अश्वारोहण हा होय. ते नेहमीं सकाळच्या प्रहरीं स्नानाच्या आधीं सर्व मुलांस घोड्यावर बसण्यास शिकवीत. त्यांचा एक उत्कृष्ट घोडा होता. आणि तो शेवटपर्यंत त्यांच्यापाशींच होता. ते तो घोडा स्वतः घेऊन मैदानांत जात. तेथें स्वतः हातांत काढणी धरून रंगण धरवीत व प्रत्येक मुलास त्याच्यावर बसवून प्रदक्षिणा करवीत. ह्यामुळें प्रत्येक मुलांस घोड्यावर बसण्याचा अभ्यास होत असे. ह्या घोड्यावर गोपाळराव स्वतः बसले म्हणजे तो मुकाट्यानें पाहिजे तसा चाले. इतकेंच नव्हे तर लगाम सोडून दिला तरी नीट वाटेनें दुसरा घोडा गाडी आल्यास वळण घेऊन चाले. पण परक्या मनुष्यास आपल्या पाठीवर कधीं बसूं देत नसे. आणि बसलाच तर तो त्याला लगेच पाडून टाकी! असें इमानी जनावर क्वचित् आढळतें.

## संतति-सौख्य.

असो; येथपर्यंत गोपाळरावजींची स्वतःची माहिती व त्यांनीं केलेली लोकसेवा ह्यांचा वृत्तांत सांगितला. पण इतक्या अवधींत त्यांचे पुत्रही मोठे मोठे पदवीधर व कर्तसवर्त झाले. म्हणजे 'शुद्ध बीजा पोटीं। फळें रसाळ गोमटीं।' ही तुकाराम महाराजांची उक्ति त्यांच्यासंबंधानें पूर्णपणें अनुभवास आली आणि 'बाप से बेटा सवाई' ह्याप्रमाणें त्यांचे पुत्र एकाहून एक विद्वान् सन्माननीय व नामांकित असेच निपजले. त्यांचे एकएकाचें चरित्र स्वतंत्रच लिहिण्यासारखें आहे. ह्यास्तव येथें त्या प्रत्येकाचें संक्षिप्त विवेचन करणें तरी अवश्य दिसतें. गोपाळरावजींस सहा पुत्र व दोन कन्या होत्या, हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्यांची येथें अनुक्रमानें थोडी थोडी माहिती देतो.

१ सर्वांत वडील चिरंजीव **गणपतराव ऊर्फ बापूसाहेब** हे होत. ह्यांचा जन्म इ० स. १८४५ मध्यें झाला व ते आपल्या चाळिसावें वर्षीं म्हणजे १८८५ मध्यें वारले. हे मोठेसे विद्वान् नव्हते तरी त्यांस इंग्रजी लिहितां-

वाचतां उत्तम येत असे. ते कांहीं वर्षें गुजराथेंत फौजदार होते. त्यांनीं फौजदारी कामाचा राजिनामा देण्याचें कारण वडिलांस वल्हिदरयाचें पत्रावरून कळेल. तें पत्र येथें देतो:—

श्री ठासरा ता० १ आगष्ट
सन १८७६

तीर्थरूप राजमान्य राजेश्री बाबा वडिलांचे सेवेसी:—

अपत्य बालकें बापूनें दोनी कर जोडून त्रिकाल चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञाप्ना विशेष. काल मी आपणांस राजिनामा देणार म्हणोन लिहिलें आहे. त्याचें कारण असें कीं, येथें असें सक्युलर झालें आहे कीं, प्रत्येक फौजदारानें कुत्रीं मारावीं. विषानें न मरतील तर हातांत तलवार घेऊन मारावीं, व त्यांच्या शेपट्या कापून हातांत घेऊन साहेब ह्यांचेकडेस दाखविण्यास जावें. तरी असलें काम माझ्यानें होणार नाहीं. साहेबाची रीत अशी आहे कीं, ज्या फौजदारावर राग असतो त्यास बुद्धया हें काम सांगतो. आणि साहेबाचा राग होण्यालाही कांहीं विशेष कारण लागत नाहीं. फक्त येथें स्वारी चार महिने आली म्हणजे शिधा सामान, बकरीं-कोंबडीं त्यानें बरोबर आणून दिलीं नाहींत म्हणजे लागलींच दहा कुत्रीं मारून आण म्हणून हुकूम होतो. आणि तो हुकूम अमलांत आणला किंवा नाहीं, याची शिपायाकडून चौकशी ठेवतो. आणि नंतर मॅजिस्ट्रेटाकडे हुकूम तोडल्याबद्दल फिर्याद करून सहा महिन्याची शिक्षा देवावितो. असा हा साहेब नादान मनुष्य आहे. अब्रूदाराच्यानें येथें अशी नोकरी होणें फार कठीण आहे. हल्लीं येथें मागचे वर्षीं साहेब चार महिने राहिला होता. तेव्हां लोकांकडून फौजदाराच्या मार्फतीनें सामान ५७५ रुपयांचें घेतलें आहे. त्यांपैकीं एक पैसा कोणास दिला नाहीं. माझे जाग्यावर दिलवादरखान या नांवाचा फौजदार होता. त्याचे ८०० रुपये घेतले आहेत ते दिले नाहींत. त्यास १०० ची जागा दिली हीच त्याच्या कर्जाची फेड! गोवर्धन म्हणून एक फौजदार होता त्यास हातानें तलवार घेऊन १० कुत्रीं मारून आण म्हणून सांगतलें. त्यानें तें काम केलें नाहीं म्हणून मॅजिस्ट्रेटकडे फिर्याद करून तीन महिन्यांची सक्तमजूरीची शिक्षा दिली. असा प्रकार आहे. सबब मला ही चाकरी करण्याची अगदीं हौस नाहीं. साहेब फारच

खूष आहे. हल्लीं कांहीं बोलत नाहीं. परंतु पुढें बिघडला म्हणजे फार आपदा पडेल, सबब राजिनामा देतो. व पुन्हा अशा बरनरसाहेबांपुढें चाकरी मागण्यासही जाणार नाहीं. पुरे झाली नोकरी! खरेपणा नाहीं. दिवसभर धास्ती व जागा ५० रुपयांची म्हणून सोडून देतों. पुढ ईश्वर काय करील तें पाहूं. कळावें सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. बापू.

या पत्रावरून त्यांचा पाणीदारपणा चांगला दिसून येतो. हे बहुधा पुण्यास फार असत व घरगुती कामासंबंधानें वडिलास नेहमीं लांबलचक पत्रें पाठवीत. त्यांचा पत्रव्यवहार फार मोठा असून त्यांत पुष्कळ विचार थोर-पणास शोभेसे आहेत. ह्यांस पुण्याचे प्रसिद्ध मोरो रघुनाथ ढमढेरे यांची कन्या दिली होती. त्यांचें नांव सरस्वतीबाई. ह्यांनाही चांगलें लिहितां-वाचतां येत असे. ह्यांनीं आपल्या सासूसासऱ्यांना अनेक रसभरीत पत्रें लिहिलीं आहेत. त्यावरून त्यांचीं सासूसासऱ्यांचे ठिकाणींही मनस्वी निष्ठा असल्याचें दिसून येतें. ह्या थोर घराण्यांतील बाईचा शेवट मात्र फार वाईट झाला. बापूसाहेब निवर्तल्यानंतर ह्या बाई पुण्यांतील वाड्यांत बहुधा एकट्याच असत. आणि पहिल्या प्लेगमध्यें तर त्यांच्या शेजारीपाजारीं सुद्धां कोणी नव्हतें. ही संधि साधून कोणी दुष्टानें त्यांस सत्यनारायणाचे पुजेस म्हणून रास्त्यांच्या पेठेंत बोलावून नेलें व तेथें त्यांचा घात करून त्यांच्याजवळ असलेला पंचवीस तीस हजारांचा ऐवज लांबविला. आणि चमत्कार हा कीं, ह्या खुनाचा पत्ताही कित्येक वर्षें लागला नाहीं! गोपाळरावजींचे सर्वांत धाकटे चिरंजीव आप्पा-साहेब जे पूर्वीं कलेक्टर होते ते रजेंत आल्यावेळीं त्यांनीं पुण्याच्या पोलीस सुपरिंटेंडंटला लिहिलें, तेव्हां कोठें देशमुखांचीं नांवें घातलेलीं कांहीं चांदीचीं भांडीं बाजारांत उमगलीं! त्यावरून पोलिसांनीं गुन्हेगारांचा पत्ता लावला तेव्हां त्यापैकीं कांहीं अपराधी मेलेले आहेत असेंही समजून आलें बाकींच्यावर सेशन कमीट खटला होऊन प्रत्यक्ष खुनाचा पुरावा न मिळाल्यामुळे फक्त त्यांस लांब लांब मुदतीच्या शिक्षा झाल्या. बापूसाहेबांस एक पुत्र होता, तो लहानपणींच वारला. मागें फक्त त्यांच्या दोन मुली होत्या त्यापैकीं एकीनें आपल्या हिश्श्याच्या देशमुखांच्या सदाशीव पेठेंतील वाड्यांतच लक्ष्मीनारायणाच्या मूर्ति स्थापन करून तें देवस्थान चालविण्याविषयीं लिहून ठेवलें होतें; त्याप्रमाणें ती व्यवस्था चालू आहे. त्या देवस्थानाचे ट्रस्टी प्रसिद्ध डॉ० नानासाहेब देशमुख व त्यांचे कनिष्ठ बंधु आप्पासाहेब हेच आहेत.

२ दुसरे चिरंजीव **कृष्णराव ऊर्फ अण्णासाहेब बी. ए. बॅरिस्टर-ॲट्-लॉ** ह्यांचा जन्म इ.स. १८४७ मध्यें झाला.हे बालपणापासूनच तैलबुद्धि असत. शाळेंत नेहमीं त्यांचा पहिला नंबर असावयाचा. त्यांची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा झाल्यानंतर ते डेक्कन कॉलेजांत जाऊं लागले. तेथें त्यावेळीं सुप्रसिद्ध गणितशास्त्रज्ञ केरूनाना छत्रे हे प्रोफेसर होते. त्यांची कृष्णरावांवर फार मर्जी असे. कृष्णरावांनीं केलेलें उदाहरण म्हटलें कीं ते पुन्हां पहावयास नको. कारण त्यांत चूक राहावयाचीच नाहीं असें तें नेहमीं म्हणत. बी. ए. च्या परीक्षेमध्यें त्यांनीं ऐच्छिक विषय प्रथम हिस्टरी व फिलॉसफी हे घेतले होते. एके दिवशीं त्यांच्या मित्रमंडळींत बोलतां बोलतां कोणी म्हणालें कीं, कृष्णराव फिलॉसफींत पहिले वर्गांत येतील यांत नवल नाहीं; पण गणितांत येतील तर खरें. ते ऐकून कृष्णराव म्हणाले, त्यांत काय आहे ? पाहिजे तर मी अद्याप गणित घेऊन पहिले वर्गांत पास होऊन दाखवितों. इतकें म्हणून आपला विषय तितकाच टाकून त्यांनीं पुन्हां परीक्षेस थोडे दिवस राहिले होते तरी गणिताचा विषय घेतला व अभ्यास सुरू केला. तेव्हां त्यांचे फिलॉसफीचे प्रोफेसर त्यांस म्हणाले " तूं अशा हट्टाला पेटूं नको. अर्धा अधिक अभ्यास दुसऱ्या विषयाचा होऊन गेला आहे, आणि ह्यापुढें तूं पहिल्यापासून गणिताला लागणार म्हणजे हेंही नाहीं आणि तेंही नाहीं असें होईल. " ती गोष्ट कृष्णरावांनीं ऐकली नाहीं. त्यांनीं गणित विषयांत परीक्षा दिली, येवढेंच नव्हे तर म्हटल्याप्रमाणें पहिल्या वर्गांत सुद्धां उतरले. अशी त्यांची बुद्धिमत्ता केवळ अप्रतिम होती. बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांस मुंबई येथें सेक्रेटरीयेटमध्यें सुपरिंटेंडेंटची नोकरी लागली. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांस विलायतेस जाऊन विशेष अभ्यास करण्याकरितां एक सरकारी स्कालरशिप मिळाली व त्याप्रमाणें बॅरिस्टरची परीक्षा देण्यासाठीं गोपाळरावजींनीं त्यांस विलायतेस पाठविलें. गोपाळरावजींचीं सारींच मुलें आधीं मोठीं मातृपितृभक्त असत. त्यांत अण्णासाहेब तर निस्सीम मातृभक्त होते. ते कोठें निघाले म्हणजे आईला केवळ नमस्कारच करीत नसत तर खरोखर आपलें मस्तक त्यांच्या चरणावर ठेवून त्यांचा आशीर्वाद घेऊन मग परीक्षेला वगैरे जात. तेव्हां सर्व तयारी झाल्यावर ते घरांत गेले व त्यांनीं नेहमींच्या पद्धतीप्रमाणें मातोश्रींच्या चरणावर मस्तक ठेवलें. पण आजचा प्रसंग वाईट वाटण्यासारखाच होता. कारण त्यावेळेस फारसे लोक विलायतेस जाण्यास धजत

नसत. ब्राह्मणज्ञातींत पहिले स्कॉलर हेच. तेव्हां आपला मुलगा कोणीकडच्या कोणीकडे जाणार; विलायत म्हणजे कोठें, ह्याची त्यावेळच्या बायकांस कल्पना असणेंही फारसें शक्य नव्हतें; तेव्हां आतां त्याची कधीं पुनः भेट होणार कोण जाणें, असें मनांत येऊन आईचे नेत्रांत अश्रू येणें साहजीक आहे. किती केलें तरी आईचेंच अंतःकरण तें. त्यांना गहिंवर आला तो आवरेना. इतका वेळ अण्णासाहेबांना विलायतेस जाण्यास मोठा हुरूप वाटत होता. परंतु आईच्या अंतःकरणाची स्थिति पाहून त्यांनाही गहिंवर आवरेनासा झाला. ते म्हणाले आईच्या मनाला जर इतकें दुःख होत आहे तर मी जाण्याचा बेत रहित करतों. ते स्वस्थ बसले व आतां पोषाख उतरावयाचा अशा बेताला आले. तेव्हां त्यांचे धाकटे बंधू रामभाऊ आंत गेले आणि आई-साहेबास म्हणाले " आई ! आतां तुम्ही दुःख जर न आवराल तर अण्णा पाऊलसुद्धां पुढें टाकणार नाहीं. आणि झालेली इतकी सर्व तयारी फुकट जाईल. " अशी समजूत केल्यावर आईसाहेबांनीं हुंदका गिळला, डोळे पुसले व बाहेर येऊन अण्णासाहेबांस म्हणाल्या, " बरें ये तर; वरचेवर पत्र पाठवीत जा म्हणजे झालें. " याप्रमाणें मातोश्रींचा आनंदानें निरोप मिळाला तेव्हां ते उठून आगबोटीवर निघून गेले. इ. स. १८६९ ते १८७३ पर्यंत म्हणजे चार वर्षें ते इंग्लंडांत होते. बॅरिस्टरची परीक्षा उतरल्यावर ते हिंदुस्थानांत परत आले. विलायतेंत असतांना वडीलमातोश्रींस त्यांचीं नेहमीं प्रेमळ पत्रें येत असत. त्यांत तिकडची पुष्कळ हकीकत असे. गोपाळरावजींचे स्वतःचे मोडी अक्षर जसें पेशवाईधर्तीचें उत्तम असे, तशींच त्यांच्या साऱ्या मुलांचीं अक्षरेंही अगदीं मोत्यांच्या ओळीसारखीं असत. अण्णासाहेब आपल्या मातोश्रीस जें पत्र पाठवीत तें मोडी लिपींतच असे व वडिलांना पाठवीत तें इंग्रजी पाठवीत. त्यापैकीं मातोश्रींना पाठविलेल्या पत्राचा उतारा देतोंः—

श्री

मुक्काम शहर लंदन, ता. १८
माहे एप्रील सन १८७२.

ती. सौ. व्रजचुडेमंडित मातोश्री आईसाहेब वडिलांचे सेवेशीं.

बालकें कृष्णानें दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेऊन शिर-साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत ता० मजकूर पावेतों आपले आशीर्वादें

करून मुक्काम मजकूर येथें सुखरूप असो विशेष. यानंतर इकडील मजकूर- मागील शुक्रवारीं राणीचे दरबारांत ड्यूक ऑफ एडिंबरो याजपुढें ड्यूक ऑफ अर्गाइल यांनीं मला सादर किंवा प्रेष केल्याची हकीकत येथील इंग्रजी पत्रांत छापली ती लंडन टैम्स पत्रांत होती. ती याजबरोबर पाठविली आहे. येथील हवा आतांशे फार उत्तम होऊन राहिली आहे. वसंत ऋतूंत नवीन पालवी वृक्षांस येते व तेणेंकरून सर्व मुलूख शोभायमान दिसतो. नारायण ब्राह्मण आतां चांगला बरा झाला आहे. रा. रा. वासुदेव जगन्नाथ व मंडळी अजून येथें आली नाहीं. पुढचे आठवड्यांत येतील असें वाटतें. त्यांचें आदरातिथ्य आम्ही सर्व नीट करूं. वरकड मजकूर अधिकोत्तर नाहीं. मी विष्णुसहस्रनाम रोज वाचीत असतो. मजविषयीं कोणत्याही प्रकारची काळजी नसावी.

हेंच पत्रीं ती. रा. बापूसाहेब यांसी शिरसाष्टांग नमस्कार. चि. रामभाऊ- तात्या, नाना, आप्पा, व चि. सौ. येसूताई, चि. सा. द्वारकाताई यांसी अनेक आशीर्वाद. ती. मातोश्री आजीबाईस शिरसाष्टांग नमस्कार.

आपले दर्शनासाठीं अति उत्सुक असा आपला बालक

**कृष्णा.**

वडिलांस पाठविलेलीं इंग्रजी पत्रें फारच विस्तृत असल्यामुळें विस्तारभयास्तव तीं देणें सुद्धां अशक्य आहे. असो.

*अण्णासाहेब विलायतेंत चार वर्षे राहून बॅरिस्टरची परीक्षा उत्तम तऱ्हेनें पास होऊन सुखरूप हिंदुस्थानांत परत आले. त्यावेळीं मुंबईमध्यें त्यांच्या

---

* अण्णासाहेब विलायतेंत असतांना ह्याच 'ड्यूक ऑफ अर्गाईलची' दर- महा ६०० रुपयांची स्कॉलरशिप् मिळत असे. ड्यूक ऑफ अर्गाईल हे फार मोठे श्रीमान् जहागिरदार असून शिवाय महाराणी व्हिक्टोरिया ह्यांचे व्याही होते. ह्यांचे वडील चिरंजीव मार्किस ऑफ लार्न हेच त्यांच्या जहागिरीचे वारस असून त्यास महाराणी साहेबांची चवथी कन्या प्रिन्सेस लुइसी ही दिली होती. इंग्लंदच्या कायद्याप्रमाणें थोरल्या मुलाला मात्र वडिलार्जित जहागीर मिळते, इतर मुलांना कांहीं नाहीं. अर्थात् ड्यूक ऑफ् अर्गाईल' ह्यांच्या वडील मुलाला- ह्मणजे 'मार्किस ऑफ लार्न' राणीचे जामात ह्यांना मात्र जहागीर होती. परंतु त्यांचेच कनिष्ठ बंधु व्यापारी होते तेही लक्षाधीश होते. परंतु व्यापारी लोक कितीही श्रीमान् असले तरी इंग्लंदमध्यें जहागिरदार लोकांप्रमाणें उच्च दर्जाचे

कै. रावब० रामचंद्र गोपाळ ऊर्फ भाऊसाहेब देशमुख, सरसुभे बडोदें.



जन्म सन १८४९. मृत्यु सन १८८९.

कै० कृष्णराव गोपाळ ऊर्फ अण्णासाहेब देशमुख ब्यारिस्टर ऍट लॉ.



जन्म सन १८६७ मृत्यु सन १८८७

मित्रमंडळींनीं त्यांचें स्वागतही मोठ्या थाटानें केलें. पुढें ते अमदाबादेस जाऊन प्रायश्चित्त वगैरे घेऊन मुक्त झाल्याचा उल्लेख पूर्वी येऊन गेलाच आहे. नंतर ते कांहीं दिवस मुंबईस हायकोर्टांत काम करीत होते. त्यानंतर राजकोटास बॅरिस्टरचा धंदा करण्याकरितांही ते गेले होते. त्यांची कायद्यांतील मार्मिकता व मुद्देसूद लेख लिहिण्याची शैली फार तारीफ करण्यासारखी असे. त्यांचे सर्वांत प्रशंसनीय कृत्य म्हटलें म्हणजे श्रीमती जमनाबाईसाहब यांच्या नांवाच्या दत्तकाच्या संबंधानें विलायत सरकारास केलेला अर्ज हें होय.

ह्या उपकाराचा कांहींतरी चांगलासा मोबदला त्यांस मिळणें अवश्य होतें. परंतु राणीसाहेबांकडून तो अण्णासाहेबांस कांहीं मिळाला नाहीं. ह्याचें कारण राजे सर टी. माधवराव हे बडोद्यास मुख्य दिवाण झाले होते व त्यांचेंच कारभारांत वर्चस्व फार असल्यामुळें महाराणी जमनाबाई साहेब यांस आपल्या मनाप्रमाणें कांहीं करतां आलें नाहीं. असो.

पुढें १८७५ सालीं मल्हारराव गायकवाड पदच्युत झाल्यावर जे दंगे झाले त्याची चौकशी करण्याकरितां त्यांस कडी प्रांतांत रेसिडेंट सर रिचर्ड मीड यांणीं स्पेशल मॅजिस्ट्रेट नेमिलें. तेथें त्यांनीं आपलें काम इतकें उत्तम रीतीनें बजाविलें कीं, तें पाहून सर टी. माधवराव सुद्धां अत्यंत खूष झाले. नंतर त्यांस बडोदे संस्थानांत डिस्ट्रिक्टजज्जाची कायमची जागा मिळाली. ह्या कामावर ते विसनगरास असतांना शेजारील कडीप्रांतांत गांवाच्या शिवेच्या तंट्यावरून दोन गांवांत मोठी मारामारी झाली. त्या तंट्यांतील लोकांचें

---

समजत नाहींत. ह्यामुळें अशा कुलाशीं राजेरजवाडे कधीं लग्नसंबध करीत नाहींत. हें एक; आणि दुसरें, ड्यूक ऑफ अर्गाइल हे जहागीरदार असले तरी महाराणी सरकारचे दरकदारच होते. तेव्हां अशा ठिकाणीं महाराणीने आपली मुलगी देणें हें उदाहरण अपूर्वच होय. तथापि त्याबद्दल तेथील त्यावेळच्या वर्तमान पत्रांनीं, महाराणीसाहेबांनीं ह्या कामांत संपत्तीकडे लक्ष न देतां आपल्या मुलीच्या सुखाकडेच विशेष लक्ष दिलें, याबद्दल त्यांची प्रशंसाच केली आहे.

ह्या ड्यूक ऑफ अर्गाइलचा व अण्णासाहेबांचा फार स्नेह होता. अण्णासाहेब हिंदुस्थानांत परत आल्यावरही त्यांनीं स्वतः केलेलें ' Rain of Law ' ह्या नांवाचें पुस्तक आपल्या सहीनिशी त्यांच्याकडे प्रेमपूर्वक भेट पाठविलेलें अद्यापही त्यांच्या संग्रहीं आहे.

हक्क ठरविण्याकरितां व गुन्हेगारांची चौकशी करण्याकरितां त्यांस स्पेशल ऑफिसर नेमलें होतें, असें ऐकण्यांत आहे.

विसानगराहून त्यांची बदली नवसरी येथें डिस्ट्रिक्ट जजाचेच जागेवर झाली. ते फार बाणेदार व तेजस्वी होते. म्हणून अण्णासाहेब व राजे सर टी. माधवराव यांचीं मनें परस्परांविषयीं बिघडलीं होतीं. तरी पण सर टी. माधवराव यांस अण्णासाहेबांचे विद्वत्तेबद्दल व बुद्धिमत्तेबद्दल फार आदर वाटत असे व ते त्यांस वचकून असत. पुढें थोड्याच दिवसांनीं त्यांस यकृताचा विकार झाला व त्यांतच त्यांचा त्यांचे वयाचे ३५ साव्या वर्षी म्हणजे १८८२ सालीं अंत झाला !

अशा रीतीनें ऐन उमेदींत, भर तारुण्यांत त्यांचा आयुष्यक्रम एकदम आटपला ही फार दुःखाची गोष्ट आहे.

अण्णासाहेबांचें लग्न लहानपणींच झालें होतें व त्यांस पुण्याचे रहिवाशी व सातारा जिल्ह्यांतील मुनसफ हरिभाऊ सोहोनी यांची कन्या दिली होती. त्यांचें नांव राधाबाई. राधाबाई जशा अत्यंत स्वरूपसुंदर होत्या तशाच त्या सर्व गुणांनीं संपन्न होत्या. त्यांस मराठी उत्तम लिहितां वाचतां येत होतें, इतकेंच नव्हे तर त्या कविताही चांगल्या करीत. त्या अत्यंत पाककुशल असून कशिद्याचें वगैरे काम उत्तम करीत असत. ह्यांनीं 'प्रार्थनामाला' म्हणून एक ५० पानांचें पद्यात्मक पुस्तक सन १८७१ मध्यें ' पुणें सिटी ' प्रेस मध्यें छापलें आहे. त्यांस वेदांत विषयाचें ग्रंथ वाचण्याचा फार नाद असे व त्यांत त्यांची चांगली गति असे. ह्या बाई अण्णासाहेबांच्या मागून बऱ्याच वर्षांनीं निवर्तल्या व मागें माधवराव व वासुदेवराव हे त्यांचे दोन पुत्र राहिले.

माधवराव हे मॅट्रिक परिक्षा पास झाल्यावर कांहीं महिने डेक्कन कॉलेजांत होते. परंतु त्यांची शरीरप्रकृति चांगली नसल्याकारणानें त्यांस कॉलेज सोडावें लागलें. त्यांचा जुन्या धर्मग्रंथांचा चांगला व्यासंग आहे. वै. ह. भ. प. विष्णुबोवा जोग यांच्यावर त्यांची फार श्रद्धा असे. जोग महाराज व माधवराव यांनीं ' सार्थ अमृतानुभव ' ' सटीप एकनाथी भागवत ' ' सटीक रुक्मिणी स्वयंवर, ' वगैरे सहा ग्रंथ छापले आहेत.

त्यांचे धाकटे बंधु वासुदेवराव यांची शरीरप्रकृति फार उत्तम होती. ते नामांकित पैलवान पांडोबा जोग यांचे शिष्य असून स्वतःही पैलवान होते.

त्यांनीं घरांतलि वाटणी वगैरे कांहींच घेतली नाहीं, व लग्नेंही करण्याच्या भरीस ते पडले नाहींत. ह्यांना इंग्रजी विद्येचा फारसा संस्कार नव्हता. त्यांची भक्तिमार्गावर व कर्ममार्गावर फार श्रद्धा होती. हे प्लेगनें सन १९१४ सालीं वारले.

माधवराव यांचे चिरंजीव विश्वनाथराव हे बी. ए. होऊन सेकंड एल्. एल्. बी. च्या परिक्षेस बसले आहेत. त्यांस प्रो. शिवराम महादेव परांजपे यांची कन्या दिली आहे.

३ गोपाळरावजींचे तिसरे चिरंजीव **रामचंद्र गोपाळ ऊर्फ भाऊसाहेब बी. ए. एल्. एल्. बी.** हे होत. ह्यांचा जन्म सन १८४९ मध्यें झाला. हे ६०० रुपये पगारावर बडोद्यास बाऊंडरी कमिशनच्या कामावर होते. हे पुढें कडी व नवसरी येथें सुभे ( कलेक्टर ) होते. काजी शहाबुद्दीन हे ह्यांचे वरिष्ठ अधिकारी त्यांच्या कामावर नेहमीं खूष असत. सर टी. माधवरावांचीही त्यांच्यावर चांगली कृपा असे. ह्यांचा वर्ण थोडासा निमगोरा होता. डोळे पाणीदार, बोलणें तेजस्वी आणि गाल वगैरे मुद्रा फार भव्य असे. ह्यांच्या मुद्रेंत गोपाळरावजींचें साम्य फार असे. हे मोठे मातृभक्त असत. गोपाळरावजींनीं पेन्शन घेतल्यानंतर यांच्या मातोश्रींच्या मनांत आलें कीं, आपण एकवार १०८ ब्राह्मणांस पीतांबर व शालजोड्या द्याव्या; म्हणून त्यांनीं ती गोष्ट रामभाऊस पत्रांतून कळविली. त्याबरोबर रामभाऊंनीं १०८ पीतांबर व शालजोड्या खरेदी करून तावडतोब पाठवून दिल्या. ह्यावेळीं आम्ही त्यांच्याजवळच होतो. रामभाऊस अंमळ कोठें दुखणें आलें कीं ते मोठमोठ्यानें " आई ! अहो आई ! " म्हणून एखाद्या लहान मुलाप्रमाणें मोठमोठ्यांनीं हांका मारीत. हेही अल्पवयांतच क्षयाच्या अजारानें १८८९ मध्यें परलोकवासी झाले. ह्यांच्या पत्नी सीतावाहिनी ह्याही फार सुशील व कुलवान असून मोठ्या धर्मशील आहेत. त्यांस एक पुत्र व एक कन्या आहे. पुत्राचें नांव गोविंदराव. गोविंदराव मॅट्रिकपर्यंत शिकलेले आहेत. ह्यांचें स्वतंत्र धंद्यांत फार लक्ष आहे. ' पूना कटलरी ' म्हणून ह्यांनीं चाकूकात्र्यांचा कारखाना काढला आहे.

४ गोपाळरावजींच्या चवथ्या चिरंजिवांचें नांव **रघुनाथ गोपाळ ऊर्फ तात्यासाहेब** असें होतें. ह्यांचा जन्म सन १८५१ मध्यें झाला. बी. ए. परीक्षा पास झाल्यानंतर मुंबईच्या हायकोर्टामध्यें त्यांस १०० रुपये पगाराची

इन्टरप्रिटरची जागा मिळाली. पुढें त्यांस त्याच खात्यांत ४०० रुपये पगार झाला होता. गोपाळरावांची स्वतःची जशी प्रकृति सदृढ होती तशीच त्यांच्या सर्व मुलांचीही असे. पण त्या सर्वांत तात्यासाहेबांची शरीरसंपत्ति फारच उत्कृष्ट होती. ते मोठे प्रख्यात मल्ल होते. त्यांची अंगलट पिळदार असे. लहानपणचा त्यांचा फोटो एखाद्या जेठीप्रमाणें आहे. ते मोठे एकांतप्रिय असत. बाहेरच्या मंडळींत ते फारसे कधीं येत नसत. त्यांची खोली स्वतंत्र होती. तींतच ते बहुधा असत. एक मोठी दगडाची उशी होती ती ते उशाकडे घेऊन नेहेमीं निजत व दोन मणक्या दोन दोन हातांनी धरण्यास कड्या केलेल्या दोन बाजूस ठेवीत व उठतांना त्या मणक्या एकदम दोन्ही हातांत घेऊन उठत ! त्यांचा आहारही शक्तिप्रमाणेंच होता. म्हणून ते कधींच कोणाच्या पंक्तीस बसून जेवीत नसत. ते भाताला निःशक्त समजून कमी खात. त्यांचा नेहेमीचा आहार म्हणजे दूध, तूप, चपात्या व भाज्या हा असे. त्यांना खावयाला एवढासा तेवढासा पदार्थ पुरत नसे. घरांत मक्याचीं कणसें वगैरे आणलीं व तीं भाजून १।२ वाटणीप्रमाणें कोणी मुलानें त्यांस आणून दिलीं तर तीं फेकून देत आणि म्हणत ' हे: ! काय भिकार खाणें !' मग दुपारी आपण आफिसांतून एक खांदाडीभर कणसें आणीत, तीं भाजीत, मुलांना दोन दोन चार चार देत, आणि मग आपण यथेच्छ चापून खात. भर ज्वानींतच यांचें पहिलें कुटुंब वारलें. तेव्हां मातोश्रीनें त्यांना दुसऱ्या लग्नाबद्दलचा विचार कळविला. त्यावर त्यांनीं त्यासंबंधानें साधकबाधक प्रमाणें त्यांना पत्रांत लिहून कळविलीं. तें पत्र फार वाचण्यासारखें असल्यामुळें त्याचा उतारा येथें देत आहों:—

श्री.

तीर्थरूप सौ० वज्रचुडेमंडित मातोश्री आईसाहेब

वडिलांचे सेवेसी.

अपत्यें तात्यानें दोन्हीकर जोडून त्रिकाल चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. आपलें पत्र पावलें. पत्र वाचलें; लग्न करावें कीं नाहीं याविषयीं माझे मनाचा निश्चय अद्यापि झाला नाहा. क्वचित् करावें असेंही मनांत येतें. परंतु दूरवर विचार केला असतां न करावें हेंच श्रेयस्कर होईल असें मनास वाटत आहे. लग्न करण्यामध्यें अनेक तोटे आहेत. स्वतंत्रता

जातें. उत्साह नाहींसा होऊन परोपकाराविषयीं प्रतिबंध होतो. कारण स्वकुटुंब-भरणाकडे मनुष्य निरत असतो. पुरुषार्थ होत नाहीं. ईश्वराकडे चित्त लागत नाहीं. नेहेमीं जीव काळजींत असतो. धर्म होत नाहीं. कारण बऱ्याच पैशाचा कुटुंबपोषणाकडे खर्च करावा लागतो. ह्याप्रमाणें अनेक तोटे आहेत. तर एवढें सोसून विषयांध होऊन लग्न करावें हें सुज्ञांस उचित नाहीं. परंतु हेंही खरें आहे कीं, लग्न न केल्यास मनुष्य आपला धंदा करून स्थिरबुद्धीनें राहू शकत नाहीं. किंचित् वेडसर किंवा परलौकिक सुखामध्यें गर्क होईल अथवा ऐहिक सुखास पराङ्मुख होऊन नेहमीं उदास परंतु बेफिकीर असा असेल. तेव्हां या दोहींतून चांगला पक्ष कोणता ? याचा निश्चय करणें बरेंच कठीण आहे. लग्न करण्यामध्यें जे तोटे वर लिहिले आहेत त्यांचा ऱ्हास मनुष्याजवळ आपआपल्या लौकिक स्थितीप्रमाणें व दर्ज्याप्रमाणें पैसा असल्यास खचीत होईल. परंतु तसें नसल्यास सदरीं लिहिलेल्या अडचणी मनुष्यास नेहमीं गांजतील. सबब आपण याचा नीट विचार करून मजला सल्ला द्यावा व नंतर काय करणें तें करण्याविषयीं आज्ञा करावी. उगीच तमासगीर लोकांचे म्हणण्यावरून आपण एकदम लग्नासारखी मोठी जोखमाची गोष्ट करण्यास मला सल्ला देणार नाहीं अशी माझी खात्री आहे. याकरितां या विषयावर आपण आपला पोक्त विचार मजला कळवावा. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना."

ह्या पत्रावरून त्यांचे विचार किती प्रगल्भ होते, ह्याची उत्तम प्रकारें साक्ष पटते. असो. पुढें त्यांनीं मातापितरांच्या आग्रहास्तव दुसरें लग्न केलें.

तात्यासाहेबांचा व आमचा प्रथमतः बोलण्याचा फारसा प्रसंग येत नसे. पण पुढें पुढें आम्हांवर ते फारच लोभ करूं लागले. आम्हीं मलबारांत होतो तेव्हां वर्षा दोन वर्षांनीं मुंबईस येण्याचा प्रसंग येत असे. परंतु तात्यासाहेब हायकोर्टांतून जातांना येतांना गुर्जरांच्या दुकानीं आम्ही कधीं येणार म्हणून अगत्य चौकशी करीत व आम्ही मुंबईस आलों म्हणजे आम्हास मुद्दाम बिऱ्हाडीं जेवावयास घेऊन जात व मलबारकडील हकीकत प्रेमानें ऐकत. एके दिवशीं आम्ही त्यांस विचारलें " तात्यासाहेब पहिल्या भयंकर प्लेगानें मुंबई सारी ओस पडली असतां आपण एकटेच येथें कसें राहात होता ? " ते म्हणाले ' त्याबद्दल मला कांहींच भीति वगैरे वाटत नव्हती. ब्राम्हण वगैरे कोणी नव्हता, एवढेंच नव्हे तर भांडीं घासायला सुद्धां कोणी नव्हतें. तरी मी

एकटाच खुशाल राहिलों होतों. स्वयंपाक माझा मीच हातानें करी व भांडीही घाशी आणि रात्रीचा गच्चीवर खुशाल निजे. रस्त्यावर कोणी चिट-पाखरूं फिरकत नसे. शब्द कानीं आला तर रात्रभर 'राम बोलो भै राम' येवढाच येत असे." हें त्यांचें भाषण ऐकून तात्यासाहेबांच्या धैर्याचें आम्हास आश्चर्य वाटलें! एवढी धैर्यानें ज्यांनी प्रथम त्याला टक्कर दिली, त्याच निर्दय काळानें पुढें मुंबईस प्लेगचें मनुष्य वियासही कोठें नसतां त्यांच्यावरच प्लेगरूपानें झडप घातली!

एके दिवशीं हायकोर्टांत ते आपल्या कामावर असतांच त्यांचें कपाळ अतिशय दुखूं लागले, व अंगांत ताप भरला. ते तसेच घरीं आले. पण रात्रीं ताप वाढत चालला आणि सांध्यांत गांठही आली. तरी ते रात्रींचे तसेच उठले, त्यांनीं दौत लेखणी घेऊन मृत्युपत्र लिहिलें व त्यांत आपल्या जिनगीपैकीं पत्नीला काय द्यावयाचें, मुलास काय द्यावयाचें, तें सर्व नीटपणें नमूद करून आपली सही केली आणि मग जाऊन हांथरुणावर पडले! रात्रींच जिकडे तिकडे बातमी पसरली. सकाळीं त्यांचे धाकटे बंधु प्रसिद्ध डॉ० नानासाहेब देशमुख एम्० डी० वगैरे आप्तइष्ट त्यांचे तेथें जमा झाले. त्यावेळीं प्लेगचे मनुष्य घरांत ठेवीत नसत. त्याला सिग्रिगेशन् क्यांपमध्यें पाठवावें लागें. त्याप्रमाणें तात्यासाहेबांनाही घेऊनजाणें भाग पडलें. परंतु ही गोष्ट त्यांना सांगावी कोणी? ह्याचे सर्वांस मोठें कोडें पडलें होतें. इतक्यांत तात्यासाहेब स्वतःच नानासाहेबाकडे पाहून म्हणाले "मग आतां हॉस्पिटल मध्यें गेलें पाहिजेना? चला तर करा तयारी." याप्रमाणें सर्व तयारी होताच त्यांस वाहनांत बसवून हॉस्पिटल मध्यें नेलें!

तात्यासाबांचें आफिसांत त्यांच्या हाताखालीं जनूभाऊ किर्लोस्कर म्हणून एक मराठीरीडर व रायटर होते. त्यांच्यावर तात्यासाहेबांची फार कृपा असे. म्हणून मुद्दाम दुसऱ्या दिवशीं ते त्यांच्या समाचारास हॉस्पिटलमध्यें गेले, व त्यांची ती हताशवाणी स्थिति पाहून डोळ्यास पाणी आणलें! तें पाहून तात्यासाहेबांनीं मानेच्या मागें हात नेला आणि म्हणाले "मृत्यु हा नेहमीं पाठीशीं उभा आहे. तो केव्हां तरी पुढें यावयाचाच. आज ना उद्यां येवढेंच अंतर! त्याबद्दल वाईट वाटण्यांत काय अर्थ आहे!" ह्यावरून तात्यासाहेबांचें अंगीं मनोधैर्य किती वसत होतें ही गोष्ट स्पष्ट होते. झालें; पुढें वात होऊन त्यांतच त्यांचा सन १८९९ मध्यें अंत झाला!

तात्यासाहेबांच्या मागें त्यांचें दुसरें कुटुंबही वारलें. त्यांच्या पहिल्या कुटुंबापासून एक कन्या व दोन पुत्र होते व दुसऱ्या कुटुंबापासून एक कन्या आहे. त्यांच्या मुलाचें नांव **केशवराव**. हे बी० ए० असून त्यांनीं सरकारी नोकरी वगैरे कांहीं पतकरली नाहीं. ते स्वतंत्र धंदा करूनच आहेत. त्यांनीं 'नागनाथ ग्राइंडिंग मिल' म्हणून एक पिठाची गिरणी स्थापन केली आहे. हे वारकरी पंथाचे असून ज्ञानेश्वरीवर त्यांची अत्यंत भक्ति आहे येवढेंच नव्हे तर प्रत्येक दिवशीं रात्रीं आठ वाजतां ते आपल्या मिलच्या इमारतींत ज्ञानेश्वरीवर प्रवचन सांगतात; व तेथें भक्तिभावानें पुष्कळ मंडळी श्रवणास जातात. विष्णुबोवा जोगाप्रमाणेंच किंवा साखरे महाराजाप्रमाणेंच केशवराव देशमुखांची ज्ञानेश्वरीही पुण्यांत सर्वत्र प्रसिद्ध आहे. बी० ए० असून ऐवढी धर्मश्रद्धा, प्राकृत ग्रंथांची आवड, हा योग केशवरावांच्या ठायीं केवळ अपूर्व होय. त्यांचे धाकटे बंधू मॅट्रिक्युलेशन होऊन कॉलेजांत असतांना हृदयाच्या रोगानें वारले !

५. गोपाळरावजींचे पांचवे चिरंजीव म्हणजे **सुप्रसिद्ध डॉक्टर मोरेश्वर गोपाळ ऊर्फ नानासाहेब देशमुख एम्. डी.** हे होत. हे आपल्या वैद्यकीय ज्ञानचातुर्यानें जसे प्रसिद्ध आहेत, तसेंच ते सार्वजनिक कृत्यानेंही प्रसिद्धच आहेत. मुंबईंत गुजराथी लोक तर त्यांना देवाप्रमाणें पूज्य मानतात. हे अत्यंत सात्त्विक स्वभावाचे किंबहुना गोपाळरावजींचीच प्रतिमा आहे असे म्हटलें तरी चालेल. 'चालेल' म्हटलें ह्याचें कारण येवढेंच कीं, लोकहितवादींचा लेखन-व्यवसाय फार दांडगा होता. आणि नानासाहेबांनीं तो कधीं फारसा अंगावर घेतला नाहीं, इतकेंच. नानासाहेबांचा जन्म १८५५ मध्यें झाला. ह्यांची वृत्ति लहानपणापासूनच फार गंभीर आहे. कोणतेंही काम असो तें शहाणपणानें व स्थिर मनानें करावयाचें असा त्यांचा स्वभाव आहे. त्यांच्या कामांत उतावळेपणा, घाई व तडकाफडकी कधींच असावयाचीं नाहीं. अप्रतिम शांति आणि अलोट बुद्धिमत्ता हे गुण त्यांचे अंगीं परमेश्वरानें कांहीं अपूर्व ठेवले आहेत. कोणी केवढाही अपराध करो, ते कोणावर संतापले आहेत असें कधींच घडावयाचें नाहीं. ह्यांची बुद्धि अण्णासाहेबांप्रमाणेंच किंबहुना कांकणभर अधिकच आहे म्हटलें तरी चालेल. प्रत्येक परीक्षा पास होणें तर कांहींच नव्हे, पण पहिल्या वर्गांत येणें हा तर त्यांचा हातचा मळ असे. इतकेंच नव्हे, तर परीक्षेंत जीं जीं रौप्य व सुवर्णपदकें

स्कालर्शिप व बक्षिसें असतील तीं सारीं त्यांसच मिळावयाचीं. आणि चमत्कार हा कीं, त्यांना घोकून अभ्यास करण्याची गरजच परमेश्वरानें ठेवली नाहीं. एकदां विषय कानावरून गेला कीं, त्यांना तें पुस्तक पुन्हां कधीं उघडावेंच लागत नसे. यामुळें ते सहज ऐषआरामांत राहून परीक्षेंत पास होत असत. इतकी त्यांजवर परमेश्वराची कृपा आहे. नानासाहेबांचा व आमचा पूर्ववयापासून परिचय व निकट सहवास असल्यामुळें त्यांच्या बुद्धिमत्तेच्या पुष्कळ गोष्टी आमच्या डोळ्यापुढें घडलेल्या आहेत. त्या अद्यापिही स्मरतात व त्यांचें अद्यापही फार कौतुक वाटतें. पण त्या येथें लिहित बसण्याचें कारण नाहीं.

डॉक्टर नानासाहेब देशमुख यांची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाल्यानंतर ते मेडिकल कॉलेजमध्यें गेले व तेथें १८७८ मध्यें एल्. एम्. अँन्ड एस्. च्या परीक्षेंत उत्तीर्ण होऊन मुंबईच्या मेडिकल खात्यांत १८७९ मध्यें त्यास २०० रुपये पगाराची असिस्टंट केमिकल अनलायझरची जागा मिळाली व भुलेश्वरापाशीं ९५।३० रुपये दरमहाची भाड्याची जागा घेऊन त्यांत 'दवाखाना' म्हणून एक खासगी औषधालयही त्यांनीं सुरू केलें. दवाखान्यांत खुर्च्या, टेबलें, कपाटें, औषधें वगैरे सर्व कांहीं जय्यत तयारी ठेवली होती. ह्या दवाखान्यांत कंपाउंडरची नेमणूक प्रथमतः आमचीच केली होती. दवाखाना सकाळीं दहा वाजेपर्यंत उघडा असे. नंतर नानासाहेब जेवण वगैरे करून आपल्या कामावर जात. आम्ही त्या वेळीं स्कूल ऑफ आर्ट मध्यें जात होतो. उभयतांची गांठ सायंकाळीं दवाखान्यांत पडत असे. आम्ही त्यांच्यापुढें यःकश्चित मनुष्य. केवळ आश्रित म्हटलें तरी चालेल. परंतु आपण धनी व हे नोकर हें नानासाहेबांच्याचसें काय पण कोणाच्याही मनांत वागलें नाहीं. ते केवळ पहिल्यापासून आमच्याशीं मित्रभावानें वागतात हा त्यांचा थोरपणा आहे. असो.

पुढें नानासाहेबांचे मनांत आलें कीं, आपण एम्. डी. च्या परीक्षेस बसावें. परंतु बी. ए. किंवा बी. एस्सी. ची परीक्षा पास झाल्याशिवाय एम्. डी. च्या परिक्षेस त्या काळीं जातां येत नसे. ह्यास्तव आधीं बी. ए. अथवा बी. एस. सी. व्हावें असें त्यांच्या मनांत आलें. पण नोकरी संभाळून आर्ट कॉलेजांत जातां येणार कसें ही एक मोठी अडचणच होती. तेव्हां त्यांनीं आपलें वरिष्ठ अधिकारी डॉक्टर लॉयन, केमिकल अनलायझर, यांचे

डॉ. मोरेश्वर गोपाळ ऊर्फ नानासाहेब देशमुख.

एम्. डी.



जन्म सन १८५५

मार्फत एलफिस्टन कॉलेजचे प्रिन्सिपाल वर्डस्वर्थ यांजकडून नुसती हजेरी केव्हां तरी दिली म्हणजे टर्म मिळेल अशी परवानगी मिळविली. मग त्यांनीं फी भरावयाची ती भरून एलफिस्टन कॉलेजांत आपलें नांव दाखल केलें. ते प्रत्यही ११ वाजतां घरून जेवण करून निघाले कीं, एलफिस्टन कॉलेजांत प्रथम जाऊन आपल्या ऑफिसांत रुजू होत. किंवा आपलें ऑफिसांतील काम संपवून संध्याकाळीं चार वाजतां एलफिस्टन कॉलेजांत हजेरी लावून मग घरीं येत.

नानासाहेबांस पुण्याचे श्रीमान् व कुलीन गृहस्थ गोविंदराव करंदीकर यांची मुलगी १८७२ मध्यें केली. त्यांचें नांव सौ. सत्यभामाबाई असें होतें. ह्या बाईही बऱ्याच शिकलेल्या असून त्यांचा स्वभाव नानासाहेबांप्रमाणेंच उदार व सात्विक होता.

नानासाहेबांची बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांनीं पुढें एम्. डी. चीही परीक्षा दिली. त्यांत ते पास झाले. नंतर त्यांची डिपार्टमेंटल् परीक्षा होऊन २०० रुपयाचा ३०० रुपये पगार झाला. हें काम त्यांनीं एकंदर सुमारें तेरा वर्षें केल्यावर त्यांचे वरिष्ठ अधिकारी डॉक्टर लॉयन हे सन १८९२ मध्यें पेनशन घेऊन गेले. जाते वेळीं त्यांनीं सरकारी रिपोर्टांत आपल्यामागें आपलें काम करण्यास डॉक्टर देशमुख सर्वथैव योग्य आहेत, असें लिहिलें होतें. इतकें असूनही वरिष्ठ अधिकाराची ती जागा सरकारानें एका सनदी नोकरास—ज्यास अनालायझरचा बिलकूल अनुभव नव्हता अशास-दिली व डॉक्टर नानासाहेब यांस असें कळविलें कीं, ही जागा सनदी नोकरांकरितां राखून ठेवलेल्या जागेपैकीं एक आहे म्हणून ती तुम्हास देतां येत नाहीं. हें तरी नानासाहेबासारख्या मानी पुरुषांस कसें खपावें ? त्यांचे हे वरिष्ठ अधिकारी ऑफिसांत लवकर येत. नानासाहेबांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें नानासाहेब अकरा वाजतां जात. त्यांस ते म्हणाले, "तुम्ही इतक्या उशीरा येऊन कसें चालेल? लौकर आलें पाहिजे." नानासाहेब म्हणाले, "माझा खासगी दवाखाना आहे, त्याचें काम आटोपून याव-यास मला थोडासा उशीर होतो." साहेब म्हणाले, "तुम्हांला खासगी दवाखाना व सरकारी नोकरी अशीं दोन कामें करतां येणार नाहींत.' "मी एकच काम करीन. सरकारी चाकरीची मला जरूर नाहीं." असें म्हणून त्यांनीं आपल्या असिस्टंट केमिकल अनलायझरच्या कामाचा राजिनामा दिला,

व आपला खासगी दवाखाना संभाळून सार्वजनिक कामें करण्यास ते मोकळे झाले. ते वरींच वर्षे मॅट्रिक्युलेशनपासून एम्. ए.पर्यंत बहुतेक सर्व परीक्षांत रसायनशास्त्राचे ( Chemistry ) परीक्षक असत. ते युनिव्हर्सिटीचे फेलो आहेत. कांहीं दिवस सिंडिक होते. ते पुष्कळ वर्षें 'जस्टिस ऑफ दी पीस' होते व कांहीं वर्षें मुंबई म्युनिसिपल् कॉर्पोरेशनचे मेंबर होते.

त्यांच्या सात्विक स्वभावामुळें त्यांची मानमान्यता फार वाढली आहे. ते कधीं फारसे लेखनव्यवसायांत पडत नाहींत, तरी हेमंतोत्सवासारख्या समारंभामध्यें ' विवाहकालाविषयीं शारीरशास्त्राचें मत, ' शारीरसामर्थ्य, वगैरे दिलेलीं त्यांचीं व्याख्यानें छापून प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांत शिकण्यासारख्या पुष्कळच गोष्टी आहेत. मुंबईसारख्या शहरीं दक्षिणी लोकांत यांच्याइतके वजनदार गृहस्थ फारच थोडे आहेत.त्यामुळें कोणत्याही मोठ्या समारंभांत व उत्सवांत नानासाहेब हेच प्रमुख असतात. सार्वजनिक कामांतही तसेंच. नानासाहेब आपण होऊन कधीं पुढें होत नाहींत. पण लोक त्यांस मुद्दाम आणून अग्रमान देतात. त्यामुळें ' पैसाफंड ' म्हटला कीं, त्यांत नानासाहेब आहेतच. तळेगांवचा कांच-कारखाना म्हटला कीं, नानासाहेब त्यांत आहेतच. हिंदुएज्युकेशनफंड त्यांचाच आहे. टिळकफंड आला कीं, नानासाहेब सर्वांच्या पुढें. असे ते ज्या त्या सार्वजनिक कामांत पुढारी असतात. परवा मुंबईस श्रीमत्सद्गुरुमार्तंड माणिकप्रभु ह्यांची स्वारी आली असतां त्यास गांधर्वमहाविद्यालयांत मानपत्र देण्याचा समारंभ झाला. सर्व ब्रह्मवृंदाची सभा भरली. तेव्हां डॉक्टर नानासाहेब देशमुख हे त्यांत प्रमुख होते. ते उठून सर भालचंद्र यांजकडे पाहून म्हणाले, कीं "आजच्या सभेचें अध्यक्षस्थान, सुप्रसिद्ध, लोकप्रिय व सन्माननीय सरभालचंद्र ह्यांनीं स्वीकारावें अशी सभेच्या तर्फेनें माझी त्यांस विनंति आहे." सर भालचंद्र त्या वेळीं फार थकले होते, त्यांस धड उभेंसुद्धां राहवत नव्हतें, त्यांस दोघांनीं धरून आणून हळू हळू सभेंत वसविले होते. तरी ते उभे राहून मोठ्या कष्टानें म्हणाले, ' माझ्यापेक्षां विद्येनें, मानानें, वक्तृत्वानें डॉक्टर नानासाहेब हेच अधिक योग्य आहेत. करितां हा मान त्यांसच देणें इष्ट आहे. आतां माझ्यानें अधिक बोलवत नाहीं.' हें ऐकतांच साऱ्या सभेंत टाळ्यांचा एकच कडकडाट झाला आणि एकच मोठा ध्वनि उठला कीं, ' आजच्या सभेंत दोनीही अध्यक्ष पाहिजेत. आजच्या सभेला दोन अध्यक्ष ! ' त्याप्रमाणें

त्या दिवसाची सभा दोन अध्यक्षांनीं पार पडली! इतकी नानासाहेबांचे ठिकाणीं लोकांची पूज्यबुद्धि आहे. नानासाहेब कोठेंही जावोत त्यांच्यामागें पेशंटांची गर्दीही असावयाचीच. नानासाहेबांनीं गिरगांव पोस्टलेनमध्यें एक मोठी चाळ बांधली आहे व तिच्याच एका भागांत ते राहतात. दुसऱ्या भागांत त्यांचा 'अमरोळी दवाखाना' आहे. ह्यावर डॉ. वेलणकर बी. एस्सी., एल्. एम्. ॲंड एस्. हे दुय्यम डॉक्टर होते. नानासाहेब असले नसले तरी त्यांचें काम चालवीत असत. डॉ. वेलणकर कैलासवासी झाल्यापासून नानासाहेबांचे पुतणें (आप्पासाहेबांचें दुसरे चिरंजीव) रावसाहेब एम्. बी. बी. एस्. हे वेलणकरांचे काम करतात. नानासाहेब हे मोठे स्नानसंध्याशील व देवभक्त आहेत. रोज प्रातःस्नान करून प्रत्यहीं ध्यानधारणेंत दोन तीन तास घालवितात. दुपारीं पुन्हा स्नान करितात, व तसेंच रात्रौंही स्नान करितात. त्यांचा आहार फार परिमित आहे. केवळ कच्च्या कंदमूळांवर कधीं कधीं ते महिनेच्या महिने राहतात. ह्यांची दत्तावर विशेष भक्ति आहे. सावंतवाडी संस्थानांत तळवडें या गांवीं त्यांनीं दत्तमंदिर बांधलें आहे व तेथें जवळच आपल्यास राहण्याकरितां लहानसें घरही बांधलें आहे. तेथें ते वर्षांतून पांच चार महिने जाऊन एकांतांत राहतात. नंतर मे महिन्यांत पुण्यास राहतात. महिन्याचे अखेरीस पुण्याहून त्यांचे कनिष्ठ बंधु **आप्पासाहेब** देशमुख यांजकडे चार दोन मडंळीसह पिंपरीस जाऊन दोन चार दिवस राहतात, व मग मुंबईस जातात. असा त्यांचा क्रम आहे. दहा वर्षांपूर्वीं नानासाहेब यांचें कुटुंब निवर्तलें. त्यांस दोन पुत्र आहेत. एक बी. ए. च्या वर्गांत आहेत व त्यांचें लग्न झालें आहे. दुसरे मॅट्रिक झाले आहेत. हेही वडिलाप्रमाणेंच सात्त्विक स्वभावाचे निघतील असा अदमास आहे. नानासाहेब हल्लीं थोडेसे थकले आहेत, तरी पण चाळिशी वगैरे लावीत नाहींत. गोपाळरावजींच्या सहा चिरंजीवांपैकीं नानासाहेब व आप्पासाहेब येवढीच काय ती रामलक्ष्मणाची जोडी राहिली आहे. पैकीं रामाचा वृत्तांत थोडक्यांत सांगितला, आतां लक्ष्मण गोपाळाचा राहिला तो पुढें सांगतों.

६ गोपाळरावजींचे सहावे म्हणजे सर्वांत कनिष्ठ चिरंजीव **लक्ष्मणराव गोपाळ ऊर्फ आप्पासाहेब** हे होत. हेही आपल्या इतरबंधूप्रमाणेंच पाणीदार, तरतरीत, तेजस्वी व बुद्धिमान् असेच आहेत. पण ह्यांच्या बालपणांत ह्यांच्यावर अपघाताचे प्रसंग बरेच आले होते. एकदां तर

गोपाळरावजींची स्वारी बाहेर गांवीं जाण्यास तयार झाली असतां आप्पासाहेब फरसबंदी अंगणांत पडून त्यांच्या मस्तकावर फार मोठी जखम झाली! मग कशाचें जाणें आणि कशाचें काय! आधीं डॉक्टर आणून ती जखम शिवणें भाग पडलें! ती जखम भरून येण्याला त्यांना बरेच दिवस लागले! त्यांची हाडकाठी बळकट असून प्रकृतीही सुदृढ आहे. ह्यांना विद्येची व काव्याची पहिल्यापासून गोडी आहे. हेही आपल्या इतर बंधूप्रमाणेंच बुद्धिमान् असून प्रत्येक शास्त्रकलेंतील मोठे रसिक आहेत. ह्यांची इंग्रजी व मोडी दोन्हीही अक्षरें फार उत्तम आहेत. ह्यांचें लहानपणींच लग्न झालें. श्रीमंत भाऊसाहेब विंचूरकरांच्या बहिणीची मुलगी ह्यांस दिली आहे. ह्यांचें नांव सौ. लक्ष्मीबाई. परंतु सर्व लोक त्यांस 'माईसाहेब' असेंच म्हणतात. ह्यांना मोडी व बालबोध उत्तम लिहितां वाचतां येत असून त्या फार सुशील, उदार मनाच्या, पतिसेवापरायण व अत्यंत संसारदक्ष आहेत. आप्पासाहेबांचा जन्म इ. स. १८५८ च्या जानेवारींत झाला व वयाच्या १५ व्या वर्षी त्यांचें लग्न झालें. १९ व्या वर्षी त्यांची बी. ए. ची परीक्षा उतरली. प्रथमतः आप्पासाहेब सातारच्या कचेरींत ३५ रुपयांच्या फडणिशीच्या कामावर रुजूं होण्याचा हुकूम घेऊन सातारच्या कलेक्टरच्या बंगल्यावर आले. त्या वेळेस तेथें मूरसाहेब कलेक्टर होते. त्यास ऑइल पेंटिंगच्या तसबिरी फार आवडत. त्यांचा आमच्यावरही फार लोभ होता म्हणून आम्हीही कधीं कधीं कांहीं काढलेल्या तसबिरा त्यांच्या बंगल्यावर दाखविण्यास नेत होतों. त्यांत एके दिवशीं एक रामपंचायतनाची व दुसरी गोपाळराव हरींची तसबीर तयार केलेली होती. ती घेऊन त्यांच्या बंगल्यावर दाखवावयास गेलों होतों. त्याच वेळीं आप्पासाहबही मूरसाहेबास भेटावयास आलेले होते. त्यांनीं आपल्या वडिलांची तसबीर पाहून मलाही ओळखिलें, व तुम्ही आठले काय, म्हणून विचारलें. 'होय' म्हणतांच त्यांचा आमचा स्नेह जडला व ते आमच्या बिऱ्हाडीं आले. दुसऱ्या दिवशीं मामलेदारकचेरींत फडणिशीच्या जागेवर रुजूं झाले. नंतर १।२ दिवसांत आम्ही त्यास जागा, गडी, ब्राह्मण, वगैरेची सर्व सोय लावून दिली. त्या वेळीं आप्पासाहेबांचा पगार जरी ३५ रुपये होता, तरी त्यांचा महिन्याचा खर्च शें दीडशें रुपयांत कमी नसे. सकाळींच फिरावयास जाणें, व्यायाम करणें, थंड पाण्यानें स्नान करणें, ह्याची आप्पा-

साहेबांस पहिल्यापासून आवड आहे. साताऱ्याच्या किल्ल्यावर त्यांनीं एक दुधाचा रतीब लावून ठेविला होता. रोज पहांटे उठून त्यांनीं व आम्ही किल्ल्यावर पळत जावयाचें व तेथील दूध पिऊन परत यावयाचें. येतांना कोठें निर्मळ पाण्याचा झरा किंवा ओहोळ दिसला कीं, 'अहाहा! किती पाणी सुंदर आहे! असें म्हणून आप्पासाहेब पागोटें काढून बसलेच खालीं. मग तास तास स्नान किंवा मस्तकावर पाण्याची धार तरी धरीत बसावयाचे अशी त्यांची नित्याची वहिवाट असे. त्यांची प्रकृति अगदीं निकोप आहे. मामलेदार-कचेरींत हे बी. ए. पदवीधर पहिलेच असल्यानें आणि त्यांचा स्वभाव फार थोर, लीन, असल्यानें तेथलि सर्व लोक त्यांस फार मान देत. शिवाय त्यांचें मोडी अक्षर फार उत्तम. जमाखर्चाचीही लिहिण्याची हातोटी पाहून सर्व लोक चकीत होत. कलेक्टर मूरसाहेब कचेरींत आले तर ते आधीं आप्पासाहेबांपाशीं येऊन घटका घटका बोलत बसत, व मामलेदारांशीं फारसें न बोलतांच निघून जात. मामलेदारांस इंग्रजी मुळींच येत नसे. ते रात्रीं कंदील घेऊन आप्पासाहेबांकडे येत व साहेब काय काय बोलला तें विचारून जात. त्या वेळचा अप्पासाहेबांचा दिनक्रम रा. थत्ते यांनीं गोपाळराव हरीस कळविला आहे. तेंच पत्र येथें देतों, म्हणजे आप्पासाहेबांच्या आत्मस्थितीचा चांगला बोध होईल. तें पत्र असें आहे:—

श्री

" श्रीमंत राजश्री रावसाहेब देशमुख मु० नाशिक स्वामीचे सेवेसीः—

आज्ञाधारक वासुदेव रामचंद्र थत्ते मुक्काम मुंबई. कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत ता. ५ माहे आक्टोबर सन १८७९ पावेतों मुक्काम मजकुरीं सुखरूप असो. विशेष. आज सुमारें एकवीस वर्षांपासून कुटुंबाची प्रकृति बिघडलेली असल्यामुळें देशीं साताऱ्यास हवा बदलण्यास गेलों होतों. परंतु दुर्दैव. हवेपासून फायदा न होतां तिकडेच तिचा काळ झाला. ईश्वरी इच्छेस इलाज नाहीं. तथापि तात्या व नाना वगैरे मंडळीकडून आपल्याकडील कुशल वर्तमान कळलें. मी साताऱ्याहून परत येतांना मुद्दाम अप्पास भेटण्यास गेलों होतों. त्यांची भेट सरकारवाड्यांत एक दिवस घेतली, व दुसरे दिवशीं घरीं गेलों. तेथें त्यांची एकंदर व्यवस्था पाहतां फार उत्तम रीतीनें चालली आहे. सरकारी काम तर फार उत्तम रीतीनें करतात. या

शिवाय कामगार व पाटील कुलकर्णी आदिकरून सर्वांची प्रीति संपादन करून वागत आहेत. तसेंच घरीं आल्यावर आपले अभ्यासांत रात्रंदिवस गुंतलेले असतात. एक घटकाहीं रिकामा वेळ घालवीत नाहींत. त्यांनीं स्वतः लिहिलेली तालुक्याची रोजकीर्द वगैरे दाखविली. ती फार उत्तम प्रकारें लिहिली असोन दहा पांच वर्षें काम केलेल्या कारकुनाप्रमाणें नीट नेटकी ठेवलेली दिसते. आप्पांचें वय जरी लहान आहे तरी तालुक्याचे कचेरींत ते घवघवीत व मोठ्या अधिकारास पात्र आहेत असें दिसतें. त्यांनीं रजा घेतली आहे व लोअर स्टँडर्डच्या परीक्षेस ते आठ चार दिवसांत मुंबईस येतील. त्यांची प्रकृति दुरुस्त असून सुखरूप आहे. कांहीं एक काळजी करूं नये. आप्पाही लोकप्रिय आहेत असें सातारा तालुक्यांतील शेंकडों लोकांनीं सांगितल्यावरून आपणांस लिहिलें आहे. हे मामलेदार झाले म्हणजे नवीन मंडळींत नांव घेण्यासारखे होतील असें आपण खचित समजावें. कळावें बहुत काय लिहिणें लोभ असावा हे विनंति.''

ते काम करीत असतांना व नियमाप्रमाणें मामलेदार होण्याच्या पूर्वी स्टाटयुटरी सिव्हिल सर्व्हिसचे नियम प्रचारांत आले. त्या नियमाप्रमाणें आप्पासाहेब हे खानदानी घराण्याचे हुषार व तरतरीत ग्राज्युएट असल्यामुळें ते स्टाटयुटरी सिव्हिल सर्व्हिसमध्यें निवडले गेले व त्यास एकदम खान-देशांत असिस्टंट कलेक्टर नेमलें.

अप्पासाहेब हे पहिल्यापासूनच विद्याव्यसनी आहेत.ते आपल्या कामाशिवाय इतरत्र एक घटकाही व्यर्थ दवडीत नाहींत. लेखन आणि वाचन हा त्यांचा आवडता विषय. ' काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ' असा त्यांचा स्वभाव आहे. त्या स्वभावाचें फळच जणों काय असें परमेश्वरानें त्यास लौकरच उच्च पदास चढविलें. त्यांनीं लोअर स्थ्यान्डर्टच्या व हायर स्थ्यान्डर्टच्या परीक्षा दिल्या.असिस्टंट जजाचीही परीक्षा दिली.गुजराथींची दिली पुढें कानडी, हिंदी वगैरे भाषा त्यास येऊं लागल्या आणि आपल्या कर्तबगारीनें असिस्टंट कलेक्टरपासून तों खुद्द कलेक्टरच्या जागेपर्यंत त्यांची बढती झाली. परंतु पुढें मात्र दुर्दैवानें त्यांच्यामध्यें व सरकारामध्यें थोडीशी तेढ पडून ती बहुतेक अखेरपर्यंतच्या त्यांच्या नुकसानीस कारणीभूत झाली. ही तेढ उत्पन्न होण्याचें मुख्य कारण म्हणजे ब्युराक्रसीचा पक्षाभिमान, म्हणजे आपले तें खरें आणि दुसऱ्याचें तें खोटें,

पेशवाईंत या घराण्याचा नांवलौकिक मोठा होता व इंग्रजींत ही तो तसाच मोठा झाला आहे. गोपाळराव हरींच्या सर्व चिरंजीवांचे स्वभाव पहिल्यापासूनच मानी, आणि तसें असणें अगदीं सहाजिकच होतें. त्यापैकीं कांहीं प्रकार जे आमच्या ऐकिवांत आहेत, ते देतों. आप्पासाहेब सोलापुरास असतांना १८९६चा दुष्काळ डिसेंबरांत सुरूं झाला.म्हणून गोरगरिब पोटाकरितां बाजारांतील धान्याची केव्हां केव्हां थोडीबहुल लुटालूट करीत; म्हणून आप्पासाहेबांनीं अधिक बंदोबस्त करण्याकरितां तेथें एक पोलिस गार्ड ठेविला होता; तो कांहीं कामाकरितां पोलिस सुपरिटेंडंटांनीं तेथून काढून दुसरे कामासाठीं पाठविला.ती संधि साधून कांहीं गुंडांनीं धान्याची लुटालूट केली. त्याजवर पोलिस सुपरिटेंडेंटनीं गोळिबार केला, तेव्हां लोक पांगले. आप्पासाहेबांस हें समजलें तेव्हां त्यांनीं जाऊन पाहिलें तों गार्ड नाहीं. त्यांनीं पोलिस-सुपरिटेंडेंटांस कारण विचारलें. त्यांनीं कानावर हात ठेविला. ही गोष्ट सरकारांत कळवून आप्पासाहेबांनीं गार्ड निघाल्याबद्दल आपली नापसंती दर्शविली. शिवाय आपण लुटालुटींच्या जागीं हजर नसतांना पोलिस सुपरिटेंडंटांनीं आपल्या जबाबदारीवर गोळीबार केला, हें त्यांस नापसंत होऊन, हेंही त्यांनीं सरकारास कळविलें.

नंतर अप्पासाहेबांनींच बंदोबस्तासाठीं आणविलेलें पुण्याचें लष्कर ३ आठवड्यानंतर परत पाठविण्याचा हुकूम केला. तो सरकारास पोलिस सुपरिटेंडेंटचे हरकतीवरून पटला नाहीं. आप्पासाहेबांस पुनः असिस्टंट कलेक्टरचे हुद्यावर तारेचे हुकुमानें कारवारास बदलले. तेथें त्यांचें १॥ वर्ष गेलें. नंतर कांहीं दिवस रजा मिळून धारवाडास नेमणूक झाली. पण तेथें आणखी एक असाच प्रकार घडून आला. आप्पासाहेबांच्या वर्तनावरून, स्वभावावरून, व नांवलौकिकावरून लोकांची त्यांच्याविषयीं फार पूज्यबुद्धि असे. त्याप्रमाणें धारवाडास असतां एकदां गणपतीचा उत्सव आला. त्यांत एका सार्वजनिक गणपतीच्या उत्सवांत सभा झाली व तींत आप्पासाहेब नको म्हणत असतांही लोकांनीं अत्याग्रहानें त्यांस त्या सभेचे अध्यक्ष नेमलें. त्यासभेंत कांहीं वक्त्यांचे तोंडचे शब्द सरकारास आवडले नाहींत. त्यांची बदली पुनः असिस्टंट कलेक्टरच्याच जागेवर सिंधप्रांतीं झाली. तेथें त्यांनीं जमीनमहसुलाचे कामीं सिंधुनदाचा पूर कमी येऊन दुष्काळासारखी स्थिति होते, ती संधि साधून मामलेदार लोक केव्हां केव्हां सरकाराशींच बेइमानी करून आपले व रयतेचे

फायद्याचे लवाडीचे मार्ग कसे धरितात तें उघडकीस आणलें. पुढें वर्षांची रजा घेऊन ते इजिप्त वगैरे दूर दूरचे देश पाहून आले. नंतर एकच वर्ष राहिलें होतें तेवढी सरकारी नोकरी करून मग त्यांनीं पेन्शन घेतलें. कलेक्टरच्या जागेवर त्यांचा पगार १०४० रुपये दरमहा होता व असिस्टंट कलेक्टरच्या जागेवर ५७६ रुपये होता. परंतु पेन्शन म्हटलें म्हणजे पगाराचे निम्में मिळावयाचें, त्याप्रमाणें तें हल्लीं २८८ रुपये पेन्शन घेऊन एकांतवासासध्ये विद्यानंदाचा यथेच्छ उपभोग घेत आहेत.

आप्पासाहेबांस तीन पुत्र व एक कन्या अशीं चार अपत्यें आहेत. वडील चिरंजीव बापुराव हे रसायन शास्त्राचे बी. ए. असून एल्‌एल्‌.बी. होते. आलीकडे ते ठाणें येथील इंग्लिश स्कूलमध्यें हेडमास्तर होते परंतु ३६ वे वर्षी कांहीं पोटांतील आजारानें आजारी होऊन १५ दिवसाचे आंतच सन १९२३ ता. ६ फेब्रुवारीला दादर येथें निवर्तले!! ही दारुण आपत्ति सोसण्याचें त्यांच्या लहान थोर बांधवजनांवर आले त्याबद्दल निरुपाय आहे. त्यांसही मुलेंबाळेंआहेत. दुसरे चिरंजीव रावसाहेब हे फार पाणीदार असून मेडिकल खात्यांतलि त्यांच्या एल. सी. पी. एस्. व एम्.बी. बी.एस्. या दोन परीक्षा उतरून ते फॉरेन स्टीमरवर ट्रॅव्हेलिंग डॉक्टरचें २२५ रुपये पगाराचे काम करीत असत.

त्यांस इजिप्त, आफ्रिका, अरबस्थान, वगैरे दूरदूरच्या सफरीस जावें लागत असे. ह्यांसही मुलेंबाळें आहेत. परंतु हल्लीं त्यांनीं हें स्टीमरवरचें काम सोडून डॉ. वेलणकर आजारी पडून वारल्यामुळें त्यांच्या जागीं त्यांचे काम डॉ. नानासाहेब देशमुख ह्यांच्या 'अमरोळी' दवाखान्यांत ते उत्तम रीतीनें चालवीत आहेत.

आप्पासाहेबांचे धाकटे चिरंजीव बाळासाहेब पुणें येथें इंटर आर्टस् होऊन इंजिनिअरिंग कॉलेजांत अभ्यास करून बी. ई. झाले आहेत ह्यांचें नुकतेंच लग्न वगैरे झालें आहे. यांचा लष्करी शिक्षणाचा सर्वक्रम पुरा झाला आहे. त्यांस शारीरिक खेळांत सोन्याचीं पदकें मिळाली आहेत. हे हल्लीं टाटा कंपनीमध्यें १५०रु० पगारावर इंजनिअरचें काम करीत आहेत.

आप्पासाहेबांच्या कन्येचें नांव सौ. कृष्णाबाई. ह्या सांगलीचे सुप्रसिद्ध व लोकप्रिय वकील रावसाहेब गणपतराव अभ्यंकर बी. ए. एल्. एल्. बी.

श्री. रावब. लक्ष्मणराव गोपाळराव ऊर्फ
आप्पासाहेब देशमुख.



जन्म सन १८५८ पेन्शनर कलेक्टर.

ह्यांस दिल्या आहेत. हें जोडपें फार भाग्यवान् आहे. गणपतरावजी आपल्या स्वतःच्या बुद्धिमत्तेवर उदयास आले आहेत. त्यांचा रहाता बंगला, त्यांतील उंची सामान व टापटीप आणि त्या उभयतांचे सौजन्य फार तारीफ करण्यासारखें आहे. मुख्य सांगावयाची गोष्ट ही कीं सौ. कृष्णाबाई अभ्यंकर ह्या आपल्या भ्रतराप्रमाणेंच सुशील व गुणी आहेत. तशाच त्या उत्तम लेखक व कवयित्रीही आहेत. त्यांनीं अनेक बोधपर नाटकें लिहून प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांच्या कविता फार प्रतिभासंपन्न असतात. त्या ' विविधज्ञानविस्तार, ' ' मासिक मनोरंजनां ' तून ' लक्ष्मी-तनया ' ह्या नांवाखालीं अनेक वेळ प्रसिद्ध झालेल्या आहेत.

ह्यावरून आप्पासाहेबांस ईश्वरानें संतति व संपत्ति हीं दोनही सुखें केवळ स्पृहणीय देऊन ' धन्यो गृहस्थाश्रमः ' ह्या संस्कृत वाक्याचें खरें खरें सार्थक केलें आहे. पण ह्यापेक्षांही ह्यांच्या विषयींचा खऱ्या महत्वाचा व खऱ्या खऱ्या सौख्याचा भाग सांगणें अद्याप राहिलाच आहे ! तो कोणता ? तर हल्लींचा दिनक्रम. तो फारच प्रशंसनीय असल्यामुळें तेवढा येथें देतों.

पुण्याच्या सदाशीव पेठेंतील त्यांच्या जुन्या वाड्यापैकीं पश्चिमेकडील अर्धा भाग आप्पासाहेबांचे वाटणीस आला आहे व त्याच्या आंतल्या बाजूस परसांत त्यांनीं आपणास रहाण्यासारखा बंगलाही बांधला आहे. पण तेथें नेहमीं राहाणें त्यांस आवडत नाहीं. शहरांतील बजबजपुरीला ते अगदीं कंटाळतात. त्यांना एकांतवास फार ठीक वाटतो. म्हणून त्यांनीं खडकी व चिंचवड स्टेशनच्या दरम्यान पिंपरी गांवाच्या हद्दींत रेलवे लाईनला लागूनच एक लहानशी जमीन घेऊन तेथें स्वतंत्र व हवाशीर बंगला बांधला आहे. हल्लीं तेथेंच ते राहतात. तेथें पाण्याची सोय उत्तम आहे. तेथें बाग करून ते एखाद्या ऋषीच्या आश्रमाप्रमाणें राहतात. अभ्यास करणारीं मुलें वगैरे पुण्याचे वाड्यांत असतात. लग्नकार्य वगैरे करणें तर पुण्याचे वाड्यांत करतात. आप्पासाहेबांचा विद्येचा व्यासंग फार असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यांची स्वतःची लायब्ररीही मोठी आहे. शिवाय ते मुंबईच्या ' रॉयल एशियाटिक सोसायटी'चे मेंबर होते. तेथून ते प्रत्येक आठवड्यास मोठमोठाले इंग्रजी मराठी, संस्कृत ग्रंथ मागवीत असत. ते सारे मनःपूर्वक वाचीत. त्यांतील त्यांनीं अनेक टाचणें करून ठेवलीं आहेत. तीं टाचणें इतकीं उपयुक्त आहेत कीं, त्या प्रत्येकावर एक एक ग्रंथ लिहितां येईल. ह्याशिवाय त्यांना लेखनाचाही

मोठा नाद आहे. ' चित्रमय जगत् ' ' कीर्तन ' मासिक वगैरे मासिक पुस्तकांतून ' संगीत शास्त्रावर ' यांनीं फार मार्मिक लेख लिहिले आहेत. ह्याशिवाय " Short account of India " नामक एक लहानसा इतिहास ग्रंथही छापला आहे. त्यांत पुष्कळ प्रकारची माहिती असून आपल्यांतील पुढारी मनुष्यांचीं सचित्र वर्णनें आहेत. समाजासंबंधानें व धर्मासंबंधानें यांचे विचार फार उच्च दर्जाचे आहेत. पुनर्विवाह, नीचोच्चजातिविवाह, इत्यादि गोष्टी स्वतःच केल्या पाहिजेत असें नाहीं; परंतु तसे जे कोणी करतील अगर ज्यास करणें भाग पडेल, त्यांचा इतरांनीं छळ करूं नये. त्यांस होईल तेवढें सहाय्य करावें असें त्यांचें मत आहे. ' प्रौढविवाहनाटक ' ' नीचोच्चजाति विवाह नाटक,' इत्यादि पुस्तकें त्यांनीं लिहून छापून प्रसिद्ध केलीं आहेत. पण तीं वाचतो कोण ? आणि त्याचा विचार तरी कोण करतो? हें वडिलाप्रमाणेंच आपले विचार लोकांना स्पष्टपणें सांगतात. हे बोलूं लागले म्हणजे त्यांच्या विचारांत विपुल माहिती भरलेली असते. ती इतकी कीं ८—४ दिवस त्यांच्या सहवासास राहिलें तर ४।५ ग्रंथ वाचल्याचें श्रेय पदरीं पडतें. हे लेखक आहेत इतकेंच नव्हे तर कवीही आहेत. ' अन्यदर्शन ' भाग १ व २ हीं पद्यात्मक दोन पुस्तकें त्यांचींच आहेत. त्यांत मूळ वामन, भर्तृहरि, मोरोपंत ह्यांचे श्लोक देऊन त्याच वृत्तांनीं त्यांतील विचारांवर शंका घेतलेल्या आहेत. त्या फार विचार करण्यासारख्या आहेत. पण इतर विषयाप्रमाणें यांच्याकडेही कोणाचें लक्ष जात नाहीं. आप्पासाहेब गायन-शास्त्रांतील फार मर्मज्ञ आहेत. ते स्वतः ताऊस, फिडल, सतार, वगैरे वाजवितात. त्यांच्या बंगल्यापासून चिंचवड संस्थान जवळ आहे. तेथील गवय्ये बजवय्ये यांस दर आठवड्यास बोलावून आणतात, करमणूक करतात, व त्यांस यथोचित देणग्याही देतात. ह्याप्रमाणें आप्पासाहेब हे ईश्वरकृपेनें विद्यानंदांत आपला कालक्षेप करीत आहेत.त्यांची शरीरप्रकृति अद्याप चांगली निकोप आहे. त्यांचीं मतें जरी नानासाहेबाहून भिन्न आहेत तरी उभयतां बंधूंत अकृत्रिम प्रेम आहे. आप्पासाहेबांची वृत्ति व स्वभाव नानासाहेबांप्रमाणेंच थोर,व उदार असा आहे.

७ येथपर्यंत गोपाळरावांच्या सहा चिरंजीवांची संक्षिप्त हकीकत दिली व ह्या सहापैकीं डॉ. नानासाहेब व आप्पासाहेब हे दोघेच जण काय ते हयात असल्याचें सांगितलें. आतां त्यांच्या दोन कन्याविषयींही थोडीशी हकीकत देतों. त्यांचें सातवें अपत्य म्हणजे येसूताई ह्या होत. त्या मंगळवेढ्याचे

जहागिरदार श्री. रावसाहेब पटवर्धन ह्यांस दिल्या होत्या. परंतु भर ज्वानींतच रावसाहेब यांस काळानें मृत्युलोकांतून नेल्यामुळें येसूताईंवर, त्यांच्या मातापितरांवर व इष्टमित्रांवर मोठा दुःखाचा पर्वत कोसळला. येसूताईंही त्यांच्यामागें फार दिवस राहिल्या नाहींत. आतां त्यांच्यामागें त्यांचे चिरंजीव बाळासाहेब पटवर्धन असून बाळासाहेबांचीं मुलें पुण्यास शिकत आहेत. येसूताई अत्यंत सुशील असून त्यांस लिहितां वाचतां चांगलें येत असे.

८ गोपाळरावांचें आठवें म्हणजे सर्वांत कनिष्ठ अपत्य सौ. द्वारकाताई ह्या होत. या बडोद्याचे जहागीरदार श्रीमंत चिंतामणराव नारायणराव मुजुमदार यांस दिल्या होत्या. ह्या फार सुशील, तरतरीत, संसारदक्ष अशा असून लिहिणार वाचणारही चांगल्या होत्या. यांना अबासाहेब या नांवाचे एकच चिरंजीव आहेत. ते बी. ए. एल्एल्. बी. असून गायकवाडींत मुनसफीच्या हुद्यावर आहेत. ह्यांस प्रथम श्रीमंत दाजीसाहेब कुरुंदवाडकर यांची कन्या दिली होती. ती लग्नानंतर थोड्याच वर्षांनीं वारली. नंतर त्यांस सर गंगाधरराव उर्फ बाळासाहेब मिरजकर यांची कन्या दिलेली आहे. श्रीमंत भाऊसाहेब व अबासाहेब ह्या पितापुत्रांनीं विलायतची सफर केली व अबासाहेबांनीं विलायतच्या प्रवासाच्या हकीकतीचा मोठा ग्रंथही लिहिला आहे. भाऊसाहेबांनींही 'शूर वाघेर' ' लाख्या बारगीर ' वगैरे बोधप्रद कादंबऱ्या लिहिल्या आहेत. सौ. काशिताई या नांवाची एक कन्याही त्यांस होती. ती श्री. अण्णासाहेब कुरुंदवाडकर यांस दिली होती. ती नुकतीच वारली. द्वारकाताई ह्या अल्पवयांतच निवर्तल्या.

## पुण्यास केलेले ग्रंथ.

रा. ब. गोपाळराव हरि यांचा लेखनव्यवसाय फार दांडगा होता. त्यांनीं प्रत्येक ठिकाणचे कारकीर्दींत अनेक ग्रंथ केले. त्यापैकीं पुणें येथें पेन्शन घेतल्यानंतर केलेल्या ग्रंथाची नांवनिशी येथें दिल्यास अयोग्य होणार नाहीं, असें वाटल्यावरून ती देतों.

१ पृथ्वीराज चव्हाण. २ उदेपूरचा इतिहास.
३ गुजराथचा इतिहास. ४ सुराष्ट्र देशाचा इतिहास.
५ लंकेचा इतिहास. ६ 'लोकहितवादी' मासिक पुस्तक.

'लोकहितवादींचा' तिसरा उद्योग म्हणजे 'पत्रव्यवहार' हा होय. पण तो यथातथ्य रीतीनें समजण्यास आम्हांस मार्ग नाहीं. जावक बारनिशीसारख्या गेलेल्या पत्रांचे रजिष्टराचें कांहीं साधन नसल्यानें कोणकोणास काय काय पत्रें गेलीं आहेत हें तर कळणें शक्य नाहीं. पण आलेल्या पत्रांपैकीं सुद्धां अनेक पत्रें आजपर्यंत गहाळ होऊन,जीर्ण होऊन,बाकी राहिलीं तेवढीं आम्हांस आजमित्तीस उपलब्ध झालीं आहेत. तेवढ्यांचीं तरी उत्तरें लोकहितवादींनीं दिलेलीं असलीं पाहिजेतच. कारण, ज्या पत्रांचीं उत्तरें त्यांजकडून मुळींच गेलेलीं नसतील,अशीं पत्रें त्यांत फारच क्वचित असतील, हें उघड आहे.आम्ही त्यांचीं २१ दप्तरें तपासलीं. त्यांतील सर्व पत्रांची नांवनिशी देणें तर शक्यच नाहीं. तथापि ज्या थोर थोर गृहस्थाशीं त्यांचा विशेष पत्रव्यवहार होता, त्यांतील कांहीं प्रमुखांची नांवनिशी देतों.

श्रीमान् व जहागीरदार.

१ श्री. पंत प्रतिनिधि.
१ श्री. अक्कलकोटचे राजे.
१ श्री. आप्पासाहेब बारद.
१ खान० काजी शहाबुद्दीन.
१ श्री. विंचूरकर.
१ " बापूसाहेब कुरुंदवाडकर.
१ " राजे सर. टी. माधवराव.

स्वामी.

१ श्री. स्वामी द्वारकामठ.
१ ,, गोस्वामी.
१ श्री. स्वामी हंसराज.
१ " स्वामी दयानंद सरस्वती.

इतर मोठमोठे गृहस्थ.

१ सार्वजनिक काका.
१ शामजी कृष्णवर्मा.
१ विष्णु परशराम शास्त्री पंडित.
१ शांताराम नारायण.
१ काशीनाथ पांडुरंग परब.
१ रावजी श्रीधर गोंधळेकर.
१ नागेशराव विनायक बापट.
१ नीलकंठ जनार्दन कीर्तने.
१ विष्णु कृष्ण चिपळूणकर.
१ वसईकर.
१ महादेव गोविंद रानडे.
१ विश्वनाथ नारायण मंडलीक.
१ पांडुरंग बळिभद्र.
१ जावजी दादाजी.
१ रामचंद्र भिकाजी गुंजीकर.
१ घरगुती सर्व मुलें.
१ चिंतामण नारायण भट.
१ भट व शास्त्री.

इ. इ. इ. इ.

स्त्रियांचा पत्रव्यवहार.

१ पंडिता रमाबाई.
१ अनुगीताबाई.
१ सरस्वतीबाई.
१ अनुसूयाबाई.
१ मिस मेरी कार्पेंटर.
१ गंगूबाई धुमाळ.
इ. इ. इ. इ.

याशिवाय गव्हर्नर, गव्हर्नर जनरल, कलेक्टर, जज्ज, वगैरे युरोपियनाशीं झालेला इंग्रजी पत्रव्यवहार निराळा. ह्यापैकीं कितीएक पत्रव्यवहार इतका लांबलचक, तत्कालीन स्थितीचा बोधक व नवी नवी माहिती देणारा आहे कीं तो सर्व छापून काढल्यास एक मोठा उपयुक्त ग्रंथच होईल. उदाहरणार्थ सार्वजनिक काकांचा पत्रव्यवहार, देशी मालाच्या संबंधाचा; वारदांचा पत्रव्यवहार, व्यापारासंबंधाचा; वसईकरांचा, पत्रव्यवहार कृषीसंबंधाचा; शामजी कृष्णावर्मांचा पत्रव्यवहार, राजकीय व सामाजिक परिस्थितीचा; विंचूरकरांचा पत्रव्यवहार बहुतेक न्याय निवडण्याचा; रानडे, व पंडित यांचा पत्रव्यवहार पुनर्विवाहा संबंधाचा व लेखन, ग्रंथोत्तेजनाच्या संबंधाचा; असे, अनेक विषयांचे अनेक पत्रव्यवहार आहेत.

## विद्याव्यसन अथवा जुनी माहिती मिळविण्याची आवड.

लोकहितवादींचे वर जे उद्योग सांगितले त्यांहूनही जुनी माहिती गोळा करणें हा उद्योग प्रचंड होय. आधीं नेहमीं लायब्ररींत जाऊन जुने व नवे ग्रंथ चाळून त्यांतील माहिती टिपून घेणें हा तर त्यांचा नेहमींचाच व्यवसाय होता. ते बाजारांत गेले तर बसावयाचें कोठें ? तर जुन्या पुस्तकाच्या दुकानीं ! येथें एकदां स्वारी शिरली म्हणजे तास अर्धातास तरी ग्रंथ चाळल्याशिवाय, व पांच चार तरी पुस्तकें खरेदी केल्याशिवाय बाहेरही पडावयाची नाहींच, असा त्यांचा धारा असे. पण ह्याशिवाय त्यांच्या भेटीस शेकडों लोक येत असत, त्यांजकडून ते जी माहिती मिळवीत ती तर सर्वांपेक्षां ही अधिक आहे. वैदिक आला तर वेदासंबंधीं माहिती, शास्त्री आला तर शास्त्रांतील माहिती, मांत्रिक आला तर मंत्रांतील माहिती, शेतकरी आला तर शेताची माहिती, वैद्य आला तर औषधांचीं माहिती; मुसलमान आला तर मुसलमानी धर्माची माहिती,

ह्याप्रमाणें त्या गृहस्थाला जो जो विषय माहित असेल, त्याचें कांहींना कांहीं तरी टांचण करून घेतल्यावांचून रावबहादुराकडून जावयास परवानगी मिळत नसे. त्यांत एखाद्या शहरांत सरकारी जुने पेशवाईतील दप्तर मिळालें तर मग तें चाळण्याचा त्यांना एक नवाच उद्योग होत असे. इनामकमिशनर असतांना त्यांस गांवोगांवचीं इनामपत्रें,सनदा,व इतर देणग्यांचीं पत्रें पहावयास मिळालीं. त्यावरून पेशवाईतील अनेक प्रकारची माहिती त्यांस मिळाली होती. शिवाय त्यांची स्मरणशक्ति इतकी विलक्षण होती कीं त्या सर्व गोष्टी ते आपल्या रोजिच्या संभाषणांत आपल्या डोळ्यादेखत घडाल्याप्रमाणें हुबेहूब वर्णन करून मनोरंजक रीतीनें सांगत असत.हें आपल्या प्रत्यक्ष अनुभवावरून आम्हांस माहीत आहे. त्यांची नेमणूक जेव्हां सातान्यास झाली, तेव्हां त्यांना सरकारवाड्यांतील जुने दप्तर पाहण्याची संधि मिळली. त्यावेळीं त्या दप्तरांतून त्यांनीं सर्व पेशवाईतील सरदारांच्या घराण्याची इत्थंभूत माहिती मिळविली. प्रत्येक संस्थानिकांचे पूर्वज, कारकीर्द, शिक्के इत्यादि सर्व त्यांनीं टांचून घेतले, त्यांत श्रीमंत पंतप्रतिप्रतिनिधी यांच्या घराण्याचाही इतिहास टिपून घेतला होता. ही बातमी त्यावेळचे पंत प्रतिनिधी यांचे कानावर गेली तेव्हां त्यांनीं गोपाळराव हरींस एक इंग्रजी पत्र लिहिलेलें आहे. तें असें:—

Poona Friday
5 October 866.

Dear Mr. Gopal Rao Hurry,

I tak the liberty to communicate with you on the following subject and beg to be favoured with the important information herein requested.

I have heard from a reliable source that, when you were at Satara, as an assistant to the Inam Commissioner you had colleted from the record of the late Government of Satara and arranged in succession the names of persons in my family from the first up to the year 1840. I therefore have reason to believe that the Dynasty of my family made by you upon the information,obtained from Royal records must be very true. So I shall esteem it a great favour if you will be good enough to furnish me with a copy

of the same at your earliest convenience. I wish to have it inserted in historical information I have written down of my family or ancestors.

I enjoy good health and wish you the same there.

yours faithfully.

श्रीनिवास पंडित प्रतिनिधी.

लोकहितवादींनीं माहितीचा जो साठा केला होता तो किती म्हणून सांगावा ? प्रत्येक राजाची व संस्थानिकांची वंशावळ, शक, शिक्के, कारकीर्द त्यांच्या चमत्कारिक चमत्कारिक गोष्टी इत्यादि ऐतिहासिक माहिती, वेद, शास्त्र, स्मृति, इत्यादिकांतील वेंचे, जुन्या नाण्यांचा संग्रह, प्रत्येक धर्माची माहिती व तत्त्वें, तात्पर्य काय कीं, त्यांच्या संग्रहांत कोणता विषय आला नव्हता असें नाहीं. फार तर काय, घोड्यांच्या जाती, त्यांचे रंग, तांदुळाचे व धान्याचे प्रकार, छपन्न देश,हे तर असोच; पण एके ठिकाणीं रानांत पाले-भाज्या किती आहेत त्यांची यादी आहे, व दुसऱ्या ठिकाणीं सर्पाच्या जाती किती आहेत त्याही दिल्या आहेत. म्हणजे लोकहितवादी प्राचीन व अर्वाचीन शास्त्राचें एक भांडारच होतें, असें म्हटलें तर तिळमात्र अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं. ह्यावरूनच त्यांच्या उद्योगशीलतेची अटकळ करावी आणि भाग्यास चढणारे कीर्तीमान् पुरुष आपल्या काळाचा कसा सद्व्यय करतात याची मनांत खूणगांठ बांधावी. असो.

रावबहादुर गोपाळरावजींस जाऊन आज जवळ जवळ पसतीस वर्षे होऊन गेलीं. त्यांच्या संबंधाचे लेख सुद्धां आजमितीस उपलब्ध नाहींत. तोंडानें ऐकूं येणाऱ्या गोष्टी तर कधींच पार झाल्या. तरी सुद्धां आज त्यांच्या संबंधानें लिहावयाचें तर किती लिहावें व किती न लिहावें असें होऊन जातें. त्यांत उद्योगशीलतेबद्दल तर फारच. त्यांचा उद्योग किती म्हणून सांगावा ? त्यांच्या प्रत्येक कृत्यांत सकाळपासून सायंकाळपर्यंत बहुधा लोकहिताचें कार्य कांहींना कांहींतरी असावयाचेंच. ह्याकरितां आतां हें प्रकरण येथेंच पूर्ण करितों.

## आक्षेप.

मनुष्य कितीही विद्वान् असो; कसाही गुणवान् असो; त्याला कोणीना कोणीतरी नांवें ठेवणारे हे असतातच.प्रत्यक्ष तुकारामासारख्या महासाधूलासुद्धां

रामेश्वर भट भेटलाच ! मग लोकहितवादीसारख्या प्रापंचिक मनुष्याची गोष्ट काय ? गोपाळराव हरींची नेहमींची वागणूक आम्हीं पाहिली होती व बरींच वर्षे त्यांचा सहवासही होता. त्यावरून त्यांच्यासारखा शांत, परोपकारी गृहस्थ फारच विरळा दृष्टीस पडतो असा आमच्या मनाचा ग्रह झालेला आहे. परंतु त्यांनाही नांवें ठेवणारे व त्यांच्या लेखावर टीका करणारेही होते व अजूनही कोठें कोठें पडद्यांतून व आडपडद्यांतून त्यांची छाया अंधुक अंधुक तरी दृष्टीस पडतेच. रा. गोपाळराव हरि यांच्यावर पहिला मोठा आक्षेप इनाम कमिशनरच्या कामासंबंधानें असल्याचें पूर्वींच सांगून त्यांत कितपत तथ्य आहे, ह्याचाही विचार केलाच आहे. हा आक्षेप केवळ 'लोकवार्तेचाच' होता. तेव्हां त्यांत विशेष असें कांहीं नाहीं. व त्याला इतकेंसें महत्त्वही देतां येत नाहीं. पण इतरत्र जे त्यांच्या वर्तनावर, लेखावर टीकात्मक आक्षेप ऐकूं येतात त्यांचा येथें विचार करणें अवश्य आहे. कारण हे आक्षेप लेखी असून ते विद्वान् लेखकाकडून करण्यांत आलेले आहेत. हे आक्षेप प्रसिद्ध दोन मासिक पुस्तककारांचे आहेत. एक ' विविध-ज्ञान-विस्तार ' आणि दुसरें ' निबंधमाला '. विविध-ज्ञान-विस्तार हे ५० वर्षांचें जुनें भारदस्त मासिक असून ते अद्याप चालत आहे. ह्यांत लिहिणारा लेखक एकच नसून त्यांत अनेक लेखकांचे लेख येत असतात. गुंजीकर, पंडित, वागळे वगैरे अनेक लेखकांचें टीकात्मक लेख येत असत. निबंधमालेचें मात्र तसें नाहीं. हें मासिक अवघें सात वर्षे चाललें व पुढें बंद झालें. ह्याचे लेखक एकच असून ते विष्णुशास्त्री चिपळूणकर किंवा धाकटे चिपळूणकर ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. तेव्हां आतां ह्या दोघांच्या आक्षेपांचा क्रमानेंच विचार करूं या.

विविधज्ञानविस्तार मध्यें २५ वर्षांपूर्वी एक लेख प्रसिद्ध झाला होता. त्यांत स्पष्ट नांव असें कोणाचेंच घातलें नव्हतें. तरी पण त्यांत पुनर्विवाह पक्षांवर टीका केलेली होती. पुनर्विवाह पक्षाचे लोक दुसऱ्यास पुनर्विवाह करा असा उपदेश करतात, पण ते स्वतः पुनर्विवाह करीत नाहींत किंवा जे लोक पुढें सरून पुनर्विवाह करतात, त्यांच्याशीं पंक्तिव्यवहार करण्यास सुद्धां भितात. हे ह्या लेखांत मुख्यत्वें करून दाखविलें आहे. पुनर्विवाह करण्याच्या कामांत ज्या सात पुढाऱ्यांनीं सह्या केल्या होत्या,त्यांना ह्या लेखानें'सप्तर्षि' असें म्हटलें आहे. व त्यांतील मुख्य किंवा धुरीण जे दोन असामी त्यांना ' भीष्माचार्य ' व 'द्रोणाचार्य' अशीं नांवें दिलीं आहेत. वयोवृद्ध या नात्यानें 'लोकहितवादी'

किंवा रावबहादुर गोपाळराव हरि देशमुख हे ' भीष्माचार्य ' व रा० महादेव गोविंद रानडे हे ' द्रोणाचार्य ' होत.

भीष्माचार्य म्हणजे लोकहितवादी व लोकहितवादी म्हणजे गोपाळराव हरि देशमुख हें आतां सांगावयास नको. हेच समाजाचे पुढारी म्हणजे महात्मे होत. तेव्हां महात्म्यांच्या अंगीं किती किती गुण असावे लागतात ह्याची कसोटी ह्या लेखकानें ' विपदिधैर्यमथाभ्युदये क्षमा ' ह्या संस्कृत श्लोकाप्रमाणें लावून पाहिली आहे. त्यांत ' विद्याव्यसन ' ' सभेमध्यें पांडित्य ' ' सत्कीर्तीची आवड ' व ' अधिकारसंपन्न असतांना क्षमा ' हे चार गुण त्यांचे अंगीं प्रमुखत्वानें वसत असल्याची तारीफ करून बाकींच्या दोन गुणांचा मात्र अभाव असल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली आहे. हे दोन गुण कोणते ? तर ' विपदिधैर्य ' व ' युधिविक्रम ' हे होत. म्हणजे संकटास तोंड देणें व कसलाही प्रसंग आला तरी न डगमगणें. हे गुण त्यांच्या अंगीं नाहींत. हें कशावरून ? तर लेखक म्हणतात कीं, पुनर्विवाहाच्या कामांत सह्या मात्र दिल्या, पण पुनर्विवाहाचे दंपत्याच्या पंक्तीस भोजनाची वेळ येतांच हातांत ब्याग घेऊन सुरतेचें तिकीट काढलें ! तेव्हां प्रसंगांशीं तोंड देण्याचें ह्यांच्या अंगीं धैर्य नाहीं. परंतु ज्या कालांत पुनर्विवाहाचें नुसतें नांव सुद्धां काढण्याची ब्राह्मण लोकांची प्राज्ञा नव्हती, त्या कालांत प्रसिद्धपणें ज्यांनीं प्रथम सह्या दिल्या व तो पुनर्विवाह प्रसिद्धपणें झाल्यानंतर सर्व 'अब्राह्मण्यं अब्राह्मण्यं' म्हणून काहूर माजलें असतां व शास्त्रीपंडितांची मोठी सभा भरून श्रीशंकराचार्यांच्या देखत पुनर्विवाहाच्या पक्षाच्या शास्त्रसंमतिविपर्यां शहानिशा झाली, त्या वेळेस पुनर्विवाह-पक्षाचे बाजूनें जे उभे राहिले व वादविवादाचा निकाल पुनर्विवाह-पक्षाच्या विरुद्ध झाला असतां त्यांस न जुमानतां बहिष्कार अंगावर घेतला व पुढें तो बरींच वर्षें सोसला, त्यांस विपत्तीमध्यें धैर्य नाहीं असें कसें म्हणतां येईल ? विविधज्ञान-विस्तारांतील लेखकाचें म्हणणें कीं, पुनर्विवाहाच्या दंपत्याच्या पंक्तीला भोजन करण्याचा प्रसंग आला तेव्हां ते सुरतेस तिकीट काढून निघून गेले. हें म्हणणें वंध्यापुत्रवत् किंवा ' ख-पुष्पवत् ' असंभवनीय आहे. कारण लग्नाचे वेळेस ते मुंबईस आलेच नव्हते, हें आम्ही मागें अमदाबादचे शुद्धिपत्रावरून दाखविलेंच आहे; व सुरतेस तिकीट काढून जाण्याचें त्यांस कारणच नव्हतें. कारण ते सुरतेस कधींच व कोणत्याही अधिकारावर नव्हते. तेव्हां वस्तुस्थिति सोडून

कांहींतरी वडबडणें व थोर पुरुषांवर नसता आक्षेप करणें अगदीं अश्लाघ्य आहे. शिवाय त्यांचे वडील वारल्यावर त्यांची जहागिरी जप्त होऊन त्यांच्या सर्व कुटुंबावर जो दारिद्र्याचा प्रसंग आला ती खरी विपत्ति होय. त्या वेळेस त्या प्रसंगास तोंड देऊन व धैर्यानें आपला उद्योग चालवून पुन्हा त्यांनीं संपन्नस्थितीचें शिखर गांठलें, हें "विपदि धैर्य", खरें व प्रशंसनीय आहे. तसेंच पुनर्विवाहाच्या वादविवादाचे वेळचें त्यांचें वागणें व वर सांगितलेल्या कौटुंबिक आपत्तीचे वेळेस नेटानें उद्योग करीत रहाणें हाच खरा 'युधिविक्रम' होय. म्हणून वरील संस्कृत श्लोकांत सांगितलेल्या व महात्म्याचे ठिकाणीं स्वभावतः असणाऱ्या सहा गुणांपैकीं आमच्या चरित्रनायकाचे ठिकाणीं चार गुण आहेत व दोन नाहींत ह्याबद्दल 'विविधज्ञान-विस्तारां'तील लेखकाला दिलगिरी वाटते. ती अनाठायीं आहे, असें आमचें स्पष्ट मत आहे. शिवाय पुनर्विवाह-पक्षाच्या पुढारी लोकांचें असें मत खास नव्हतें व अजूनही नाहीं, कीं आपल्या कन्या, स्नुषा यांजवर दुर्दैवानें वैधव्याचा प्रसंग आला तर त्या प्रत्येकीनें पुनर्विवाह केलाच पाहिजे. तर ज्या कोणी अशा आपत्तींत सांपडल्या असतील त्यांनीं पुनर्विवाह केल्यास समाजाकडून त्यांस अडथळा न व्हावा, त्यांचा छळ होऊं नये, त्यांस निंद्य समजूं नये, येवढाच ह्या समाजसुधारणांचा उद्देश होता, हें अवश्य लक्षांत ठेवलें पाहिजे. अशा प्रकारचा घोंटाळा होऊं नये म्हणून पुनर्विवाह पक्षाच्या लोकांचें जें पूर्वीं 'पुनर्विवाहोत्तेजक' असें नांव होतें त्या ऐवजीं 'विधवा-विवाहप्रतिबंधनिषेधक मंडळ' असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे, हेंही येथें नमूद करून ठेवणें योग्य दिसतें.

अलीकडे थोड्या वर्षांपूर्वी तर 'द्रोण पत्रावळी' व 'पानतंबाखू' वर लुब्ध होऊन विविधज्ञान--विस्तारमध्यें कोणी **देव** या नांवाच्या मनुष्यानें निबंधमालाकारांच्याच 'उष्टया पत्रावळी' गोळा करून लोकहितवादींच्या लेखाबद्दल नसती उठाठेव केली आहे. ज्यांनीं त्यांच्या उदात्त विचाराची शींव सुद्धां पाहिली नाहीं त्यांची कींव करावी तेवढी थोडीच वाटते.

लोकहितवादीच्या लेखावर यथेच्छ टीका करणारे प्रसिद्ध निबंधमालाकार विष्णु कृष्ण चिपळूणकर हे होत. ह्यांनीं इ. स. १८७४ मध्यें निबंधमाला मासिक पुस्तक सुरू केलें, व तें सात वर्षं चाललें. कोणतेंही मासिक किंवा वर्तमानपत्र नवीन सुरू झालें कीं, त्याच्याकडे आपआपले ग्रंथ व पुस्तकें

अभिप्रायार्थ पाठविण्याची प्रत्येकाचीच चाल असते. त्याप्रमाणें लोकहितवादीं-नींही आपला निबंधसंग्रह व इतर पुस्तकें निबंधमालेकडे अभिप्रायार्थ पाठ-विलीं. तरी त्यांजवर बरेच दिवस कांहीं अभिप्राय आला नाहीं व तो निबंधमालेच्या झणझणीत लेखावरून अनुकूल येणें तर शक्यच नाहीं, हें लोकहितवादीही जाणून असलेच पाहिजेत.तथापि कसाही का असेना; आपल्या लेखाबद्दल इतरांचीं मतें तरी काय आहेत तें ऐकण्याची प्रत्येक ग्रंथकर्त्याला जिज्ञासा ही असतेच. त्याप्रमाणें लोकहितवादींनीं पुन्हा त्यांस आपल्या पुस्त-कावर अभिप्राय देण्याविषयीं सूचना केली. तीस मान देऊन निबंधमालाका-रांनीं लोकहितवादींचीं पुस्तकें वाचून निबंधमालेच्या सातव्या वर्षाच्या आरं-भापासून त्यावर टीका करण्यास सुरुवात केली. ती शेवटपर्यंत म्हणजे तब्बल एक वर्ष सुरू होती. अर्थात् त्या एका टीकेनें निबंधमालेचे १२ अंक भरले आहेत. आधीं नवीन विद्वानांचे ग्रंथ म्हटले म्हणजे निबंधमालाकारांची त्यावर चुरचुरीत टीका ही ठेवलेलीच. आणि त्यांत इंग्रजांची, गुणाबद्दल स्तुति केली आणि आपल्या भटभिक्षुकांचें अज्ञान व भोळेपणा बाहेर काढला, कीं निबंधमालाकारांचें माथें फिरलेंच, अशी त्यांची स्थिति होती. मग स्वतः त्यांनीं इंग्रज लोकांची स्तुति केलेली असली, व प्रसंगोपात गोडवे गाइले असले तरी चालत. पण ते दुसऱ्यानें गातां कामाचे नाहींत ! असा त्यांचा स्वभाव होता. लोकहितवादींचे ऐतिहासिक व धार्मिक वगैरे जे इतर ग्रंथ होते त्यावर फारशी टीका करण्यासारखी नव्हतीच: तर टीकेला पात्र असा काय तो 'लोकहितवादी' निबंधसंग्रह येवढा एकच ग्रंथ होता. त्यावरच निबंधकारांनीं आपलें हत्यार उपसून एक वर्षभर यथेच्छ तोंडसुख घेतलें आहे. कारण, त्यांत लोकहितवादींनीं कोठें कोठें इंग्रज लोकांची स्तुति केली आहे व भोळ्या, अज्ञान व अक्षरशत्रु ब्राह्मणांस नांवें ठेविलीं आहेत. ते निबंधमालाकारांस कसें खपणार ? निबंधमालाकार म्हणजे सुप्रसिद्ध विष्णुशास्त्री चिपळूणकर हे होत. हे मोठे कर्तृत्ववान् होते; पाणीदार होते; लेखनपटु होते; विद्वान् होते; आणि त्यांचे अनुयायी तर महाराष्ट्रांत एकाहून एक धुरंधर आहेत. तेव्हां त्यांच्या लेखावर टीका करणें युक्त नाहीं. तथापि लोकहितवादींचे चरित्रकार या नात्यानें त्यांच्या लेखांतील आक्षेपांवर त्यांच्या तर्फेनें काय काय म्हणतां येण्यासारखे आहे,ह्याचा विचार करणें हें एक आमचें कर्तव्यच आहे. ह्यास्तव निबंधमालेंत लोकहितवादींवर मुख्य मुख्य आक्षेप

कोणते घेतले आहेत, व त्यावर लोकहितवादींच्या तर्फेनें काय काय म्हणता येण्यासारखें आहे, ह्याचाही आतां थोडासा विचार करूं.

प्रथमतः लोकहितवादींच्या विद्याव्यसनाबद्दल व त्यांच्या अविश्रांत श्रमाबद्दल निबंधमालाकारांनीच खूप तारीफ केली आहे व नव्या मंडळीनें त्यांचा कित्ता गिरवावा असें म्हटलें आहे.पण पुढें त्यांनीं त्यांच्यावर जो अनिर्वाच्य भडिमार केला आहे त्यामुळें त्यांच्य सर्व गुणावर जणों काय विरजणच पडल्यासारखें दिसतें.कारण तें पुढें म्हणतात. 'खरा देशहितेच्छु म्हटला म्हणजे तो पराकाष्ठेचा निस्पृह असला पाहिजे, तो वचनाचा धड पाहिजे, व कसल्याही संकटाला डगमगतां उपयोगी नाहीं. ह्या कसोटीला आमच्या देशांतील देशहितेच्छु उतरत नाहींत.' देशहिताची कल्पना ज्यांच्या ज्यांच्या मनांत उद्भवते ते ते लोक आपआपल्या बुद्धीप्रमाणें व शक्तीप्रमाणें त्या त्या मार्गाला अनुसरतच होते. मग ' मागील पिढीला ' या गुणांच्या अभावामुळेंच कसें काय अपेश आलें? आणि नव्या पिढीनें कोणती मोठी ध्वजा लाविली ? मागल्या पिढींत कोणी आशाळभूतपणा दाखविला ? इत्तल की बात तित्तल कोणीं केली ? आणि संकट समयीं तरी गयावया करून कोणीं पदर पसरला होता ? हे सारे गुण पुढल्या पिढीच्या कंपूंतच जणों काय भरलेले होते. आणि तोंपर्यंत त्यांचा इकडे जणों काय दुष्काळच पडला होता. तसे तर नाहींच; परंतु उलट " आतां राज-प्रधानाच्या नाकाच्या लवकरच चिरफळ्या उडणार असल्यामुळें त्याची आम्ही अधिक विचक्षणा करीत नाहीं. " अशी वर नाकानें अद्वातद्वा बडबड करून अखेर न्यायमूर्तीसमोर "आम्ही निखालस गैरसमजुतीनें नालस्ती केली याबद्दल आपण आम्हांस क्षमा कराल अशी आशा आहे; आणि इतक्याही उप्पर आपण क्षमा केली नाहीं, तर आम्ही अनन्वित कृत्य केल्या-बद्दल आमच्या जिवास जन्मभरपर्यंत खात राहील." अशी प्रतिपक्ष्यापाशीं करुणा भाकून अखेर सपशेल तोंडघशी पाडणारे ' देशहितेच्छु ' ह्या ' नव्या पिढीच्याच ' कंपूत निर्माण झाले, ही गोष्ट निबंधमालाकारांस काय आम्ही सांगितली पाहिजे ? तात्पर्य, लिहिण्याच्या भरांत मनुष्य किती आडरानांत शिरतो त्याचा 'निबंधमाला' हा एक मासला आहे.

आतां निबंधमालाकारांच्या ' लोकहितवादी ' वरील आक्षेपांचा क्रमानेंच विचार करूं. त्यांचा पहिला आक्षेप हा आहे कीं, 'ग्रंथ हें नांव शोभण्यासारखी स्वतंत्र रचना त्यांचे हातून झाली नाहीं.' 'गुजराथचा इतिहास' 'उदेपूरचा इतिहास'

' सुराष्ट्राचा इतिहास ' ' स्वाध्याय ' वगैरे त्यांचीं पुस्तकें आहेत, तीं ग्रंथ या नांवाला शोभण्यासारखी नाहींतच का? 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रहाचा' नुसता पहिला-भाग घेतला तरी तो सबंध निबंधमालेच्या सात वर्षांयेवढा आहे. तरीसुद्धां ग्रंथाला शोभेशी रचना नाहींच का ? हो, पण ती रचना 'स्वतंत्र ' नव्हती; परतंत्र होती! म्हणजे त्यांच्या इतिहासास इंग्रजी ग्रंथांचा किंवा जुन्या बखरींचा, कागदपत्रांचा आधार होता तेव्हां असे ग्रंथ काय कामाचे ? पण अशा आधारानें ग्रंथ लिहिले म्हणून त्यांना कांहीं किंमतच नाहीं काय ? वामन पंडितांनीं ' यथार्थदीपिका ' ज्ञानेश्वरानीं ' भावार्थ-दीपिका ' लिहिल्या त्या गीतेच्या आधारानें लिहिल्यां आहेत; तरी ते ग्रंथ जगद्वंद्य झालेले नाहींत काय ? आचार्यांचें शारिरभाष्य, ' सायनाचार्यांचें वेदभाष्य, फार लांब कशाला ? शास्त्रीबोवांनीं व त्यांच्या वडिलांनीं केलेले अरेबिअन नाईटस्, रासेलस, अनेक विद्यामूलतत्वसंग्रह, मेघदूत, वगैरे, ही तरी स्वतंत्र रचना कोठें आहे ? म्हणून ते सारे ग्रंथ या नांवाला शोभण्यासारखे नाहींत काय? पण तें असो;त्यांना क्षणभर ग्रंथ असें म्हटलें तरी त्यांची रचना 'ठाक ठिकीची नाहीं;' याचा तरी अर्थ काय? सारीं मुलें एकाच शाळेंत शिक-तात; एकाच पंतोजीचे कित्ते गिरवितात; तरी प्रत्येकाच्या हस्ताक्षराचें वळण हें निराळेंच असतें. तें हुबेहुब माझ्याप्रमाणें असेल तरच तें ठाकठिकीचें, नाहींतर कुचकामाचें, असें म्हटलें तर कसें चालेल ? ' भाषा अलंकृत नाहीं, व ठाकठिकीची नाहीं. ' ह्या म्हणण्यांत अर्थ काय ? प्रत्येकाची लेखनशैली ही निरनिराळी असावयाचीच. विचारसरणी हाच ग्रंथांतील मुख्य विषय होय. मालाकारांच्या वडिलांची भाषा कां घ्याना ? ती **' विराजे सिंदूरे धवलवसने भूपवनिता '** अशी होती. आणि खुद्द मालाकारांची भाषा **' सरसा सालंकारा सुपदन्यासा सुवर्णमय मूर्तिः'** अशी होती म्हणूनच **' विलोकुनि विलासिनी जन पुनः पुन्हा कामुका'** ह्या पंताच्या उक्तीप्रमाणें विलासी मंडळीच्या तिच्यावर उड्यावर उड्या पडत! मूळच्या सौंदर्याची किंमत साधेपणानें कमी होते थोडीच. एखाद्या स्त्रीचे नेत्र-कटाक्ष, विलास व नखरा पाहून लोक कितीही तन्मय झाले तरी साध्या व सुंदर स्त्रीला तूं डोळे कां मोडीत नाहींस ? कंबर कां लचकवीत नाहींस? त्याकरितां तूं हलक्या किंमतीची आहेस, तुझ्याकडे आम्ही ढुंकून सुद्धां पहाणार नाहीं, असें विचारी पुरुष कधींच म्हणणार नाहीं. येवढेंच नव्हे

तर, प्रपंचांत ज्याला सत्कीर्ति मिळवावयाची असेल, तो साध्या स्त्रीलाच अधिक मान देईल. हा जगांतला सुप्रसिद्ध नियम आहे.

पुढें मालाकार म्हणतात ' हीं मागच्या पिढींतील मंडळी इंग्रजी विद्येचा प्रकाश पडतांच फार बहकली होती?' ती कशी काय? तर इंग्रजांचें तितकें चांगलें आणि आपलें तितकें वाईट असें म्हणूं लागली.पण तिनें कां बहकूं नये ? बाजी-रावासारखे दिवटे प्रभु गादीवर येऊन पुण्यपत्तनाचे 'पापपत्तन' करून सोडलें! ' **पायलीची खाईल क्षिप्रा । पालखी द्यावी तया विप्रा** ।'अशी गाजर-पारख सुरू झाली. भूवैकुंठीं जाऊन साक्षात् परब्रह्माच्या साक्षीनें प्रत्यक्ष भूदेवच दिवसाढवळ्या ब्रह्महत्या करूं लागले! युद्धांत जय मिळण्याकरितां अनुष्ठानें बसूं लागलीं. अशा स्थितींत एकाएकीं मागचें सर्व अज्ञान—तिमिर जाऊन नव्या ज्ञानसूर्यानें सारें जग नेत्रांना स्पष्ट दिसूं लागलें. तेव्हां नवें आंग्ल-विचार—विभूषित लोक ' बहकले ' तर त्यांत नवल तें काय ? दुर्दैवानें माला-कारांचा त्यावेळीं जन्मही नव्हता त्यास नाइलाज आहे. नाहीं तर त्यांच्या मालेचाही दर्प बहकून गगनाला जाऊन भिडला असता ! कारण, त्यावेळची वस्तुस्थितीच तशी होती. लोकहितवादींच्या ग्रंथासंबंधानें मालाकार पुढें म्हणतात " निबंधसंग्रहासारखे लेख त्या काळच्या विचारशक्तीस चांगलें खाद्य होतें. पण वरील निबंध सध्याच्या स्थितीला म्हटलें म्हणजे ज्वानींत आलेल्या मनुष्यास जसे बोंडलीं भरभरून दूध पाजावें त्यासारखेच होत. ज्या वयांत भरभक्कम पेलेच्या पेले उठवावयाचे, किंबहुना शक्त्यनुसार चरव्याच्या चरव्या तोंडाला लावावयाच्या, त्या काळाला हे लटुपटीचे खेळासारखे लेख काय उपयोगी ? आतां येवढें खरें आहे कीं, वरील समूहांत माहितीच्या गोष्टी जागोजाग सांपडतील. कांहीं ठिकाणीं मार्मिकपणाचें लिहिणें आढळेल: आणि शुद्ध मराठी भाषा व सुबोधभाषापद्धति यांचाही लाभ होईल. पण येवढ्या महासागरांत डुंबल्याचें फळ एकंदरींत फारच थोडें येईल. "

आतां ग्रंथांत काय असावें हे 'मालाकर' पुढें सांगतातः—

" एक त्यांत नवा मजकूर तरी असावा किंवा जुनाच असला तर तो नव्या तऱ्हेनें लिहिलेला तरी असावा. निबंध--संग्रहांत दोन्ही प्रकार आढळत नाहींत. "

कोणताही लेखक जे लेख लिहितो ते चालू काळास व चालू पिढीस उपयोगी पडतील असेच लिहितो. पुढील काळाकरितां व पुढील पिढीकरितां

तो वहुधा लिहितच नाहीं. तसें करतां येणें त्याला फारसें शक्यही नसतें. पुढील पिढीला ते लेख इतकेसे महत्त्वाचे वाटले नाहींत म्हणून ते कवडीच्या किंमतीचे झाले काय ? ज्ञानेश्वरीमध्यें ' स्वराज्य ' मिळविण्याचा मार्ग नाहीं; किंवा मोरोपंताच्या भारतांत होमरूलबद्दल चर्चा नाहीं, म्हणून ते टाकाऊ झाले काय ? कोणताही ग्रंथ पाहिला तरी तो त्या त्या कालाकरितां व त्या त्या पिढीकरितांच लिहिलेला असतो. पुढच्या पिढीचे लोक मोठे शहाणे निपजले, तरी त्यांच्या शहाणपणाला आद्यग्रंथाचा किंवा मागील पिढीच्या ग्रंथाचा पाया असतो. ' लोकहितवादींचे ' लेख "पेलेच्या पेले गडप्प करणाऱ्या व चर्व्यांच्या चर्व्या तोंडाला लावणाऱ्या वयांत आलेल्या मनुष्यास केवळ बोंडल्यावर बोंडलीं पाजल्याप्रमाणें होत." पण चर्वी तोंडाला लावण्याचें जें सामर्थ्य आलें तें बोंडलीं भरून दूध प्याल्यानेंच आलें ही गोष्ट विसरतां कामा नये. वाडगेच्या वाडगे श्रीखंड पचूं लागलें म्हणून मातेच्या दुधाला नांवें ठेवून कसे भागेल ? पेलेच्या पेले दूध झोंकतां आलें म्हणून आईनें आपल्याला लहानपणीं बोंडल्यानें दूध पाजलें हा वेडेपणा केला असें कोणी म्हणेल काय ?

दुसरें:—लोकहितवादींच्या लेखांत:—

"माहितीच्या गोष्टी पुष्कळ सांपडतात, कांहीं ठिकाणीं मार्मिक लिहिणें आढळतें, शुद्ध मराठी भाषेचा आणि सुबोध भाषेचा लाभ होतो," मग त्यांत नवेपणा नाहीं हें कसें काय ? माहितीच्या गोष्टी सांपडतात आणि त्यांत नवेपणा मात्र नसतो म्हणजे काय ? जुनीच गोष्ट असेल तर तिला माहिती म्हणतात काय ? तसेंच शुद्ध व सुबोध भाषेचा लाभ होतो, पण ती नव्या तऱ्हेनें लिहिलेली नसते म्हणजे तरी काय ? ह्या परस्परविरोधी विधानांची एकवाक्यता कशी काय करावयाची ?

लोकहितवादींचा महासागर मंथन करून मालाकारांनीं त्यांतील सिद्धांतांचें जें सार काढलें तें असें:—

' ब्राह्मण लबाड, ब्राह्मण मूर्ख, ब्राह्मणांनीं देश बुडविला, पंडितांनीं साता समुद्राविषयीं शोध केला नाहीं, हिंदु लोक म्हणजे मेंढरें, संस्कृत विद्या येथून तेथून अप्रयोजक व वेडगळ, तिची हल्लींच्या काळांत कवडीचीही योग्यता नाहीं, धर्माची स्थिति फार खराब झाली आहे, नवा धर्म तयार केला पाहिजे, जुने शास्त्री व भटें मेलीं पाहिजेत, त्यांस छदाम उचलून

देणें म्हणजे निव्वळ पाजीपणा, एतद्देशीय राजेरजवाडे म्हणजे पशू, भट-भिक्षुक लायब्ररींत येऊन ज्ञान संपादन करून घेत नाहींत, ग्रंथास उत्तेजन देत नाहींत, पुनर्विवाह सुरू झाला पाहिजे, विलायतेची महायात्रा करून आलेल्यास सर्वांनीं अग्रासन दिलें पाहिजे, कर्मकांडाच्या खटपटीत बिलकुल अर्थ नाहीं, सर्व गुणांचें निधान काय ते इंग्रज लोक, इ. इ. '

ह्या निष्कर्षरूपी सूत्रांना मालाकारांनीं आपल्या अलंकारिक भाषेंत किती जरी सजविलें असलें तरी त्यांत कोणतें विधान खोटें व चुकीचें आहे ? लोकहितवादी स्वतः ब्राह्मण कुलांतच जन्मलेले होते; असें असून ज्या अर्थी त्यांनीं ब्राह्मणांना नांवें ठेविलीं त्या अर्थी त्यांची त्या वेळची स्थितिच तशी असली पाहिजे हें उघड आहे. इतकेंच नव्हे तर त्यांचीं उदाहरणें त्यांनीं प्रत्यक्ष पुढें मांडलीं असतां त्यांस नांवें ठेवणें म्हणजे दुराग्रहाची शिकस्त झाली असेंच म्हटलें पाहिजे. इतर ठिकाणचें तर लांबच राहो, पण पुण्यांतील ब्राह्मणांनीं सुद्धां अगदीं ताळ टाकला होता. पुण्याचा कोतवाल नुसती लांचच खाऊन राहिला नाहीं, तर तो चोरांच्या टोळींत शिरून दरवड्यांतही सामिल झाला होता, ही गोष्ट तर लोकहितवादींच्या पहिल्याच पत्रांत नमूद केली आहे. शाक्तपंथाच्या नादीं लागून पुण्यांतील त्या वेळचे मोठ मोठे ब्राह्मणही किती नीचपणाचीं कर्में करीत होते हेंही त्यांच्या पुढील पत्रांत दाखविलेंच आहे. ब्राह्मण लोकांच्या नीच कृत्यांची मजल आणखी पुढें किती गेली होती हेंच पहाणें असल्यास त्या वेळचा ज्ञानप्रकाशांतील खालील उतारा पहावाः—

" मागील आठवड्यांत पुण्यांतील शास्त्री यांनीं प्रायःश्चित्त अमृतेश्वराचे देवळीं राघोपंत अवळसकर यांनीं अतिशूद्र जातीच्या स्त्रियेशीं संसर्ग केला होता म्हणून बहिष्कृत कांहीं दिवसामागें शास्त्री यांनींच ठेवलें होतें. सांप्रत कांहीं द्रव्यव्यय होत्साता शुद्ध केलें. याजबद्दल इतर भिक्षुक व शास्त्री यांस द्रव्याचा अंश मिळाला नाहीं त्यांस संताप आला आहे. यास्तव ते कलह करतील असें वाटतें. १५।१०।१८४९

" ज्ञानप्रकाश. "

अशीं त्या वेळच्या ब्राह्मणांचीं कृष्णकारस्थानें किती किती म्हणून सांगावीं ? याचें कारण ' यथा राजा तथा प्रजा ' या म्हणीप्रमाणें शेवटच्या बाजीरावाचे कारकीर्दींत पुण्यांतील ब्राह्मणांची स्थिति झाली होती. तरी सुद्धां

'लोकहितवादींनीं' आपल्या पहिल्या भवानीच्याच पत्रांत ब्राह्मणांची तरफदारीच केली आहे. सर्वच ब्राह्मण कांहीं लबाड नाहींत, यांत निवडानिवडीचा विचार करावयाचा तो तुम्हीच केला नाहींत असा इंग्रज सरकारालाच हितवाद सांगितला आहे. मग अशा वेळीं ब्राह्मणांस 'लबाड.' म्हणूं नये तर काय म्हणावें ? दुसरें, त्यांस लबाड म्हटलें आहे तें कशाकरितां ? तर त्यांनीं नीच कृत्यें करावयाचीं सोडून द्यावींत म्हणून. मग यांत वावगें तें काय ? उलट हा लोकांवर अनुग्रह किंवा उपकारच आहे. दुर्गुण टाकण्याविषयीं बाप मुलाला रागें भरला तर तो निर्दय नव्हे तर त्याच्या कल्याणाकरितांच होय. तद्वत् 'लोकहितवादीं' नींही नीचवृत्तीच्या त्यागाविषयींच जर ब्राह्मणांची निर्भर्त्सना केली, तर तीही सद्धेतुप्रेरित असल्यामुळें यथायोग्यच आहे. शिवाय हा त्यांचा त्यांना उपदेश आहे, अनुग्रह आहे; त्यांची निंदा नव्हे. कारण ब्राह्मण लोकांनीं नीट वागावें, शहाणे व्हावें; आतांचा काळ निराळा आहे; असें सांगणें म्हणजे त्यांच्यावर एक प्रकारचा उपकार करणेंच नव्हे काय ? आणखी तें व्रत त्यांनीं आजन्म निरपेक्ष चालविलें. खरोखर रात्रंदिवस मजुरासारखे खपून दुसऱ्याची निंदा करण्यांत त्यांना स्वतःला एक कवडीचाही फायदा नव्हता. ते आपल्या शतपत्राच्या इत्यर्थांत म्हणतातः—

पत्र नंबर १००

## शतपत्रांचा इत्यर्थः

" वि. वि. मी आपले श्रम या पत्रांत संपूर्ण करणार. आज दोन वर्षे लोकांस त्यांची स्थितिरीति कशी आहे, ती अगदीं भीड न धरतां उघड करून सुचविली. त्यांत एखादें अक्षर अधिकउणें, शुद्धअशुद्ध कोणास वाटलें तर त्यांनीं क्षमा करावी. माझे जिवाची पक्की खात्री आहे कीं, जो कोणी या पत्रांचें अवलोकन करील आणि विचार करून पाहील, त्यास प्रत्येक शब्द खरा आहे असें वाटेल. लोकहितवादीनें कोणाची मजुरी पत्करली नाहीं. कशाची आशा, अपेक्षा किंवा इच्छा धरली नाहीं. कोणाचे सांगण्यावरून व शिकाविल्यावरून कृत्रिम वर्णनें केलीं नाहींत. लाभावर किंवा द्रव्यावर नजर ठेवून कीर्ति व्हावी या हेतूनें लिहिलें नाहीं. इतके श्रम केले ते लोकांस त्यांची स्थिति कशी आहे ती कळावी, त्यांनीं सुधारावें, इहलोकीं सुखवृद्धि व्हावी, परलोकचें साधन घडावें, व आपले बहुत कालापासून दृढ ग्रह झालेले

आहेत, त्यांपैकीं कांहीं अविचारानें व कांहीं मूर्खपणानें जडलेले आहेत ते कमी व्हावेत किंवा नाहींसे व्हावेत, इतक्याच हेतूनें मी यथामतीनें वेतनावांचून श्रम केले आहेत, व जितकें लिहिलें आहे, तितकें सर्व लोकांस नजर आहे. हें लिखित-शतक कोणी बालबोध अथवा मोडी छापून मुलांस लिखितासारखें वाचण्यास देईल तर बहुत नफा होईल. यास्तव या ग्रंथावर लोकहितवादी आपली सत्ता ठेवीत नाहीं. पाहिजे त्यांनीं तीं पत्रें छापून प्रगट करावीं. कितीएक प्राचीन काळचे लोकांस, कितीएक लोकहितवादीचीं मतें विपरीत व सर्व हिंदुधर्मास विपरीत भासतील, परंतु तो त्यांचा मिथ्या भास आहे. कारण कीं, त्यांत हिंदुधर्मास विपरीत कांहीं नाहीं. फक्त मूर्खपणास मात्र विपरीत आहे. याचा नीट विचार केला तर खात्री होईल."

"माझें मागणें सर्व लोकांस असें आहे कीं, मी जें लिहिलें आहे त्याचा विचार करून पहा. तुमच्या चांगल्यावांचून त्याचा दुसरा हेतु नाहीं. तुमचें कल्याण व्हावें म्हणून मी झटतों व तुमच्या चुक्या वगैरे उघड करून दाखविण्यांत रागरोष होईल हें मी मनांत आणलें नाहीं. कारण कीं, माझी उत्कंठा तुमच्या सुधारण्याकडे आहे. माझें अंतःकरण सर्व तिकडे आहे. यास्तव मी जें लिहिलें आहे त्याचा तुम्ही विचार करावा."

"कारण कीं, ज्यानें तुमची सेवा एकनिष्ठपणानें केली, त्याजवर तुमची इतराजी नसावी. किंबहुना तो काय बोलतो हें तरी मनन करावें. अस्तु. तुमची आमची गांठ आज सतत दोन वर्षें होती. याचा मला मोठा आनंद सर्वकाळ वाटेल. सर्वांनीं कृपा लोभ असो द्यावा हे विनंति."

किती एकनिष्ठ प्रेम हें! आणि किती देशबांधवांची कळकळ ही! मालाकार म्हणतात, "खऱ्या देशहितेच्छूच्या अंगीं पराकाष्ठेची निस्पृहता पाहिजे" ह्यापेक्षां आणखी निःस्पृहता ती काय असावी? असें असतां मालाकार पुढें म्हणतात 'यापैकीं बरेच गुण लोकहितवादींच्या ठिकाणीं वसत नाहींत!' अरेरे! हें शतपत्र इत्यर्थाचें पत्र इतकें कळकळीचें, प्रेमाचें, व अंतःकरणाच्या प्रतिबिंबाचें आहे कीं, एखाद्या पाषाणहृदयाला सुद्धां पाझर फुटेल! 'तुमची इतराजी नसावी' हें शेवटचें वाक्य वाचून तर प्रेमानें कंठ भरून येणार नाहीं असा कोण आहे? अशा निरपेक्ष व एकनिष्ठेनें सेवा करणाऱ्या वयोवृद्ध महात्म्याला मालाकारांनीं नाहीं नाहीं ते वाग्प्रहार हेंच अखेर बक्षीस द्यावें ना? आणि तें तरी कशाबद्दल? तर जे सिद्धांत शास्त्रीबुवांनीं आपल्या मालेंत गुंफिले

आहेत तेच सिद्धांत लोकहितवादींनीं आपल्या निबंधसंग्रहांत निराळ्या शब्दांत आणले म्हणून !

असो. ब्राह्मणांच्या लबाडीचीं उदाहरणें पूर्वीं दिलीं. आतां काय ? मूर्ख-पणाचीं पाहिजेत ? तींही कांहीं थोडीं नाहींत. तरी पण लोकहितवादींनीं आपल्या पहिल्या नंबरच्या पत्रांत जें म्हटलें आहे. [ जातींतील सारेच लोक मूर्ख व लबाड असतात असें नाहीं ] तें वाक्य नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे. आधीं आमचे ब्राह्मणशाहीचे प्रभु बाजीराव ! यांचें नांव मूर्खांचे अग्रभागीं घालणें जरूर आहे. कारण समर्थांनीं म्हटल्याप्रमाणें 'मूर्खांमाजी परममूर्ख' ह्या कसोटीस पूर्णपणें उतरणारे असे तेच व 'यथा राजा तथा प्रजा' या नात्यानें बाकीची मंडळीही त्यांची अनुयायी बनली, तर त्यांत नवल काय ?

हे दुसरे बाजीरावसाहेब आपलें राज्य इंग्रजसरकारचे हवालीं करून ब्रह्मावर्तामध्यें "हरि हरि" म्हणत बसले असतां एके दिवशीं इंग्रज सरकार-कडून त्यांस जे सालीना ८ लाख रुपये पेन्शन मिळत असे, तो खजिना उंटावर भरून एक कामदार घेऊन श्रीमंताकडे आला. त्या वेळीं श्रीमंत बाजीराव सकाळचे वेळीं भागिरथीवर स्नानास गेले होते. बाजीरावांची स्नान, संध्या, ब्रह्मयज्ञ म्हणजे मोठें बंडच ! ब्रह्मयज्ञांतील तिलतर्पण सुरू झालें कीं, त्यास प्रतिदिवशीं पोतींच्या पोतीं तीळ लागत असत ! श्रीमंतांनीं अपसव्य केलें कीं, शागीर्द लोक तिळाची धार सारखी तर्पण होईपर्यंत हातावर ओतीत ! हें श्रीमंतांचें पितृतर्पण चाललें आहे, तोंच इंग्रज सरकाराकडून खजिना घेऊन आलेल्या कामगारानें मुजरा केला, व खजिना घेऊन आल्याचें कळवून थैलीचा लखोटा पुढें ठेविला. ब्राह्मण तिलतर्पण सांगण्यास पुढें उभा होताच. त्यास श्रीमंत म्हणाले, ठीक आहे करा संकल्प. भागिरथीवर आलेला खजिना भागीरथीलाच अर्पण होणें योग्य आहे. श्रीमंतांचें मुखांतून आज्ञा निघण्याचा अवकाश कीं, ब्राह्मणांनीं संकल्प म्हटला व श्रीमंतांनीं भागिरथीस सर्व आलेल्या द्रव्याचें उदक सोडलें ! मग काय ! बरोबरच्या परिचारकांनीं नऊ उंट होते ते खालीं बसविले. त्यांच्यावरच्या रुपयांच्या भरलेल्या थैल्या काढल्या, नावा बोलावून आणल्या; व त्यांत ते सारे आठ लाख रुपये भरून भागिरथीच्या मध्यावर नेऊन भराभर ओतून दिले ! ! आणि मग स्वारी वाड्यांत गेली.

विचारा इंग्रज सरकारचा कामगार रिकामे उंट घेऊन कलेक्टरकडे गेला व झालेला सर्व वृत्तांत त्यानें साहेबांस जाहीर केला. कलेक्टर साहेबांनीं ती सर्व गोष्ट इंग्रज सरकारांत जाहीर केली; पण त्या वेळची परिस्थिति निराळी होती, म्हणून इंग्रज सरकारनीं तितका खजिना पुन्हा श्रीमंताकडे पाठवून दिला, व आपल्या कामदारांस सक्त हुकूम दिला कीं, श्रीमंतांचा खजिना केव्हांही गेला तरी श्रीमंत स्नानसंध्येंत असतांना कधींही वर्दी देऊं नये! ही गोष्ट आमच्या वडिलांनीं प्रत्यक्ष ब्रह्मावर्तास पाहिल्याचें सांगितलें. तेव्हां ह्या श्रीमंतांच्या मूर्ख-पणास काय म्हणावें? आठ लाख रुपये निव्वळ पाण्यांत ओतण्यापेक्षां त्याचा दुसरा कोणताच सद्व्यय करतां आला नसता काय? हंडी पडून फुटली तर तिचा खणकर आवाज होतो, म्हणून आपल्या वाड्यांतील साऱ्या हंड्या व झुंबरें फोडणाऱ्याचा हा शहाणपणा का मूर्खपणा? पतीबरोबर पत्नीस जुलमानें सती दवडणें, अर्भक अवस्थेंत कन्येचा वळी घेणें, लहान अर्भकें गंगेस अर्पण करणें, प्रयागास जाऊन देह कर्वतून घेणें, जगन्नाथाचा रथ छातीवरून जाऊं देणें, लक्ष्मी प्राप्त होण्यासाठीं विघ्न घालणें, इत्यादि धर्मबाह्य चाली, ज्या लोकांत चालत होत्या व हल्लीं सुद्धां क्वचित् दृष्टीस पडतात, त्या साऱ्या मूर्खपणाच्या नव्हेत काय? दहा पांच वर्षांपूर्वीं पनवेलीहून एक श्रीमान् बाई वाईस चातुर्मासांत जाऊन ब्राह्मणांस इच्छाभोजन घालूं लागली असतां एका ब्राह्मणानें ओल्या पोफळाच्या सुपारीच्या पोटांत जो मगज असतो त्याची भाजी करावयास सांगितली! तिनें भरा-२ पोफळें आणवून त्यांतील मगज काढून त्याची भाजी करून भूदेवांस तृप्त केलें. हा ब्राह्मणांचा मूर्खपणा नव्हे तर काय त्यास आणखी शिंगें असतात? हीं उदाहरणें आमच्या माहितींतील होतीं तीं आम्हीं दिलीं. लोकहितवादींना त्या कालांत तर हजारों उदाहरणें दिसत असतील. म्हणूनच इतके कळकळीचे व स्पष्ट उद्गार त्यांच्या लेखांतून बाहेर पडले आहेत. मग त्यांच्या म्हणण्यांत खोटेंपणा तो कसा काय?

आतां "ब्राह्मणांनीं देश बुडविला" असे लोकहितवादींनीं म्हटलें असलें तरी त्यांत वावगें तें काय? दिवसा ढवळ्या आपल्या डोळ्यादेखत आपल्या पुतण्याचा खून करून आपणच अर्धे राज्य कबूल करून परकीयांस घरांत घालणारा ही ब्राह्मणच होय. शिंदे होळकरांस न जुमानतां, सुरजमल्ल जाटा-सारख्या साधु पुरुषाचा अपमान करून दिल्लीचे तक्त फोडणारा व

हेकटपणानें फर्जी विरेस घालून अखेर पानपतास प्यादेमात करून घेणाराही ब्राह्मणच होता. मग ब्राह्मणांनीं देश बुडविला म्हटल्याची येवढी चिड तरी कां यावी. ? ' खावें तितकें टाकावें ' ' उष्टयांतलें तूप पुन्हां भंग्यानें बाजारांत विकावयास आणावें ' इत्यादि चार चार करून हुजऱ्याच्या नादास लागून भूवैकुंठास शास्त्रविशारद ब्राह्मणाची हत्या करून अखेर स्वराज्याचें उदक सोडणाराही ब्राह्मणच. ह्या सर्व गोष्टी मालाकारांनीं म्हटल्या तरी चालतात; पण त्या लोकहितवादींनीं म्हणता कामा नये ! सहस्र भोजनें झोडण्यांत, जप जाप्य, अनुष्ठानें करण्यांतच ब्राह्मण मंडळी चूर झाली होती. विलायत म्हणजे काय ? ती कोठें असते ? आपल्यावर राज्यकर्ते इंग्रज आले कोठून? ह्याची त्या वेळीं ब्राह्मण मंडळीस दाद तरी होती काय? दधिसमुद्र आणि क्षीर सागराच्याच गप्पा मारणारे ह्यांस त्यावेळीं लोकहितवादींनीं नकाशाचें ज्ञान करून घ्या,पाश्चिमात्य विद्या किती व कशा पुढें गेल्या आहेत त्या पहा,नकाशा उघडा, म्हणजे तुम्हांला भूगोलाचें यथार्थ ज्ञान होईल, **'धी श्री स्त्रीम्' 'वरासाय्' 'कागुहार्'** हीं सूत्रें पोपटासारखीं म्हणून त्यांचा हल्लींच्या काळीं कांहीं उपयोग नाहीं, असें म्हटलें म्हणून ' ' साता समुद्रापलीकडे जाऊन हे शोध करीत नाहींत, ' अशा अलंकृत भाषेनें त्यांचा उपहास करणें योग्य आहे काय ? न्हाणवली मिरवत चालली म्हणून तिला धरून आणून तिचें वपन करणें, चुन्यानें तोंड भाजलें म्हणून हुजऱ्यास चुना खावयास लावून ठार मारणें, असले संस्थानिक पशु नव्हेत तर पक्षी समजावयाचे कीं काय ? भटाभिक्षुकांनीं भांग्या मारुतीपाशीं जमून घोट्याची तार चढवावयाची, चकाट्या पिटावयाच्या, लोकांच्या टवाळ्या करावयाच्या, शाक्तपंथासारखे पंथ स्वीकारून मांसावर ताव मारावयाचा; त्यापेक्षां तुम्ही लायब्ररींत जाऊन वर्तमानपत्रें वाचा; जगांत काय चाललें आहे तें पहा; शहाणे व्हा; असें म्हटलें तर पातक झालें काय ? लोकहितवादीसारख्यांनीं कपाळकूट केली म्हणूनच पुण्याच्या लायब्ररीची लोकांत आज येवढी बोलबाला चालली आहे. जे लोक विलायतेला जातात ते लोक कांहींना कांहींतरी विद्या-कला घेऊन येतातच. प्रो. परांजपे ' र्‍यांगलर ' झाले, मिशांनीं टाइपांचें यंत्र नवीन काढलें, फाळक्यांनीं सिनेमा आणला, अशा कर्तृत्ववान् पुरुषांस ' अग्रासन ' द्या असें लोकहितवादींनीं म्हटलें म्हणून त्यांत मोठा अपराध झाला काय ? काय हें म्हणणें !

आतां धर्म व कर्मकांड; ह्या संबंधानें आम्ही फारशी चर्चा करीत नाहीं. कारण, पुनर्विवाह कां सुरू करावा व त्यापासून फायदे काय आहेत, ह्या गोष्टी लोकहितवादींनीं आपल्या निबंधांत सांगोपांग सांगितल्याच आहेत. ही गोष्ट मालाकारास कदाचित पसंत नसेल. तेव्हां तसा मतभेद असणें शक्य आहे. तरीसुद्धां पुनर्विवाह सशास्त्र आहे, याबद्दल मालाकारांच्या वडिलांनींसुद्धां शंकराचार्यांपुढें कबुली दिली होती, ही गोष्ट विसरतां कामा नये.

तेव्हां आतां रहतांपैकीं दोनच मुद्दे राहिले. एक ' संस्कृत विद्या येथून तेथून अप्रयोजक व वेडगळ ' आणि दुसरा मुद्दा ' सर्व गुणांचें निधान काय ते इंग्रेज लोक.' संस्कृत विद्या, म्हणजे तर्कशास्त्र अर्थशास्त्र इ० हीं हल्लींच्या काळाच्या अगदीं निरुपयोगी, असें म्हटलें, किंवा इंग्रज लोकांचे जे खरे सद्गुण आहेत त्यांचीं वर्णनें केलीं, व त्यांच्या दीर्घोद्योगाबद्दल तारीफ केली म्हणून लोकहितवादींचें म्हणणें निखालस कवडी मोल ठरेल का ? पण खुद्द ' मालाकार ' शास्त्रीबुवा यांनींसुद्धां प्रत्यक्ष निबंधमालेंतच हीं विधानें केलीं नाहींत काय ? पहाः—चित्रशाळेतील निबंधमालेची नवी आवृत्ती पृष्ठ १८.

" एक तर ह्या शास्त्रांचा [ अर्थशास्त्र, तर्कशास्त्र इ. इ. ] व्यवहार-दृष्ट्या मुळींच उपयोग होत नाहीं. "

पण हेंच विधान लोकहितवादींनीं केलें कीं, तें तुणतुणें होतें ! ह्या प्राचीन विद्या निरुपयोगी आहेत येवढेंच म्हणून मालाकार राहिले नाहींत; तर त्या कशा निरुपयोगी आहेत ह्याचें त्यांनीं स्पष्टीकरण सुद्धां केलें आहे. तें असें म्हणतातः—

' तर्कशास्त्र उत्तम पढलें कीं सर्व खोटीं मतें नाहींशी होऊन मन सत्य-मय होतें असें नाहीं व हें शास्त्र न पढतांही पुष्कळांची सत्यासत्यविवेचन-शक्ति प्रखर असते असेंही पण आढळतें. '

लोकहितवादींनीं ' जुन्या विद्या ' निरुपयोगी म्हटल्या कीं, त्यावर अप-शब्दांची लाखोली वहावयाची आणि स्वतः मात्र तोच मुद्दा अगदीं तिखट-मीठ लावून व फोडणी घालून पुढें ठेवावयाचा; ' म्हणजे ताक नाहीं म्हण-णार, ही सून कोण ? बाई बसा; आज ताक मुळींच उरलें नाहीं. जा बरं ! ' असें म्हणणाऱ्या सासूबाईचाच हा मासला होय.

तसेंचः—" आपल्या मराठी भाषेविषयीं पाहिलें तरी देखील तिच्या संबंधानें मुख्य अचाट काम म्हणजे कोश. या कोशांची [ क्यांडी साहेबांचा इंग्रजी व मराठी कोश व मोल्स्वर्थ साहेबांचा मराठी व इंग्रजी कोश ] योग्यता अज्ञानास्तव व दुरभिमानास्तव मानीत नाहींत. पण आमची अशी खात्री आहे कीं त्यांनीं महाराष्ट्र भाषेवर जे उपकार करून ठेविले आहेत त्यांस पार नाहीं."

हें शास्त्रिबुवांचें म्हणणें. पण तेच जर लोकहितवादी म्हणतील, कीं इंग्रज लोक सर्व गुणांचें निधान, तर हांजीहांजीपणाचा चार्ज मालाकरांनीं ठेवून दिलाच त्यांच्यावर! ह्याचा अर्थ काय ?

" तेव्हां ज्ञानाचे खरे भोक्ते असे एकंदर लोकांचे मानानें पाहातां अगदींच थोडे आहेत, ह्यांत संशय नाहीं. बाकीचे एकंदर लोक अज्ञान व तज्जन्य जे अनर्थ म्हणजे दुर्मतें, आळस, व दुराचार ह्यांत बुडून राहिले आहेत. इंग्लंडांत ज्ञान संपादनाच्या सोयी उत्कृष्ट असल्यामुळें तेथील मजुरांना जें ज्ञान असेल, तें या लोकांपैकीं शहाणे म्हणविणारांनाही नाहीं."

अशी विलायतेंतील विद्यापिठाची शास्त्रीबुवांनीं तारीफ केली तरी चालते, पण त्याच शारदापीठांत प्राविण्य मिळवून आलेल्यास ' अग्रासन द्या ' असें लोकहितवादीनें मात्र म्हणतां कामा नये! आणखीः—" काव्य-ग्रंथांतील रसास्वाद घेण्यास जर हे परस्थ लोक आम्हांस न शिकविते, तर तो आम्हांस कधाही समजता ना यांतही अगदीं संशय नाहीं" [ पृ० २६ ].

" सारांश. अजून आमच्या लोकांत खरे परीक्षक फारच थोडे आहेत व त्यामुळें काव्य म्हणजे काय हें एकंदर लोकांस कांहींच कळत नाहीं" पृष्ठ० २९ ].

" त्यांजपासून [ इंग्रज लोकांपासून ] ग्रहण करण्याचे गुण हे कीं, तक्केलोडाशीं बसण्यांत व इकडची काडी तिकडे न करण्यांत प्रतिष्ठा न मानतां त्यासारखें त्यांनीं व्यायाम करावे, देशाटनें करावीं, [ लोकहितवादींनीं सांगितलेली विलायतेची महायात्रा मात्र नव्हे हो! ] तसेंच अक्षरशून्य व रिकामें रहाण्यांत भूषण न मानतां त्यासारखे विद्यानिपुण होऊन जगांत नांव राखण्याची उमेद धरावी." [ पृ० ६१ ].

लोकहितवादींनीं ह्यापेक्षां निराळें असें काय सांगितलें आहे? आपले लोक आळशी आहेत; त्यांनीं आळस सोडावा, इंग्रजासारखे उद्योगी व

शहाणे व्हावें, हेंच. फार झालें तर शब्दांत थोडासा फेरफार. पण त्यावर मालकारांचा हा शिक्काः—

"पाश्चात्य ग्रंथकारांनीं नांवें ठेवावीं, व लोकहितवादींनीं त्याचें तुणतुणें वाजवावें व आम्ही पाजींतले पाजी व मूर्खांतले मूर्ख म्हणवून घ्यावें, हें किती लज्जास्पद आहे!" [पृ० ९८२]

लोकहितवादींना सांगावयाला पाश्चिमात्य ग्रंथकार कशाला पाहिजेत? त्यांना स्वतःलाच ही स्थिति दिसत नव्हती काय? लोकहितवादींचें तर असोच; पण मालकारांनीं तर पाश्चिमात्यांचें तुणतुणें घेतलें नव्हतें ना? मग त्यांचीही तार त्याच सुरांत कशी काय लागली?

आपल्या देशाची नासाडी आपल्या लोकांनीं अज्ञानानें केली. असें कोणी म्हटलें कीं, मालकारांच्या तळपायाची आग मस्तकांत जाते. हा फक्त कालाचा महिमा म्हटला पाहिजे. त्यांच्या अज्ञानाचें कोणी नांव काढतां उपयोगी नाहीं. यासंबंधानें ते म्हणतात, "जरी हा देश इतका प्राचीन असून आज तो कितीही निकृष्ट स्थितीला पोहोंचला असला तरी त्यांत आश्चर्य मानण्यासारखी गोष्ट मुळींच नाहीं व तशा स्थितींत त्यास नांवें ठेवणें योग्य नाहीं. एकंदर जगाची रहाटी आपण नित्य काय पहातो? उत्पत्ति, स्थिति आणि लय हे अवस्थात्रय पदार्थमात्रास लागूं नये काय? बाल्य, यौवन या अवस्थांस व्यक्तीभूत मनुष्य जसा पात्र तसेंच एकंदर राष्ट्रही पात्र नाहीं काय? 'जमका अजब तडाका' कोणाला सुटला आहे?" [पृ० ५९८१].

म्हणजे मालकारांचें म्हणणें मातृदेशाला जी निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे, तिच्याबद्दल कोणी अवाक्षर काढूं नये. कारण तींत कोणाचा दोष नाहीं. तें कालमाहात्म्य किंवा नशीब आहे. 'जमका अजब तडाका कोणाला सुटत नाहीं' म्हणून आपण होऊन कोणी आत्महत्या करून घेतो काय? होतां होईतों प्राण वांचविण्याविषयीं धडपड करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. त्याच-प्रमाणें आपला देश खालावला आहे, त्याची उन्नति व्हावी अशी ज्याला ज्याला कळकळ उत्पन्न होईल, त्यानें त्यानें आपल्या शक्त्यनुसार व आप-आपल्या विचारानुसार प्रयत्न केला तर त्यांत घातक तें कोणतें?

पण शास्त्रीबुवांना कोणाचेंच कांहीं रुचत नाहीं. ते सरसहा सर्वांचीच कशी बचेरी उडवितात ती पहाः—

" ज्याला त्याला असें वाटूं लागलें आहे कीं, हा आमचा देश एक-दांचा परमोत्कर्षाच्या स्थितीस येऊन पोंचतो कसा ? मग काय, कोणीं कला-कौशल्य हातीं घेतलें, तर कोणीं धर्माच्या सुधारणा करावयाचें पतकरलें, कोणीं नवे माग तयार करून मँचेस्टरबरोबर टक्कर मारण्याला कंबर बांधली, कोणीं पाहिलें कीं, इंग्लंडची येवढी सुधारणा झाली आहे, ती केवळ वक्तृत्वामध्यें झाली आहे, तेव्हां वक्तृत्वाचे वर्ग सुरूं करूं या." [पृ० ३२१].

' बोलेल तो करील काय ? ' या म्हणीप्रमाणें ' वक्तृत्वोत्तेजक ' सभेची थट्टा झाली. पण पुढें ३३३ पानांतील शास्त्रीबुवांचें मत पहा. तें असें आहे:—

" हल्लीं बाबू केशव चंद्रसेनासारख्या एतद्देशीय विद्वानांस प्रकृत कला बरीच साध्य झाली आहे. आतां ज्या ठिकाणीं इंग्रजी विद्येचा बराच फैलाव झाला आहे, तेथें सभांचा वगैरे कसलाही समारंभ झाला तरी थोडेंबहुत बऱ्याच प्रकारें भाषण करणारे लोक कोणीना कोणी तरी असतातच. अस्तु: तर याप्रमाणें हल्लींही वक्तृत्वाचा अंकुर जो फुटलेला दृष्टीस पडतो तो यापुढें असाच जर सतत पोषण पावत गेला, तर येथील जमीनीच्या उत्कृष्ट पिकाउपणामुळें तो पुढें चांगला सरसावत जाईल यांत आम्हांस बिलकुल संशय नाहीं."

एकीकडे अशा बोलघेवड्या लोकांपासून आमच्या देशाची काय सुधारणा होते असें म्हणावयाचें, आणि लगेच मध्यें घटका लोटली नाहीं तोंच हा वृक्ष आमच्या देशाची जमीन सुपीक असल्यामुळें फोंफावत जाण्याबद्दल संदेहही बाळगावयाचा नाहीं. ही तऱ्हा काय ? एके ठिकाणीं:—

" आमचे इकडील वाचक इंग्लंडच्या वायकांच्या तोडीचे होताहेत तोंपर्यंत आपणांत बर्क, मेकाले, ह्यासारखे लिहिणारेही खास निपजतील यांत शंका नाहीं." [ पृ० ८४ ].

अशी मेकॉलेची तारीफ करावयाची; पण पुढें पान १८३ मध्यें पहावें तों मेकॉलेसारखे ' टारगे ' ग्रंथकार म्हणून त्यांच्याच कपाळावर शास्त्रीबुवांच्या तप्तमुद्रेचा डाग ! एकीकडे [ पृ० ३ ] वर पहावें तों ' च्यार्ज ' ' अक्ट ' ' कैदीस संशयाचा फायदा ' वगैरे शब्दांनीं ( घेडगुजरी ) वकील लोक मराठी भाषेचा चिवडा करतात म्हणून निबंधमालाकार सांगतात आणि ' लोकहितवादीं 'च्या निबंधसंग्रहांत ' भटांवर लोकहितवादींचा असा च्यार्ज आहे कीं,' म्हणून ' च्यार्ज ' शब्द आपण स्वतःच वापरतात ! म्हणजे जीं

विधानें मालाकारांनीं स्वतःच केलीं आहेत, तींच विधानें लोकहितवादींनीं केल्याबद्दल त्याजवर ताशेरा झाडतात. तेव्हां या प्रकारास काय म्हणावें बरें ?

" सदोषत्व हें कोणासच इहलोकीं सुटलें नाहीं, " [ पृ० ९८६ ] हें जर खरें तर ' लोकहितवादीनें ' नाना फडणविसांचे दोष दाखविले म्हणून येवढें आकांडतांडव तरी कां ?

' इतिहासाच्या योगानें आपणांविषयीं व इतर राष्ट्रांविषयीं यथार्थज्ञान वाचकास होतें.' [ पृ० ८१ ]

हें जर मालाकारांस संमत आहे, तर भूगोल व नकाशा शिकल्यानें तेंच ज्ञान यथार्थ राष्ट्रीय ज्ञानास कां उपयोगी पडूं नये ? ह्याचा थांग नाना फडणविसासारख्या मुत्सद्द्यासही लागूं नये हा कमीपणा नव्हे काय ? नानाफडणीस मुत्सद्दी होता, ही गोष्ट कोणास कबूल नाहीं ? त्यांच्या अंगचे गुणांचें वर्णन करण्याचा जेव्हां प्रसंग आला, तेव्हां तेव्हां ' लोकहितवादीं 'नींही त्यांचे गुणानुवाद गाइले आहेत. ऐतिहासिक गोष्टी भाग तीनमध्यें ते म्हणतातः—

" नाना फडणीस हा पुरा शहाणा होता. म्हणून तोतया, इंग्रज, दादासाहेब व निजाम या चार मोठ्या मसलतींतून पार पडला."

कित्येक पत्रांत तर नाना फडणीसाच्या कर्तबगारीचे निबंधच्या निबंधच ' लोकहितवादी ' नीं लिहिलेले आहेत. पण लांब कशाला ? ' फड व पेशवाईन्तील हकीकत ' या लेखाचाच निबंधमालेच्या शेवटीं ' लोकहितवादींचा उत्कृष्ट उतारा' म्हणून घेतला आहे, त्यांतच नाना फडणीसाचें स्तोत्र काय थोडें आहे काय ? ' कोणाविषयींही अभिप्राय देणें तो निर्भीडपणानें द्यावा, हेंच देशहिताचें मोठें कार्य आहे. ' हा तर निबंधमालाकारांचा पहिला सिद्धांत. मग तेंच काम इमानें इतबारें केवळ परहितार्थ बजाविलें असतां त्याच मालाकाराकडून मालेच्या जन्मदात्याच्या जन्मापूर्वीचे ' लोकहितवादींनीं ' ' एक पूर्ण संवत्सर तोंडसुख ' हेंच बक्षीस मिळविलें ना ? धन्य आहे जगाची आणि जगाच्या रहाटीची ! दुसरें काय !

एकंदरींत लोकहितवादींसारख्या विचारशील, परोपकारी, बुद्धिमान्, उद्योगतत्पर व सन्माननीय पुरुषावर—नव्हे महात्म्यावर--एखाद्या अज्ञान दुर्विदग्ध लेखकावर ताशेरा झाडल्याप्रमाणें जो ताशेरा झाडला आहे तो कां ? असा सहाजीक प्रश्न उत्पन्न होतो. आणि तोही थोडा थोडका नव्हे तर तब्बल

एक वर्ष ! म्हणजे निबंधमालेचे बारा अंक ! ह्यांतील हेतु काय ? त्यांत त्यांना अनुकूल असा शब्द क्वचितच आढळेल. कित्येक ठिकाणची टीका तर इतकी अप्रयोजक व कुत्सितपणानें भरली आहे कीं, तिची शहानिशा करावयाला आणखी निराळा ग्रंथच करावा लागेल ! आणि सर्वांत चमत्कार हा कीं, निबंधमालेचे हुबेहुब विचार थोड्याशा अन्य शब्दांनीं प्रत्यक्ष निबंधमालेंतच गोंवलेले असूनही त्याच विधानाबद्दल मालाकार लोकहितवादींवर अवाच्या सवा तोंडसुख घेतात, याचा अर्थ काय ? बरें, विचाराबद्दल एक असो; कारण, त्यांत मतभेद असणें शक्य आहे. पण क्षुल्लक बाबतींत सुद्धां तऱ्हा तीच. ह्याचा एकच मासला देतों. [ पान १०१४ ] ' **सांप्रतचें पंडितांचें ज्ञान**,' ह्या निबंधाचा उतारा घेतांना त्यामध्यें एके ठिकाणीं ' तसेंच नैय्यायीकही भांडतात, ' असें वाक्य आलें आहे. त्यांत शिळा प्रेसांतील लेखकाच्या चुकीनें ' नैय्याकई ' अशीं अक्षरें पडलीं असावींत. ही गोष्ट समंजस मनुष्यास सहज कळण्यासारखी आहे. परंतु मालाकारांनीं तो अशुद्ध शब्द जसाचा तसा देऊन त्याच्याखालीं टीप दिली आहे:—

" वरचा शब्द मूळाप्रमाणेंच ठेवला आहे. कदाचित् (!) तो लेख-प्रमादही असेल; तरी रावबहादुरांच्या संस्कृतज्ञानावरून पहातां वरील उत्पत्तीच केवळ करावयास पाहिजे असें नाहीं, असें आम्हांस वाटतें. "

लोकहितवादी संस्कृतांत मोठे पंडित नसतील; कालीदास भवभूतीच्या संस्कृत नाटकांत पोहले नसतील; म्हणून त्यांस ' नैय्याइक ' हा शुद्ध शब्दही माहीत नसेल काय ? एकाद्या ग्रंथकाराचा उपहास करतांना त्या ग्रंथकाराची योग्यता व परिस्थिति मनांत आणणें अगदीं अवश्य आहे.

वेस्ट आणि बुलरच्या हिंदुधर्मशास्त्राचें शेवटील प्रश्नोत्तराचें भाषांतर लोकहितवादींनींच केलें होतें, व त्यास त्या कामाकरतां हायकोर्टांत स्पेशल ड्युटीवर नेमलें होतें. तसेंच संस्कृत सुभाषितांचें भाषांतर करून छापलेलें त्यांचें पुस्तक प्रसिद्धच आहे. ' स्वाध्याय ' ' आगमप्रकाश ' ' निगमप्रकाश ' हींही प्रसिद्ध आहेत. 'गृह्य सूत्रें' वगैरे ग्रंथांचीं भाषांतरें दुसऱ्याकडूनच करविलीं आहेत; परंतु कांहीं त्यांनींही केलेलीं आहेत. अशा लोककल्याणार्थ रात्रंदिवस निरपेक्ष रीतीनें झटणाऱ्या पुरुषाचा असा उपहास करणें ज्ञाता म्हणविणाऱ्यांस शोभत नाहीं. पण हें शास्त्रीबुवास काय होय ? कारण शास्त्रीबुवांचा 'अथ' पासून 'इति' पर्यंत सन्मान्य लोकांस दूषण देण्याचाच बाणा होता. मिशनरी, वरिष्ठ अधि-

कारी, व जोतिराव फुले यांजवर फुलें वाहतां वाहतां मराठी शालापत्रकाचा अस्त होऊन रुपेरी बेडी तोडून स्वैर गतीनें निबंधमाला सुरू झाली. तेव्हां तींत तोच ओघ निष्प्रतिबंध चालू झाला ह्यांत नवल नाहीं. हें तर काय? पण यांनीं आपल्या अनुयायांचा जो नवा कंपू तयार केला, त्यांनीं सुद्धां हें व्रत ' अकुतोभय ' चालविलें! जणों काय देशाचें खरें खरें हित जें काय आहे तें मोठमोठ्या अंमलदारांवर व ग्रंथकारांवर तोंडसुख घेण्यांतच आहे ! अक्षर-शत्रूंच्या अपशब्दांचें नकली रुपांतर कसें असतें तें पहाणें असल्यास ' केस-री' च्या आयाळाच्या प्रत्येक वटेंत दृष्टीस पडतें. एखाद्या सन्माननीय राज-पुरुषाची कीर्ति वाढूं लागली कीं त्यावर 'केसरी' नें झडप घातलीच ! त्यांत इंग्रज सरकारांत त्याची मानमान्यता असली, तर मग काय विचारावयासच नको. मग त्याला ' राजा ' पदवी असो कीं ' महाराजा ' पदवी असो. केसरीच्या गुहेंत ह्या सर्वांची दावण एकच ! कोणाला–

" दिवाण बहादुरांच्या नाकाच्या आतां लौकरच चिरफाळ्या होतील. " म्हण, [ मग प्रत्यक्षतः कोणाच्याही होवोत. ] राजा सर. टी माधवरावासारख्या मुत्सद्यास '**एक पोलिटिकल अत्याबाई,**' म्हणून ढोबळ अक्षरांनीं अग्रमान दे, 'सर' साहेबासारख्या लोकप्रिय व परोपकारी गृहस्थास ' **चोंबडा** ' म्हण, मग त्यांत आपली आयाळ पडो किंवा झडो त्याचा विधिनिषेध नाहीं ! हा जो हटवादीपणाचा गुण अंगीं खिळलेला त्यांच्या कंपूत दृष्टीस पडतो, त्याचाच हा प्रभाव होय. त्यांत मालाकारांनीं जर कांहीं सारासार विचार केला असतां तर असलीं शेलकीं विशेषणें तरी निदान ' लोकहितवादी ' च्या वाट्यास खचित आलीं नसतीं.ह्या नवीन देशहितेच्छु मंडळींच्या मनाचा ग्रहच असा होता कीं, इंग्रज सरकारांत एकनिष्ठेनें व दक्षतेनें कामें बजावून खरोखर प्रसिद्धपणें राव-बहादुरी मिळविणें ही कांहीं खरी रावबहादुरी नव्हे. तर ज्याला 'राजा'सारखी पदवी सार्वभौमसरकार देतें, ज्याची 'रावबहादुर' म्हणून सरकार प्रशंसा करतें, ज्या महात्म्याच्या तेजस्वीपणाला दिपून कोणी असभ्य शब्द तोंडांतून काढूं शकत नाहीं, त्यावर आपण यथेच्छ हव्या तशा उणाख शब्दांचा वर्षाव करून तोंडसुख घेणें, हीच खरी बहादुरी ! !

तेव्हां अशा दुराग्रहानें कलुषित झालेल्या लेखावर उत्तर तरी किती किती व काय काय म्हणून द्यावयाचें? एकदां आमच्या समक्ष एका गृहस्थांनीं राव-बहादुर गोपाळराव हरीशीं बोलतां बोलतां गोष्ट काढली कीं "निबंधमालेमध्यें

आपल्या लेखावर जो येवढा भडिमार केला आहे, त्याला आपण उत्तर कां देत नाहीं? किंवा त्याचा प्रतिकार कां करीत नाहीं?" त्यावर तें थोडेसें हसून म्हणाले " अहो! आधीं माझें लेख कोणी वाचतो कीं नाहीं याचीच मला शंका होती; तो आज माझे लेख सबंध वाचणाराच नव्हे तर त्यावर टीका करणारा भेटला येवढेंच काय कमी झालें?" असो.

तात्पर्य काय, लोकहितवादींसारख्या अविश्रांत व निरपेक्ष रीतीनें लोकसेवेंत, राजसेवेंत, जन्म घालविणाऱ्या परोपकारी, विद्वान, राजमान्य, सन्माननीय, 'माला-कार, हे ज्यांस मुळाप्रमाणें शोभतील, अशा वयोवृद्ध गृहस्थावर शास्त्रीबोवांनीं जो येवढा टीकेचा भडिमार केला—केवळ असामान्य—असा तसा नव्हे—तो निखालस अश्लाव्य आहे. बरें केला तर केला, पण त्यांत तरी कांहीं तथ्यांश? जे विचार लोकहितवादींनीं प्रगट केले आहेत तेच विचार मालाकारांनीं अन्यत्र अलंकृत शब्दांनीं सांगितले आहेत इतकाच काय तो फरक! लोकहितवादींनीं आळशी, दुराचारी, फुकटखाऊ लोकांस पोशिंदे, टोणपे मूर्ख म्हटलें आहे, आणि मालाकारांनीं विद्वान, सन्माननीय, राजवैभव भोगणारास व देशहिता-साठीं रात्रंदिवस झटणारास 'मठ्ठ' 'खप्पी' व 'ज्ञानशून्य' ठरविलें आहे. लोकहितवादींचे ग्रंथ म्हणजे हल्लींचे काळांत बोंडलींभर दुधासारखे आहेत; परंतु तेंच चर्व्याच्या चर्व्या दूध पचविण्याला लागणारें सामर्थ्य द्याव-याला हेंच बोंडलें उपयोगीं पडलें आहे, हे उपकार शास्त्रीबुवांनीं थोडे तरी स्मरावयास पाहिजे होते. तें सोडून देऊन त्यांच्या उपकाराची फेड अशा रीतीनें करणें हा शुद्ध कृतघ्नपणा होय. असो; लोकहितवादींचे श्रम माला-कारांस जरी समजले नाहींत, तरी लोकहितवादींनीं आपल्या **'स्वाध्यायाच्या'** प्रस्तावनेच्या आधीं म्हटल्याप्रमाणें—

**'कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी'**

ह्या भवभूतीच्या उक्तीनुरूप कोठें ना कोठें, कोणी ना कोणी तरी, त्यांच्या लेखाची प्रशंसा करणारे सांपडतीलच सांपडतील ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. कारण, विष पाजून देहांत शिक्षा देणाऱ्या लोकांनींच महासाधु साक्रेटिसाचा सोन्याचा पुतळा करून अथेन्समध्यें बसविला व ते त्याला देवाप्रमाणें पूज्य मानूं लागले; ही, गोष्ट सर्वविश्रुतच आहे.

## गोपाळराव हरि उर्फ 'लोकहितवादी'च्या ग्रंथांचा गोषवारा.

गोपाळरावांनीं सरकारी जबाबदारीचीं कामें निरलसपणें करून इतर सार्वजनिक व लोकोपयोगी कामें किती केलीं तीं सारीं सांगतां येणें तर आम्हांस शक्यच नाहीं. परंतु जेवढीं आमच्या अवलोकनांत आलीं आहेत तेवढीं आम्ही ठिकठिकाणीं सांगत आलोंच आहोंत. पण पुढें पेन्शन घेऊन पुण्यास आल्यावर उतार वयांतही शेवटच्या तेरा वर्षांत तीं तशीच चालू राहिलीं होतीं. इतकेंच नव्हे तर तीं अधिक प्रमाणांत चालू असत. हें आतां आम्हीं थोडक्यांत सांगतों, त्यावरून ध्यानांत येईल. थोर कीर्तिमान् पुरुष जेवढे जेवढे निपजतात तेवढे तेवढे सारे उद्योगशील तर असतातच, पण गोपाळरावहरींच्या प्रचंड उद्योगाबद्दल आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. त्यांचे कट्टे प्रतिपक्षी जे प्रसिद्ध निबंधमालाकार कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर त्यांनीं लोकहितवादींचे फक्त वृद्धापकाळांतीलच उद्योग पाहिले होते. त्या प्रत्यक्ष प्रतिपक्षीयांनीं सुद्धां त्यांच्या उद्योगाची आपल्या मालेंत वाखाणणी केली आहे. ती वाखाणणी अगदीं मनःपूर्वक आहेः—

"लोकहितवादींचे लेख समग्र वाचणें म्हणजे सुद्धां जबरदस्तच काम आहे, मग त्यावर यथास्थित विवेचन करण्यास किती वेळ व किती श्रम पाहिजेत. ××× लोकहितवादी हे स्वदेशहितार्थ उद्योग करूं लागल्यास आज सुमारें चाळीस वर्षें झालीं ××× तरी अद्यापिही त्यांचें वय उतार झालें असतां व राजसेवेचा भार त्यांच्या डोईवरून उतरला असतां त्यांचा लोककल्याणनिमित्तक उद्योग अव्याहत चालू आहेः ×× देशहितार्थ उलाढाल करण्याविषयीं हव्यास, ग्रंथरचना, सभापांडित्य, वगैरेविषयीं हौस हीं सर्व नव्या दमाच्या तरुणबांडांतही आढळणार नाहींत, अशी या वयातील पुरुषाची आजघटकेला तरतरी आहे. सारांश, ह्या सर्व गोष्टींसंबंधानें सर्वांनीं विशेषतः आमच्या अलीकडील कमकुवत मंडळींनीं रावबहादुरांचा कित्ता घेणें अत्यंत उचित होय."

ज्यानें त्यांच्या म्हणजे लोकहितवादींच्या ग्रंथावर 'निबंधमाले' सारख्या सुप्रसिद्ध मासिक पुस्तकांत सारखी वर्षभर टीका केली, त्याच गृहस्थांनीं त्यांच्या उद्योगशीलतेबद्दल इतकी मनःपूर्वक तारीफ केली आहे, ह्यावरूनच त्यांच्या प्रचंड व निरलस उद्योगाची प्रत्येकानें कल्पना करावी. आतां त्यांच्यापैकीं जेवढे उद्योग दृष्टोत्पत्तीस येतात तेवढे क्रमानेंच सांगतों.

लोकहितवादींनीं छापून प्रसिद्ध केलेले व आज आमच्या पहाण्यांत आलेले ग्रंथ पुढीलप्रमाणें आहेत:—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | निबंधसंग्रह. | २ | विद्यालहरी. |
| ३ | एका दिवसांत लिहिलेलें पुस्तक. | ४ | हिंदुस्थानांतील बालविवाह. |
| ५ | आगमप्रकाश. | ६ | निगमप्रकाश. |
| ७ | पानपतची लढाई. | ८ | गीतातत्त्व. |
| ९ | हिंदुस्थानाला दरिद्र येण्याचीं कारणें. | १० | कलियुग. |
| ११ | भिक्षुक. | १२ | हिंदुस्थानचा इतिहास (पूर्वार्ध). |
| १३ | जातिभेद. | १४ | सार्थ आश्वलायन गृह्यसूत्र. |
| १५ | स्वाध्याय. | १६ | सुभाषितें अथवा बोधवचनें. |
| १७ | ऐतिहासिक गोष्टी १-२-३. | १८ | पृथ्वीराज चव्हाण. |
| १९ | उदेपूरचा इतिहास. | २० | गुजराथचा इतिहास. |
| २१ | सुराष्ट्र देशाचा इतिहास. | २२ | लंकेचा इतिहास. |
| २३ | 'लोकहितवादी' मासिकपुस्तक. | | |

लोकहितवादीकृत निबंधसंग्रह भाग १ हा ग्रंथ शिलालेखांत छापला आहे. हा सुमारें ११०० पानांचा ग्रंथ आहे. हा ग्रंथ जीर्ण झाल्यामुळें तो कोणत्या छापखान्यांत छापला व कधीं छापला हें समजण्याला मार्ग नाहीं. परंतु यांतील संग्रहीत निबंधांस सन १८४८ पासून १८५२ पर्यंत सुरवात आहे. व हा ज्याअर्थीं पहिला भाग आहे, त्याअर्थीं त्याचे दुसरे भाग किंवा राहिलेले लेख तरी असले पाहिजेत हें उघड आहे. परंतु ते कोठेंही उपलब्ध नाहींत, याबद्दल दिलगिरी वाटते. हा भाग मिळणें सुद्धां परम दुर्घट होतें. पण त्याची एक सुंदर रीतीनें बाइंडींग केलेली प्रत मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालयांतून मिळाली. याबद्दल आम्ही त्या संग्रहालयाचे फार फार अभार मानतों.

लोकहितवादींच्या प्रत्येक ग्रंथांत प्राचीन माहिती, अर्वाचीन माहिती, आणि बोध हीं तर ओतप्रोत भरलेलीं आहेतच, पण त्यांतूनही त्या कालाची परिस्थिति, रितीभाती, अज्ञानाचे मासले, ग्रंथकाराच्या अंतःकरणाची कळकळ, व पुढील स्थितीचें अनुमान ज्यास पहाणें असेल त्यानें त्यांचा निबंधसंग्रहच पाहिला पाहिजे. ह्यांत नानाविध विषय गोवले आहेत. अमुक एक विषय नाहीं असें नाहीं. फार लांब कशाला? हल्लीं जी होमरूलची किंवा स्वरा-

ज्याची चळवळ जारीनें उपस्थित झालेली दृष्टीस पडते, त्यांचें पूर्ण भविष्य 'लोकहितवादीं'नीं पूर्वीच वर्तविलें होतें. तें अक्षरशः किती अनुभवास येत आहे, पहा.

पत्र नं० ५४ ता. १ एप्रिल १८४९.

## इंग्रजी राज्यापासून फळ.

X [ कांहीं भाग ] या मूर्ख समजुती जातील, आणि हल्लींचा जो वर्ण-संकर आहे म्हणजे वास्तविक ब्राह्मण नसतां ब्राह्मण म्हणवितात, व शूद्र असतां ब्राह्मण म्हणवितात व ब्राह्मण असतां ब्राह्मण म्हणत नाहींत हा वर्ण-संकर मात्र जाईल, आणि व्यवस्थित होईल. या लोकांच्या पायांतील शृंखला तुटतील, हे चोहों देशांत जाऊन व्यापार करतील, विद्वान होतील, व आपले देशांत कापड वगैरे जिन्नस करावयास शिकतील, तेव्हां सुखी होतील. लोक शहाणे झाले म्हणजे हळूंच इंग्रजाजवळ म्हणतील आम्हाला तुमच्या देशांत आहे तसें पार्लमेंट द्या, नंतर आपले लोक त्यामध्यें बसूं लागले म्हणजे हळूंच म्हणतील आम्ही तुम्हासारखे शहाणे आहों मग आम्हास अधिकार कां नसावे. हिंदु लोकांचें बहुमत असें पडलें म्हणजे सरकारास देणें अगत्य आहे. इकडील लोक राज्याचा वगैरे कारभार चांगला करूं लागले, लांच खाण्याचें सोडून दिलें म्हणजे बहुतकरून मोठालीं कामें गव्हर्नरचीं सुद्धां यांचे हातीं येतील. आणि आपले लोक पार्लमेंट आणि स्वराज्य भोगतील. राज्य-कारभारांत त्यांस महत्त्व प्राप्त होईल. असे हे लोक प्रबल झाले म्हणजे इंग्रजांस कांहीं दिवसपर्यंत आभारी मानतील. कारण कीं त्यांचे योगानें हे ज्ञानी झाले. परंतु ज्या काळीं इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांहीं नवीन कानू बसवावयाचा आग्रह धरतील, त्या काळीं अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील. आणि इंग्रजांस सांगतील कीं तुम्ही आपले देशास जावें, आतां आमच्या देशाचा कारभार आम्हाला चांगला करतां येतो, तुमचें गुरुत्व नको. तुम्ही पाहिजे तर व्यापारापुरते इकडे येत जा. आमचे प्रजेचें आम्हीं जसें रक्षण करतों तद्वत् तुमचेंही करूं. परंतु तुमचें वर्चस्व नको. याप्रमाणें या देशाची गति होईल, आणि नवीन राज्यस्थिति चांगल्या प्रकारची होईल. पहिलें अज्ञान अगदीं नाहींसें होईल, यांस

दोनशें वर्षे तरी पाहिजेत, परंतु असें होईल यांत शंका नाहीं. अशी मागले इतिहासावरून कल्पना होते. आणि हें तथ्य आहे अशी खातरजमा आहे.

"लो० हि०"

लोकहितवादींच्या लेखांत लोकांनीं सज्ञान व्हावें, आळस टाकावा, वाईट चाली सोडून द्याव्यात हा नेहमीं इत्यर्थ असे. त्या वेळचे ब्राह्मणांतील अज्ञान पाहून त्यास फार वाइट वाटत असे. व त्यांचे दुराचार पाहून त्यांच्या मनांत संतापही चढे. त्या भरांत ते अशा दुराचारी ब्राह्मणांची स्पष्टपणें निर्भर्त्सना करीत व कधीं कधीं त्यास लागत असे शब्दही योजीत. पण त्याचें कारण, त्यांचा गर्विष्ठपणा नव्हे, तर त्यांचें अंतःकरण लोकहितासाठीं रात्रंदिवस जळत असे. त्याचेंच तें द्योतक असे. ही गोष्ट खालील एक दोन पत्रावरून ध्यानांत येण्यासारखी आहे.

प्रभाकर ता० २३ एप्रिल १८४८.

नंबर ६

## शाक्तमार्ग.

विनंती विशेषः—हिंदूधर्मांत बहुत पंथ आहेत, सरासरी शंभर एक असावे. असेच दुसरे धर्मांतही आहेत. परंतु या पंथापैकीं एक दुर्घट पंथ तंत्राचा आहे. म्हणजे रुद्रयामल व योनींतील तंत्र वगैरे ग्रंथ आहेत त्यांत शक्तिउपासना करण्याचा मार्ग लिहिला आहे. तो बंगाल देशांत व गौड ओरिसा प्रांतांत पूर्वीपासून चालतो. तेथील लोक शक्तिउपासना तंत्राधारानें करतात. म्हणून या देशांत जे लोक मांत्रिक व सामर्थ्यवान् आहेत, अशा गप्पा फार आहेत.त्यांचें खरेंपण व खोटेंपण काय असेल तें असो. त्याचा विचार सांप्रत मी करीत नाहीं. परंतु मला बहुत खेद होतो कीं, तो पंथ अलीकडे दक्षिणेंत पुणें इत्यादि बहुत ठिकाणीं चालूं लागला आहे. त्याचें कारण पाहिलें असतां लक्ष्मी प्राप्त व्हावी, पुत्रकामना इत्यादि वासना तृप्त व्हाव्या म्हणून उपासना करितात, असें शाक्त सांगतात. पण मला वाटतें तें कांहीं नाहीं.

त्यांचीं मद्यमांस खाण्याचीं व्यसनेंच मुख्य आहेत. तीं पुरतीं होण्याकरितां कितीएक निर्लज्जपणानें आपले घरीं दारूचे कारखाने करून मद्य तयार करतात

व कितीएक विकत घेतात. ते जरी गुप्तपणानें असें करितात तरी त्यांचे श्रीमुखाची दुर्गंधी ते जेथें बसतील तेथें प्रगट होऊन हे शाक्त आहेत, असें सर्वांस समजतें व कितीएक मस्त होऊन घरीं व रस्त्यांत सांपडतात. या गोष्टी प्रसिद्ध आहेत. परंतु त्यांच्या प्रतिबंधाचा उपाय कोणी लोक समजून करीत नाहींत. किंबहुना त्याजवर झांकण घालून जो तो म्हणतो कीं, हें आपलें डोकीवर कोणी घ्यावें ? मी तुम्हांस या प्रकरणाचा थोडासा इतिहास कळवितों. तो मीं श्रमेंकरून समजून घेतला आहे. यास्तव हा दुष्ट पंथ सुटण्याकरितां प्रगट व्हावा. ह्या पंथांतील लोकांस वाममार्गी किंवा वामाचारी म्हणतात आणि शाक्त हेंही त्यांचें नांव प्रसिद्ध आहे. प्रथमतः ज्यांस मद्यमांस घ्यावें अशी इच्छा होते, तो, जे दुसरे वाममार्गी आहेत त्यांचे नादीं लागतो. नंतर एक दिवस, बहुधां अमावास्या किंवा अंधारी रात्र अशी, योजितात आणि त्या त्या उमेदवारास आपले धर्मांत घेण्याचा संस्कार करितात. तो असा कीं, त्या दिवशीं मध्य रात्रीस आठ असामी वाममार्गी आणि आठ स्त्रिया-एक एक वेगळाल्या जातीची असावी-म्हणजे विधवा ब्राह्मणी, परटीण, न्हावी, कळवंतीण, गौळीण, कोष्टीण, सोनारीण, ब्राह्मणी सुवासीण, एकूण आठ, त्या गुरुच्या घरीं मिळोन येतात; आणि तेथें स्थंडिल घालून आठ कलश मद्याचे व मांस, असें मांडतात, अग्नि पेटवितात आणि त्याजवर काली म्हणजे देवीची मूर्ति मांडितात. नंतर प्रत्येक पुरुष प्रत्येक स्त्रीच्या जवळ बसतो, आणि पूजा करतात आणि प्रतिज्ञा करितात कीं मी आजपासून जातिनिषेध मानणार नाहीं. मद्यमांस भक्षीन व स्त्री स्वकीय किंवा परकीय यांचे ठायीं निषेध किंवा व्यभिचार मानणार नाहीं. मला सर्व सारखें आहे. येणेंकरून मला भगवती मेल्यावर स्वर्गास नेवो. आणि या जन्मीं सुखसंपदा देवो. अशीं प्रार्थना व प्रतिज्ञा करितात. नंतर पूजा संपूर्ण झाली म्हणजे तंत्रशास्त्रांतील कांहीं उपदेश करितात आणि नित्य पूजेचा मार्ग सांगतात. या नंतर तो वामाचारी दीक्षित झाला. मग त्यानें पुनरपी अंधेरे रात्रीस पूजेचा बेत केला म्हणजे तशा स्त्रिया जमवून ते सोबती जमवून बसावें; स्त्रियास ते भैरवी म्हणतात आणि आपल्यास भैरव म्हणतात व दारूस सिद्ध म्हणतात. अशी विलक्षण नांवें घेऊन कोणी नग्न होऊन नग्न स्त्रियांची पूजा करितात. आणि कितीएक महार आणि मांग यांचे हातचे जेवतात. शिवरात्रीस आणि एकादशीस देखील अशीं कर्में करतात. त्यांचे आणखीही पुष्कळ विधि

असतात. कोणी आपलें कपाळीं कुंकू लावून तांत्रिक टिळकाची खूण वाळगतात. कोणाची खूण तोंडाची घाण असते, मग ते आपल्या मंडळींत आपल्यास मोठें सामर्थ्यवान् म्हणवितात. कोणी म्हणतात आम्ही ज्यांस शाप देऊं, त्यांस मारूं. कोणी म्हणतात आम्हांस देवी दिसते, कोणी म्हणतात आम्ही चिंतूं ते कार्य करूं. अशीं अनेक प्रकारचीं कर्मे तें आपल्या अंगीं भासवितात परंतु वागवीत नाहींत. तेणेंकरून लोकांत निंदेस मात्र पात्र होतात. असे भ्रष्टाकार ब्राह्मण लोकांत हल्लीं चालूं लागले आहेत. त्यांनीं वैदिक मार्ग, अग्निहोत्र ज्ञानप्राप्ति, वेदपरायण, पुराणमार्ग, शालिग्रामपूजा, इत्यादि धरून स्वस्थपणें भगवंताचें भजन करावयाचें तें दिलें सोडून. या नरकवासरूप पंथांत पडून राहिले आहेत. मला तर वाटतें कीं याचें साधन कर्ममात्र आहे. असे जे दुष्ट नीतिभ्रष्ट* असतात, त्यांस ईश्वर शासन केल्यावांचून रहात नाहीं. पेशव्यांचे राज्यांत ब्राह्मणधर्माला कांहीं तरी आळा होता. कारण कीं नियंते होते. परंतु हल्लीं ब्राह्मण अतिशूद्रापेक्षांही वाईट कर्में करवितात. त्यांस कोणी शासन करणारा नाहींसा झाला आहे. जे चार गरीब आहेत ते भितात कीं कोणी अब्रूची अर्जी कोर्टांत करील मग हुकूमनामा होईल.हे कष्ट कोणी भोगावे? परंतु मला वाटतें कीं, अद्यापि वाममार्गी ब्राह्मण फार नाहींत, दक्षिणमार्गी जर सगळे असले तर त्यास ताळ्यावर आणावयास उशीर नाहीं. कितीएक लोकांनीं जेवावयास जाणें सोडलें व कितीएक घरांत बसतात; कोणाच्या घरीं जात नाहींत असे त्रासले आहेत. परंतु कोणामध्यें असा धीर नाहीं कीं सर्वांस बोलावून याचा निर्बंध करून बंदोबस्त करावा आणि मूळचे पवित्र स्थितीवर ब्राह्मणधर्म आणावा. म्हणजे शुद्ध ज्ञानमार्ग, शास्त्रविचार, परमेश्वराचें आराधन करणें इत्यादि मार्ग स्थापावे आणि मंत्रतंत्र व जारणमारण इत्यादि गोष्टी किमयासारख्या अशक्य; परंतु अडाणी लोकांस भुलवण्याकरितां ब्राह्मण लोक प्रतिष्ठा दाखवून दुष्ट कर्में करितात; हीं एकदम बंद होतील तर चांगलें आहे. पूर्वीं इजिप्त देशांत एक मजदाद नामक खोटा पैगंबर होऊन व्यभिचार नाहीं असें मत चालू करीत असे. परंतु नाशिरिवान राजानें त्यास फाशीं दिलें, तेव्हां तें मत आटोपलें. तसें या दुष्ट वाममार्गी लोकांस मोठें शासन झालें.

* या काळीं पुण्यांत शाक्तमार्ग फार लोकांनीं घेतला होता. त्यांस लक्षून हें पत्र आहे. हा मार्ग पुढें कृष्णंभट गोखले यांनीं खटपट करून मोडला.

पाहिजे व यांचीं घरें व रात्रीच्या बैठका यांचा पत्ता लावून नीतीचें रक्षण करणें हें चांगलें. नाहींतर काय होईल तें ईश्वर जाणें. मनुष्याची कल्पना चालत नाहीं. आणखी याविषयीं पुढें मजकूर लिहूं. लो. हि.

ह्याशिवाय ' ब्राह्मणांचें अज्ञान ' ' पुनर्विवाह ' वगैरे विषयावरील अनेक पत्रें फार मनोरंजक, बोधप्रद व तत्कालीन स्थितीचीं दर्शक आहेत. स्थलाभावामुळें तीं तर घेतां येत नाहींतच, तरी ह्या भागांतील अखेरचा 'काळेपाणी' या विषयावरील एक लहानसाच परंतु नव्या माहितीनें भरलेला लेख कसा आहे, ह्याचा मासला देऊन हें प्रकरण आटोपतों:—

## काळेपाणी [ वृत्तवैभव ]

इंग्रजी राज्यांत काळ्या पाण्याची शिक्षा होते हें सर्वांस ठाऊक आहे. परंतु काळेपाणी काय आहे म्हणून विचारतां पुष्कळास ठाऊक असल्याचें दिसत नाहीं व पाहिजे तो पाहिजे तें सांगतो. म्हणून त्याविषयीं थोडीशी माहिती लिहिणें जरूर आहे. काळेपाणी म्हणजे स्वदेशांतून मनुष्यास काढून परदेशांत तुरुंगांत नेऊन ठेवणें. पूर्वीं इंग्रज सरकारचा हा कैदखाना आस्ट्रेलिया बेटांत बाटवें शहर आहे तेथें होता. कैदीस तिकडे पाठवून तिकडील गव्हर्नरचे स्वाधीन करीत. मग जन्मपर्यंत किंवा नेमलीं वर्षेंपर्यंत तेथें त्यास कैदेंत रहावें लागे. पुढें १८५७ सालीं, अंदमान म्हणून हिंदुस्थानचे दक्षिणेस एक बेट आहे, तेथें पूर्वींचे लोकांची वसाहत आहे, पण ते लोक अगदीं रानटी व वानराप्रमाणें जंगलांत फिरणारे, म्हणून त्या बेटांत तपास करण्यास एक कमेटी नेमली होती. नंतर तिनें ठरविले ठिकाणीं एक मोठा तुरुंग बांधला व त्याजवर कारभारी ठेविला आणि तेथें बंडांतील कैदी वगैरे पाठविण्याचा उपक्रम सुरू केला. तेव्हांपासून येथें सुमारें २००० कैदी जमले आहेत. त्यांजकडून रान तोडवून साफ करवितात. प्रथमतः आजारानें तेथें कितीएक लोक मेले; परंतु आतां तितका आजार नाहीं. या बेटावर बंदर चांगलें नाहीं. त्याचें नांव पोर्ट ब्लेअर असें ठेविलें आहे. कप्तान ब्लेअर यांनीं हें बंदर शोधून काढलें आहे, यास्तव त्यांचें नांव त्यास दिलें आहे.

तेथील लोकांचे बंदोबस्ताकरितां व कैदीचे बंदोबस्ताकरितां त्या ठिकाणीं थोडीशी फौजही ठेविली आहे. जंगली लोक अद्याप आहेत तसेच आहेत. व त्यांची भाषा वगैरे पृथकच आहे. ती अद्याप कोणास येत नाहीं. व ते

शेतभात करीत नाहींत. पशुसारख्या वृत्तीनें राहतात व त्यांच्या स्त्रिया नाग-
व्याच असतात.

प्रत्येक युरोपिअन राजाचा काळेपाण्याचा देश नेमिलेला आहे. रशियाच्या राजानें आपला जंगली व वाईट मुलूख सिबिरिया म्हणून उत्तर समुद्राचे कांठीं आहे, तो काळेपाणी ठरविला आहे. तसेंच इंग्रज सरकारचा अम्मल ब्रह्मदेश, चीन, सुमात्रा बेट या ठिकाणीं आहे. तेथील कोर्टें ज्यास काळ्या पाण्याची शिक्षा ठरवितात, त्यांस हिंदुस्थानांतच पाठवितात. यास्तव चिनी व मलाई कैदी हिंदुस्थानांत असतात.

हिंदुस्थानचे कैदी जमले म्हणजे मुंबईत कारभारी आहे तो एक जहाज भाड्यानें घेतो, आणि पहारा देऊन पोर्ट ब्लेअरचे कारभाऱ्याकडे पोंचवून देतो. याप्रमाणें व्यवस्था आहे."

ह्या 'लोकहितवादी' कृत निबंधसंग्रहांत इतके विविध विषय भरलेले आहेत कीं, जिज्ञासू लोकांनीं हा ग्रंथ एक वेळ तरी अवश्य वाचावा. त्यांतील 'लग्नाची चाल' 'नेटिव अंमलदार' 'लांच' 'ब्राह्मणांचे आचार' 'चार वर्णांची सांप्रतची स्थिति' 'पेशवाईतील माहिती' 'कायद्याची माहिती' [ स्टाट्ट लॉ ] इत्यादि प्रकरणें इतकीं वाचनीय आहेत कीं, त्यावरून मिळणारें ज्ञान म्हणजे एका नव्या परीक्षेची तयारी होते. असो. आतां त्यांच्या इतर ग्रंथांतील त्रोटक उतारे देणें म्हणजे सुद्धां दुरापास्त होईल. तेव्हां त्यांतील सारांश तरी थोडक्यांत सांगून पुढील प्रकरणास सुरवात करतों.

१ विचारलहरीः—हेंही एक मोठें प्रकरण असून त्यांत अनेक विषयावर सामाजिक व राजकीय बाबींवर स्फुट लेख आहेत.

२ एका दिवसांत लिहिलेलें पुस्तकः—रविवारच्या एका सुट्टींत ता० १ जून सन १८४९ मध्यें लिहिलेलें हें एक पुस्तक आहे. ह्या प्रतीवर 'ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापलें' असें लिहिलेलें आहे. मग तें पूर्वीं छापलें होतें कां छापावयाचा हेतु होता, हें समजण्यास मार्ग नाहीं.

३ इंग्रजी भाषेतील "The child marriage in India" हा एक मोठा थोरला इंग्रजींत लिहिलेला ग्रंथ आहे.

४ आगम-प्रकाश व निगम-प्रकाश हे दोनीही ग्रंथ आम्हास पहावयास मिळाले नाहींत, याबद्दल दिलगिरी वाटते.

६ लोकहितवादींचा ' हिंदुस्थानचा इतिहास पूर्वार्ध, हा मूळ रेव्ह. जी आय्. ग्लीग. एम्. ए. यांच्या " हिस्टरी ऑफ धि ब्रिटिश एम्पायर इन इंडिया " या पुस्तकाच्या आधारानें लिहिला आहे. ह्यांतील मूळचा विषय तर उत्तम आहेच आहे. पण त्यांतूनही त्याची प्रस्तावना कांकणभर जास्तच आहे म्हटलें तरी चालेल. नुसत्या प्रस्तावनेचींच पृष्ठें ११६ आहेत. ह्यांत मुसलमानी धर्मासंबंधानें व लोकासंबंधानें ओतप्रोत माहिती भरली आहे कीं, तितकी माहिती मुसलमानांचे इतिहासांत तरी वाचावयास मिळेल कीं नाहीं याचा संशय आहे. हींत पैगंबर किती झाले, त्यांच्या कारकीर्दी, इतिहास, कुराणाची साद्यंत माहिती, त्यांतील वाक्यें, मंत्र, मुसलमानी बादशहा, ह्यांचें फार मनोवेधक वर्णन असून मुसलमानी राष्ट्रदर्शक नकाशाही त्यास जोडला आहे. ही माहिती इस्लाम धर्म व मुसलमान रियासतीच्या जिज्ञासूंनीं एकवेळ तरी अवश्यमेव वाचावी. ह्यावरून लोकहितवादींच्या बहुश्रुतपणाची व शोधकबुद्धीची परिपूर्ण साक्ष पटते.

७ स्वाध्यायः—स्वाध्याय म्हणजे ब्रह्मयज्ञ. हें ब्राह्मणांचें नित्यकर्म आहे. ब्रह्मयज्ञ म्हणजे प्रत्येक वेदांतील आरंभींची ऋचा घेऊनच देवतर्पण व पितृतर्पण करण्याची हल्लीं वहिवाट आहे. पण पूर्वीं तसें नव्हतें. नेहमीं वेदाध्ययन करणें हा खरा स्वाध्याय होय. तो कसा करावा ? गुरुगृहवास कसा व किती ? वेद किती आहेत ? ह्या सर्वांच्या आरंभींच्या ऋचा कोणत्या ? ब्राह्मण म्हणजे काय ? अरण्यकें उपनिषदें किती ? घन व जटा कशा असतात ? स्मृती किती व कोणत्या ? मंत्र द्रष्टे कोण ? इत्यादि वैदिक धर्माची यच्चयावत् माहिती देऊन त्यांस अनेक परिशिष्टें जोडिलीं आहेत व त्यांत, याज्ञिक. मंत्र. तंत्र, सत्कर्में, असत्कर्में, ह्यांचें फार मार्मिक वर्णन केलें आहे. आणि शेवटच्या परिशिष्टांत धर्माधर्मविवेचनाची प्रश्नोत्तरावली दिली आहे. हा ग्रंथ वैदिकांनीं तर वाचावाच वाचावा: पण विशेषेंकरून गृहस्थांनीं वाचावा म्हणजे वैदिक धर्माचें पुष्कळ सार कळेल.

८ सार्थ आश्वलायन गृह्यसूत्रः—प्रत्येक मनुष्याच्या जन्मापासून मरेपर्यंत जे जे संस्कार करण्याची वहिवाट आहे त्यांचे मंत्र, विधि व त्यांच्या अर्थाचा खुलासा ह्यांत केला आहे व शेवटीं त्यांत आलेले वैदिक मंत्र देऊन पुढें एक शब्दकोशही जोडला आहे. ह्यावरून हें पुस्तक वैदिक धर्मीयांना किती संग्राह्य आहे हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं.

९ सुभाषित अथवा सुबोध वचनें:—हीं बहुतेक संस्कृत ग्रंथावरून मराठी भाषेंत सुबोध रीतीनें लिहिलीं आहेत. तीं सुशिक्षितांच्या केव्हांही उपयोगाचीं व वक्त्यासही सहायकारक आहेत.

१० ऐतिहासिक गोष्टी भाग १।२।३ ह्यांतील गोष्टी ज्ञानवर्धक तर आहेतच, पण त्यांत इतर जी ऐतिहासिक माहिती आहे ती केवळ निरुपम होय. लोकहितवादींच्या सर्व गुणामध्यें प्राचीन ऐतिहासिक माहितीचा विलक्षण संग्रह व तो नवीन मिळविण्याची हाव हा गुण अत्यंत तारीफ करण्यासारखा होता. प्रसिद्ध निबंधमालाकार विष्णु शास्त्री चिपळूणकर यांनीं यांच्या निबंधसंग्रहावर इतकी लांबलचक टीका केली आहे पण या ऐतिहासिक माहितीच्या संबंधानें त्यांसही मान डोलविणें भाग पडलें. ते आपल्या टीकात्मक अंकाच्या शेवटीं म्हणतात:—

" असो; आतां सरते शेवटीं ' लोकहितवादीं 'च्या निबंधसंग्रहांतला एक दुसरा उतारा वाचकांस सादर करतों. त्यावरून प्रस्तुत ग्रंथकाराच्या गुणांचें वर्णन जें आम्हीं आरंभींच्या उपोद्घातांत केलें आहे त्याची प्रतीति वाचकांस आल्यावांचून राहणार नाहीं.

[ यापुढें त्यांनीं ' फड व पेशवाईतील माहिती,' या निबंधाचा उतारा सुमारें पांच पानें देऊन पुढें ते नामदार साहेबांस विनंती करतात:— ]

"वरील उतारा वाचून कोणांस खेद वाटणार नाहीं कीं,प्रस्तुत ग्रंथकारानें शास्त्रें व पुराणें याविषयीं विवेचन करण्याच्या भानगडींत न पडतां आपल्या देशबंधूस आपल्या बहुश्रुतपणाचा फायदा करून देण्याचें जर मनावर घेतलें असतें तर किती बरें होतें ! "

"तर या गोष्टीविषयीं आमच्या देशबंधूंच्या तर्फेनें नामदार साहेबांस विनंती करून त्यांची रजा घेतों."

प्रत्यक्ष लोकहितवादींच्या प्रतिस्पर्ध्यानें जेव्हां त्यांच्या ऐतिहासिक माहितीची महती गायली आहे, तेव्हां ती किती महत्त्वाची असेल ह्याची वाचकांनींच कल्पना बांधावी.

हे गोष्टीचे आणि उपयुक्त माहितीचे भाग जरी लहान लहानच आहेत तरी त्यांतील ऐतिहासिक भाग इतका महत्वाचा आहे कीं, त्यामुळें कोणत्याही मनुष्याच्या ज्ञानांत नवीन भर पडल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून त्यांच्यांतील कांहीं नमुनें देतो:—

" इंग्रजी ग्रंथांतून तर्जुमे करण्याचें काम पहिल्या प्रथम सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे यांनीं केलें. त्यांचे इसापनीति, बालमित्र हे ग्रंथ फारच लोकप्रिय आहेत. पुढें बापू जोशी साष्टीकर यांनीं ' निघंट ' म्हणून वैद्यशास्त्राचा एक ग्रंथ तयार केला. पुढें छत्रे यांनीं बाळशास्त्री जांभेकर यांस आपलें काम शिकविलें व बाळशास्त्री यांनीं दादोबा पांडुरंग वगैरे मंडळी तयार केली. तशीच इकडे प्रथम ब्यार्व्हीसाहेबांनीं सर्वेची पाहाणी करण्याची विद्या शिकविली, व गणिताचीं बुकेंही प्रसिद्ध केलीं. पुढें डॉक्टर तयार करण्याकरितां बुकें झालीं. आणि त्यानंतर हरी केशवजी, गोविंद नारायण वगैरे पुष्कळ ग्रंथकार तयार झाले व होत आहेत. परंतु हे ग्रंथकर्तृत्वाचें काम अद्यापिही बहुत शिल्लक आहे, व लोकांस अझून त्याबद्दलची असावी तशी रुची नाहीं. व ज्ञानवृद्धींत आपले लोक फार पराङ्मुख व उदासीन आहेत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. "

" पूर्वीचे सूत, पुराणीक व संजय हे भाट जातीचे होते "

" मथुरेंत श्रीविष्णुमंदिर व वृंदावनांत श्रीरंगाचें मंदिर हीं माणिराम पारखजी यांनीं बांधलेलीं आहेत. व तीं फार अद्भुत आहेत. मनिराम पारखजी हे दौलतराव शिंद्यांचे पोतनीस होते, त्यावेळेस त्यांनीं बहुत पैसा मिळविला. सदरील देवळांपैकीं श्रीरंगाचे देवळास ६० लाख रुपये लागले असें म्हणतात. हें देऊळ त्रिचनापल्लीस जें देऊळ आहे त्याचीच प्रत केली आहे. वृंदावनांत नित्यानंद प्रभूचें दुसरें देऊळ आहे तेंही असेंच फार मोठें आहे. हीं देवळें किती भक्कम म्हणून सांगावयाचीं झालीं तर इतकें सांगितल्यानें वाचकांचें समाधान होईल कीं, प्रलयकाळ होऊन गेला तरी हीं देवळें जशींच्या तशींच दिसतील ! "

" कितीएक दिवसपर्यंत कांहीं मनुष्यें सुधारणेचे कामीं अगदीं पुढारी असतात, परंतु पुढें त्यांच्या बुद्धीचा पालट होऊन ते मागें हटून पुनः धर्मभोळ्या लोकांप्रमाणें वागूं लागतात. यांचीं उदाहरणें भास्कर दामोदर पाळंदे, सदाशिव बल्लाळ गोवंडे, बापू रावजी मांडवे, जनार्दन सखाराम गाडगीळ वगैरे आहेत. असा पालट होण्यास वास्तविक काय कारणें असतील तीं असोत."

" तारीख ८।९।१० आगष्ट रोजीं सन १८६८ सालीं अमदाबादेस अतिवृष्टि होऊन प्रचंड वारा सुटला. त्यांत दहा हजार घरें पडलीं.

त्यामुळें मोठी धांदल उडाली, व गरिबागुरिबांना आश्रय नाहींसा झाला. परंतु मुंबई वगैरे बाहेरील ठिकाणची लाख रुपये मदत आल्यामुळें गरिबांचीं घरें पुन्हा सरासरी झालीं. रेलवे, टपाल, तार वगैरे सर्व बंद पडलें होतें. त्या वेळेस तेथें रीचसाहेब कलेक्टर होते."

"श्री. मल्हारराव गायकवाड यांची द्वितीयपत्नी लक्ष्मीबाई हिचें लग्न नवसरीस सन १८७४ मे १७ रोजीं झालें. तेव्हां नवसरीचे सुभे नारायणराव वासुदेव खारकर होते. ह्या लग्नांत बाईही गर्भार होत्या. तरी उखा व शकुंतला या पुराणप्रसिद्ध स्त्रियांच्या दाखल्याखालीं तिच्याशीं लग्न करण्यास चिंता नाहीं असा सोळा शास्त्र्यांनीं मल्हारराव यास शास्त्रार्थ काढून दिला."

"[ अमदाबादचा दुसरा महापूर ] ता० २३ सप्टेंबर सन १८७५ सालीं अमदाबादेस नदीचें पाणी शिरून नदीच्या कडेचीं घरें वाहून गेलीं व माधवपुरा व लष्करी बाजार वगैरेही वाहून गेलीं. हें पाणी अमदाबादेंत दोन दिवस होतें. या जलप्रलयानें वीस लक्षांचें नुकसान झालें. त्या वेळेस बारोडेल साहेब कलेक्टर असून त्या प्रसंगांत उचित अशी मदत सरकारनीं व लोकांनीं केली."

११ उदेपूरचा इतिहासः—ह्यांत माहिती विपुल असून ती इतक्या मनोवेधक रीतीनें लिहिली आहे कीं वाचकांस जणों काय आपण एखादी कादंबरीच वाचीत आहों असें वाटतें. 'राणा संग्रामसिंह' 'उमरावसिंग' 'प्रतापसिंग' इत्यादि शूर वीरांच्या कारकीर्दी इतक्या चित्तवेधक रीतीनें वठल्या गेल्या आहेत कीं जणों काय आपण एखादें वीररसप्रधान नाटकच वाचीत आहोंत असें त्यांत मन तल्लीन होऊन जातें.

१२ गुजराथचा इतिहासः—हा गुजराथी अनेक ग्रंथावरून लिहिला आहे. गुजराथी भाषेंत 'रास' म्हणजे बखर. 'रासमाला' म्हणजे अनेक बखरी, ह्यांच्या आधारानें लिहिला आहे. हा सुमारें ३५० पानांचा ग्रंथ असून त्याचे २९ भाग आहेत. इतका सुलभ इतिहास मराठींत क्वचितच आढळेल.

१३ सुराष्ट्र देशाचा इतिहासः—हा इतिहास गुजराथी ग्रंथावरूनच केला आहे. 'सुराष्ट्र' म्ह० काठेवाड, अर्थात् हा काठेवाडचा इतिहास आहे. ह्याची किंमत अवघी एक रुपया आहे. परंतु इतिहासभक्तांना ह्याची किंमत लाख रुपयांच्या ठिकाणीं वाटेल अशी ह्याची योग्यता आहे. कारण याच्या आंतील माहिती तर महत्त्वाची आहेच पण अखेरीस जी शकवारी जोडिली आहे ती

तर बिनमोल आहे. यादव वंश कधीं बुडाला ? चंद्रगुप्ताची कारकीर्द कधीं झाली ? त्याचा नातू अशोक याची कारकीर्द कधीं झाली ? ह्या गोष्टी केवळ अमृततुल्य आहेत.

१४ लंकेचा इतिहासः—लंका हीच आधीं चमत्कारिक मग तिचा इतिहासही चमत्कारिक असेल ह्यांत संशय तो कशाचा? हा इतिहास ज्या ग्रंथांवरून केला आहे, त्यांतील थोडिशीं वाक्येंच खालीं देतोः—

पाली भाषेंतील वाक्यें, प्रार्थना.

१ नमोतस्स भगवता अरहते समामं बुद्धस्स !

२ बुद्धं शरणं गच्छामि.

३ पानाति पाता वेर माणीसी रवाषदं समाद्या.

४ मुखावादत्ते. इ. इ. इ. इ.

" हिंदुस्थानांत बुद्ध बहुत झाले, जे पुरुष कैवल्यज्ञानी झाले त्यांस बुद्ध म्हणतात. "

" इसवी सनापूर्वी ३० व्या वर्षी तिसू राजा राज्य करीत असतां 'महेंद्र साधू ' हिंदुस्थानांतून लंकेत आला. त्यास महासाधू म्हटलें आहे. ह्यास लंकेंत जाण्याचा दृष्टांत झाला व त्यास विमानांत बसवून लंकेंत देवांनीं नेलें. असें म्हणतात. "

" त्यांत बुद्धाच्या मूर्ति स्थापन केल्या आहेत. देवळाजवळ मठ व धर्मशाळा ठेविल्या आहेत. त्यांस कांहीं सोहोळा करावयाचा असला म्हणजे पांच पन्नास हजार साधू जमतात, त्यांस अन्न पुरवितात. व राजे लोक त्यांचे पंक्तीस वाढावयास येत असतात असें लिहिलें आहे. "

" हतगैन नांवाची १६०० दगडी खांबाची ९ मजली धर्मशाळा बांधली होती ! तींत एक हजार साधू रहावे अशा सहस्र खोल्या आहेत. ही धर्मशाळा तयार झाल्यावर तींत रत्नमाला बांधल्या. मुख्य माजघरांत राजाचें सिंहासन ठेविलें, त्यावर सोन्याचे खांब उभे केले. त्याची उथळी सिंहाचे मुखाची केली. मोत्याचे तुरे बांधले. सिंहासन हस्तिदंती. त्यावर सुवर्ण-छत्र. खालीं किनखापी जाजमें, तक्के मांडून मोठा थाट केला व सोन्याचे भांड्यांत स्वयंपाक करून साधूस जेवण दिलें. ही इमारत तीनशें एकविसांत महासेन यानें पाडून टाकिली. परंतु १००१ मध्यें पराक्रमबाहूनें परत बांधली.

वारंवार राज्यक्रांतीचे वेळीं व देशांत दंगेधोप्याचे वेळीं ह्या इमारतीची बरीच खराबी झाली. हल्लीं त्या इमारतीचे खांब मात्र उभे आहेत, व आतां तिची सर्व शोभा नाहींशी झाली आहे. "

"हल्लीं कलविरा येथें एक तळें आहे त्याचा घेर चाळीस मैल आहे. "

" कितीएक राजांनीं या कामाकरितां इतकें औदार्य केलें कीं, एकदां महितरू येथें मोठी यात्रा होती, तेथें साधू जमावयाचे होते, त्या करितां सात मैलपर्यंत-कदंब नदीपासून डोंगरापर्यंत-बिछायती पसरल्या व त्याजवरून पायघड्या घालून त्यांस चालत आणविलें *"

" किती एक राजे आपण स्वतः शेत नांगरण्यास जात. म्हणजे साधूस स्वकष्टार्जित अन्न पोंचावें आणि पुण्य लागावें हा त्यांचा हेतु होता. किती-एक राजे स्वतः नहराचें पाणी लाटीत. असा त्या काळीं साधूंचा मान होता. "

" रुवान वळीचें देऊळ २७० फूट उंच आहे. त्यावर एके वेळीं तळा-पासून शेंड्यापर्यंत हार लावले होते. त्याचप्रमाणें एकदा महीतळाचें देऊळ जाईच्या फुलांनीं भरून टाकलें होतें. "

" रोमचा आगस्टस बादशहा यांजकडे पांड्य राजाकडून वकील गेले होते. "

अशी अश्रुतपूर्व माहिती सारखी भरलेलीच आहे. ती किती किती म्हणून द्यावी ? ह्यासाठीं ह्या पुस्तकाची ही ' शितावरून भाताची परीक्षा' ह्या नात्यानें महती समजावी.

१५ शिलकी असलेले हस्तलेखः—ह्यांत ' इंग्लिश कारकीर्दीचा इति-हास,' हा ग्रंथ फार मोठा असून ओतप्रोत व अनुभविक माहितीनें भरला आहे, व भाषा नेहमींप्रमाणें अगदीं साधी आहे.

ह्या शिवाय अनेक प्रकारचीं अनेक विषयांवरील टांचणें तर अनेक आहेत. त्यांत संस्कृत शास्त्रार्थ, इंग्रेजीचे उतारे, वगैरे अनेक नव्या नव्या गोष्टींचा समावेश केला आहे.

---

* हिंदुस्थानांतही श्रीकृष्णानें ब्राह्मणांचीं उष्टीं काढलीं, अशी कथा महाभार-तांत आहे. हें पुण्य बाजीरावींत फार वाढलें होतें. परळीवर उत्सव वगैरे होतात तेथेंही अद्यापि नवस करून उष्ट्यांत लोळतात, व हें मोठें पुण्य समजतात.

ह्याशिवाय लोकहितवादींनीं अमदाबादेंतील ' हितेच्छु ' वगैरे गुजराथी पत्रांतून अनेक इंग्रेजी भाषेंत लेख प्रसिद्ध केलेले असल्याचे ऐकूं येतें; पण त्यापैकीं आम्हांस कांहींच उपलब्ध झाले नाहींत. लोकहितवादींच्या अश्रांत उद्योगापैकीं हीं दोन कलमें झालीं. एक सरकारी नोकरी आणि ग्रंथकर्तृत्व. याशिवाय ' लोकहितवादी ' हें मासिक पुस्तक ते चालवीत होते. पण त्यांत सर्व ऐतिहासिक माहिती असल्यामुळें त्यांबद्दल विशेष सांगण्याची अवश्यकता नाहीं.

## दवाखान्याची हकीकत.

लोकहितवादींचा सर्वांत मोठा धर्म म्हणजे गोरगरिबांस औषधपाणी, अन्नवस्त्र व हरएक प्रकारची मदत देणें हा होता. त्यांनीं नेहमीं एक धर्मार्थ दवाखाना घरामध्यें ठेवला होता.त्याकरितां वैद्य वेगळा. औषधखातेंही वेगळेंच. रा. गोपाळरावजींनीं आत्मचरित्राचें स्वदस्तुराचें थोडेसें केलेलें टांचण सांपडलें आहे. त्यांत असा उल्लेख आहे कीं सन १८४८ मध्यें मेहेरबान वार्टीन साहेब, ब्राऊन साहेब, वकील साहेब एजंट ह्यांनीं त्यांस चांगलें सर्टिफिकेट दिलें व पुण्यांत दवाखाना व छापखाना उघडण्याचें कामीं फार मेहनत घेतली , पण छापखाना कोणता तें मात्र समजत नाहीं. तो बहुधा ' ज्ञानप्रकाश ' असावा असें वाटतें. कारण त्यांचा ज्ञानप्रकाशछापखान्याशींच निकट संबंध असल्याचें ऐकिवांत आहे. असो.

ह्या अपल्या धर्मादाय दवाखान्याकरितां कोणाकडून अभ्रकभस्म कोणाकडून लोहभस्म, कोणाकडून गोरखचिंचा वगैरे ते नेहमीं मागवीत असत. खालचीं पत्रें पहाः—

—श्री—

" गोब्राह्मणप्रतिपालक रा. रा गोपाळरावसाहेब

देशमुख—यांसी—

प्रति प्रभाकर वैद्य वाताहणें कसबा-जत, आशीर्वाद उपरि तागाइत मित्ती आषाढ वद्य ११ रोज शनिवार पावेतों उत्तम असो विशेष. सातार मुक्कामीं आपण सांगितल्या प्रमाणें तीन औषधी पाठविल्या आहेत. अभ्रकभस्म १ तोळा, लोहकांतभस्म १ तोळा, सुवर्णमालिनीवसंत १ तोळा दीड

मासा. येणेंप्रमाणें आहेत. पावल्याचें उत्तर यावें. बहुत काय लिहिणें हा आशीर्वाद."

दुसरें पत्र खुद्द गोपाळरावजींनींच बत्तीसशिराळ्याच्या एका गृहस्थास गोरख चिंचा पाठविण्याविषयीं लिहिलेलें आहे, तें असें:—

"आशीर्वाद उपरी गोरख चिंचा पन्नास ५० पाठविण्याविषयीं तुम्हीं येथें आला होता त्या वेळेस समक्ष सांगितलें व दोन तीन वेळ पत्रद्वारें कळविलें; परंतु अद्याप सदर चिंचा पाठविण्याचें तुम्हांस स्मरण होत नाहीं. तरी हें पत्र पावतांच सदरहू चिंचा मिळवून रेलवेपार्सल करून जरूर पाठविणें. कळावें लोभ असावा हे आशीर्वाद."

रावबहादुर गोपाळराव हरि हें प्रत्यहीं लोकोपयोगार्थ किती प्रकारचे उद्योग करीत, हें जर इत्थंभूत सांगूं लागलें तर तें कोणास खरें सुद्धां वाटणार नाहीं. ते स्त्रीशिक्षणाचे मोठे कैवारी असल्यामुळें, व त्यांचे वाली असल्यामुळें पंडिता रमाबाई, सौ० अनुसूया बाई, अनुगीता बाई, सौ० गंगुबाई धुमाळ ह्यांच्या सारख्या विदुषी स्त्रियांचा त्यांच्याकडे नेहमीं कांहींना कांहींतरी पत्रव्यवहार हा असेच. पण ह्याशिवाय कोणी म्हणत आमची मुलगी सासरीं नांदवीत नाहींत, ती आपण नांदवावयास लावा; कोणी म्हणे माझी बायको माझ्याकडे पाठवीत नाहींत, ती पाठवून देण्याची कृपा करावी: इत्यादि बाबतींतही त्यांस रदबदली करावी लागे. ह्यासंबंधाचीं कित्येक पत्रें आम्हांस त्यांचे दप्तरांत सांपडलीं आहेत. पण तीं विस्तारभयास्तव येथें देतां येत नाहींत.

रा. गोपाळराव हरींनी पेन्शन घेतल्यानंतर ते अखेरपर्यंत पुण्यांतच राहिले. मधून मधून त्यांचे चिरंजीव रघुनाथ गोपाळ ऊर्फ तात्यासाहेब व मोरेश्वर गोपाळ ऊर्फ नानासाहेब यांचे जवळ ते मुंबईस कांहीं दिवस राहात असत.

आतां रा. ब. गोपाळराव हरींचें अंतःकरण किती दयाशील असे ह्याविषयीं आम्हीं स्वतःच पाहिलेल्या गोष्टी पुढे देत आहों. त्यांचें कनिष्ठ चिरंजीव लक्ष्मणराव ऊर्फ अप्पासाहेब जे पूर्वीं कलेक्टरच्या कामावर असून हल्लीं पेन्शनर आहेत, त्यांच्या सहवासानें आमची व रावबहादुर गोपाळराव हरींची प्रथम ओळख झाली. त्यांचा आमचा फार घरोबा होता. खुद्द लोकहितवादींची कारकीर्द, त्यांनीं पेन्शन घेतल्यानंतर म्हणजे १८७९ नंतर आम्हीं बरींच वर्षे पाहिली आहे इतकेंच नव्हे. तर त्यांच्या बरोबर फिरण्यासबरण्यास सुद्धां

नेहमीं आम्हीं बरोबर असूं. त्यांवरून हा अनुभव आम्ही लिहित आहोंत. लोकहितवादींना बाहेर पायानीं फिरण्यांचा फार नाद असे. घरीं गाडी घोडे होते तरी ते कधीं गाडींतून जातच नसत.आणि ते सुद्धां सकाळ संध्याकाळच नव्हे तर भर दोन प्रहरीं उन्हांतून फिरण्यासही ते मागें घेत नसत. जातांना मुक्काम म्हणजे बहुतकरून जुन्या पुस्तकाचे दुकानीं. ते एकदां तेथें शिरले कीं तासांचे तास पुस्तकें चाळण्यांत घालवीत. आणि अखेर दहापांच रुपयांची तरी पुस्तकें निवडून काढून तीं विकत घेत. बाहेर निघतांना छत्री सुद्धां घ्यावयाची नाहीं. साधा पोषाख. हातांत एक मोठा सोटा. आणि धोत-राची कांस घातली कीं स्वारी बाहेर पडावयाची. पण ह्याशिवाय बहुधा एक गडी बरोबर असावयाचा. त्याच्या खांद्यावर डाळेचुरमुऱ्याचे एक पोतें व खारकांचें एक लहान गाठोडें, मलमाचा एक मोठा डबा व थोड्याशा मलम-पट्या इतकें सामान असे. कोठेंही रस्त्यांत आंधळा पांगळा दृष्टीस पडला कीं, त्यांस थोडेसे चुरमुरे व एखादी दुसरी खारीक द्यावयाची व पाहून पाहून पैसाही त्यापुढें टाकावयाचा. पण सर्वांपेक्षां दुखणेकरी पाहिला कीं स्वारी उभी राहिलीच. मग त्याला काय होतें याची चौकशी करून औषध जवळ असल्यास द्यावयाचें, नाहींतर बरोबर नांवाच्या छापील कार्डस् असत त्यांपैकीं एक त्याजपाशीं देऊन त्याला घराकडे ये म्हणून सांगावयाचें. महारोगी पाहिला कीं, रावबहादुर थांबलेच. त्यांना रोग्याची किळस म्हणून कधीं येत नसे. हा केवढा थोरपणा आहे? ते त्याच्या पट्या त्यांजकडून काढवून जखमा पाहात, व त्यावर मलम लावावयास देऊन लगेच पट्या बांधीत, व अन्न वगैरे नेण्यासाठीं घरीं ये म्हणून सांगत. हा त्यांचा नित्यक्रम असे. आणखी यापेक्षां दयाशील अंतःकरण तें कसे असावयाचें? आतां दुसरी एक गोष्ट आमच्या समक्षच घडलेली लिहितों म्हणजे त्या महात्म्याची थोरवी कळून येईल.त्यांच्या घरीं नेहमीं घोड्याची गाडी असून त्यावर मारुती या नांवांचा फार वर्षांचा जुना कोचमन होता.तो नेहमीं घोड्याच्या चंदींतील हरबरे काढून चोरून ठेवी, व घरीं जातांना हळूच घेऊन जात असे.ही गोष्ट सर्व मुलांनीं पाहून एके दिवशीं बाबासाहेबांच्या कानावर घातली. [ रावब. गोपाळरावजींस सर्व मुलें बाबासाहेब म्हणत ] तेव्हां ते म्हणाले " उगाच बोलूं नका. त्याला मुद्दे-मालानिशीं धरून इकडे आणा. " ती गोष्ट मुलांना पटली, व तीं त्याच्या पाळतीवर टपून बसलीं. दसरा जवळच आलेला होता. तो एके दिवशीं

मारुतीनें पायली अडीशी हरभरे घोड्याच्या चंदींतले काढून एका धोतरांत बांधून ठेवले,व रात्रीं सर्वांची नजर चुकवून घराबाहेर पडला;तोंच मुलांनीं त्यास धरलें आणि त्या हरभऱ्याच्या गाठोड्यासह त्यास बाबासाहेबासमोर आणलें. आणि त्याच्या हातांतील मोटली सोडून हरभरे दाखविलें व सर्व हकीकत सांगितली. सर्व मुलें भोंवतालीं मजा पहावयास जमलीं होतीं. कारण त्यांना वाटलें कीं मारुतीला आतां खास मार बसणार किंवा निदान कामावरून तरी काढणार. परंतु बाबासाहेबांनीं सर्व ऐकून घेऊन शांतपणानें मारुतीस विचारलें "कायरे, तूं हे घोड्याच्या चंदींतील हरभरे कां चोरलेंस?" तो म्हणाला 'उद्यां दसरा होता म्हणून थोडेसे पोळ्यासाठीं घेतले होते.' बाबासाहेब म्हणाले, "तुला हरभरे पाहिजे होते तर घरांत मागावयाचें होतेंस.असें चोरून कधीं नेऊं नयेत. मुके जनावर उपाशी नाहीं का मरणार? जा; असें पुन्हां घेत जाऊं नको. कोण आहेरे तिकडे? ह्या मारुतीला एक पायलीभर हरभरे द्यावयास सांगा." झालें आटोपलें! मारुतीबोवानें पायलीभर हरभऱ्याची खांदाडी मारली आणि हंसत-मुखानें बिऱ्हाडीं निघून गेला! ह्याचें नांव क्षमा आणि ह्याचें नांव दया! सारीं मुलें बिचारीं चुरमुरे खात उगीच बसलीं. इतकें ज्याचें अंतःकरण दयाळू त्याचे हातून वंशपरंपरेनें चालत आलेलीं इनामें विनाकारण जप्त करून त्यांस भिकेस लावण्याचें व आपल्या मुलाबाळांचे कल्याण करण्याचें कधीं तरी मनांत आलें असेल काय? आतां अधिकाऱ्याच्या आणि कायद्याच्या नात्यानें तसेंही प्रसंग आले असतील हें उघड आहे.परंतु त्याचा दोष लोकहितवादींकडे देणें मुळींच योग्य होणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. कारण, त्या कामावर दुसरा कोणीही अंमलदार येतां तरी तीच दशा झाली असती.

घरांत गाड्या होत्या, घोडीं होतीं, पण गोपाळरावजी बाहेर पडले म्हणजे पायानेंच चालत जावयाचे. मग तें ठिकाण कितीही लांब असो. हें वर सांगितलेंच आहे. त्यांच्या बरोबर असलेलें मनुष्य चालावयास कंटाळें, पण ते कधीं कंटाळत नसत कीं दमत नसत. एकदा त्यांचे बडो-द्याचे जामात श्री० चिंतामणराव नारायण ऊर्फ भाऊसाहेब मुजुमदार हे मुंबईस त्यांच्या येथें आले व बोलतां बोलतां म्हणाले "आपल्याला एकदां कुलाब्याची दांडी पहावयाची आहे." नंतर दुपारीं जेवणखाण झाल्यानंतर गोपाळरावजी बाहेर जावयास निघाले व म्हणाले "तुम्हांस कुलाब्याची दांडी पहावयाची आहेना? चला तर आपण तिकडेच जाऊं." हें ऐकून जामातांनीं

पोषाख घातला व तेही त्यांच्या बरोबर जाण्यास निघाले. त्यांच्या मनांत बाबासाहेबांनीं घरांतील गाडी जोडावयास सांगितली असेल, किंवा आतां सांगतील. पण पुढें पाहतात तों बाबासाहेबांची स्वारी पायानेंच निघाली;तेव्हां त्यांसही मुकाट्यानें त्यांचे मागोमाग चालणें भाग पडलें.बाबासाहेबांच्या नेहमींच्या क्रमाप्रमाणें वाटेंत आंधळ्यापांगळ्यास ग्वारका,पैसे देणें, रोगग्रस्तांस मलमपट्या वाटणें, जुन्या पुस्तकांचीं दुकानें पहाणें हीं कृत्यें होतच होतीं. होतां होतां बाबासाहेबांची स्वारी ४॥ वाजण्याच्या सुमारास एडवर्ड महाराजांचे पुतळ्याजवळ जाऊन पोंचली. त्यांचे जामात भाऊसाहेब मुजुमदार त्यांचे बरोबर चालतच होते ! त्यांना इतक्या लांब चालावयाची संवय कोठची ? त्यांना चालावयाचा कंटाळा आला व पायही थकले. पण आपण होऊन 'गाडी करूं या' असें म्हणावें कसे ? या विवंचनेंत ते होते. इतक्यांत मुंबईतील गोपाळरावांचे स्नेही एक साहेब हायकोर्टचे जज्ज गाडींत बसून चालले होते. त्यांनीं गोपाळरावजींस पाहिलें. त्याबरोबर त्यांनीं आपली गाडी थांबविली व गाडीखालीं उतरून गोपाळरावजींच्या हातांत हात घातला व रीतीप्रमाणें इकडचे तिकडचे कुशलप्रश्न झाल्यानंतर विचारलें कीं " आतां आपण इकडे कोठें निघाला ?" बाबासाहेब म्हणाले " हे आमचे जामात बडोद्याहून आले आहेत, त्यांना कुलाब-दांडी दाखविण्यास जात आहे. " तेव्हां जज्ज साहेब बोललें " मग यापुढें तुम्हीं येथून जाऊन तेथें पोंचणार कधीं व परत येणार कधीं ? याकरितां आपण ही माझी गाडी घेऊन जा.मी दुसरी गाडी करून बंगल्यावर जाईन." गोपाळरावजी नको नको म्हणत होते, परंतु जज्ज साहेब ऐकेनात, त्यांनीं आपल्या कोचमनास गाडी फिरवावयास सांगितली व तींत बसून श्वशुर व जामात कुलाब्याची दांडी पहावयास गेलें ! ह्या गोष्टींत गोपाळरावजींचा साधेपणा व युरोपियन लोकांतील त्यांचा आदर. हीं दोन्हींही व्यक्त होतात. या वेळेस त्यांनीं पेनशन घेतलें होतें.

सन १८७८ मध्यें आम्ही स्कूल ऑफ आर्टमध्यें असतांना देशमुखांचे घरीं आमचें जाणेंयेणें फार असे. एके दिवशीं रविवारीं दुपारीं जेवण झाल्यानंतर बाबासाहेब म्हणाले "आठल्ये ! चला हो, आज तुमचें आर्टस्कूल पहावयास जाऊं. " आम्हीं म्हटले, " आज रविवार, सुट्टी आहे. क्लास वगैरे बंद असतील. " ते म्हणाले " आम्हाला क्लासाशींच काय करावयाचें आहे ? असेल तेंच पाहूं म्हणजे झालें. " असें म्हणून स्वारी निघाली.

डोक्यास तांबडें पागोटें, अंगांत पांढरा अंगरखा, साधें उपरणें, साधा धोतर-जोडा, निऱ्याची कास मारलेली व हातांत एक सोटा, हाच त्यांचा नेहमींचा बाहेर पडण्याचा थाट. गोरगरिबांकरितां, खुर्दा, औषधें, मलमपट्टी खारका वगैरे सरंजाम हा नित्याचाच. त्याप्रमाणें स्वारी बाहेर पडली. आम्हीही पाठीमागून निघालों. दोन प्रहरची बारा वाजावयाची वेळ. उन्ह फार तावत होतें. हें पाहून त्यांचे चिरंजीव डॉ. नानासाहेब ह्यांनीं कोचमनास हाक मारली. व म्हणालें "लवकर गाडी जोड; आणि बाबासाहेब आणि आठल्ये कोटांत चालले आहेत त्यांना गाडींतून घेऊन जा." त्याप्रमाणें तो गाडी जोडून घेऊन आला. तों आम्ही भुलेश्वराच्या कोपऱ्यापर्यंत गेलों होतों. माझ्या मागें कोचमनानें गाडी आणून भिडविली व बाबासाहेबांस सांगण्यास खूण केली. इतक्यांत बाबासाहेबांनींही पाठीमागें पाहिलें आणि त्यास विचारलें, "गाडी कोणी पाठविली ?" तो म्हणाला "नानासाहेबांनीं पाठविली आहे." तेव्हां बाबासाहेब म्हणाले, "जा, ती परत घेऊन: आणि नानाला सांग कीं तुला कोठें बाहेर जावयाचें असल्यास जा, मला गाडी नको. मी पायानेंच जातों." तेव्हां कोचमनचा नाइलाज होऊन गाडी परत घेऊन गेला व आम्ही पुढें निघालों आणि स्कूल ऑफ आर्टच्या अगदीं दाराशीं येऊन पोंचलों. आंतील दरवाजा उघडाच होता. पण त्या दिवशीं सुट्टी असल्यानें आंत जाण्यास परवानगी नव्हती. पट्टेवाला आमच्या ओळखीचाच होता. त्यास आम्ही परवानगी विचारली, पण तो म्हणाला, "साहेबांच्या परवानगी-शिवाय आज कोणास आंत सोडतां येत नाहीं. साहेब खाना खात आहेत ते उठेपर्यंत थांबा." त्यामुळें आमचा नाइलाज झाला. पण बाबासाहेब तेथेंच दरवाज्याच्या पायऱ्यावर बसले आणि म्हणाले, "कांहीं चिंता नाहीं, परवानगी नसेल तर कांहीं नको. आपण येथेंच बसूं." असें म्हणून तेथूनच आंत डोकावून "पेंटिंगचा क्लास कोणता? शेडिंगचा कोणता? मॉडेलचा क्लास कोणता?" असें प्रश्न विचारून तेथूनच जेवढा भाग दिसत होता तेवढ्याचीच ते माहिती करून घेत होते. "साहेब खाना खाऊन उठला, तुम्हांला भेटून यावयाचें असल्यास जा." असें शिपायानें मला येऊन सांगितलें. त्यावेळेस स्कूल ऑफ आर्टवर ग्रिफिथ साहेब हे मुख्य होते. त्यांस मी जाऊन भेटलों, व "रावबहादुर गोपाळराव हरी स्कूल पहावयास आले आहेत व ते खालीं बसले आहेत म्हणून सांगितलें." साहेब जरा रागानें म्हणाले "त्यांस वर कां नाहीं

आणलें?" "पट्टेवाला परवानगी देईना;" असें आह्मी म्हणतांच साहेब धडधड जिना उतरून खालीं आले; त्यांनीं गोपाळरावजींचा हात धरला व तसदीबद्दल माफी मागून आंत आणून त्यांस परमादरानें क्लास व त्यांतील कामें वगैरे दाखविलीं. बागेंतील माळ्याकडून पुष्पगुच्छ आणवून त्यांच्या हातांत नम्रपणानें देऊन त्यांची रजा घेतली. नंतर आम्ही परत जावयास निघालों, तों काळबादेवीच्या रस्त्यावर एक गाडी भेटली. तिच्यामध्यें त्यांचे एक स्नेही युरोपियन कमांडर चालले होते. गोपाळरावांस पाहून त्यांनीं आपली गाडी थांबविली. त्यांच्या हातांत हात घातला व कुशलक्षेम झाल्यावर हल्लीं तुमचा धाकटा मुलगा काय करतो म्हणून विचारलें. ते म्हणाले " त्याला नुकतीच असिस्टंट कलेक्टरची जागा मिळाली आहे. " हें ऐकून साहेबांनीं फार संतोष व्यक्त केला आणि ते पुढें निघून गेले. नंतर जुन्या पुस्तकाच्या दुकानांत बराच वेळ चालना होऊन १०१५ रुपयांचीं पुस्तकें खरेदी करून स्वारी घरीं आली.

## रतलामची दिवाणगिरी.

रावबहादुर गोपाळराव हरींनीं पेन्शन घेतल्यानंतर सन १८८४च्या फेब्रुवारींत रतलामच्या महाराजांनीं मोठ्या आग्रहानें कांहीं दिवस आपलें संस्थानांत सुधारणा करण्याकरितां गोपाळरावजींस दिवाण नेमलें. ह्या कामावर ते एकच वर्ष होते. पुढें त्यांच्याच कृपेनें उदयास आलेले सुप्रसिद्ध शामजी कृष्णवर्मा बॅरिष्टर ॲट लॉ यास आपल्या जागेवर दिवाण नेमण्याविषयीं तेथील महाराजाशीं शिफारस करून त्यांनीं आपल्या कामाचा राजीनामा दिला. त्यांनीं तेथें दिवाणगिरीचें काम कसें केलें तें त्यांस त्यावेळीं तेथील महाराजांनीं पाठविलेल्या पत्रावरून कळण्यासारखें आहे. तें पत्र येणेंप्रमाणें:—

Ratlam 19th February 1885.

Dear Rao Bahadoor,

It is with great reluctance that I have accepted your Resignation of the office of Divan, not only my-self have you pleased but people of all classes also have been satisfied with your work. It is needless for me to say anything in praise of a gentleman, who in his long and usefull ca-

reer has obtained high distinctions from the British Government. I think, however that it will give you great gratification to learn that I am going io appoint in your place your friend Pandit Shamji Krishan Varma B. A. of Balliol College, Oxford and Barister-at-law, who was introduced to me by you last month as a gentleman of high culture and linguistic acquirements. I trust he will fulfil my expectations and do credit to my selection.

Believe me to be yours
very truly,
(signed) Runjit Sing,
Maharaja of Ratlam.

ह्यावरून गोपाळरावजींनीं राजिनामा देतांना रतलामच्या महाराजांना किती वाईट वाटलें, व महाराजाप्रमाणेंच त्यांच्या प्रजेसही ते किती प्रिय होते ह्या दोहोंचीही साक्ष या पत्रांत आहे. शिवाय ज्या शामजी कृष्णवर्माला लहानपणापासून मुलाप्रमाणें सहाय्य केलें होतें, त्याची त्यांनीं आपल्याच दिवाणगिरीच्या जागेवर शिफारस केली, ह्यावरून त्यांचा थोरपणा चांगला व्यक्त होतो.

याप्रमाणें रावबहादुर गोपाळराव हरींनीं सरकारी कामें तर एकनिष्ठतेनें व निरलसपणानें बजावलींच, पण तशींच किंबहुना कांकणभर अधिकच त्यांनीं लोकसेवाही केली. ह्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. त्यांची खरी खरी व निरपेक्ष लोकसेवा म्हणजे त्यांनीं लोकांस वर्तमानपत्रद्वारें केलेला उपदेश होय ! त्यांत आळशी, दुराचारी, दुराग्रही लोकांस झणझणीत अंजन असल्यामुळें ते लेख सामान्य लोकांना आवडत नसत. किंबहुना लोक त्याबद्दल नाकेंच मुरडीत. परंतु त्यांचा स्वभाव कृतींत परोपकारी असल्यामुळें व हजारों लोकांचे त्यांच्या हातून कांहींना कांहीं तरी कल्याण झालें असल्यामुळें पुष्कळ लोकांची त्यांच्या ठिकाणीं पूज्यबुद्धि होती, ही गोष्ट त्यांस ठिकठिकाणीं मिळालेल्या मानपत्रांवरून व मोठमोठ्या लोकांचे पत्रव्यवहारावरूनही स्पष्ट होते. जेथें जेथें त्यांनीं काम केलें, तेथून तेथून निघतांना तेथील रहिवाशांसही वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. रतलामच्या एका मोठ्या व्यापाऱ्याचें पत्र पुढें दिलें आहे. त्यावरूनही लोकहितवादींच्या कारकीर्दीचें चांगलें अनुमान होतें. तें पत्र हें:—

श्री.

श्रीमंत रावबहादुर देशमुख साहेब मु. मुंबई स्वामीमहाराजांचे सेवेसी.

"अपत्यानुरूप कृष्णवल्लभ पुनमचंद बापास मु. रतलाम शिरसाष्टांग नमस्कार विज्ञप्ति विशेष. ता. १ मार्च रोजीं आपणाकडील कृपापत्र आलें तें पावलें. पत्र पाहून जो परमावधीचा आनंद झाला तो पत्रीं लिहूं शकत नाहीं. असेंच वरचेवर पत्र पाठविण्याची कृपा करतील. हल्लीं येथील सर्वप्रकारचे भारग्वाईचे वगैरे सर्व विचार पूर्वीच्या पत्रांत लिहिल्याप्रमाणेंच आहेत. आपण येथून गेल्यापासून जी उदासीनता आम्हां शहरवासी लोकांत आली आहे, ती शांत होण्यास कांहीं उपाय सुचत नाहीं. हल्लींचे कारकीर्दींत सर्व नाखूष असून आजपर्यंतचे कारकीर्दींत कांहीं एक काम करण्याचा प्रकार लिहिण्यासारखा दिसून आला नाहीं. हल्लीं दिवसेंदिवस आपल्या भेटीची उत्कंठा विशेष होत आहे. याकरितां मर्जीनुरूप लिहून कळवितील त्याप्रमाणें आम्हां उभयतां बंधूंच्या येण्याचा विचार झाला आहे. हल्लीं आम्ही येथें एक अशी शुभवार्ता ऐकली आहे कीं, जयपुरास आपली स्वारी येणार आहे. हें ऐकून येथील सर्व शहरवासी लोक खूष झाले आहेत; तरी या पत्राच्या खरेपणाविषयींचा मजकूर पत्रोत्तरीं कळविण्याची कृपा व्हावी, ही फार आशा आहे. श्यामजीभाई दिवाण हे हल्लीं इंदुरास साहेबांना आणण्याकरितां गेले आहेत. वरकड मजकूर लिहिण्यासारखा नाहीं. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना."

रतलामच्या दुसऱ्या एका पत्रांत तेथें झालेल्या अग्निप्रळयाचें वर्णन आहे म्हणून तेंही पत्र येथें देतों:—

श्री

श्रीमंत कृपासागर राजमान्य राजश्री गोपाळरावजी देशमुख स्वामींचे सेवेसी—

कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. बहुत दिवस पत्र नाहीं. अशी अवकृपा होऊं नये. पत्रोत्तरीं सांभाळ होऊन बुद्धिवाद होत असावा. इकडील मजकूर माझी बदली रतलामसरकारनें येथील वकिलीच्या जागेवर ता० १ एप्रिलपासून केली आहे. त्याप्रमाणें येथें येऊन कामाचा चार्ज घेतला. व येथील एजंटसाहेब यांनीं कबूलही केलें कीं, हा सर्व प्रकार आपल्या

कृपेचा आहे, असें समजून आपले उपकार मानतों. पडल्या काळांत एखाद्यास मदत करणें हें मोठें श्रेय व भूषण आहे. आपला उपकार मजवर मोठा झाला आहे. ईश्वर आपणांस सुखी ठेवो.

लिहिण्यास वाईट वाटतें कीं, रतलाम शहरीं अग्नीचा मोठा प्रलय होऊन तीन मह्ले जळाले व पांच सात लक्षांचें नुकसान झालें. आगीनें तीन दिवस शहरांत मोठा प्रलय करून टाकला. सुमारें १००० घरें जळालीं. येणेंकरून सरकार मोठे दुःखित आहेत. लग्न करून राजधानीस येऊन पंधरा दिवस झाले नाहींत तोंच शहरचें नुकसान झालें. लोक रस्त्यावर पडले असोन मोठी दुःखदायक स्थिति झाली आहे. तो प्रकार लिहितांना अंगावर रोमांच उभे राहतात. वरकड मजकूर विशेष नाहीं. कृपालोभ निरंतर राहून सांभाळ होत असावा.

**बळवंतराव जोशी.**

ता. क. ता. ९ रोजीं रतलामसरकारांनीं छत्रे फंडास ५० रुपये पाठविले ते पोंचले असतीलच.

इंदूर १४।८।८६

गोपाळराव रतलामास दिवाण असतांना त्यांस श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकर ह्यांचीं हीं पत्रें जात असत. त्यांपैकीं एक येथें देतोः—

श्री

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री—

गोपाळरावजी देशमुख मुक्काम रतलाम स्वामीचे सेवेसी-पोष्य गणपतराव हरिहर नमस्कार विनंति. येथील कुशल तागायत ता. ३ एप्रिल सन १८८४ इसवी पावेतों जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष, आपण रतलाम संस्थानांत कारभारी झालांत हें ऐकून फार आनंद झाला. चि. रा. भालचंद्रराव अण्णाराव यांचा विवाह नेमले तिथीला यथासांग झाला. आपले चिरंजीव रा. रा. लक्ष्मणराव अप्पासाहेब सिव्हिल सर्व्हंट हे समारंभास आले होते. त्यांचा परिचय नव्हता तो झाला. समारंभ सर्व सांग झाला. आपण आहांत तें रतलाम संस्थान केवढें आहे ? जमाबंदी किती ? प्रदेश किती लांबरुंद आहे ? हवा कशी आहे ? आपल्यास कशा प्रकारें हवा मानवते ? या

संस्थानची जमीन कशा प्रकारची आहे? मुख्य धान्यें कोणकोणतीं होतात? नवीन चमत्कार त्या देशांत कोणते आहेत? देश सुपीक आहे कीं कसा आहे? खाणी वगैरे कांहीं निरनिराळे जातीच्या दगडाच्या व दुसऱ्या प्रकारच्या कांहीं आहेत किंवा कसे? याबद्दलची माहिती आपले फुरसतीप्रमाणें जशी आपल्यास नवीन माहिती मिळेल तसतशी वरचेवर पत्रद्वारें लिहून येत जाईल अशी आशा आहे. तसेच संस्थानचा एकादा सविस्तर इतिहास झाला असून तो छापला आहे काय? छापला असेल तर त्याची एखादी प्रत आम्हांस मिळेल काय? तिकडे जुना पुस्तकसंग्रह वगैरे आहे काय? त्याचे फेरिस्त मिळूं शकेल काय? वगैरे लिहिणेंत येईल अशी आशा आहे. वारंवार पत्र येऊन कुशलवृत्त कळविणें व्हावें. कळावें बहुत काय लिहिणें लोभ करावा ही विनंती.

ह्या पत्रावरून श्री. बापूसाहेबांची ज्ञानजिज्ञासा व शोधकबुद्धि किती तरतरीत होती हें चांगलें निदर्शनास येतें. सोलापुरचे श्री. अप्पासाहेब वारद ह्यांचींही रतलामच्या मुक्कामास अशींच पत्रें आलेलीं आहेत. त्यांत व्यापारासंबंधीं माहिती विचारलेली आहे.

## आपत्ति.

सुखामागून दुःख व दुःखामागून सुख हें जगाचें रहाटगाडगेंच आहे. किंवा ' जगीं सर्व सूखी असा कोण आहे ' या समर्थांच्या उक्तीप्रमाणें गोपाळरावजींनाही अखेर अखेर बरेच दुःखाचे म्हणजे कुटुंबहानींचे धक्केही सोसावे लागलेच. त्यांना दुःखाचा पहिला प्रसंग म्हणजे त्यांचे थोरले जामात श्री. मंगळवेढेकर पटवर्धन यांचा मृत्यु हा होय. रा. ब. नाशकास असतांना पेन्शन घेण्याचे तयारींत होते. त्या वेळीं सप्टेंबर महिन्यांत मंगळवेढेकर अजारी आहेत म्हणून तार आली. रा. ब. लगेच गणेशशास्त्री तरटे वैद्य यांस घेऊन मंगळवेढ्यास गेले. पुष्कळ औषधोपचार केले पण कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेरीस ता. २ आगस्ट सन १८७९ रोजीं त्यांचे थोरले जामात श्री. रा. हरिहरराव रामचंद्र पटवर्धन हे वारले! त्या वेळीं येसूताईचें [गोपाळरावांच्या जेष्ठ कन्येचें] वय २० वर्षांचें होतें.

ह्या वेळीं ठाण्यास स्पेशल जज्ज असलेले रावसाहेब चिंतामणराव नारायणभट यांनीं त्यांस दुखवट्याचें एक पत्र पाठविलें आहे. तें फारच हृदयग्राहक असल्यामुळें येथें देतों. तें पत्र हें:—

Tanna
9th Aust. 1879

My dear Rao Bahadur.

I have read with deep regret and overwhelming sorrow of the departure of Raosaheb Patwardhan of Mangalveda from this world. I have known him for some years and I was greatly impressed with his gentlemanly behaviour and his amiable disposition. I had formed a closer acquaintance with him during the past year while he stayed at Sangli, and am now shocked to hear of his demise. It is true that he suffered while at Sangli from fever & cough, which increased gradually to undermine his health, and he was compelled to leave for Mangalveda. Probably he did not recover thoroughly from his sickness, to which he has succumbed at last. When I think of the sudden and sad bereavement of your daughter, tears run down from my eyes. To refer to the good disposition or any other of the qualities and sterling virtues of the pair so happily-united is merely to intensify sorrow. It is such a transient world as this that we are doomed to live in. Divine will is inscrutable and we must simply abide by it. This is probably the first time that you have to experience such a severe trial in your family, and its effects must be unbearable during your old age, May God give you and your amiable but unforunate daughter and all the members of your family strength to bear the heavy loss and support you in your affictions May Raosaheb's soul rest in everlasting peace !

I remain yours truly,
Chintaman N. Bhat.

भटांचा देशमुखांच्या घराण्याशीं फार एकोपा होता. गोपाळरावजींचे तिसरे चिरंजीव रामभाऊ व चिंतामणराव ल्हानपणापासून एका वर्गांत होते.

रावसाहेब चिंतामणराव भट अष्टे येथें मुनसफ असतांना आम्ही तेथें असि० मास्तर होतों. त्यामुळें त्यांचा आम्हांवर अत्यंत लोभ होता. शाळाखात्याचा राजीनामा देऊन, आम्हांस मुंबईच्या चित्रशाळेंत पाठविण्यास कारण हेच परोपकारी गृहस्थ होत. रामभाऊकडे आमची शिफारस करून त्यांच्याकडून रा. ब. गोपाळरावजींची पहिली ऑईल पेंटिंगची तसबीर ह्यांनींच तयार करविली. नंतर आम्ही बडोद्यास रामभाऊंच्या येथें बरेच दिवस होतो. पुष्कळ लोकांच्या तसबिरी काढल्या. तेव्हां राजे सर. टी. माधवराव ह्यांनीं आम्हांस मुद्दाम बोलावणें पाठवून १०० रुपये पगाराची पेंटरची जागा दिली. अशा संबंधामुळें भटांच्या घराण्याची व देशमुखांच्या घराण्याची आम्हांस चांगलीच माहिती आहे. तेव्हां अशा परिचित मनुष्याला अशा आकस्मिक दुःखाच्या भारानें वरच्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें वाईट वाटणें साहजिक आहे.

( २ ) दुसरा दुःखाचा प्रसंग म्हणजे गोपाळराव व त्यांचें कुटुंब हयात असतांच त्यांच्यावर पुत्रशोकाचा दुःखाचा प्रसंग आला, तो होय. त्यांचे दुसरे चिरंजीव अण्णासाहेब हे कर्तेसवरते व बुद्धिवान् पुत्र ऐन तरुण वयांत त्यांच्या डोळ्यासमक्ष सन १८८२च्या आक्टोबरांत आपल्या वयाच्या ३५व्या वर्षीं गेल्यामुळें त्यांस किती दुःख झालें असेल ह्याची कल्पनाच केली पाहिजे.

( ३ ) पुढें सन १८८३सालीं त्यांचे थोरलें बंधु चिंतामणराव हे वारले. हेही मोठे पाणीदार असून सरकारांतही त्यांचें वजन फार असे; ही गोष्ट त्यांच्या मरणानंतर सरकारानें जें त्यांच्या चिरंजीवांस मुद्दाम पत्र लिहिलें आहे, त्यावरून कळण्यासारखी आहे. तें पत्र असें:—

श्री

मि. विनायक चिंतामण देशमुख राहणार पुणें यांसः—

अजतर्फ रा. ब. नारायण गोविंद आपटे स्पेशल फ. जज्ज. जि. पुणें व सातारा सलाम वाजत सलाम.

कळावें कीं, आपले वडील रा. ब. चिंतामणराव हरि देशमुख यांनीं आपला अमोलिक वेळ शेतकरी रयतेच्या हिताकडे घालवून लवादी काम फार काळजीपूर्वक व विशेष मेहनत घेऊन चांगलें रितीनें केलें. अशाविषयीं मे. स्पेशल जजसाहेब बहादुर ह्यांनीं सन १८८३ चें वार्षिक रिपोर्टांत आपले

वडिलांची शिफारस केली होती. ती सरकारास मान्य वाटून त्यांनीं नं. ३६९२ ता. २२ माहे मे सन १८८४ चे ज्युडिशिअलचे ठरावांत त्यांचे आभार प्रदर्शित केले आहेत. ते आम्ही आपल्यास मोठ्या आनंदानें कळवितों. कळावें जादा काय लिहिणें हे कितापत.

ता. १८।६।८४

चिंतामणरावांस आपल्या पूर्वजांचा मोठा अभिमान असे. आपल्या दर्जास व थोरपणास यत्किंचितही कमीपणा येऊं नये याबद्दल त्यांचा मोठा कटाक्ष होता. एकदां ते बाहेरगांवाहून पुण्यास आल्यावर त्यांस समजलें कीं, आपले गौळआळींतील असलेलें घर भाड्यानें लोकांस रहावयास दिलें आहे. तें त्यांस खपलें नाहीं. त्याबद्दल त्यांस वाईट वाटलें व त्यासाठीं त्यांनीं एक गोपाळरावजींस खरमरीत पत्र लिहिलें तें असें:—

श्री

आशीर्वाद उपरी. मी सुट्टीमध्यें पुण्यास आलों. येथें आल्यावर असें समजलें कीं, आपला जुना वाडा गौळआळींत आहे. तें घर तुम्हीं भाड्यानें लोकांस रहावयास दिलें. सदरहू प्रकारावरून चित्तास फार वाईट वाटलें. कारण सदरहू घर भाडें उत्पन्न करण्याचें उद्देशानें वडिलांनीं मिळविलेलें नाहीं. तें घर आपलें खाजगत विश्रांतिकरितां व आपले कुटुंबास शीतल छाया असावी असें मनोदयानें वडिलांनीं संपादन केलें. व त्या घरांत ते स्वतः रहात होते. व त्याच घरांत आपण सर्व लहानाचे थोर झालों. व वडिलांनीं त्याच घरांत देह ठेविला; असें प्रकारचें जें केवळ पूज्य तें घर वडिलांची कुडी होय. तें घर भाड्यानें देणें यांत वडिलांची अमर्यादा केल्यासारखें आहे.

वडिलांचे आशीर्वादें करून जी आपली स्थिति काळानुरूप आहे, त्याजवरून त्या घराचे डागडुजीस खर्च करण्यास अवघड पडेल असें नाहीं. आपण सर्व हयात बऱ्या स्थितींत असतां, वडिलांचें राहाण्याचें घर भाड्यानें दुसऱ्यास देणें अगदीं वाईट, व अप्रतिष्ठेचें काम आहे, असें माझे विचारास येतें. कोणी ब्राह्मणास कांहीं उपजीविकार्थ देऊन त्या घरांत तो ब्राह्मण ठेविला असतां ती गोष्ट निराळी आहे. तें घर आपले घरमंडळींपैकीं

कोणास रहाण्यास द्या, अथवा देऊं नका. परंतु भाड्यानें तें घर दुसऱ्यास रहाण्यास देणें हें गैर आहे. ह्यास्तव जो भाडेकरी ठेविला आहे त्यास सत्वर घर खाली करून देण्याविषयीं लिहून तें घर होईल तितकें जलदीनें व अगत्यानें विलंब न होतां पूर्वस्थितींत ठेवावें. अल्प लाभावर दृष्टी देऊन दुराग्रहास प्रवर्तक होऊं नये, व होणार नाहींत अशी पूर्ण आशा आहे.

ता. ७ मे मुक्काम पुणें हे आशीर्वाद

**चिंतामणराव हरि देशमुख**

गोपाळरावजींच्या घरांत आजपर्यंत चिंतामणराव होते ते वडिलाप्रमाणेंच त्यांस वाटत. ते गेल्यावर गोपाळरावजीसही आपल्यास कोणी वडिल माणूस उरलें नाहीं म्हणून वाईट वाटणें सहाजीकच होतें. चिंतामणरावजी गेल्याचें वर्तमान श्री. विंचूरकर यांस कळतांच त्यांनींही गोपाळरावजीस दुखवट्याचें पत्र पाठविलें आहे.

पुढें इ. स. १८८५ मे महिन्यामध्यें गोपाळरावजींचें कुटुंबही एकाएकीं अतिसाराच्या उपद्रवानें वारलें. ह्या सौ. आईसाहेब किती सुशील, उदार व संसारदक्ष होत्या त्याबद्दल पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यामुळें गोपाळरावजींचा बराच धीर खचला असावा हें उघड आहे. कारण पत्नीशिवाय जगांत रहाणें म्हणजे अर्धांगवायूच्या व्यथेप्रमाणेंच होतें. सौ. गोपिकाबाईसाहेब गेल्यावर गोपाळरावजींस जीं दुखवट्याचीं पत्रें आलीं आहेत, त्यांत त्यांच्याच पदरीं असलेले प्रसिद्ध लेखक वामन बाळकृष्ण रानडे ह्यांचें पत्र मात्र येथे देतों. त्यावरून त्या मंडळीच्या थोरपणाची व त्यांच्या वियोगामुळें होणाऱ्या गोपाळरावांच्या स्थितीची चांगली कल्पना होते. कारण वामनराव हे त्यांस अपत्याप्रमाणेंच असल्यामुळें त्यांचें उद्गार अत्यंत कळवळ्याचे दिसतात. वामनरावांचें पत्र हें:—

श्री

पुणें, कानिटकरांचा वाडा विश्राम बागेचे मागें ७।९।८५

प्रिय बाबासाहेब यांचे चरणाचे सेवेसीः—

विज्ञापना विशेषः—मातोश्री श्रीमती सौ. आईसाहेब यांचा कॉलऱ्यानें अंत झाल्याचें ऐकून फार फार वाईट वाटलें. आई साहेबांचा इतक्या अक-

ास्तिकपणें शेवट झाला हा आपल्या भाग्यशाली कुटुंबांत मोठाच दुःखाचा प्रसंग होय. ह्यांत संशय नाहीं. प्रथमतः नारायणराव शिरके यांनीं हें दुःखवृत्त सोमवारीं कळविलें. व नंतर मंगळवारीं इं. प्र. वर्तमानपत्र बघितलें. मातोश्री आईसाहेबांचा काळ व्हावा त्याप्रकारें उत्तम स्थितींत झाला. हें दुःखांत समाधान होय, आपल्याकडून श्री. शेखमिरे यांस ह्या दुःखवृत्ताचें आलेलें कार्ड पाहून तर त्यापासून दुःख आणि उपदेश दोन्हींही झालीं. आईसाहेब ह्या महाभाग्यशाली असून त्या आपल्या विस्तृत कुटुंबाची शोभा आणि ऐश्वर्य होत्या. त्यांचें भाग्यशालित्व तर इश्वरानेंच खरें करून दाखविलें. त्यांचा अंत त्यांच्या प्रियपतीच्या देखत आणि प्रिय पुत्रांचें हातें शुश्रुषा होत असतां झाला. जन्मास येऊन पुत्र, पौत्र, कन्या, सुना, सुखानें संसारोपभोग आणि योग्य कालीं पतिसंन्निध मृत्यु इतक्या गोष्टी अनुक्रमानें होत गेल्या म्हणजे सार्थक झालें असें सर्व लोक समजतात, त्याप्रमाणेंच आईसाहेबास सर्व गोष्टी जसजशा घडत याव्या तसतशा घडत येऊन त्यांचा सत्परिणाम झाला यांत संशय नाहीं.

शेखमिरे यांचें पत्रांत लिहिल्याप्रमाणें आपली प्रिय मैत्रीण, जिवाची सखी आणि संसारभार वाहणारी अर्धभागिनी गेली. परंतु आतां त्याबद्दल आपण शांततेनें विषाद न मानतां प्राप्त प्रसंगाकडे लक्ष देऊन सर्वांचें समाधान करालच. मी लिहिणें म्हणजे केवळ हास्यास्पद आहे.

आईसाहेबांचा काळ झाल्यामुळें आतां पुढील चिन्हें डोळ्यासमोर दिसून वाईट वाटतें. आईसाहेबांचेंमुळें आपलें सर्व पुत्रमंडळ वर्षांतून कधींतरी एकत्र मिळून एक प्रकारें त्या परस्पर दूरस्थ बांधवांच्या एककालीं भेटी होण्याचा प्रसंग हमेशा येत असे. परंतु आतां काय ? सर्व मुलें एकत्र जमतील असा सुदिन क्वचित् अनुभवास येईल ! देशमुखांचें घरांत आईसाहेब आटोपल्यामुळें भिन्नता, विभक्तपणा, आणि औदासिन्य जागृत झाल्यासारखीं वाटूं लागलीं ! ईश्वरी इच्छा ! एकाद्या कार्यप्रसंगीं किंवा सुट्टीच्या दिवसांत सर्व पुत्रांनीं एकत्र जमून आनंदानें कांहीं दिवस लोटावे व परस्पर प्रेम वृद्धीच्या गोष्टी व्हाव्या तशा प्रकारचा काळ आतां पुण्यास कधींतरी येईल काय ?

आमच्या आईसाहेबांच्या योगानें आपल्यामागें संसारसंबंधीं व्यवस्थेची बिलकुल काळजी नसे. परंतु आपल्याला आपल्या आर्यजननीची जी विलक्षण

काळजी आहे आणि देशबंधूंचें कल्याण करण्याची जी अतोनात इच्छा आहे, तिला आईसाहेबांच्या परिणामानें कांहींएक वैगुण्य न येवो इतकीच इच्छा आहे !

प्रिय मातोश्री आईसाहेबांस प्रथमतः श्रीमंत मंगळवेढेकर जामाताच्या संबंधानें विलक्षण दुःख सोसावें लागून मागाहून त्यांच्या प्रियपुत्राचें दुःख पहाणें कपाळीं आलें. कै० अण्णासाहेबांचें केव्हां कोणी नांव काढलें तर त्यांच्या डोळ्यांत एकदम खळकन पाणी येत असे. असा विलक्षण प्रकारचा असह्य पुत्रशोक त्यांस होऊन त्यांच्या पहिल्या शक्तिसामर्थ्यांत तर फारच तफावत पडली होती. तथापि शेवटीं इश्वरानें त्यांस हें सुखाचें मरण दिलें ह्यामध्येंच आम्हां सर्वांस समाधान मानलें पाहिजे.

येसूताई व द्वारकाताई या कन्याद्वयांवर त्यांचें विलक्षण प्रेम असून यांत येसूताईचे सुखाचा अंत झाल्यापासून त्या आपल्या अंतःकरणांत जळत होत्या. त्या उभयतां भगिनीस त्यांचे प्रियबांधव आपल्या प्रेमानें मातृवियोगाचें दुःख भासूं देणार नाहींत अशी आशा आहे. आईसाहेब जीवमान असतां मीं बहुतांचे जवळ असे उद्गार काढले आहेत कीं, त्या भाग्यशालित्वाची केवळ मूर्तीच होत्या. ईश्वर त्यांचे आत्म्यास शांति देवो आणि त्यांच्या शोकाकुल पुत्रकन्यादिकांचें सांत्वन करो. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ असूं देणें — ही विज्ञापना

ता०

आपला प्रेमेच्छु

**वा. बा. रानडे,**

हेंच पत्रीं प्रिय बांधव **बापूसाहेब, भाऊसाहेब**, **तात्यासाहेब** यांसः— वर बाबासाहेबांस लिहिलें आहे त्यावरून शोकाचें समाधान होईलच, आपण सर्व शांत, विचारी, गंभीर आहांत. वरील माझें लिहिण्यांत कांहीं प्रमाद असल्यास त्याजबद्दल रोष न मानावा. स्नेह, व ममत्व वृद्धिंगत करावें ही विनंति.

आपला बांधव

**वा. बा. रानडे.**

वामनराव रानडे हे आधींच कसलेले लेखक; त्यांत ते देशमुखांच्याच घरांत वाढलेले; अपत्यासमान त्यांचें नातें; साऱ्या कुटुंबावर अनुपम प्रेम;

अशा मनुष्याच्या लेखणींतून त्या दुःखद परिस्थितीचें चित्र इतकें परिणामकारक वठलें, तर त्यांत कांहीं मोठेसें आश्चर्य नाहीं. दुसऱ्या कोणी कितीही चातुर्यानें लेख लिहिला असतां तरी तो इतका हृदयभेदक झाला नसता. आपल्या कुटुंबाचे स्मरणार्थ गोपाळरावजींनीं वार्षिक बक्षिस देण्याकरितां पुण्यांतील वेदशास्त्रोत्तेजक मंडळीस १५०० रुपये दिले आहेत. त्यांच्या व्याजांतून दरवर्षी वेदशास्त्रोत्तेजक सभेकडून **सौ. गोपिकाबाई देशमुख** यांच्या नांवें बक्षिस दिलें जातें.

जामातवियोग, पुत्रवियोग, बंधूवियोग, व प्रियपत्नीचा वियोग झाला तरी गोपाळराव हे विचारी व दिलदार असल्यानें तें सारें दुःख सहन करून नेहमीप्रमाणेंच शांतवृत्तीनें असत पण परमेश्वरानें तेवढ्यावरही भागविलें नाहीं. तर आणखी सहा महिन्यांनीं त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव गणपतराव ऊर्फ बापूसाहेब हे एकाएकीं पुण्यास कॉलऱ्यानें वारले! व पुढें सुमारें चार वर्षांनीं १८८९ त त्यांची जेष्ठ कन्या येसूताई ह्या पंढरपुरास कालऱ्यानें वारल्या व त्याच सालीं मागून सुमारें दोन महिन्यांनीं त्यांचे तिसरे चिरंजीव रामभाऊ हे कफक्षयानें मुंबई येथें वारले!! हा त्यास तिसरा पुत्रशोक झाला.

मनुष्य कितीही विचारी व शांत असला तरी एकामागून एक असे मनुष्यहानीचे प्रसंग येऊन गुदरले म्हणजे त्याचेंही मन उद्विग्न झाल्याशिवाय कसें राहील? तो उदासीनपणा बाहेरून दिसला नाहीं तरी आंत तरी असावयाचाच. तरी गोपाळरावजी हे पहिल्यापासून खंबीर मनाचे असल्यानें 'ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें। चित्तीं असो द्यावें समाधान।' ह्या साधूच्या उक्तीप्रमाणें पुण्यांतील आपल्या सदाशिव पेठेच्या वाड्यांत स्वस्थ अंतःकरणानें शेवटचे दिवस काढीत होते. त्यांचे पूर्वीचे व्यवहार पूर्वीप्रमाणेंच चालू होते. तरी पण मनांतील दुःखाचा परिणाम त्यांच्या शरीरप्रकृतीवर स्पष्ट दिसूं लागला. ह्या वेळीं त्यांचे तीन चिरंजीव कर्तेसवरते मोठमोठे विद्वान व नामांकित होते. चिरंजीव तात्यासाहेब हे हायकोर्टांत इंटरप्रीटर असून त्यांना ४०० रुपये पगार होता. दुसरे नानासाहेब एम्. डी. ची परीक्षा होऊन त्यांची मुंबईच्या श्रीमान शेट सावकारांत व इतर राजेरजवाड्यांत उत्तम प्रॅक्टिस चालली होती. व कनिष्ठ चिरंजीव आप्पासाहेब नुकतेच सिव्हिलीयन होऊन असिस्टंट कलेक्टरच्या जागेवर होते. गोपाळरावजींची प्रकृति पाहिल्या

पासूनच निकोप होती. तरी पुढें पुढें त्यांस मानसिक दुःखामुळें मधुमेहाचा विकार झाला होता.

शेवटीं १८९२ च्या मे महिन्यांत त्यांची दुसरी कन्या सौ. द्वारकाताई मुजुमदार ह्या मुंबई येथें कफक्षयाचे विकारानें मृत्युमुखीं पडल्या. त्या फार शांत स्वभावाच्या, तेजस्वी, आणि धर्मपरायण अशा होत्या. व त्यांच्यावर गोपाळरावजींचें फार प्रेम होतें. सौ. द्वारकाताईच्या मृत्यूपासून त्यांस असह्य दुःख झालें. शरिराला दिवसेंदिवस क्षीणता येऊं लागली, गात्रें अधिकाधिक शिथिल होऊं लागलीं. आतां आपले फार दिवस निभणार नाहीं असें वाटूं लागतांच त्यांनीं आपल्या तिन्ही पुत्रांस जवळ बोलावून आणलें. त्रिवर्ग पुत्रही पुण्यास येऊन दाखल झाले. त्यांची त्यांनीं विचारपूस केली. अगदीं अखेर-च्या दिवशीं सुद्धां त्यांनीं नित्य नियमाप्रमाणें पार्थिव पूजा केली पण त्याच दिवसाच्या उत्तर रात्रीं ता. ९ माहे आक्टोबर सन १८९२ इसवी रोजीं शांत चित्तानें ईश्वर नामस्मरण करीत त्यांनीं आपला देह ठेविला ! ! !

येवढा उदार महात्मा, उद्योगशील व कर्ता पुरुष गेल्यामुळें सर्व लोकांस हळहळ वाटली, मग त्यांच्या तीन पुत्रांस त्या वेळीं किती दुःख झालें असेल ह्याची कल्पना करावी. पुण्यांतील शेकडों लोक त्यांच्या अंत्यविधीस जमले होते. नंतर त्यांच्या तेराव्या दिवशीं त्यांच्या वाड्यांत दुखवट्याची मोठी सभा भरली. तींत न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे हे प्रमुख होते. शेंकडों लोकांचे समुदायांत न्यायमूर्ति रानड्यांनीं रा. ब. गोपाळराव हरि यांचे गुणांचें वर्णन करून अखेर—

**जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले ॥ १ ॥**
**तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ २ ॥**
**मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥ ३ ॥**
**ज्यासी आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥**
**दया करणें जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥**
**तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥**

हा अभंग म्हणण्यास सुरवात केली. व त्यांतील गुणांशीं त्यांची तुलना करावयाची त्यांच्या मनांत होती. परंतु दुःखवेगानें त्यांचा कंठ त्या वेळीं इतका भरून आला कीं, पुढें तो अभंग त्यांच्यानें म्हणवेना. ते नुसते अश्रु

ढाळीत बसले. तेव्हां दुसऱ्या कोणी तो अभंग पुरा केला. ह्यावरून न्याय-मूर्तींचें रावबहादुरांवर केवढें खरें प्रेम होतें! एकंदरींत असे थोर पुरुष फार क्वचितच निर्माण होतात. गुजराथी लोकांनीं 'गोपाल स्तोत्र' म्हणून एक निराळें काव्यच केलें आहे. गोपाळराव हरींची निधनाची वार्ता पसरतांच शेंकडों मोठमोठाल्या लोकांकडून त्यांच्या चिरंजीवांस दुखवट्याचीं अशीं अनेक पत्रें आलीं, व अनेक वर्तमानपत्रांत, त्यांच्याबद्दल लेख आले. ह्यावरून त्यांची योग्यता केवढी होती व ते लोकादरास किती पात्र होते हें समजून येतें.

असो. अशा प्रकारें ह्या उदार महात्म्यानें, पुण्यपुरुषानें आपल्या बुद्धि-प्रभावानें सरकारास सुप्रसन्न करून आपल्या निरपेक्ष सेवेनें व दयार्द्र अंतः-करणानें व उदार बुद्धीनें जगावर होईल तेवढा परोपकार करून राजा व प्रजा या दोघांकडूनही धन्य धन्य म्हणवून घेतलें. संततीनें, संपत्तीनें युक्त अशा सुखसौख्यांत, शांतिसुखांत समाधानांत आपली इहलोकची यात्रा संपविली. एकंदरींत रा. ब. गोपाळराव हरि देशमुख अव्वल इंग्रजींत कॉलेजें व युनिव्हर्सिटीही स्थापन झाली नव्हती, अशा वेळीं ४।५ वर्षांत इंग्रजी भाषेसारख्या परकी व सर्वथैव भिन्न अशा भाषेचें उत्कृष्ट ज्ञान संपादन करून तारुण्याच्या ऐन भरांतही भलभलत्या संवयींत, व्यसनांत न पडतां स्वधर्मानें वागून इंग्रज सरकारची नोकरी एकनिष्ठतेनें व इमानानें करून हिंदुलोक हे अप्रतिम बुद्धिमान् असून उच्च दर्जाचे नोकरीस पात्र आहेत असें त्यांचे मनांत विश्वास उत्पन्न करून देण्यास विशेषेंकरून हेच एक कारणीभूत झाले, ह्यांत संदेह नाहीं.

ह्यासाठीं ह्यांच्या अंगच्या सद्गुणांचा जे जे कोणी कित्ता गिरवतील तेही तसेंच ऐहिक सुखास व कीर्तीस पात्र होतील, हें कांहीं निराळें सांगावयास पाहिजे असें नाहीं. ह्यासाठीं प्रत्येकानें त्यांच्या कृतींतील जो जो भाग उत्तम वाटेल, त्याचा त्याचा कित्ता गिरवून त्यांच्या प्रमाणेंच धन्य व्हावें. इतकें सांगून हें चरित्र येथेंच पुरें करतों.

रा. ब. गोपाळराव हरि देशमुख यांच्या निधनानंतर त्यांच्या चिरंजीवांस सार्वजनिक संस्थांकडून आलेल्या दुखवट्याच्या पत्रांपैकीं कांहीं पत्रें पुढें देतों:—

श्री

पुणें तारीख २१ माहे आक्टोबर १८९२.

श्रीमंत राजमान्य राजश्री, रघुनाथराव गोपाळ व मोरेश्वर गोपाळ व लक्ष्मणराव गोपाळ देशमुख मुक्काम पुणें—स्वामींचे सेवेसीं—

सार्वजनिक सभा पुणें यांजकडून विनंती करण्यांत येते कीः—आपले वडील सरदार रावबहादुर गोपाळराव हरि देशमुख यांस तारीख ९ माहे ऑक्टोबर सन १८९२ रविवार रोजीं देवाज्ञा झाली. ही गोष्ट विशेषेंकरून महाराष्ट्र देशांतील व गुजराथ प्रांतांतील लोकांस समजल्यावर कोणासही दुःख आढ-ळल्यावांचून राहणार नाहीं. आपलें घराणें बहुत जुनें असोन सर्व महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. त्या घराण्याप्रमाणें आपले तीर्थरूपांचें शील, गुण, त्यांची भूतदया व तदनुसार त्यांची कृति ह्या सर्व गोष्टी त्यांच्या अंगीं पूर्णपणें वसत होत्या.

कै. गोपाळरावजींच्या मृत्यूनें आपल्या कुटुंबावर तर मोठाच गहजब गुद-रला आहे. तथापि ईश्वरइच्छेपुढें इलाज नाहीं, असें जाणून शोकाचें सांतवन मोठ्या विवेकानें केलें पाहिजे.

कै. रा. ब. गोपाळराव हरींच्या मृत्यूनें आपल्या कुटुंबाचें जसें अनिवार्य नुकसान झालें आहे, त्याप्रमाणेंच सार्वजनिक संस्थांचेंही नुकसान झालें आहे. त्यांत विशेषेंकरून सार्वजनिक सभेचें फारच नुकसान झालें आहे. गेल्या १०।१२ वर्षांत रा. ब. यांनीं पेनशन घेतल्या दिवसापासून ते सार्व-जनिक सभेच्या कामाविषयीं आपला पोक्तसल्ला व भरपूर माहिती देत असत. व वार्धक्य स्थितींतही निरालस्यपणें प्रत्येक सभेच्या कामीं स्वतः हजर राहून कळकळीनें कामें करीत असत. अशा प्रकाराचे सल्लामसलतगार सभेस सांप-डणें कठीण आहे.

रा. ब. गोपाळरावजींच्या मृत्यूनें गोरगरिबांस व अनाथांस तर आपला एक मोठा पोशिंदा गेला असें वाटून फार दुःख होत आहे. अनेक विद्या-र्थ्यांस पैशाची व पुस्तकांची मदत आणि गरीबगुरीब रोग्यांस धर्मादाय दवाखाना घालून औषधपाण्याचे कामीं तर त्यांचें औदार्य सर्वप्रसिद्धच होतें.

रा. ब. गोपाळरावजींचा शांत स्वभाव व मनमिळाऊ वर्तन यामुळें ते लहानापासून थोरापर्यंत सर्वांस सारखे उपयुक्त होते व कोणत्याही लोकोपयोगी कामीं साह्य देण्याची तत्परता यांचे अंगीं फारच विलक्षण होती.

अशा निरनिराळ्या तऱ्हेनें त्यांचा जो समाजास उपयोग होत असे त्याचें वर्णन करावें तितकें थोडें. असो. रा. ब. यांच्या थोर नांवलौकिकास अनुरूप असे आपण सुविद्य व सुशील पुत्र आहांत तेव्हां त्यांनीं सार्वजनिक संस्थास साह्य करून जशी कीर्ति संपादन केली तशीच कीर्ति आपणही आपल्या वर्तनक्रमानें संपादन करून रावबहादुरांची आठवण होऊं देणार नाहीं असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे. कळावें हे विनंती.

Vishnu Moreshvar Bhide.

सह्या:—

१ ज्ञानेश्वर जनार्दन गोखले.
२ सखाराम रामचंद्र जोशी निसबत फडणीस.
३ नारायण भाई दांडेकर.
४ गणेश गोविंद गोखले.
५ वी. आर. सहस्रबुद्धे.
६ वामनराव वी. रानडे.
७ शिवराम हरी साठे.
८ गोविंद महादेव गद्रे.
९ नागो भास्कर देवधर.
१० वामन विष्णु लेले.

श्री

पुणें तारीख २१ आक्टोबर सन १८९२.

राजमान्य राजश्री. रघुनाथराव गोपाळ व मोरेश्वरराव गोपाळ व लक्ष्मणराव गोपाळ देशमुख मु० पुणें—स्वामींचे सेवेसी—

युनिअन क्लब पुणें यांजकडून विनंति करण्यांत येतें कीं—आपले वडील सरदार रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांस तारीख ९ माहे आक्टोबर सन १८९२ रविवार रोजीं देवाज्ञा झाली. ही गोष्ट ऐकून आम्हां सर्वांस अतिशय दुःख झालें आहे. युनिअन क्लबची स्थापना सन १८९० च्या जुलई

महिन्यांत झाली. त्या दिवसापासून रावबहादुर हे त्या संस्थेचे सभासद होते व ते या संस्थेबद्दलही फार कळकळ बाळगीत असत. हें त्यांचें गुणास व स्वभावास अगदीं अनुरूपच होतें. पुण्यांत जेवढ्या संस्था आहेत तेवढ्यांत कोठेंही या सत्पुरुषाचें नांवही नाहीं व आश्रयही नाहीं अशी एकही संस्था नसेल. असा सत्पुरुष नाहींसा होणें म्हणजे देशाचें मोठें दुर्भाग्य म्हणावयाचें.

अशा पुरुषाचे मृत्यूनें आपणांस परमावधीचें दुःख होईल यांत कांहीं नवल नाहीं. परंतु परमेश्वर सत्तेपुढें कांहीं इलाज नाहीं असें समजून आपण आपलें चित्तास शांति आणली पाहिजे. आणि वडिलांच्या अंगचें जें लोकहिताच्या कामीं अलौकिक प्रेम त्याचें अनुकरण करून त्यांनीं उभारलेला कीर्तिध्वज नेहमीं कायम ठेवण्याविषयीं दक्ष राहील अशी आम्हांस पूर्ण आशा आहे. कळावे लोभ असावा हे विनंति ता. २१ माहे आक्टोबर १८९२

सह्या:—

**१ विष्णु बाळकृष्ण सोहनी.** **२ गोविंद महादेव गद्रे.**
**३ शिवराम हरी साठे.** **४ कृष्णाजी रघुनाथ केळकर.**
**५ नारायण भाई दांडेकर.** **६ गणेश गोविंद गोखले.**
**७ नारो भास्कर देवधर.** **८ गोपाळ रामचंद्र साने.**
**९ वामन विष्णु लेले.**

श्री

श्रीमंत राजमान्य राजश्री रघुनाथराव गोपाळ व मोरेश्वरराव गोपाळ व लक्ष्मणराव गोपाळ देशमुख मुक्काम पुणें—स्वामींचे सेवेसी—

पुणें नेटिव जनरल लायब्ररी कमेटी यांजकडून विनयपूर्वक कळविण्यांत येते कीं—आपलें वडील सरदार रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांस तारीख ९ माहे आक्टोबर सन १८९२ रविवार रोजीं प्रातःकाळीं देवाज्ञा झाली ही गोष्ट ऐकून सर्व महाराष्ट्रांतील लोकांच्याच काय पण मुंबई इलाख्यांतील लोकांस समजल्यावर दुःख झाल्यावांचून राहिलें नाहीं. सरदार रा. ब. पुणें शहरचे रहिवासी असल्यामुळें या शहरांत आजमित्तीपर्यंत जेवढ्यांनीं निरनिराळ्या संस्था उत्पन्न जाहल्या तेवढ्या सर्वांत साक्षांत अगर परोक्ष रीतीनें त्यांचा संबंध राहात आला आहे. नेटिव जनरल लायब्ररीचे ते जनकच होते, कारण तिची स्थापना सन १८४८ सालीं मेहेरबान ब्रौनसाहेब जज्ज व एजंट

असतांना झाली तेव्हां हें कार्य करण्यांत त्या वेळचे जे विद्वान् व प्रमुख होते, त्यामध्यें रा. ब. हे एक पुढारी होते व प्रारंभीं लायब्ररीचे चिटणिसाचें काम त्यांचेच गळ्यांत पडलें. तेव्हांपासून आजमित्तीपर्यंत त्या संस्थेसंबंधानें द्रव्य-द्वारां व शरीरद्वारां तिचें संगोपन करण्याविषयीं त्यांनीं कधींही मागें पुढें केलें नाहीं. सन१८७९सालीं जो मोठा अग्निप्रलय झाला व बुधवारचा बहुतेक वाडा जळाला त्यामुळें त्यांत असलेल्या संस्थेचें जें सर्वस्वी नुकसान झालें त्यापैकीं ह्या लायब्ररी येवढें नुकसान कोणाचेंच झालें नाहीं, परंतु तिचे पुनर्जीवनाविषयीं ज्या ज्या सद्गृहस्थांनीं अंतःकरणपूर्वक मदत केली आहे,त्यांपैकीं रा.ब.हे अग्रणी होते असें म्हटलें तरी चालेल. पुस्तकें सर्व जळून गेल्यामुळें ज्याच्यानें जशी होईल तशी पुस्तकें संपादन करण्याची खटपट सुरू झाली. तेव्हां कै. रा. ब. यांच्यापाशीं पुस्तकांचा बहुत संचय होता, त्यापैकीं निवडक अशीं २००। ३०० पुस्तकें काढून त्यांनीं लायब्ररीस बक्षीस दिलीं. त्याचप्रमाणें या संस्थे-संबंधानें इमारती बांधण्याकरितां फंड जमा करण्याचें ठरल्यावर त्यांनीं आपण स्वतः त्या कामाकरितां द्रव्याची मदत करून राजेरजवाडे यांजकडे जाण्याचा प्रसंग जेव्हां जेव्हां येई त्या त्या वेळीं रा.ब. हे स्वतः कधींही मागें पुढें करीत नसत व त्यांचे वजनदारीमुळें व इभ्रतीमुळें संस्थेचें इमारतीकरितां द्रव्याची मदत मिळविण्याकरितां उपयोग झाला आहे.

सार्वजनिक काम करण्याविषयीं त्यांचेसारखे नेहमीं तयार असणारे असे पुरुष क्वचितच दृष्टीस पडतात. थोर घराण्यामध्यें जन्मास येऊन त्या घरा-ण्याची थोरवी वाढविण्याविषयीं आपल्या वडिलांचें अंगीं जसे गुण होते तसे दृष्टीस पडणें फार विरळा. उत्तम प्रकारें विद्याभ्यास करून सरकारी हुद्याची मोठी जबाबदारीचीं कामें उत्तम प्रकारें बजावून स्वदेशाच्या सामा-जिक अथवा राष्ट्रीय उन्नतीसंबंधानें कोणतेही कामांत पुढाकार घेण्यास त्यांनीं कधींही मागें पुढें केलें नाहीं. परमेश्वर कृपेनें त्यांस द्रव्यसामर्थ्य व शरीरसामर्थ्य हीं उत्तम होतीं. त्याचप्रमाणें त्यांची उत्साहबुद्धि ही अप्रतिम होती. त्याचप्रमाणें पुढारी होण्यास ज्या ज्या गोष्टी अवश्य त्या त्या त्यांचें अंगीं पूर्णपणें असत व लोकही त्यांचा पूर्ण उपयोग करून घेत असत.

अशा प्रकारें ज्यांचें अंगचे गुण होते त्यांच्या मृत्यूनें आपल्या कुटुंबावर तर गहजब गुदरला आहेच. तथापि हरिसत्तेपुढें इलाज नाहीं असें जाणून आपण आपल्या शोकास विवेकानें आवरण घालालच. आपल्या वडिलांच्या

अंगीं जे अनेक अनुकरणीय गुण होते म्हणजे ते निरालस्य, शांतस्वभाव, लहानापासून थोरापर्यंत मन मिळाऊपणानें वागणेची हातोटी, त्यांची विलक्षण जिज्ञासा, त्यांची सहनशीलता, परोपकाराविषयीं तत्परता, याचे वर्णन करतां येत नाहीं. ह्या गोष्टी आपल्या सर्वांच्या डोळ्यापुढें जितक्या असतील तितक्या दुसऱ्या कोणाच्याही पुढें नाहींत. याजकरितां रा. ब. च्या थोर नांव लौकिकास अनुरूप असे आपण विद्वान व सुशील पुत्र आहांत तेव्हां त्यांनीं ज्याप्रमाणं लोकहिताचे कामीं आपला देह झिजवून कीर्ति संपादन केली त्याप्रमाणें आपणही आपल्या सद्वर्तनक्रमानें सुकीर्ति संपादन कराल अशी आम्हां सर्वांस पूर्ण आशा आहे. कळावें हे विनंति. ता. २१ आक्टोबर सन १८९२.

सह्याः—

१ विष्णु बालकृष्ण सोहनी.
१ शिवराम हरी साठे.
१ गणेश विष्णु डांगे.
१ कृष्णाजी रघुनाथ केळकर.
१ नारायण भाई दांडेकर.
१ गणेश गोविंद गोखले.
१ नारो भास्कर देवधर.
१ वामन विष्णु लेले वकील.

श्री

श्रीमंत राजमान्य राजश्री—रघुनाथराव व मोरेश्वरराव व लक्ष्मणराव गोपाळ देशमुख मु० पुणें—स्वामीचे शेवेसी—

पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळी यांजकडून कळविण्यांत येतें कीं, आपले वडील सरदार रा० ब० गोपाळराव हरी देशमुख यांस शके १८१४ आश्विन वद्य ४ तारीख ९ माहे अक्टोबर सन १८९२ रविवारी प्रातःकाळीं देवाज्ञा झाली यामुळें आपणांस पितृवियोग कायमचा झाला. त्या प्रसंगानें आम्हांस व इतर सर्व महाराष्ट्रीयांस फार दुःख झालें आहे. आपले वडिलांस देवाज्ञा झाली यांत या हतभाग्य देशाचा एक पुरस्कर्ता गेला, महाराष्ट्राचा एक असामान्य थोर पुरुष गेला, या शहराचा एक प्रवर्तक गेला, व आमच्या ह्या संस्थेचा

एक आस्थेवाईक अध्यक्ष गेला ! आपले वडिलांनीं सरकारी फार मोठा नेकीचीं व जबाबदारीचीं कामें केलीं यांत आम्हांस कांहीं वाटत नाहीं, परंतु केवळ निरिच्छेनें लोककल्याणबुद्धीनें जें लोकहित केलें तें फार प्रशंसनीय होय. अव्वल इंग्रजींत पुढें होऊन सार्वजनिक हिताच्या गोष्टीकडे आपला फुरसतीचा वेळ देऊन लोकाज्ञानध्वंसनेचें जें व्रत आरंभिलें तें अव्याहत ४० चाळीस वर्षें सारखें चालविलें, ही गोष्ट असामान्य होय. असे पुरुष महाराष्ट्राचे भूषणभूत होत. आमच्या ह्या संस्थेचे अध्यक्ष होते तेव्हांची तर गोष्ट राहोच, पण नसतांनाही त्यांनीं या संस्थेस अगदीं प्रथमपासून फार मदत केली ती पुनः पुनः स्मरून आम्हांस फार दुःख होत आहे.परंतु तें क्षणभर एकीकडे ठेऊन आपणांस झालेल्या महत् दुःखाचा क्षणभर तरी विसर पडावा व ज्यानें कोणास कधींही सोडलें नाही, त्या मृत्यूपासून झालेलें अनिवार दुःख व नुकसान विसरून आपण आपल्या पित्यापेक्षां कांकणभर जास्तीच सामान्य लोकावर उपकार करून त्यांचें विस्मरण पाडून त्यांच्या अनेक अपूर्ण राहिलेल्या इच्छा व हेतु पूर्ण करून त्यांस आपल्या आजपर्यंत योग्य निर्मळ वर्तुणुकीनें जसा संतोष दिलात त्याप्रमाणें या पुढील वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें वर्तन करून त्यांच्या आत्म्यास चिरकालिक संतोषित कराल व थोर वडिलांचे थोर चिरंजीव म्हणवून घ्याल इतकेंच विनयपूर्वक सांगणेकरितां आम्ही आलों आहों. ह्या जगांत संपत्ति, अधिकार, विद्वत्ता यांपासून होणाऱ्या भासमान सुखापेक्षां वृद्धपणीं सर्व प्रकारें सुपुत्र पाठीमागें ठेवून शांततेनें योग्य वेळीं ईश्वरसान्निध्यास जाण्याचा योग फार दुर्मिळ असतां केवळ पूर्वपुण्याईनें ज्यांस लाभला असेल त्या थोर लोकहितवादी पुरुषाच्या सत्यलोकीं स्थिर झालेल्या आत्म्यास निरंतर सुख होवो व तोच सर्व जगच्चालक तुम्हांस योग्य कर्तव्य व देशहित करण्यास सर्व प्रकारें सामर्थ्य देवो अशी प्रार्थना करून आम्ही आपला निरोप घेतों. कळावें लोभ असावा हे विनंति.

पुणें ता. २१ माहे आक्टोबर सन १८९२.

मंडळीचे आज्ञेवरून

**वामन विष्णु लेले.**

सेक्रेटरी 'वक्तृत्वोत्तेजक मंडळी' पुणें.

श्री

श्रीमंत राजमान्य राजश्री रघुनाथराव गोपाळ, मोरेश्वर गोपाळ, व लक्ष्मण-राव गोपाळ देशमुख—स्वामीचे शेवेसी—

पुणें गायनसमाजाचे कमेटी कडून विनंति कीं—आपले तीर्थरूप श्री० सरदार रा० ब० गोपाळराव हरी देशमुख यांस तारीख ९ माहे अक्टोबर सन १८९२ रोजीं देवाज्ञा झाली ही गोष्ट वाईट झाली. ही दुःखाची वार्ता ऐकून ज्या लोकांस गोपाळरावजींचें नांव ऐकून माहीत आहे त्यांस,व विशेष-करून महाराष्ट्रांत व गुजराथ प्रांतांत कोणासही अत्यंत वाईट वाटल्यावांचून राहाणार नाहीं. आपलें घराणें फार प्राचीन व थोर असून ह्या प्रांतांत फार प्रसिद्ध आहे. त्यास अनुरूप अशी गोपाळरावांची विद्वत्ता, त्यांचें सौजन्य व लोकचातुर्य, त्यांची भूतदया व परोपकारबुद्धि व हरएक प्रकारें लोकांच्या बऱ्याविषयीं व भरभराटीविषयीं कळकळ व तदनुसार त्यांचें वर्तन इत्यादि अनेक गुण त्यांचे अंगीं पूर्णपणें वसत होते हें सर्वप्रसिद्ध आहे. त्यांनीं स्वभाषेचें व पाश्चिमात्य भाषेचें व शिवाय फारशी व गुजराथी भाषांचें ज्ञान-संपादन केलें होतें. यामुळें त्यांचें ग्रंथावलोकन फार होतें. सारांश, हल्लींच्या लोकांत जुन्या गोष्टींच्या माहितीचे गोपाळराव केवळ भांडारच होतें, असें म्हटल्यास कांहीं विशेष दोष येईल असें वाटत नाहीं. अशा गुणी पुरुषाच्या सतत वियोगानें त्यांचे कुटुंबातील माणसावर तर मोठाच प्रसंग गुदरला म्हणा-वयाचा; परंतु हल्लीं या प्रांतीं देशसुधारणेच्या संबंधानें ज्या ज्या म्हणून संस्था आहेत,त्या सर्वांवरही असाच प्रसंग आला आहे. कारण हल्लीं जेवढ्या म्हणून अशा प्रकारच्या संस्था आहेत, त्या सर्वांशीं गोपाळरावजींचा संबंध असोन त्यांच्या भरभराटी विषयीं त्यांचा पुढारीपणा होता. अशा संस्थांपैकींच पुणें येथील गायनसमाजाची संस्था आहे. गायनकलेचा जीर्णोद्धार व्हावा एतदर्थ गोपाळरावजी हे समाजसंबंधीं वेळोवेळीं द्रव्यसंबंधानें व कोणाकडे जाण्या-येण्याच्या संबंधानें स्वतः जाऊन त्यांस हकीकत सांगून त्यांजकडून गायन-समाजास कांहींतरी चांगलें उत्तेजन येईल, अशा प्रकारची मदत मागून संस्था सुरळीत चालावी अशा विषयीं मोठ्या कळकळीनें आमरणांत झटत होते. समाजाच्या संबंधानें कांहीं उणीवी व जरूरीच्या गोष्टी होत्या त्यांतील उणेपणा ह्यांनीं आपल्या हयातींत नाहींसा करून कांहीं गोष्टी कायम करून

ठेविल्या सारख्या केल्या आहेत. कोणीकडे केव्हांही जाण्याचा प्रसंग पडल्यास गोपाळरावजी हे वयोवृद्ध झाले असतांही तरुण मनुष्याप्रमाणें तत्पर असत; ह्या विषयीं सर्व लोकांत त्यांची ख्याती आहे. गोपाळरावजींचे सतत वियोगानें ह्या संस्थेवर मोठाच घाला पडल्यासारखें झालें आहे. हे ह्या संस्थेचे आधार-भूत स्तंभच होते. आतां विनंति एवढीच कीं कै० गोपाळराव यांनीं त्यांचें अंगचे गुण व विद्वत्ता यांची स्थापना आपलें ठिकाणीं केली आहे, तरी ज्या रीतीनें गोपाळरावजी हे देशकल्याणाविषयीं व सुधारणुकीविषयीं कळकळीनें झटत होते तसाच क्रम आपणांकडूनही पुढें चालू राहील अशी उमेद आहे. कारण आपणही गोपाळरावजीप्रमाणें विद्याविनयसंपन्न असोन त्यांनीं कित्ता घालून दिल्याप्रमाणें त्यांचे सर्व गुण आपलें ठिकाणीं वसत आहेत असा लौकिक आहे. ह्यास्तव आपण कुलीन, सुशील, गंभीर स्वभावाचे व पोक्त विचाराचे असल्यामुळें आपणच आपल्यावर आलेल्या दुःखाचें निवारण करण्या-विषयीं पूर्णपणें समर्थ आहांत. ह्यासंबंधानें दुसऱ्यानें आपल्या दुःखाचें शांतवन करावें अशी उणीव आपले ठिकाणीं कोणतीही नाहीं. परंतु लोकरीतीप्रमाणें सूचनार्थ लिहिलें आहे. कळावें. सुज्ञाप्रति बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति.

**सानंदं सदनं सुताश्चसुधियः कांता न दुर्भाषिणी ।**
**सन्मित्रं सधनं स्वयोषितिरतिश्चाज्ञापराःसेवकाः ।**
**आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे**
**साधोः संगमुपासतेहि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥ १ ॥**

अशा प्रकारचे भाग्यशाली पुरुष गोपाळराव हरि देशमुख होऊन गेले.

**अनंतराव खंडराव रास्ते.**

सह्या

1. **१ एस् आदिमूलम् मुदलियार.**
2. **१ महादेव गोविंद रानडे.**
3. **१ नारायण भाई दांडेकर.**
4. **१ गोविंद महादेव गद्रे.**
5. **१ हरि रावजी.**
6. **१ चिंतामण नारायण भट.**
7. **१ चिंतामणराव विश्वनाथ नातु.**
8. **१ नारो भास्कर देवधर.**
9. **१ रामकृष्ण बळवंत दुवे.**

श्री.

राजमान्य राजश्री रघुनाथराव गोपाळ व मोरेश्वरराव गोपाळ व लक्ष्मणराव गोपाळ देशमुख रा. पुणें —स्वामींचे शेवेसी—

पुणें लवाद कोर्ट कमेटी यांजकडून विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, आपले तीर्थरूप सरदार रा. ब. गोपाळराव हरि देशमुख हे ता. ९ माहे अक्टोबर सन १८९२ रविवारीं परलोकवासी झाले, हें वर्तमान ऐकिल्यापासून कोणास वाईट वाटणार नाहीं असे लोक थोडेच. रावबहादुर यांनीं मोठीमोठीं सरकारी हुद्याचीं कामें करून पेनशन घेतलें. त्यांनीं पेनशन घेतल्यापासून आज १०।१२ वर्षे सार्वजनिक लोकहिताचीं कामें करण्यास ते हमेशा पुढें असत. ते बहुतेक सार्वजनिक कामांत पुढारी होते. ते लवाद कोर्टाचे प्रेसिडेंट आज सुमारें ४।५ वर्षे होते. त्यांचेसारखे काम केलेले अनुभवशीर पोक्त आणि थोर मनाचे असे लवाद कोर्टास प्रेसिडेंट मिळणें दुर्मिळ आहे. आपले वडिलामध्यें असा एक अलौकिक गुण होता कीं त्यांचेसारखे शांत स्वभावाचे आणि लहानापासून तो मोठ्यापर्यंत सर्वांशी सारख्या रीतीनें दळण वळण असणारे गृहस्थ मिळणें फारच दुर्मिळ आहे, असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. त्याचप्रमाणें आपले वडिलासारखे संतती आणि संपत्तीमान्ही गृहस्थ पाहूं लागले असतां आपले महाराष्ट्रदेशांत मिळणें कठीण आहे. रावबहादुर यांस शोभण्यासारखे आपण त्याजला विद्वान आणि सुशील असे पुत्र आहां, तेव्हां जसे रावसाहेब हे आमचे देशास स्तंभ होऊन कीर्ति संपादून गेले त्याप्रमाणें आपणही सुकीर्ति संपादन कराल अशी आशा आहे. कळावे ही विनंति.

ता. २१ आक्टोबर १८९२.

**सदाशिवराव रघुनाथ मेहेंदळे.**
सेक्रेटरी लवाद कोर्ट पुणें.

डॉक्टर मोरेश्वर गोपाळ देशमुख—यांचे शेवेसी—

**भलारे भला बोलतां त करावे।**
**बहूता जनांचें मुखीं येत घ्यावें॥**
**परी शेवटीं सर्व सोडूनि द्यावें।**
**मरावें परी कीर्तिरूपें उरावें॥१॥**

पुणें दीनबंधूसार्वजनिकसभेच्या तर्फे सन्मानपूर्वक आपणांस असें कळविण्यांत येतें कीं, सरदार रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांजला ता. ९ माहे अक्टोबर सन १८९२ रोजी देवाज्ञा झाली ही दुःखाची शोककारक वार्ता ऐकून सर्व मेंबरांस दुःख वाटत आहे. अशा दुःखकारक प्रसंगीं आपल्या दुःखित अंतःकरणाचें शांतवन करावें एतदर्थ हें दुखवट्याचें पत्र आपणाकडेस आम्ही घेऊन आलों आहोंत, त्याचा आपण स्वीकार करावा अशी आमची विनंति आहे. रा. ब. हे जातीचे ब्राह्मण असून त्यांच्या मनांत ब्राह्मण व ब्राह्मणेतर हा भेद मुळींच नव्हता. ब्राह्मणज्ञातीमध्यें यांनींच इंग्रजी शिकविण्यास उत्तेजन दिलें आणि जीं लोकोपयोगीं व सार्वजनिक कामें केलीं त्यांची सविस्तर हकीकत दिल्यास पुष्कळ विस्तार होईल. यांनीं प्रभाकर पत्रामध्यें " लोकहितवादी " या नांवानें बरीच पत्रें निःपक्षपात बुद्धीनें लिहून आपल्या ज्ञातीस ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला. लोकहितवादी या सहीनें बरेच ग्रंथ केले. कोणत्याही सार्वजनिक कामास ते द्रव्यद्वारां, उपदेशद्वारा मदतही करीत असत. रा. ब. हे आमच्या फ्री स्कुलांत नेहमीं येऊन मुलांची परीक्षाही घेत असत. व त्या शाळेस द्रव्यद्वारा मदतही करीत. त्यांच्याविषयीं आमच्या दीनबंधूसार्वजनिकसभेच्या मंडळीचे मनांत अगदीं पूज्यबुद्धि आहे. हे कोणी गरीब अगर श्रीमान गृहस्थांचें घरीं जाण्यास मागें पुढें पहात नसत. रावापासून रंकापर्यंत त्यांची समदृष्टी होती. सदरहू वर्तनानें सर्व हिंदुस्थानभर त्यांची कीर्ति पसरली आहे. सरदार रा. ब. यांनीं सरकारी मोठमोठी हुद्यांचीं आणि जबाबदारीचीं कामें फारच उत्तम प्रकारें केलीं. आणि सरकारानें त्यांच्या बहुमानार्थ योग्यवेळीं त्यांचा सन्मानही केला. जरी रा. ब. यांनीं आपलें आयुष्य सरकारी नोकरीमध्यें खर्च केलें तथापि त्यांचें लक्ष्य लोकहिताच्या व सार्वजनिक कामाकडे फार असे. रावबहादुर हे स्वभावानें मोठे शांत, दयाळु व गंभीर होते. परंतु पुत्रशोकाचे पर्वत कोसळल्यामुळें ते अगदीं खचले होते. असो !! आपणांस आमचे इतकेंच कळविणें आहे कीं, रा. ब. यांनीं जो धर्मार्थ दवाखाना घातला आहे तो चिरकाल राहील अशी व्यवस्था ठेवावी. जोंपर्यंत तो दवाखाना आहे, तोंपर्यंत रा. ब. हे जगांत आहेत असें होईल.

आपण विचारशील आहांत, करितां या प्रसंगीं विवेक करुन आलेल्या प्रसंगास पाठ दिली पाहिजे.

आम्हीं मोठया खेदानें परम दुःखित होऊन विनंती करतों कीं, परमेश्वर रा. ब. यांच्या आत्म्यास मुक्ति देवो अशी त्याजपाशीं प्रार्थना आहे.

सह्याः—

१ लक्ष्मणराव कृष्णराव घोरपडे-पेनशनर.
१ वंडोबा मल्हारबा शेट—कंत्राटदार.
१ रामचंद्रराव कृष्णराव घोरपडे.
१ तुकाराम घासीराम—कंत्राटदार.
१ नारायणराव रघुनाथराव नवलकर.
१ हरिश्चंद्र नारायणराव नवलकर.

॥ श्री ॥

विद्यावैभवादि उत्तम गुणसंपन्न रा. रा. नानासाहेब, तात्यासाहेब, आणि आप्पासाहेब देशमुख मु. पुणें यांस—

खालीं सह्या करणारे राहणार मुंबई यांजकडून कळविण्यांत येत आहे कीं, आपले प्रिय जनक व प्रसिद्ध लोकहितवादी सरदार रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांस ता. ९ माहे अक्टोबर सन १८९२ इ. रविवार रोजी देवाज्ञा झाल्याचें खेदकारक वर्तमान, पत्रांतून प्रसिद्ध झाल्याचें पाहून आमचे मनास बहुत दुःख होत आहे. ह्या भारतभूमीचे प्रसिद्ध इतिहासकार नाहींसे झाले; भारतीय विद्येचे निधान हरपलें, मराठे लोकांत विद्यावृद्धी करणारे उदार गृहस्थ निरंतर दुरावले; शेतकऱ्यांचें हितचिंतक व त्यांना उत्तमावस्थेत आणणारे बळकट स्तंभ अवचित भंगले; आतां आमच्या मराठे मंडळांतील सुजन मनुष्यांची इतर वर्गास ओळख कोण करून देतो? शेतकऱ्यांची स्थिति जाणून त्यांचीं सुखदुःखें ऐकून घेऊन त्यांना सुखप्राप्तीचीं साधनें कोण करून देतो? आतां आम्हीं आपलीं सुखदुःखें कोणाचें कानीं घालावीं? आमचे पुढारी व्हा! आमची दाद लावा!! आमच्या तरणोपायाचे मार्ग आम्हास दाखवा! असें आम्हीं कोणास विनवावें? एकंदरीत आम्हां शेतकरी वर्गाचें, आम्हा महाराष्ट्रीयांचें, आम्हा हिंदु जनांचें तेजोमय अमोल रत्न एकाएकीं हरपलें; त्यामुळें आमचें अवर्णनीय व कधींही भरून न येणारें नुकसान झालें आहे.

आम्हां इतर जनांची जर अशी अवस्था झाली आहे, तर आपणांवर आणि आपल्या कुटुंबावर दुःखाचा मेरूच कोसळला आहे. ह्या परम दुःखाचें विस्मरण आपणांस कधींही व्हावयाचें नाहीं. ह्या मर्त्य लोकाची स्थिति अशीच आहे असें अनेक महाजनांनीं म्हटलें आहे, तें असें—

श्लोक

**जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।**

भगवद्गीता

श्लोक

**पण्डिते चैव मूर्खे च बलवत्यपि दुर्बले**
**ईश्वरे च दरिद्रे च मृत्योः सर्वत्र तुल्यता ॥**

आर्या

**सर्वहि अनित्य दुःखचि, लोक जरिहि परम हा गमे रुचिर**
**किति नर हा याचा अढळ दिसे पर महाग मेरु चिर ॥**

मोरोपंत

ओव्या

**मृत्यु न म्हणे हा भूपति । मृत्यु न म्हणे हा चक्रवर्ती ।**
**मृत्यु न म्हणे हा करामती । कैवाड जाणे ॥**
**मृत्यु न म्हणे हा पुण्य पुरुष । मृत्यु न म्हणे हा हरिदास ॥**
**मृत्यु न म्हणे हा विशेष । सुकृति नर ।**
**गेले बहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे ।**
**गेले अगाध महिमेचे । मृत्युपंथें ॥**

**रामदास.**

वर लिहिल्याप्रमाणें मृत्युमहिमेची सीमा प्रत्येकास समजण्यासारखी आहे. काळानें आम्हांस सोडलें नाहीं ! यास्तव विवेकबळें करून दुःखाचें निरसन करावें—**ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें, चित्तीं असो द्यावें समाधान—**

ह्या संत शिरोमणि महाराज तुकाराम यांच्या वचनाचा विचार करून आपलें मनाचें शांतवन करावें. हेंच आमचें नम्रतापूर्वक मागणें आहे. कळावें ही विनंति.

मुंबई ता. १९ माहे अक्टोबर सन १८९२.

आपले नम्रसेवक

**१ सदाशिव सखाराम हंडे देशमूख.**
**१ द्वारकोजी केशवजी धोंडकर पंच क्राफर्ड मार्केट.**
**१ धमाजी बाळाजी रुकारे जे० पी० व कंट्राक्टर.**
**१ तुकोजीराव गोपाळराव महाडिक.**
**१ माधवराव राघोजी रोकडे जे० पी० प्रोप्रायटर.**

मराठे मंडळीची शाळा

श्री नंबर ११३/१८९२

रयतेच्या एजन्सीची कचेरी—पुणें—ता० १९ आक्टोबर १८९२

श्री० रा० रघुनाथ गोपाळ उर्फ तात्या साहेब देशमूख आणि बंधुवर्ग

—स्वामींचे सेवेसी—

स्वामी आणि प्रजाकार्यसेवक भास्कर रामचंद्र सहस्त्रबुद्ध म्यानेजर रयतेची एजन्सी, पुणें कृतानेक सा० नमष्कार वि० वि० कै० रा० ब० सरदार गोपाळराव हरि देशमूख यांचे मृत्युपासून अनाथ आणि अशिक्षित लोकांचें आजमितीस किती मोठें नुकसान झालें आहे याची थोडक्यांत हकीकत सोबतच्या जोडलेल्या इंग्रजी पत्रकांत दिलेली आहे. रावसाहेबांच्या मृत्युमुळें आपणा सर्व कुटुंबांतील माणसांस जें दुःख झालें असेल, त्याच्या दसपट अगर शतपट दुःख अनाथ आणि गरजू अशा बहुजन समुदायास झालेलें आहे. कारण रावसाहेबांच्या भूतदयेच्या सावलीखालीं पुष्कळांस आराम मिळत होता. तेव्हां या प्रांतांतील सर्व अडाणी आणि गरीब प्रजा रावसाहेबांच्या आश्रयास आणि औदार्यास पराङ्मुख झाल्यामुळें दुःखार्णवीं बुडाली आहे. त्यांचेकडे पाहून आपण आपलें दुःख विसराल अशी सर्वांस आशा आहे.

रावसाहेबांनीं ज्या अनेक सार्वजनिक संस्थेस वेळोवेळीं द्रव्यद्वारा आणि शरीरद्वारां जी मदत केलेली आहे, ती सर्व कृत्येंच त्यांचीं स्मारकें आहेत, ही गोष्ट अगदीं खरी आहे. परंतु ज्या असंख्य जनसमुदायावर रावसाहेबांचे उपकार आहेत, त्यांनीं आपली कृतज्ञता प्रदर्शित करणें अगदीं वाजवी आहे असें समजून रावसाहेबांनीं आपल्या हयातींत बहुतखर्चानें जो धर्मार्थ आर्यऔषधांचा दवाखाना काढला आहे, तोच भरभराटीस येऊन खेड्यापाड्यांतील रयत लोकांस शाळामास्तर लोकांचे मार्फत औषधें मिळत जावीं, अशी खटपट करण्याबद्दल रयतलोकांची खरी इच्छा आहे. आणि ह्या कृत्यास रयत लोकांच्या शक्तिनुसार रयतलोक मदत करण्यास तयार आहेत. तरी रयत लोकांस कै० रावबहादुरांचा जो आश्रय होता तो तुटला नाहीं, असें दाखविण्याचें काम आपल्यावर येऊन पडलें आहे तरी तें आपल्या हातून सुकीर्तीनें शेवटास जावो अशी जगन्नियंत्या परमेश्वराची प्रार्थना करून हा विनंतिलेख आपणा सर्वांचे चरणीं अर्पण करीत आहे.

कळावें लोभ असावा हे विनंति.

**भास्कर रामचंद्र सहस्रबुद्धे.**

मॅनेजर—रयतेची एजन्सी, पुणें.

ग्रा. क्र. ८०३६ नों. दि
दि.

समाप्त.

IRBK-0100736